

# अंतरंग

## समलिंगी मुलामुलींच्या आत्मकथा

संकलन : बिंदुमाधव खिरे

**टिपणी:** या पुस्तकाचे प्रकाशन जून २०१३ साली झाले. त्यातील काही वैद्यकीय/कायदेविषयक माहिती आता कालबाह्य झालेली आहे.
प्रकाशनानंतर वैद्यकीय/कायद्यात झालेले काही बदल :
- साल २०१३: तृतीयपंथी, द्विलिंगी (Intersex) व्यक्तीला व इतर कोणाही व्यक्तीला त्याचा/तिचा लिंग भावानुसार जेंडर/लिंग भाव ठरवण्याचा कायदेशीर अधिकार आहे- स्त्री, किंवा पुरुष किंवा तृतीयपंथी.
- भा.द.स. ३७७ कलम आता बदलले आहे. ०६.०९.२०१८ पासून दोन प्रौढ व्यक्तींनी संमतीने खाजगीत समलिंगी संबंध करणे आता गुन्हा नाही.
- साल २०१४: भारतीय मानसोपचारतज्ज्ञ संस्था (IPS-Indian Psychiatric Society) समलैंगिकतेला, किंवा तृतीयपंथी असण्याला आजार मनात नाही.
- २५.०८.२०२२ पासून समलैंगिक लैंगिक कल बदलायचा प्रयत्न करणे, किंवा तृतीयपंथी व्यक्तीचा लिंग भाव बदलायचा प्रयत्न करण्यास (any form of Conversion Therapy) कायद्याने बंदी घालण्यात आली आहे.

**Note:** This book was published in June 2013. Some of the medical/legal information provided in the book is now outdated. Some of the medical/legal updates are given below:
-2013: Transgender persons, Intersex persons and all other persons have the legal right to identify as male or female or transgender as per their legal identity.
- IPC377 has now changed. From 06.09.2018, gay sex between two consenting adults in privacy is not a crime.
- Year 2014: Homosexuality, Bisexuality, Transgender gender identity is not an illness or disorder (Indian Psychiatric Society (IPS)).
- From 25.08.2022 attempts to convert homosexual/bisexual sexual orientation to heterosexual orientation or trying to change the psychological gender identity of any person (any form of Conversion Therapy) is now banned by law.

# अंतरंग

'गे' मुलामुलींच्या आत्मकथा

**संकलन : बिंदुमाधव खिरे**

© या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुन:प्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक आणि प्रकाशक दोघांचीही लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

# अंतरंग

## 'गे' मुलामुलींच्या आत्मकथा

संकलन : बिंदुमाधव खिरे

**प्रकाशक**
समपथिक ट्रस्ट
१००४, बुधवार पेठ, ऑफिस नंबर ९,
(विजय मारुती चौकाजवळ)
पुणे - ४११ ००२
फोन - (०२०) ६४१७९११२
E-mail : samapathik@hotmail.com

**अक्षरजुळणी, ले-आउट**
चंद्रशेखर बेगमपुरे

**मुखपृष्ठ**
नीलम नागवेकर

आवृत्ती पहिली : जून २०१३

**किंमत : रु. १५०/-**

# अंतरंग

'गे' मुलामुलींच्या आत्मकथा

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| सूची | | ०५ |
| प्रस्तावना | | ०७ |
| ऋणनिर्देश | | १६ |
| **भाग एक- माहिती** | | |
| (अ) | **वैद्यकीय- डॉ. भूषण शुक्ल** | १७ |
| (ब) | **कायदा-** | २५ |
| | **श्री. भानुप्रताप बर्गे** | |
| | वरिष्ठ पोलिस निरीक्षक | २६ |
| **भाग दोन- लेस्बियन मुलींच्या आत्मकथा** | | |
| (१) | **नलिनी** (मुंबई) | २९ |
| (२) | **सपना** (मुंबई) | ३९ |
| (३) | **नेहा** (पुणे) | ४७ |
| (४) | **शोभना** (मुंबई) | ५८ |
| **भाग तीन- गे मुलांच्या आत्मकथा** | | |
| (५) | **प्रणेश** (जळगाव) | ६५ |
| (६) | **मयूर** (सातारा) | ७५ |
| (७) | **अशोक** (परभणी) | ९८ |
| (८) | **आदित्य** (अहमदनगर) | १०३ |
| (९) | **शिशिर** (पुणे) | ११३ |
| (१०) | **उमेश** (परभणी) | १२० |
| (११) | **आतिश** (पुणे) | १२३ |

| | | |
|---|---|---|
| (१२) | रोहित (सोलापूर) | १३२ |
| (१३) | राहुल (नाशिक) | १३७ |
| (१४) | जमीर (पुणे) | १४३ |
| (१५) | अजित (चंद्रपूर) | १५० |
| (१६) | मंदार (नाशिक) | १५७ |
| (१७) | विद्यासक्त (पुणे) | १६० |
| परिशिष्ट-(अ) अधिक वाचन | | १७४ |
| (ब) संस्था | | १७५ |

# सूची

| | | |
|---|---|---|
| **गे/होमोसेक्शुअल** | : | समलिंगी व्यक्ती |
| **लेस्बियन** | : | समलिंगी स्त्री |
| **एमएसएम** (MSM) | : | पुरुषांबरोबर लैंगिक संबंध करणारे पुरुष (Men who have Sex with Men) |
| **होमोफोबिया** | : | समलिंगी व्यक्तीची, समलिंगी जीवनशैलीची भीती व त्यातून उत्पन्न होणारा द्वेष |
| **बायसेक्शुअल** | : | उभयलिंगी व्यक्ती |
| **हेटरोसेक्शुअल/स्ट्रेट** | : | भिन्नलिंगी व्यक्ती |
| **आउट** (Out) | : | आपण समलिंगी आहोत हे इतरांना सांगणं |
| **क्लोजेट** (Closet) | : | आपण समलिंगी आहोत हे इतरांपासून लपवणं |
| **रिसेप्टिव्ह जोडीदार/बॉटम** | : | लैंगिक संबंधात स्त्रीची भूमिका घेणारा (स्वीकृत) जोडीदार |
| **इन्सर्टिव्ह जोडीदार/टॉप** | : | लैंगिक संबंधात पुरुषाची भूमिका घेणारा जोडीदार |
| **जेंडर आयडेंटिटी** | : | लिंगभाव (व्यक्ती स्वत:ला मानसिकदृष्ट्या पुरुष समजते का स्त्री समजते तो त्या व्यक्तीचा लिंगभाव असतो.) |
| **टीजी** | : | ट्रान्सजेंडर (जे पुरुष स्वत:ला स्त्री मानतात/ज्या स्त्रिया स्वत:ला पुरुष मानतात) |
| **'एलजीबीटीक्यूआय'** | : | लेस्बियन, गे, बायसेक्शुअल, ट्रान्सजेंडर, क्वीअर, इंटरसेक्स |

# प्रस्तावना

## माझ्याबद्दल थोडंसं

मी बिंदुमाधव खिरे. पुण्यात एका मध्यमवर्गीय, सनातनी, धार्मिक कुटुंबात वाढलो. वयात आल्यावर मला पुरुषांबद्दल भावनिक व शारीरिक आकर्षण वाटू लागलं. स्त्रियांबद्दल अजिबात आकर्षण वाटत नव्हतं. (तेव्हा 'समलिंगी' हा शब्द माहीत नव्हता.) इतर मित्रांसारख्या मला स्त्रिया आवडत नाहीत, पुरुष आवडतात या गोष्टीचा मला खूप त्रास झाला. मी या इच्छांना पाप समजायचो. साहजिकच याचा माझ्या स्वप्रतिमेवर, आकांक्षांवर परिणाम झाला. माझा आत्मविश्वास खचला. खूप नैराश्य आलं. आत्महत्या करावी असा विचार मनात आला. मी स्वत:चा द्वेष करू लागलो. एखादा बॉयफ्रेंड मिळवावा असं वाटायचं, पण ती इच्छा मनात येताच मी किती घाणेरडा आहे असा विचार मनात यायचा. पुढे स्त्रीशी लग्न झालं, वर्षात घटस्फोट झाला.

अंदाजे १९९८-१९९९मध्ये अमेरिकेत असताना (मी कम्प्युटर सायन्स इंजिनिअर होतो व काही वर्षं अमेरिकेत नोकरीसाठी होतो.) मी सॅन फ्रॅन्सिस्कोतील 'त्रिकोण' नावाच्या समलिंगी आधार संस्थेची मदत घेतली. मला या संस्थेत माझ्यासारखे अनेक भारतीय समलिंगी पुरुष भेटले. त्यांच्या सहवासात मी स्वत:ला स्वीकारायला लागलो. माझ्या मनावरचं ओझं उतरलं. माझ्यामध्ये कमालीचा फरक पडला. २०००च्या सुरुवातीला मी कायमचा पुण्यात आलो.

घरचे माझ्या दुसऱ्या लग्नाचा विचार करत होते. (तोवर घरच्यांना मी समलिंगी आहे हे माहीत नव्हतं.) मी पुण्यात आल्या आल्या त्यांना सत्य सांगितलं. त्यांना खूप धक्का बसला. आईनी साधू/बाबांची मदत घेतली. वडिलांनी मी गेल्या जन्माचं पाप आहे असं स्पष्ट सांगितलं. शेवटी मी आईला मानसोपचारतज्ज्ञांकडे घेऊन गेलो.

त्यांनी तिची समजूत काढली, की माझ्यात काहीही दोष नाही. काही कमी नाही. तेव्हा हळूहळू मी बदलेन ही तिची आशा विरली. आता दुसरा पर्याय नाही, हे दिसल्यावर मला स्वीकारायचा ती प्रयत्न करू लागली. मी आईवडिलांबरोबर राहत असलो तरी वडील मात्र माझ्याशी या विषयावर आजही काही बोलत नाहीत, पण मला विरोधही करत नाहीत.

पुण्यात आल्यावर काही काळानी मी नोकरी सोडली व सप्टेंबर २००२मध्ये 'समपथिक ट्रस्ट' ही समलिंगी, ट्रान्सजेंडर, हिजडे व इंटरसेक्स व्यक्तींसाठी संस्था सुरू केली. उद्दिष्ट होतं, की अशा लैंगिकता असलेल्या व्यक्तींसाठी एक 'ड्रॉप इन सेंटर' चालवावं, या विषयाची शास्त्रीय माहिती द्यावी. त्यांना आपली लैंगिकता स्वीकारण्यास मदत करावी. त्यांना अधिकारांची जाणीव करून द्यावी व आरोग्य आणि कायद्याच्या विविध सुविधा पुरवाव्यात.

हे काम करताना सातत्यानी जाणवत होतं, की या विषयांवर मराठी लिखाण जवळजवळ नगण्य आहे. म्हणून 'पार्टनर', 'इंद्रधनू-समलैंगिकतेचे विविध रंग', 'लैंगिक शिक्षण, एच.आय.व्ही./एड्स हेल्पलाइन मार्गदर्शिका', 'मानवी लैंगिकता - एक प्राथमिक ओळख', ही पुस्तकं लिहिली. या वंचित समाजाबद्दल असलेल्या अन्य समाजाच्या पूर्वग्रहदूषित दृष्टीत बदल व्हावा, या समाजाला त्यांचे अधिकार मिळून, त्यांना ताठ मानेनं समाजात वावरता यावं, या उद्देशानं ही पुस्तकं लिहिण्याचा खटाटोप केला.

हा प्रवास चालू असताना मी एका पुरुषाच्यां प्रेमात पडलो. हे नातं फार टिकलं नाही. हे नातं तुटल्याचा मला प्रचंड त्रास झाला. नैराश्य आलं, कामातून लक्ष उडालं. महत्त्वाकांक्षा मेली. अत्यंत कष्टानं उभी केलेली स्वप्रतिमा कोसळली. कशाला जगायचं असं वाटू लागलं. मानसोपचारतज्ज्ञ डॉ. भूषण शुक्ल यांच्याकडे जाऊन मी अनेकवेळा

रडलो. नैराश्य कमी व्हावं म्हणून औषधं घेतली. माझ्या आईलाही माझा त्रास कळत होता, पण ती काही करू शकत नव्हती. माझे सहकारी आणि जवळचे मित्र रमेश अनमूलवार, सचिन वागलगावे आणि टिनेश चोपडे यांनी मला खूप मोठा आधार दिला. सहा ते आठ महिन्यांनी मी या नैराश्यातून बाहेर आलो. हळूहळू परत कामात लक्ष देऊ लागलो. परत नव्या जोमाने काम करू लागलो.

११ डिसेंबर २०११ला मी पुण्यात पहिल्यांदा समलिंगी, ट्रान्सजेंडर, हिजडे, इंटरसेक्स यांचा 'अभिमान मोर्चा' काढला ('प्राइड परेड'). पोलिसांनी या मोर्चाला परवानगी दिली. इंग्रजी वर्तमानपत्रांतून या मोर्चाला चांगली प्रसिद्धी मिळाली.

या यशाने माझं मनोबल परत वाढलं. वाटू लागलं, की आता नुसतं पुणे, पीसीएमसी (पिंपरी-चिंचवड महानगरपालिका) एवढाच वकूब न ठेवता, महाराष्ट्रातील अशा सर्व व्यक्तींसाठी काहीतरी करावं. तेव्हा सुचलं, की महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आपण समलिंगी व्यक्तींच्या आत्मकथा मिळवून त्या संकलित कराव्यात.

लोकं ज्या ज्या समाजाची थट्टा करतात, ज्यांचा द्वेष करतात, ज्यांना मुख्य प्रवाहातून बहिष्कृत करतात, त्यांची माणूस म्हणून समाजाला ओळख व्हावी या उद्दिष्टांनी चार पुस्तकांचं संकलन करायचा मनसुबा रचला.

(१) समलिंगी मुलामुलींच्या पालकांच्या आत्मकथा.
(२) तृतीयपंथी व ट्रान्सजेंडर मुलामुलींच्या आत्मकथा.
(३) समलिंगी मुलामुलींच्या आत्मकथा.
(४) इंटरसेक्स व्यक्तींच्या आत्मकथा.

या शृंखलेतलं हे तिसरं पुस्तक.

*****

## 'गे' शब्दाचा अर्थ

गे हा शब्द मराठीतला नाही. तो इंग्रजी शब्द आहे. गे या शब्दाचा पूर्वीचा अर्थ 'आनंदी'. हळूहळू हा शब्द समलिंगी व्यक्तींसाठी वापरात आला. आता बहुतांशी वेळा गे हा शब्द समलिंगी व्यक्तींसाठी वापरला जातो.

## 'समलिंगी' शब्दाचा अर्थ

वयात आल्यावर कोणत्या लिंगाच्या व्यक्तीबद्दल भावनिक व लैंगिक आकर्षण जाणवतं तो आपला लैंगिक कल (Sexual Orientation) असतो. अनेक मुलांना लैंगिक व भावनिक आकर्षण फक्त मुलींबद्दलच जाणवतं. तसंच अनेक मुलींना लैंगिक व भावनिक आकर्षण फक्त मुलांबद्दलच जाणवतं. अशा विरुद्ध लिंगाच्या व्यक्तींबद्दल भावनिक व लैंगिक आकर्षणाला 'भिन्नलिंगी लैंगिक कल' म्हणतात.

काही मुलांना लैंगिक व भावनिक आकर्षण काही मुलांबद्दल व काही मुलींबद्दल जाणवतं. तसंच काही मुलींना भावनिक व लैंगिक आकर्षण काही मुलांबद्दल व मुलींबद्दल जाणवतं. अशा दोन्ही लिंगाच्या व्यक्तींबद्दल भावनिक व लैंगिक आकर्षण असण्याला 'उभयलिंगी लैंगिक कल' म्हणतात.

काही मुलांना लैंगिक व भावनिक आकर्षण फक्त मुलांबद्दलच जाणवतं. तसंच काही मुलींना लैंगिक व भावनिक आकर्षण फक्त मुलींबद्दलच जाणवतं. अशा समान लिंगाच्या व्यक्तींबद्दल भावनिक व लैंगिक आकर्षण असण्याला 'समलिंगी लैंगिक कल' म्हणतात.

समलिंगी शब्दाव्यतिरिक्त मराठीत अनेक शब्द आहेत, जे समलिंगी व्यक्तींसाठी वापरले जातात. पण हे सर्व शब्द हिणकस, तुच्छता दर्शवणारे, थट्टेने वापरलेले शब्द आहेत. उदा., गांडू, बुळ्या, बुळग्या.

## 'एमएसएम' शब्दाचा अर्थ

समलिंगी या शब्दाव्यतिरिक्त काही संस्थांमध्ये एमएसएम हा शब्द

वापरला जातो. 'मेन हू हॅव सेक्स विथ मेन' (पुरुषांशी लैंगिक संबंध करणारे पुरुष). पण एमएसएम हा समलिंगी या शब्दाला पर्यायी शब्द नाही. एमएसएम हा लैंगिक कृती दर्शवतो, ती लैंगिक ओळख (Sexual Identity) नाही. एमएसएम लैंगिक कल दर्शवत नाही तसेच समलिंगी व्यक्तीच्या भावना, जीवनशैली याबद्दल काहीच सांगत नाही.

**एमएसएम हा शब्द कसा आला?**

समलिंगी संबंध करणाऱ्या पुरुषांमध्ये असुरक्षित (बिन निरोधाचा) संभोगाचं प्रमाण जास्त असल्यामुळे एचआयव्ही संसर्गित पुरुषांकडून इतर पुरुषांमध्ये एचआयव्हीचा प्रसार जास्त प्रमाणात होऊ लागला. या एचआयव्हीच्या प्रसारास आळा घालण्यासाठी सरकारने या समूहासाठी विविध उपक्रम हाती घेतले. मोफत निरोध पुरवणे, गुप्तरोगांवर मोफत उपचार करणे, एचआयव्हीची मोफत चाचणी करणे इत्यादी. म्हणून 'समलिंगी लैंगिक वर्तन करणाऱ्या पुरुषांचा समूह' असे दर्शवणारा एमएसएम हा शब्द तयार झाला.

**'गे' जीवनशैली**

गे हा शब्द फक्त लैंगिक आकर्षण दर्शवत नाही. यात एक पूर्ण समलिंगी जीवनशैली सामावली आहे. म्हणजे गे असणं नुसतं लैंगिक आकर्षणाशी निगडित नसून त्याच्याबरोबर त्या व्यक्तीचे इतरही पैलू जोडलेले आहेत. वयात आल्यावर आपण वेगळे असल्याची आपल्याला आलेली जाण, स्वत: लैंगिकतेशी दिलेला लढा, स्वत:च्या लैंगिकतेचा स्वीकार, समाजाच्या तिरस्काराला सामोरं जाणं, आपल्या अधिकारांची जाण, 'आउट' होण्याचा निर्णय, समलिंगी जोडीदाराशी असलेलं नातं, समलिंगी मित्रांचा आधार, इत्यादी. अशा अनेक छटा गे जीवनशैलीशी निगडित आहेत.

*****

## ‘होमोफोबिया’ ( समलिंगी व्यक्तींचा द्वेष)

होमोफोबिया म्हणजे समलिंगी व्यक्तीची भीती व त्यातून उत्पन्न होणारा द्वेष. प्रामुख्याने भिन्नलिंगी असलेल्या समाजात होमोफोबिया हा सर्व समलिंगी व्यक्तींच्या वाट्याला येतो. मी या समलिंगीद्वेष्ट्या समाजात समलिंगी म्हणून या अग्निदिव्यातून गेलो आहे, जात आहे. तसे अनेकजण जात आहेत, जाणार आहेत. भिन्नलिंगी समाजाच्या हिणकस दृष्टीमुळे येणारे नैराश्य, आत्महत्येचे विचार, रसातळाला गेलेली अस्मिता, बेफिकिरी, विध्वंसक वृत्ती अनेक समलिंगी व्यक्तींच्या वाट्याला आली आहे. या समलिंगीद्वेष्ट्या दृष्टीमागे धर्माची चुकीची शिकवण आहे, लोकांमधील गैरसमज आहेत, जुन्या वैद्यकीय शास्त्राची चुकीची शिकवण आहे आणि जुने, बुरसटलेले कायदे आहेत. या सर्व गोष्टींमुळे समलिंगी व्यक्तींना समाजानं माणूस म्हणून जाणण्याचा प्रयत्न केलेला नाही.

अनेक धर्मग्रंथांत समलैंगिकतेला पाप मानलं आहे. या बाबतीत सर्व धर्मांत समभाव दिसतो, म्हणून समलिंगीद्वेष्ट्या नजरेला धर्माची मान्यता मिळाली.

हे पुरेसं नाही, की काय म्हणून ‘समलैंगिकता भारतात नव्हती, ते पाश्चात्त्य फॅड आहे’ असाही गैरसमज झालेला दिसतो. लोक विसरतात (किंवा त्यांना सांगितलेलं नाही), की अनेक भारतीय प्राचीन ग्रंथांत समलैंगिकतेचे उल्लेख आहेत. उदा., ‘मनुस्मृती’, ‘कामसूत्र’ इत्यादी. काही प्राचीन देवळांवरची शिल्पं समलिंगी संबंध दर्शवतात. समलैंगिकता परदेशातून आलेली नाही. परदेशातून आली ती मानवी अधिकारांची जाण, त्यांच्या चळवळीतून मिळालेलं प्रोत्साहन, हिंमत. अनेकांचं मत आहे, की निसर्गात असे संबंध दिसत नाहीत म्हणून ते अनैसर्गिक आहेत. हेही चूक आहे, कारण निसर्गात अनेक प्राणी, पक्ष्यांमध्ये समलिंगी संबंध दिसतात.

काहींचा गैरसमज आहे, की लहानपणी मुलांचं लैंगिक शोषण झालं तर ती समलिंगी बनतात. माझं आणि या पुस्तकातल्या काहीजणांचं असं कोणतंही लैंगिक शोषण झालेलं नाही आणि तरी आम्ही समलिंगी आहोत.

काहींचा समज असतो, की समलिंगी पुरुषांमध्ये, पुरुषांचे मानले गेलेल्या संप्रेरकांचे ('हार्मोन्स') प्रमाण कमी असेल आणि स्त्रियांचे मानले गेलेल्या संप्रेरकांचे प्रमाण जास्त असेल म्हणून ते पुरुष समलिंगी आहेत. यात काहीही तथ्य नाही. भिन्नलिंगी पुरुषांमध्ये आणि समलिंगी पुरुषांमध्ये असं कोणतंही वैविध्य आढळत नाही.

आपलं मूल समलिंगी आहे हे कळल्यावर काही पालकांना अपराधीपणा वाटतो, की आपण आपल्या मुलाला वाढवण्यात काहीतरी चूक केली असेल, म्हणून तो 'असा' झाला. पालकांनी अपराधी वाटून घ्यायचं काहीही कारण नाही कारण मुलाला/मुलीला कसं वाढवलं जातं यावर त्यांचा लैंगिक कल ठरत नाही.

या समाजात असलेले समलिंगी व्यक्तींबद्दलचे गैरसमज व द्वेष दूर व्हावा, त्यांचा मणूस म्हणून स्वीकार व्हावा म्हणून समलिंगी मुलामुलींनी अत्यंत तळमळीनी व प्रामाणिकपणाने आपल्या आत्मकथा या पुस्तकात लिहिल्या आहेत.

*****

**या पुस्तकाचा प्रवास**

समलिंगी व्यक्तींच्या आत्मकथा मिळवताना अनेक गोष्टींचा विचार केला. पहिली गोष्ट- समलिंगी पुरुष व समलिंगी स्त्रिया (लेस्बियन) या दोघांचा याच पुस्तकात समावेश असावा. दुसरी गोष्ट- प्रतिनिधित्व. समलिंगी व्यक्ती फक्त पुण्या-मुंबईत नाहीत. त्या प्रत्येक शहरात,

गावात आहेत. आता अनेक जिल्ह्यांत समलिंगी समाजाबरोबर काम करणाऱ्या संस्था आहेत. म्हणून मी 'पाथफाईंडर', 'अॅव्हर्ट', 'महाराष्ट्र एड्स नियंत्रण संस्था' या फंडिंग एजन्सीजकडून या संस्थांचे कॉन्टॅक्ट्स मिळवले व त्या संस्थांना या पुस्तकाची माहिती दिली. त्यांना विनंती केली, की त्यांनी त्या त्या जिल्ह्यांतील समलिंगी व्यक्तींना या प्रकल्पाबद्दल सांगावं. यांच्या व्यतिरिक्त माझ्या कॉन्टॅक्टमधील समलिंगी व्यक्तींशी मी संपर्क साधला. उद्दिष्ट हे, की समाजातील विविध स्तरांतील, विविध अनुभवांतून गेलेल्या समलिंगी व्यक्तींचं अंतरंग या पुस्तकात उमटावं. शहरातील/खेड्यातील, शिक्षित/अशिक्षित, घरच्यांना आपण समलिंगी आहोत हे सांगितलेले, घरच्यांपासून आपण समलिंगी आहोत हे लपवलेले, लग्न न केलेले/लग्न केलेले, मानसिक/शारीरिक आजार असलेले, विकलांग असलेले, नात्यांमध्ये पुरुषांशी एकनिष्ठपणे नाते जोपासलेले/एकनिष्ठतेवर विश्वास न ठेवणारे, परदेशात राहिलेले/परदेशात कधी न गेलेले असे विविध अनुभव या पुस्तकात वाचायला मिळतील.

एक महत्त्वाची उणीव लक्षात आली, ती म्हणजे वयस्कर समलिंगी व्यक्तींच्या आत्मकथा यात नाहीत. लिहिणारे सर्वजण वयाच्या विशी ते चाळीशीतले आहेत.

पुण्यात या पुस्तकाविषयी समलिंगी व्यक्तींबरोबर एक बैठक घेतली व काही महत्त्वाच्या गोष्टी ठरवल्या -

- ज्यांना खरं नाव द्यायचं नाही, त्यांनी टोपणनावानी लिहावं.
- लिहिणारी व्यक्ती निदान पाच वर्षं महाराष्ट्रात राहिलेली असावी, जेणेकरून महाराष्ट्रातील संस्कृतीची छाप त्याच्या आत्मकथेत उतरेल.
- प्रामाणिकपणा अत्यंत महत्त्वाचा मानला.

काहींनी चटदिशी आत्मकथा लिहून दिल्या. काहींना थोडा वेळ लागला. अनेकांनी मात्र 'देतो', 'नक्की देतो' असं सांगूनही शेवटी

दिल्या नाहीत. परत परत मागे लागून शेवटी कंटाळून मी नाद सोडला. त्यामुळे विचारलेल्यांपैकी कोल्हापूर, लातूर, बीड, यवतमाळ, नंदुरबार, नागपूर, सिंधुदुर्ग इथून एकही आत्मकथा आली नाही. असं असूनसुद्धा पुणे, मुंबई, अहमदनगर, परभणी, जळगांव, सोलापूर, सातारा, नाशिक, चंद्रपूर या जिल्ह्यांचं प्रतिनिधित्व मिळालं.

शिशिरची कथा त्यानी इंग्रजीमधून लिहिली, त्याचं भाषांतर मयूरनी केलं. नेहा व शोभनानी त्यांच्या कथा इंग्रजीमधून लिहिल्या, त्यांचं भाषांतर मी केलं. सपना व नलिनी यांनी मला त्यांच्या आत्मकथा सांगितल्या. त्या मी रेकॉर्ड केल्या व मग टाइप करून घेतल्या.

आधुनिक वैद्यकीय व कायद्याची माहिती समजावी म्हणून मानसोपचारतज्ज्ञ डॉ. भूषण शुक्ल व सामाजिक सुरक्षा विभाग, पुणेचे वरिष्ठ निरीक्षक श्री. भानुप्रताप बर्गे यांच्या मुलाखती घेतल्या.

हे पुस्तक या लेखकांच्या धाडसाशिवाय होऊ शकलं नसतं. म्हणून हे पुस्तक या सर्वांना अर्पण करतो. आशा करतो, की यापुढे अशा तऱ्हेची अनेक पुस्तकं येत राहतील. हे पुस्तक आणि आगामी येणारी पुस्तकं समलिंगी व्यक्तींना दिलासा देतील, त्यांच्या कोंडमाऱ्याला वाचा फोडतील. भिन्नलिंगी समाज समलिंगी व्यक्तींबद्दल संवेदनशील बनेल व आम्हा समलिंगी व्यक्तींना या समाजात मानानी वावरता यावं यासाठी, समलिंगी व्यक्तींच्या अधिकारांसाठी, आमच्या खांद्याला खांदा देऊन उभा राहील.

बिंदुमाधव खिरे
जून २०१३

*****

# ऋणनिर्देश

या गोष्टी संकलित करण्यास अनेकजणांची मदत झाली. सर्वप्रथम या पुस्तकासाठी ज्यांनी आपल्या आत्मकथा लिहिल्या/सांगितल्या त्यांचा मी मनापासून आभारी आहे. त्यांनी धाडस करून अत्यंत प्रामाणिकपणे जगासमोर त्यांचे अनुभव, विचार मांडले आहेत.

या कथांसाठी विविध समलिंगी व्यक्तींपर्यंत पोहोचण्यासाठी मला पाथफाईंडर इंटरनॅशनलचे डॉ. कांचन पवार, सुशील अहिरे, महाराष्ट्र एड्स नियंत्रण संस्थेच्या जॉइन्ट डायरेक्टर अवशरण मॅडम, केतन पवार, 'अॅव्हर्ट'च्या अमिता अभिचंदानी, 'केएचपीटी'चे डॉ. प्रशांत देशपांडे, 'निरामय आरोग्य धाम'च्या सीमा किणीकर, 'प्रवरा मेडिकल ट्रस्ट' (नाशिक)चे कुलदीप पवार, 'क्वीअर इंक'च्या शोभना कुमार यांनी मदत केली.

नीलम नागवेकर यांनी मुखपृष्ठ रेखीत केलं. चंद्रशेखर बेगमपुरे यांनी पुस्तकाचं डीटीपी व ले-आउट केला. माधुरी चव्हाण यांनी व्याकरण व शुद्धलेखन तपासलं. अरविंद नारायण व डेव्हिड यांनी कायदेशीर बाबींवर मदत केली.

या उपक्रमात हमसफर ट्रस्टचे अशोक राव कवी व विवेक राज आनंद माझ्या पाठीशी उभे राहिले. मी या कामात व्यस्त असताना प्रोजेक्ट डायरेक्टर टिनेश चोपडे यांनी 'समपथिक ट्रस्ट' (मी स्थापन केलेली संस्था) समर्थपणे व मनापासून सांभाळली. या पुस्तकाच्या कामात मला परीक्षित शेटे, पायल, सुजीत आणि अश्पाक यांनी मदत केली. या सर्वांचे आभार मानावे तेवढे थोडे आहेत.

*****

# भाग एक - माहिती

## (अ) डॉ. भूषण शुक्ल (MD, DNB, FRCH Psychiatry)

• डॉ. भूषण शुक्ल हे एक नामवंत मानसोपचारतज्ज्ञ आहेत. लैंगिकतेच्या विषयावर त्यांनी गेली पंधरा वर्षं काम केलं आहे. चार वर्षं त्यांनी इंग्लंडमध्ये एन.एच.एस. (नॅशनल हेल्थ सर्व्हिस)मध्ये काम केलं. २००८पासून ते पुण्यात प्रॅक्टिस करत आहेत.

• **लैंगिकतेची प्राथमिक जाण याबद्दल थोडं सांगा.**

सर्वांनी लक्षात ठेवायची गोष्ट म्हणजे तुमचा लैंगिकतेचा जो भाग आहे, याच्याशी कोणाचा काही संबंध नाही. ती निर्माण करण्यात पालकांचा (किंवा इतर कोणाचा) हात नाही. हे खरं आहे, की तुमची लैंगिकता तुमच्यासाठी खूप अडचणीची असू शकते, गैरसोईची असू शकते, पण तरीसुद्धा त्याबद्दल तुम्ही काहीही करू शकत नाही.

प्रत्येकाची लैंगिकता ही चार भागांत विभागली जाऊ शकते. हे समजावं म्हणून मी खूप सोपं करून सांगतोय, पण शास्त्रीयदृष्ट्या ते पूर्ण सत्य आहे, असं मी म्हणत नाही.

(१) मुलाचे/मुलीचे 'गोनॅड्स' - शरीरात वृषण आहेत, की स्त्रीबिजांडं आहेत व ती कशी काम करतात, याला आपण 'गोनॅड पातळी' म्हणूयात.

(२) मुलाची/मुलीची बाह्य जननेंद्रियं. याला आपण शारीरिक पातळी म्हणूयात.

(३) त्या मुलाचा/मुलीचा लिंगभाव काय आहे? म्हणजे तरुणपणी ते स्वतःला मुलगा की मुलगी समजतात. ही तिसरी पातळी म्हणूयात.

(४) वयात आल्यावर त्या मुलाला/मुलीला कोणत्या लिंगाच्या व्यक्तीबद्दल लैंगिक आकर्षण वाटतं? (स्त्री? पुरुष? का दोन्ही लिंगांच्या व्यक्तींबद्दल लैंगिक आकर्षण वाटतं?) ही चौथी पातळी.

या चारही पातळ्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही. ८०% लोकांमध्ये या सर्व पातळ्यांमध्ये एकसंधपणा (काँग्रुअन्स) असतो. म्हणजे त्या मुलाची/मुलीची गुणसूत्रं, जननेंद्रियं, लिंगभाव व लैंगिक कल यांच्यात एकसंधपणा असतो, या एकसंधपणाला पुरुष किंवा स्त्री हे सर्वसाधारणपणे नाव दिलं गेलं आहे. पण या सगळ्यांमध्ये इतक्या छटा आहेत, की हे सर्व बऱ्याचदा सामान्य माणसाच्या तर सोडाच अनेक डॉक्टरांच्याही समजेच्या पलीकडचं आहे. थोडक्यात सांगायचं तर यातलं आपल्याला फार कळतं असा आव खरंच कोणी आणू नये.

- **औषधोपचार, समुपदेशन, धाक, शिक्षा या मार्गांनी लैंगिक कल बदलता येतो का?**

मुलांचा/मुलींचा लैंगिक कल बदलता येत नाही. असे बदल करायच्या प्रयत्नांनी त्या मुलाची/मुलीची अस्मिता (जी अगोदरच रसातळाला गेलेली असते) अजूनच दुखावते. यातून काहीही साध्य होत नाही.

काहीजणांमध्ये असा समज आहे, की कालांतराने लैंगिक कल बदलू शकतो किंवा आपोआप बदलतो. एक लक्षात ठेवा, की जसजसं वय वाढतं तसतशा लैंगिक आवडी बदलतात, लैंगिक सुखाच्या संकल्पना बदलतात. लैंगिकता खूप बदलणारी (डायनॅमिक/फ्लुइड) गोष्ट आहे. दहा वर्षांपूर्वी तुमची जी लैंगिकता होती तीच आज आहे असा कोणताही माणूस नाही. तसं कोणी असेल तर तो अत्यंत दयनीय स्थितीत जगत आहे, ही इज लिव्हिंग अ व्हेरी पथेटिक लाइफ. इथे लक्षात घ्या, की 'फ्लुइड' आहे याचा अर्थ प्रत्येक गोष्ट बदलता येते असं नाही. 'फ्लुइड' म्हणजे ती नदीसारखी 'फ्लुइड' आहे म्हणजे त्यातील

पाणी बदलतं, त्यातील मासे बदलतात, पाणी कमी-जास्त होतं, वेग कमी जास्त होऊ शकतो, पण याचा अर्थ तिचा इकडचा काठ तिकडे आणि तिकडचा काठ इकडे होत नाही आणि ती क्षणात इथून उठून ५ किमी. दूर जात नाही. नदीचा समुद्र होत नाही.

- **आमच्यामुळे असं मूल झालं का?**

अनेक पालकांना असं वाटतं, की आमच्यामुळे असं मूल झालं का? तर याचं उत्तर स्पष्टपणे 'नाही' असं आहे. आईवडिलांनी मुलामुलींना कसं वाढवलं याचा त्यांच्या मुलामुलींच्या लैंगिकतेशी काहीही संबंध नाही.

मला अनेक पालक विचारतात, की आम्ही या मुलांची/मुलींची लैंगिकता बदलण्यासाठी काय करू शकतो? याचंही उत्तर 'काहीही नाही' असं आहे. म्हणजे आईवडिलांना वाटतं, की त्यांच्या मुलामुलींच्या घडणीवर त्यांचा खूप मोठा प्रभाव असतो. असं त्यांना वाटत असलं तरी हा प्रभाव लैंगिकतेच्या बाबतीत (वरील दिलेल्या पैलूंमध्ये) काहीही नसतो.

याच्यापुढे जाऊन मी असं म्हणेन, की अल्पसंख्याक म्हणून मानल्या गेलेल्या ज्या लैंगिकता आहेत त्या खूप 'बायोलॉजिकली ड्रिव्हन' आहेत आणि त्यांचा बाहेरच्या जगाशी फारसा काही संबंध नाही, हे वारंवार शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध झालेलं आहे. ही गोष्ट आईवडिलांनी लक्षात घेणं आवश्यक आहे. त्यांना आपल्या मुलामुलींच्या लैंगिकतेचं वाईट वाटणं, त्याचं दु:ख होणं, हे मूल चारचौघांसारखं नाही, याचा त्रास होणं साहजिक आहे, स्वाभाविक आहे आणि त्याच्याबद्दल माझी पूर्ण सहानुभूती आहे. पण हे माझ्यामुळे झालं आणि काहीतरी करून याच्यात आपण बदल घडवून आणू शकतो, ही गोष्ट खरी नाही.

- **पालकांची इच्छा- नातू/नात हवी**

अनेक पालक म्हणतात, की आम्ही हे स्वीकारू, पण कर्तव्य म्हणून

तरी त्यांनी लग्न केलं पाहिजे, मुलंबाळं झाली पाहिजेत. बहुतेक पालकांकडून मुलांबद्दल अशा अपेक्षा असतात.

मला वाटतं, की कर्तव्य ही जी गोष्ट आहे तीसुद्धा फार 'फ्लुइड' आहे. बऱ्याचदा आईवडील म्हणतात, की आम्ही अशी अपेक्षा बाळगणं चूक आहे का? तर याचं जर सरळ, स्पष्ट उत्तर हवं असेल तर 'हो', कारण पोराची प्रत्येक अपेक्षा तुम्ही तरी पूर्ण करू शकता का? आणि जर अपेक्षा करणं आणि त्या व्यक्तीनं ती पाळणं हा जर नातेसंबंधाचा पाया असेल तर मग कोणतचं नातं टिकणार नाही. देवावर विश्वास ठेवणारेसुद्धा देवाकडून किती अपेक्षा ठेवतात? पण त्या पूर्ण नाही झाल्या तर त्याच्याशी नातं तोडतात का? म्हणतात का देवाला, की तू बदल आणि माझी इच्छा पूर्ण कर. ही तुम्ही लालूच दाखवता, पण त्याचा उपयोग होतो का? म्हणजे अपेक्षेच्या रास्तपणाची व्याख्यासुद्धा जर बहुसंख्येने ठरवली जाणार असेल तर अवघड आहे आणि या धडपडीत आपल्या मुलाला/मुलीला सुखी करायच्या चुकीच्या कल्पनेनं अजून चार जीव दु:खी करता. तुमचं मूल व त्याचा/तिचा होणारा समाजमान्य जोडीदार. आपण आपल्या भिन्नलिंगी लैंगिक कलाच्या मुलाचं/मुलीचं लग्न एका समलिंगी लैंगिक आकर्षण असणाऱ्या भिन्नलिंगाच्या व्यक्तीशी लावू का? का आपल्या समलिंगी मुलामुलींसाठी एक नियम आणि इतरांसाठी वेगळा असा दुटप्पीपणा आपण करणार आहोत? त्यांना जर मुलं झाली तर मुलंही यात भरडली जातात.....असा तुम्ही दु:खाचा आयाम वाढवून जास्त लोकांना त्या दु:खाच्या परिघात आणता.

- **या सनातनी समाजात पालकांच्या काय मर्यादा आहेत?**

मानसोपचारतज्ज्ञ म्हणून प्रॅक्टिस करताना मला नेहमी जाणवतं, की अनेक पालक त्यांच्या प्रकारे (विशेषत: आई) मुलाला/मुलीला समजून घ्यायचा प्रयत्न करतात, सांभाळून घेण्याचा प्रयत्न करतात. पण अशा वेळी असं दिसतं, की काही मुलांची पालकांकडून अवास्तव अपेक्षा

असते. आईवडिलांना ही सर्व गोष्ट समजणं खूप अवघड जातं, कारण ते या मुलांच्या/मुलींच्या तीन पिढ्या मागे असतात. एक पिढी ७-१० वर्षांची मानली तर ही मुलं तीन पिढ्या पुढे असतात. या मुलांपेक्षा तीन पिढ्या मागे असणाऱ्या पिढीला ही लैंगिकतेची संकल्पना पूर्णपणे समजावी ही अपेक्षा रास्त नाही. प्रगल्भता आली, की तुम्हाला हे लक्षात येईल, की कोणीही दुसऱ्याला पूर्णपणे समजू शकत नाही. आईवडिलांनी आपल्याला स्वीकारावं ही एक गोष्ट, पण आपल्याला पूर्णपणे समजून घ्यावं हा अट्टहास आततायी आहे.

दुसरी गोष्ट उपस्थित होते ती म्हणजे काही मुलं म्हणतात, ''जर पालकांनी आम्हाला स्वीकारलं तर आता आम्ही जसं हवं तसं वागू व या सगळ्याला तुम्ही नुसता होकारच नाही दिला पाहिजे, तर तुम्ही त्याला 'सपोर्ट' केला पाहिजे.'' जर पालक ते करू शकले तर उत्तमच, पण हे अनेक पालकांना अवघड जातं. विशेषतः ज्या मुलाला/मुलीला विरुद्ध लिंगाच्या व्यक्तींचे कपडे घालणं, हावभाव करणं हा त्यांच्या लैंगिकतेचा महत्त्वाचा भाग आहे अशांची, आईवडिलांनी हे सर्व स्वीकारलं पाहिजे, ही अपेक्षा खूप अवास्तव आहे. त्या आईवडिलांवर हा खरंतर अन्याय आहे. त्यांनी अत्यंत कष्टाने तुम्हाला समजून स्वीकारायचा प्रयत्न केला आहे, ही खूप मोठी बाब आहे. ते जर तुम्हाला समजून घ्यायचा प्रयत्न करताहेत तर तुम्हीही त्याची जाण ठेवली पाहिजे. जर आपल्याला वाटत असेल, की आपले पालक आपल्याला स्वीकारत नाहीत, तर आपण स्वतंत्र राहून आपली जीवनशैली जरूर जगावी, पण प्रौढ झाल्यावरही घरच्यांकडे राहायचं, त्यांच्या पैशावर आपली जीवनशैली जगायची आणि त्यांनी अजून पूर्णपणे आपल्याला का स्वीकारलं नाही म्हणून जाब विचारायचा, हे मला पटत नाही. तुम्ही शिका, स्वतःच्या पायावर उभं राहा, स्वतंत्र राहा आणि तुमची जीवनशैली जगा. जर ते मूल स्वतंत्र राहायची तयारी दाखवत असेल तर आईवडिलांनीही त्याला/तिला अजिबात अडवू नये. काही झालं तरी चालेल, पण त्यानी माझ्यापाशीच

राहिलं पाहिजे हा अट्टहास पालकांनी धरू नये. काही वेळेला पालकांना आणि मुलांना असं वाटतं 'धरलं तर चावतंय सोडलं तर पळतंय', पण अशा वेळी पालकांनी आणि मुलांनी कठोर भूमिका घेणं गरजेचं आहे.

- **गे व्यक्तींनी त्यांचं लैंगिक आरोग्य कसं सांभाळावं?**

तुम्ही गे आहात म्हणून तुमचं शारीरिक वास्तव (रिॲलिटी) काही बदलत नाही. इतर जण एचआयव्ही व एसटीआय (लैंगिक संबंधांतून पसरणारे आजार) होऊ नयेत यासाठी लैंगिक संबंधांच्या बाबतीत जी काळजी घेतात ती यांनीही घेतली पाहिजे. या समाजातील काही जणांचे अनेक जोडीदार असतात. म्हणून हा समाज जास्त 'रिस्क'मध्ये आहे. यांनी तर जास्त काळजी घेतली पाहिजे.

लैंगिक संबंधाच्या वेळी निरोध वापरायलाच पाहिजे, एखादा पुरुष दिसायला चांगला आहे, त्याला कोणत्या आजाराची लक्षणं दिसत नाहीत म्हणजे त्याला एचआयव्ही किंवा एसटीआयची लागण नाही असा अर्थ लावू नका. लक्षणं दिसत नसली तरी हे आजार त्या व्यक्तीला असू शकतात. म्हणून त्याच्याबरोबर बिन निरोधाचा संबंध करू नका. तो निरोध वापरायला तयार नसेल तर त्याला 'बाय बाय' करा.

जर निरोध न वापरता लैंगिक संबंध झाले व एक-दोन महिन्यात गुप्तरोगाची लक्षणं दिसली (लिंगातून दुर्गंधीयुक्त स्राव जाणं, जननेंद्रियांवर फोड/जखमा होणं, जननेंद्रियांवर पाण्याने भरलेले, जळजळ करणारे पुरळ येणं, जांघेत गळू होणं, लिंगावर/गुदद्वारावर फ्लॉवरसारखे कोंब येणं, गुदातून रक्त जाणं इत्यादी) तर लगेच ॲलोपॅथिक डॉक्टरकडून उपचार घ्यावेत.

जर तुम्ही एचआयव्हीसंसर्गित असाल, तर संभोगाच्या वेळी न चुकता निरोधचा वापर करा. म्हणजे तुमच्या जोडीदाराला एचआयव्ही विषाणूंची लागण होणार नाही व जर जोडीदाराला एचआयव्हीचा संसर्ग असेल व त्याला एआरटीची औषधं चालू असतील तर त्याच्या एआरटी

रेझिस्टंट विषाणूची लागण तुम्हाला होणार नाही. खाणं, पिणं, व्यायाम, योग्य त्या चाचण्या (उदा., सीडी-फोर काउंट) योग्य वेळी करा. वेळच्या वेळी औषधं घेणं इत्यादी सर्व काळजी घ्या. 'क्रोनिक' आजारात माणसं जी पथ्यं पाळतात ती तुम्हीही पाळली पाहिजेत.

- **गे मुलांच्या/मुलींच्या मानसिक आरोग्याबद्दल थोडं सांगा.**

मला वाटतं, की मुलांचं शिक्षण व आर्थिक स्वातंत्र्य हे सर्वांत महत्त्वाचे मुद्दे असले पाहिजेत. शिका आणि लवकरात लवकर आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र व्हा. इंग्रजी शिका. याच्या खालोखाल मी म्हणेन, की भावनिकदृष्ट्या मुलांनी आईवडिलांपासून स्वतंत्र होणं आवश्यक आहे. हे दोन्ही मुद्दे खरंतर सर्व लैंगिकतेच्या मुलामुलींसाठी लागू आहेत, पण विशेषतः लैंगिक अल्पसंख्याक मुलांसाठी. कारण ही मुलं अत्यंत त्रासदायक परिस्थितीतून आयुष्य काढत असतात. म्हणजे इतर दोन भावाबहिर्णीसारखे ते दोन भावनिक दणके खायला तयार आहेत हे गृहीत धरणं चुकीचं आहे. या सनातनी समाजात वाढताना अशा मुलांवर जो परिणाम होतो, जो पीळ बसलेला असतो तो आयुष्यभर त्यांच्यासोबत राहतो. सर्व समाजांमध्ये हा परिणाम दिसतो. असा कोणताही समाज नाही जिथे तो दिसत नाही. त्यामुळे या मुलांना जरा हलक्या हाताने वाढवावं लागतं. त्यांच्या शैक्षणिक, आर्थिक व भावनिक स्वातंत्र्याकडे आईवडिलांनी लक्ष दिलं पाहिजे. त्या दृष्टीने लागेल ती मदत करावी, पण त्या मुलाला जपलं पाहिजे म्हणून त्यांचे वाट्टेल ते लाडही करू नयेत. म्हणजे तो २५ वर्षांचा झाला तरी आईवडिलांच्या जिवावर राहात असेल, आपल्या स्वतःबद्दलच्या जबाबदाऱ्या स्वीकारत नसेल तर ते योग्य नाही.

मला वाटतं, की लैंगिक अल्पसंख्याक समाजामध्ये भावनिक असुरक्षितता आणि मानसिक आजारांचे (विषेशतः नैराश्य) प्रमाण इतर समाजापेक्षा कैकपटीने जास्त असतं. म्हणून अशा मुलांनी स्वतःची काळजी घेतली पाहिजे. एक साधं आणि सोपं उदाहरण असं, की समजा एखाद्या व्यक्तीची रोगप्रतिकारशक्ती कमी आहे तर आपल्याला

'इन्फेक्शन' होऊ नये म्हणून तो काय काळजी घेईल? गर्दीच्या ठिकाणी जायचं नाही, हात धुतल्याशिवाय जेवायचं नाही, गरम जेवण घेणं, पाणी उकळून पिणं, नियमित व्यायाम करणं इत्यादी.

पहिल्यांदा त्या मुलाने/मुलीने हे स्वीकारायला पाहिजे, की मी इतरांपेक्षा जास्त 'इमोशनली व्हल्नरेबल' आहे आणि त्याचबरोबर आपल्या वाट्याला येणारी प्रलोभनं कितीही 'टेम्पटिंग' असली तरी त्याबद्दल स्वत:ला एकतर लांब ठेवायचा प्रयत्न करणं किंवा पुरेसं संरक्षण बाळगणं. त्यांनी कायम लक्षात ठेवलंच पाहिजे, की 'ॲट एनी पॉइन्ट इन टाइम आय ॲम मोअर इम्पॉर्टंट दॅन माय रिलेशनशिप'. माझ्या आयुष्यात माझ्या नात्यापेक्षा, जोडीदारापेक्षा माझं सुदृढ राहाणं जास्त महत्त्वाचं आहे. कारण जेव्हा स्वत:पेक्षा आपला जोडीदार महत्त्वाचा आहे अशी स्थिती येते तेव्हा ते नातं हाच केंद्रबिंदू बनतो व तिथे वेदना सुरू होते. मग त्या मुलाची/मुलीची सेक्शुॲलिटी कोणतीही असो. मला मान्य आहे, की आपण सगळी माणसं आहोत, सर्वगुणसंपन्न नाही आहोत. नातेसंबंधातूनच आपण घडत असतो. मला मान्य आहे, की काही नाती अशी असतात, की त्याक्षणी ती नाती आपल्यापेक्षा, सर्व जगापेक्षा महत्त्वाची वाटायला लागतात. काहीवेळा ती आपल्या जिवापेक्षा महत्त्वाची वाटायला लागतात. पण वस्तुस्थिती अशी आहे, की स्वत:चं स्वातंत्र्य हे सर्वांत महत्त्वाचं असतं. द फॅक्ट रिमेन्स दॅट इंडिव्हिज्युअल फ्रीडम रिमेन्स सुप्रीम. त्यामुळे या मुलामुलींनी स्वत:ला जपणं ही सर्वांत मोठी जबाबदारी आहे.

*****

## कायदा

पूर्वी ख्रिस्ती धर्माची ब्रिटिश कायद्यावर मोठी छाप होती. या धर्मात समलिंगी संभोग पाप असल्यामुळे ब्रिटिश कायद्यात हा गुन्हा बनला. भारतात ब्रिटिशांचे राज्य आल्यावर भारतीय दंडविधान संहितेत समलिंगी संबंध गुन्हा ठरला (भा.दं.सं.३७७). या कायद्यानुसार दोन प्रौढ पुरुषांनी राजीखुषीनं व खासगीत केलेला संभोग गुन्हा ठरला. या कायद्यामध्ये जोडीदाराचं वय काय आहे, तो संभोग दोघांच्या संमतीने होतोय का? याचा कसलाच विचार झाला नाही. सरसकट सगळ्यांनाच गुन्हेगार ठरवलं.

समलिंगी लोकांबद्दलची समाजाची वक्रदृष्टी, समलिंगी लोकांचं आर्थिक शोषण करण्यास ३७७ कलमाचा होणारा वापर, या कायद्यामुळे एचआयव्ही हस्तक्षेप प्रकल्पांस होणारा अडथळा या सर्वांमुळे 'नाझ फाउंडेशन इंडिया' व 'लॉयर्स कलेक्टिव्ह' या संस्थांनी ३७७ कलमात बदल व्हावा, प्रौढ व संमतीने संभोग करणाऱ्यांना हे कलम लागू होऊ नये म्हणून २००१मध्ये दिल्ली हायकोर्टात एक जनहित याचिका दाखल केली.

ही केस ८ वर्षं चालली. २ जुलै २००९ला चीफ जस्टिस अ. प्र. शहा व जस्टिस एस. मुरलीधर यांनी ऐतिहासिक निकाल दिला, की ३७७ कलम हे समलिंगी लोकांच्या मूलभूत अधिकारांचं उल्लंघन करणारं आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंनी सर्व भारतीय नागरिकांना समान हक्क मिळतील असं स्वप्न पाहिलं होतं. काही व्यक्तींना समलैंगिकता मान्य नाही म्हणून समलिंगी व्यक्तींना त्यांच्या अधिकारांपासून वंचित ठेवणं हा त्यांच्यावर मोठा अन्याय आहे. (प्रौढ नसलेल्या व्यक्तीबरोबर संभोग करणं, मग त्या व्यक्तीची संमती असली तरी या कायद्यांतर्गत गुन्हाच आहे.) प्रौढ पुरुषांनी संमतीने केलेल्या संभोगाला गुन्हा मानला जाऊ नये, या दिल्ली हायकोर्टाच्या निकालाविरुद्ध काही गट सुप्रीम कोर्टात गेले आहेत. तिथे ही केस चालू आहे.

## (ब) श्री. भानुप्रताप बर्गे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक
सामाजिक सुरक्षा विभागप्रमुख, पुणे कमिशनर ऑफिस.

- वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री. भानुप्रताप बर्गे हे गेली २० वर्षं पोलिसदलात आहेत. त्यांनी मुंबईत असताना आतंकवादी व अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांविरुद्ध अनेक यशस्वी मोहिमा राबवल्या आहेत. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना अनेक मानसन्मान प्राप्त झाले आहेत. ते सध्या पुणे कमिशनर ऑफिसच्या सामाजिक सुरक्षा विभागाचे प्रमुख आहेत.

- **सर, गे/लेस्बियन्सच्या कोणत्या प्रकारच्या केसेस सामाजिक सुरक्षा विभाग हाताळते?**

ज्या केसेस नाजूक असतात, की घरच्यांना तो पुरुष गे आहे हे माहीत नाही आणि त्याला ब्लॅकमेल केलं जातंय अशा केसेस असतील तर अशा पुरुष/स्त्रियांनी सामाजिक सुरक्षा विभागाकडे जरूर मदत मागावी. आम्ही त्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन करू आणि संवेदनशीलपणे ही केस हाताळायचा प्रयत्न करू.

पण हे महत्त्वाचे आहे, की ती व्यक्ती प्रौढ असली पाहिजे. जर ती व्यक्ती मायनर असेल (१८ वर्षं पूर्ण झालेली नसेल) तर मात्र कोणतीही रिस्क घेतली जात नाही. आम्ही त्यांना इथं बोलवू शकत नाही. आम्ही त्यांना CWC- 'चाइल्ड वेल्फेअर कमिटी'ला रेफर करतो आणि तिथे योग्य ते निर्णय घेतले जातात.

जर कोणा लहान मुलाला कोणी प्रौढ व्यक्ती त्रास देत असेल, ब्लॅकमेल करत असेल, जबरदस्ती करत असेल तर IPCच्या कलमांप्रमाणे आम्ही त्या प्रौढ व्यक्तीवर कारवाई करू शकतो.

गे संदर्भातल्या तक्रारी पोलिस स्टेशनवर फार येत नाहीत. आल्यावर काही वेळा पोलिसांना माहीत नसतं, की अशा विषयावर काय कायदेशीर कारवाई करायची, काय मार्गदर्शन करायचं? अशा वेळी सामाजिक सुरक्षा विभाग अशा विविध विषयांत काम करत असल्यामुळे आम्ही पूर्वीच्या अनुभवातून सांगू शकतो, की काय करायचं आणि काय करायचं नाही किंवा आमच्या कॉन्टॅक्टमध्ये अनेक एनजीओज असतात. जेव्हा आम्हाला यातला काही भाग कळत नाही तेव्हा आम्ही तुमच्यासारख्या एनजीओजची मदत घेतो. उदा., कोर्टाची 'लेटेस्ट जजमेंट्स', 'गव्हर्न्मेंट स्टँड' इत्यादी.

- **आता ३७७ कलमावरच्या केसेस दाखल होऊ शकतात का?**

३७७च्या बाबतीत जर दोन प्रौढ पुरुषांमध्ये किंवा दोन प्रौढ स्त्रियांमध्ये संमतीने खासगीत लैंगिक संबंध होत असतील तर अशा तक्रारी आमच्याकडे येणार नाहीत. पण जर संमती नसताना लैंगिक संबंध झाले किंवा 'मायनर' व्यक्तीबरोबर एका प्रौढ व्यक्तीने लैंगिक संबंध केले (जरी त्या मायनरची संमती असली तरी) तर आम्ही ३७७ खाली तक्रार घेणार आणि इन्व्हेस्टिगेट करणार.

- **समलिंगी व्यक्तीने कोणती काळजी घ्यायला पाहिजे?**

समलिंगी व्यक्तीने काळजी घेतली पाहिजे, की लैंगिक संबंध हे प्रौढांमध्ये, संमतीने आणि खासगीत झाले पाहिजेत. जर संबंध कायद्याच्या चौकटीत नसतील तर मग ती व्यक्ती गे आहे का स्ट्रेट आहे हे आम्ही बघणार नाही. कायदेशीर कारवाई करणार. आणखी एक गोष्ट, यातून जातीचा, धर्माचा पेच निर्माण होता कामा नये. जात, धर्मांमध्ये ताणतणाव, गैरसमज निर्माण होईल हा उद्देश असता कामा नये- 'कम्युनल हार्मनी हॅज टु बी मेन्टेन्ड.'

- **सामाजिक सुरक्षा विभागाबरोबर एनजीओजना कशा प्रकारे काम करता येईल?**

तुमच्यासारख्या एनजीओजची मोठी जबाबदारी आहे, की जनजागृती करून लोकांना सामाजिक सुरक्षा विभागाबद्दल माहिती द्यावी आणि या विभागाचा आधार कसा घ्यायचा याबद्दल शिक्षण द्यावं.

जर तुम्ही या विषयाबद्दल कॉन्फरन्स, सेमिनार भरवले, चर्चासत्र आयोजित केली तर पोलिसांची भूमिका समजावून देण्यासाठी आम्ही नक्की येऊ. हा काही महारोग नाही, की त्यापासून सगळ्यांनी दूर पळायला पाहिजे. पोलिसांत आमच्यासारखे जे संवेदनशील आहेत, ते ही गोष्ट लोकांना सांगू शकतात, म्हणजे समाजास कळेल, की काही पोलिस उदारमतवादी आहेत, फक्त एनजीओजच असा स्टँड घेत नाहीत, तर काही पोलिस अधिकारीही अशी उदारमतवादी दृष्टी बाळगतात.

*****

# भाग दोन- लेस्बियन मुलींच्या आत्मकथा

## नलिनी (मुंबई)

माझा जन्म मुंबईचा. घरी माझा लहान भाऊ, आई, वडील, मी आणि आजी (खरंतर ती वडिलांची मावशी होती. आम्ही तिला आजी म्हणायचो.) अशी एकूण पाच जणांची फॅमिली. भाऊ दोन वर्षांनी लहान. घरचं वातावरण थोडं ऑर्थोडॉक्स पद्धतीचं. आमची मध्यमवर्गीय फॅमिली होती.

आईच्या घरची परिस्थिती चांगली होती. वडिलांचे आईवडील लहानपणीच वारले म्हणून ते मावशीकडेच वाढले. तिथली परिस्थिती अगदीच बेताची होती. वडिलांनी खूप कष्ट केले म्हणून आम्ही इथवर आलो आहोत. आजीशी बोलण्यातून मला कळलंय, की माझ्या आईवडिलांचं लव्ह मॅरेज आहे, पण आईवडील या संदर्भात कधीच काही बोललेले नाहीत.

आईवडिलांचं खूप प्रेम असलं तरी त्यांची खूप भांडणं व्हायची. परत सर्व व्यवस्थित व्हायचं, पण जेव्हा भांडणं व्हायची तेव्हा ती विकोपाची व्हायची. त्याचा माझ्यावर वाईट परिणाम झाला. मला आठवतं, की एकदा आजी, माझा भाऊ आणि माझ्यासमोर त्यांचं एवढं मोठं भांडण झालं, की ते बघून मी अक्षरशः थरथर कापत होते. त्यावेळेला मी साधारण दुसरी-तिसरीला असेन. मनात कुठेतरी झिरपत गेलं, की लग्नामध्ये अशी भांडणं होऊ शकतात.

भाऊ लहानपणी कमी बोलायचा, पण त्याचा बाहेर खूप मोठा मित्रवर्ग होता. मला मात्र लहानपणी एक-दोनच मित्रमैत्रिणी होत्या. शाळेत माझी एक जवळची मैत्रीण होती- योगिता. ती अजूनही माझी जवळची मैत्रीण आहे. (जवळची असली तरी तिला माझ्याबद्दल माहीत

नाही, की मी लेस्बियन आहे.) मला कोणाबरोबर मिक्स व्हायला आवडायचं नाही. अगदी कॉलेजपर्यंत माझा खूप छोटा ग्रुप होता. आता मी इंटरनेटच्या सोशल साइट्सवर इतरांना भेटते, त्यामुळे माझ्या खूप ओळखी झाल्यात. मला वाटलं नव्हतं, की मला एवढ्या मित्रमैत्रिणी मिळतील.

मी मराठी मीडिअममध्ये शिकले. शाळेत मी साधारण होते, पण माझं ड्रॉईंग चांगलं होतं. शाळेत ड्रॉईंगच्या परीक्षा दिल्या. इंटरमीजिएट ड्रॉईंग परीक्षेत 'ए' ग्रेड मिळाली. लहानपणापासून वाचायची मला खूप आवड होती. दहावीच्या आसपास विद्या बाळ, रझिया आणि आता कविता महाजन, सुमेध वडावाला, सानिया यांचं स्त्री मुक्ती संदर्भात लिहिलेलं लिखाण वाचताना वाटायचं, की आपण पण असं बनायला पाहिजे. लग्नाच्या बाबतीत, जोडप्यांनी एकमेकांना समान मानायला पाहिजे. दोघांना समान वागणूक मिळाली पाहिजे अशी विचारसरणी तेव्हापासून होती. घरामध्येसुद्धा फक्त मला कामं सांगितली, पण माझ्या भावाला कामं दिली नाहीत तर मला राग यायचा.

माझ्या आजीचं लग्न झाल्यावर (१९४०च्या आसपास) तिचं तिच्या नवऱ्याशी पटलं नाही. म्हणून ती माहेरी आली आणि तेव्हापासून माहेरचं सर्व घर तिनेच सांभाळलं. माझ्या जन्माच्यावेळी आजी आमच्याकडे आली आणि आमच्याकडेच राहिली. ती अत्यंत स्ट्रॉंग होती आणि माझ्या जडणघडणीत तिचा मोठा वाटा आहे. कधी कधी वाटतं आईपेक्षा आजी जास्त फॉरवर्ड होती.

लहानपणापासून बघितलं, की आईला महिन्यातून दोन-चार दिवस बाजूला बसवलं जायचं, हे असं का? मी आजीला विचारलं तेव्हा तिनी अगदी मोघम उत्तर दिलं. मला हे असं स्त्रीला वागवणं चुकीचं वाटायचं. पण हे जरा थोडं अगोदर माहिती झाल्यामुळे, मला जेव्हा मासिक पाळी सुरू झाली तेव्हा मी घाबरून गेले नाही. माझ्या पहिल्या मासिक पाळीनंतर काही दिवसांनी मला आईनी लैंगिक शिक्षणावरचं एक मराठी

पुस्तक दिलं. मी सगळं वाचलं, पण आईशी त्याबद्दल कधी काही बोलले नाही.

दहावी झाल्यावर, मला ड्रॉईंगसंबंधित कोणतातरी कोर्स करायचा होता. म्हणून मग मी 'कमर्शिअल आर्ट' करायचं ठरवलं. माझे वडील तरुण असताना त्यांना आर्टिस्ट बनायचं होतं, पण घरची आर्थिक परिस्थिती वाईट असल्यामुळे ते त्यांची आवड पूर्ण करू शकले नाहीत. म्हणून त्यांची इच्छा होती, की मला ही संधी मिळाली पाहिजे. त्यांची इच्छा मला 'जेजे' (कॉलेज ऑफ आर्ट)ला घालून शिकवायचं. पण मला दहावीनंतर जेजेला प्रवेश मिळाला नाही. त्यांच्या प्रवेश परीक्षेत मी उत्तीर्ण झाले नाही. मला खूप त्रास झाला. नैराश्य आलं, कारण मला खात्री होती, की मला प्रवेश मिळेल. मी दुसरीकडे कुठेही प्रवेशासाठी प्रयत्न केले नव्हते. शेवटी ते वर्ष वाया जाऊ नये म्हणून मी कॉमर्सला प्रवेश घेतला. पुढच्या वर्षी परत 'जेजे' आणि 'रहेजा'ला ट्राय केलं. त्यावेळी 'रहेजा'ला प्रवेश मिळाला.

मी 'रहेजा'ला जाऊ लागल्यावर एका आठवड्यानी सपनानी प्रवेश घेतला. तिही माझ्याच वर्गात आली. दुसऱ्या एका बाकड्यावर ती आणि अजून एक जण बसली. क्लास सुरू झाला. मी मराठी मीडिअमची असल्यामुळे इंग्रजीचे जरा वांदे होते. सरांनी काहीतरी विचारलं आणि सपनानी इंग्रजीमध्ये उत्तर दिलं. त्यामुळे मला अजूनच बुजायला झालं. मग रिसेसमध्ये आमची ओळख झाली. तेव्हा कळलं, की ती महाराष्ट्रीयन आहे. मला ती गुजराती किंवा सिंधी वाटली होती. हळूहळू सर असाइनमेंट्स देऊ लागले. सपना सर्वांत पहिली त्या सबमिट करायची. सरांनी असाइनमेंट दिली, की त्याच दिवशी संध्याकाळपर्यंत ती पूर्ण करून द्यायची. आमच्यात कुजबूज व्हायची, की ही एवढी फास्ट कशी काय असाइनमेंट करून देते?

सपनाचं माझ्याकडे कधी लक्ष गेलं मला माहीत नाही, पण माझ्या बाजूनी मला आठवतं, की आम्ही त्याच वर्षी मनोरीला सहलीला गेलो

होतो. तेव्हापासून या नात्याला रूप यायला लागलं. मनोरीला पाऊस चालू होता. सर्वजण पावसात खेळत होते. सपनाला आणि मला पावसात खेळायला आवडायचं नाही म्हणून छत्रीखाली आम्ही दोघी शेजारी बसून कोणीतरी आणलेला व्हिडिओ गेम खेळत होतो. सपनानी नेहमीप्रमाणे शर्ट-पॅन्ट घातलेली होती. आमच्या सरांनी आम्हाला मागून पाहिलं. त्यांना वाटलं, की ही दोघं मुलगा-मुलगी आहेत. म्हणून त्यांनी जवळ येऊन वाकून पाहिलं आणि त्या वेळेपासून आमचा ग्रुप आम्हाला चिडवायला लागला, की 'आले हे नवरा-बायको!' मला वाटतं तिथे मला तिच्याबद्दल काहीतरी वाटतंय याचा अर्थ कळायची सुरुवात झाली.

पूर्ण अर्थ समजायला दोन वर्षं लागली. आमची मैत्री वाढत गेली. ती माझ्या घरी यायची. मी तिच्या घरी जायचे. कॉलेजला मी बांद्रा स्टेशनला येऊन तिची वाट बघायचे. ती आल्यावर तिच्याबरोबर कॉलेजला जायचे. आम्ही कायम एकत्रच असायचो. मला कळू लागलं होतं, की हे नातं मैत्रीपलीकडचं आहे, पण नक्की काय हे कळलं नव्हतं. तिला सोडून कोणत्याही मुलामुलींवर माझं लक्ष गेलं नाही.

तिसऱ्या वर्षी मी घरच्यांबरोबर सुट्टीत कोकणात आमच्या मूळ गावी गेले. सपनाला विचारलं, "येशील का तू आमच्याबरोबर?" तोवर आईला माहीत होतं, की ही माझी जीवलग मैत्रीण आहे. ती आली. गावी गेल्यावर एक दिवस आई काहीतरी कारणावरून म्हणाली, "ती बघ कशी शहाण्यासारखी वागते, नाहीतर तू" आणि चिडून मला चापट मारली. ते मला खूप लागलं. मी अगदी रडायला आले कारण आईनी तिच्यासमोर मला मारलं. त्यावेळी तिनं मला जवळ घेतलं. त्यावेळीही मला कळत नव्हतं, की ही मला जवळ का घेते? कारण मला आठवतंय मी तिचा हात दोनदा-तिनदा बाजूला केला.

मी तिच्यासमोर तिला पत्र लिहिलं. म्हणजे असं, की मला माझ्या भावना बोलून दाखवता यायच्या नाहीत. ती मला म्हणायची, "तुला बोलून नाही ना दाखवता येत तर मग मला लिहून सांग". म्हणून मी पत्र

लिहिलं. लिहिता लिहिता माझं मला क्लिअर होत गेलं, की ती मला खूप आवडते. माझ्या आयुष्यात तिचं विशेष स्थान आहे हे स्पष्टपणे दिसलं. तेव्हा कळलं, की मी तिच्या प्रेमात आहे आणि तिला सोडून दुसऱ्या कोणाशीही लग्न करायचा मी विचारही करू शकत नाही. तिला ते पत्र दिलं. तिनं ते वाचलं. तिला हे नातं क्लिअर होतं आणि तिला हेच ऐकायचं होतं. साहजिकच तिला खूप आनंद झाला.

तेव्हा आमचे लैंगिक संबंध नव्हते. पुढचं वर्ष आम्ही फक्त किस करायचो. त्यानंतर खूप दिवसांनी संबंध झाले कारण एकान्त मिळणं अवघड होतं. माझ्या घरी कायम आजी असायची आणि तिच्या घरी तिची आई. दोघींची घरं खूप लहान असल्यामुळे प्रायव्हसी मिळणं मुश्कील असायचं.

कॉलेज संपल्यावर घरच्यांची चर्चा सुरू झाली, की आता हिचं लग्न लावायचं. त्यावेळी मी काहीही बोलायची नाही, पण हे ठाम होतं, की मी लग्न करणार नाही. आई खूप आक्रमक, शिस्तबद्ध असल्यामुळे मी कोणत्याच बाबतीत तिच्याशी मोकळेपणानं बोलू शकले नाही. तिची भीती होती म्हणून तिला काही सांगू शकले नाही. वडील प्रेमळ होते, पण ते कंपनीच्या कामात आणि आमच्या सोसायटीचे चेअरमन असल्यामुळे त्यांच्या कामात ते इतके व्यस्त असायचे, की त्यांना बोलायला वेळच नसायचा.

कॉलेज संपल्यावर मला नोकरी लागली. नोकरीच्या पहिल्याच दिवशी माझ्या आजीला माइल्ड पक्षाघात झाला. त्यानंतर ती आजारी पडत गेली आणि तीन वर्षांनी ती वारली. मला खूप दुःख झालं. माझी प्रेमाची गोष्ट सोडली तर मी तिच्याशी सर्वकाही बोलायचे. मला वाटतं, की तिला याचीही कल्पना असावी कारण एकदा सपना व मी किसिंग करताना ती अकस्मात खोलीत आली होती. तिला हे सर्व विचित्र वाटलं, पण ती काहीच बोलली नाही. अधूनमधून मात्र ती म्हणायची, "तुम्ही बहिणीसारख्या दिसता". मी लग्न करावं असा आग्रह आजीने कधीही

केला नाही.

ग्रॅज्युएशनच्या वेळी आमच्या ग्रुपमधल्या एकीचं लग्न ठरलं, पण ते वर्षातच मोडलं. मला आईला सांगायला कारण मिळालं, की 'बघ हा सगळा जुगार आहे, मला यात पडायचं नाही.' आईनी अनेक वेळा सांगून पाहिलं, की 'असं प्रत्येक वेळेला प्रत्येकाच्या वाट्याला येत नाही', पण मला हे निमित्त पुरलं. मैत्रिणीच्या अनुभवाची ढाल मी पुढे केली. मी ऐकत नाही म्हणून आमचे एक नातेवाईक आमच्याकडे आले आणि मला समजवायला लागले, पण मी अशी काही तिरसट उत्तरं दिली, की ते पुन्हा कधी परत आले नाहीत. शेवटी गोडीगुलाबीनी मी ऐकत नाही हे बघितल्यावर आई मला म्हणाली, "लग्न कर, नाहीतर एक तू तरी या घरात राहा, नाहीतर मी या घरात राहते. दोघांपैकी एकच जण इथे राहील."

त्यावेळी बाबांनी मध्यस्थी केली, म्हणाले, "जाऊ दे, तिला नाही ना करायचं, मग जबरदस्ती करू नकोस". हे थोडं आश्चर्याचं वाटेल, पण मुळातच वडील कधीही प्रत्यक्ष माझ्याशी या विषयावर बोलत नसत. मला जे काही विचारायचं, सांगायचं ते आईला सांगायचं आणि आई माझ्याशी बोलायची. 'तू असं का करतेस, तुला काही प्रॉब्लेम आहे का?' असं बाबांनी मला कधीही विचारलं नाही. त्यांना (आई सोडून) इतरांशी फार वाद घालता येत नाही म्हणून ते वादापासून दूर राहायचा प्रयत्न करतात. त्यांचा स्वभावच तसा आहे. गुपचूप बसून जे होतंय ते होऊ द्यायचं.

शेवटी आई म्हणाली, "तुला नसेल करायचं तर तुझ्या भावाचं बघायला लागू का?" त्यातसुद्धा थोडासा ब्लॅकमेलचा भाग होताच, म्हणजे 'बघ ही शेवटची संधी आहे.' ती हेही म्हणायची, "आजीची इच्छा होती तुझं लग्न व्हावं. तिच्या इच्छेपोटी तरी कर."

माझ्या भावाचं ग्रॅज्युएशन झालं. मग त्याने मॅनेजमेंटचा कोर्स केला. आईनी माझा नाद सोडला आणि त्याचं लग्न लावलं.

नातेवाईक अधूनमधून विषय काढायचे, की 'आता लाडू कधी देणार', पण मला या असल्या प्रश्नांची खूप तिडीक होती आणि मी उडवाउडवीची उत्तरं द्यायचे. म्हणून नातेवाईक आईला विचारायचे. आई म्हणायची, "तिला नाही लग्न करायचं, मी तरी काय करणार?"

ग्रॅज्युएशन झाल्यावर दोन-तीन वर्षं मी 'ग्राफिक डिझायनर' म्हणून नोकरी केली. मग दोन वर्षं सपनाबरोबर 'पार्टनरशिप' केली. पण त्यात फारसं यश आलं नाही. म्हणून मग मी 'फ्री-लान्सिंग' करू लागले. आतासुद्धा 'फ्री-लान्सर' म्हणूनच काम करते. आर्थिकदृष्ट्या मी स्वतंत्र आहे. घरावर विसंबून नाही, पण एवढी मिळकत नाही, की स्वत:ची खोली घेऊन आम्ही दोघी राहू.

या प्रवासात आमची भांडणं झाली, पण एकमेकांना सोडायचा विचार मनातही कधी आला नाही. एक बिकट प्रसंग आला, नाही असं नाही. मी नोकरी करत होते तेव्हा सपनाने 'ॲनिमेशन'च्या कोर्सला प्रवेश घेतला. तिथे तिला एक शिक्षिका आवडली. सपना तिच्याबरोबर जास्त वेळ घालवू लागली. ती म्हणायची, की 'ते फक्त इन्फॅट्युएशन आहे, प्रेम नाही. मला तुला सोडायचा अजिबात विचार नाही'. पण सपना तिच्याकडे जास्त लक्ष देऊ लागली. मला याचा खूप त्रास झाला. खूप असुरक्षित वाटायला लागलं. आम्ही बाकी कोणा लेस्बियन्सना ओळखत नव्हतो. वाटायचं, की आम्हीच असं जगातलं एकमेव जोडपं आहोत-'मेड फॉर इच अदर'. त्यामुळे एक दुसरीशिवाय दुसरं जग नव्हतं.

या काळात तिच्याशी खूप भांडणं झाली. एकदा रागाच्या भरात तिने मला लिहिलेली सर्व पत्रं मी एका तळ्यात फेकून दिली. मनात आत्महत्येचा विचार आला. मी तिला फोन केला. तिला त्याचं गांभीर्य कळलं आणि ताबडतोब मला भेटायला आली. हे तिचं 'इन्फॅट्युएशन' अंदाजे एक वर्ष चाललं. मग परत सर्व सुरळीत झालं. त्याच्यापुढे आमचा प्रवास आजवर सुरळीत चालू राहिलाय. खरंतर मला आजही

इतर जोडप्यांचं काही कळत नाही; आज एकत्र असतात तर उद्या नसतात. हे कसं काय? आम्ही गेली अठरा वर्षं एकत्र आहोत. भांडणं झाली, पण एक दुसऱ्याला सोडून द्यायचा विचार कधीही आला नाही.

आता आम्हाला आधार देणाऱ्या लेस्बियन मैत्रिणी आहेत. त्याकाळात मी इंटरनेट वापरत नव्हते. पुढे हळूहळू मी इंटरनेट वापरायला शिकले. 'फेसबुक'वर आले. मग मला कळलं, की आपली कम्युनिटी आहे. आधार गट आहेत. लेस्बियन मैत्रिणी सगळ्या सपनाच्या ओळखीनेच भेटायच्या. तिच्या ओळखीतून इतर जणी 'फेसबुक'वर माझ्या मैत्रिणी झाल्या. या दरम्यान मंगला गोडबोले यांचं 'हे दु:ख कोणा जन्माचे' हे पुस्तक माझ्या वाचनात आलं. त्यातून मला खूप माहिती मिळाली.

मुळात वाचनाची आवड असल्यामुळे जेव्हा इंटरनेटची ओळख झाली तेव्हा प्रथम शोधल्या त्या मराठी लेख, कविता असणाऱ्या साइट्स. अशाच काही मराठमोळ्या साइट्सवर वाचन, लिखाण, चर्चा करता करता अनेक खास, जीवाभावाचे मित्रमैत्रिणी मिळत गेले. त्यांची मैत्री माझ्या जीवनाचा अविभाज्य अंग होऊन गेली. इतके जीवाभावाचे मित्र असूनही अद्याप त्यांना मी माझी खरी ओळख सांगू शकले नाही, कारण ते मला ॲक्सेप्ट करतील का? ही भीती आहेच. शिवाय त्यांना गमावण्याची, मैत्री तुटण्याची कल्पनाही दु:खदायक आहे. सपना मला अनेकदा म्हणते, ''तुझ्या इतर 'स्ट्रेट' मित्रमैत्रिणींना सांगायला काय हरकत आहे? त्यांच्याकडूनही सपोर्ट मिळू शकतो.''

पूर्वी खूप भीती वाटायची, पण हल्ली माझ्या विचारात बदल होऊ लागला आहे. भीती कमी झालीय. मुख्य म्हणजे मानसिक कुतरओढ संपली आहे आणि हे झालंय ते याच माझ्या मित्रमैत्रिणींमुळे. या मराठी साइट्सवर इतर अनेक चर्चेच्या विषयांव्यतिरिक्त समलैंगिकता या विषयावरही मनमोकळ्या चर्चा गेल्या दोन-तीन वर्षांत होऊ लागल्या आहेत. खूप सकारात्मक चर्चा-प्रतिसाद वाचायला मिळाले. या

विषयावरचं 'पार्टनर' (लेखक- बिंदुमाधव खिरे) या पुस्तकाचं परीक्षण वाचायला मिळालं. त्यावर झालेल्या चर्चेत चक्क माझ्या 'स्ट्रेट' मित्रमैत्रिणींकडूनच समलैंगिकतेवरच्या मराठी साहित्यातल्या इतर पुस्तकांचे संदर्भ मिळाले. माझे मित्रमैत्रिणी दुरावतील ही भीती बरीचशी निरर्थक आहे असं वाटू लागलंय.

मला पहिल्यांदा माझ्या आईवडिलांना सांगायचंय पण ते मला अवघड वाटतंय. सांगितलं तरी ते समजून घेतील का याची शंका आहे. दोन वर्षांपूर्वी माझी आई पडली आणि तिला इजा झाली. त्यामुळे तिची मानसिक स्थिती दुर्बल झाली आहे. या अवस्थेत तिला सांगणं केवळ अशक्यच आहे आणि तसंही आईचं मत या बाबतीत तरी ठाम विरुद्ध असणार हे नक्की. वडिलांचीही मतं अशीच आहेत. एकदा माझे वडील आणि मी 'याला जीवन ऐसे नाव'च्या शोमध्ये बिंदुमाधव खिरे यांची मुलाखत बघत होतो. तेव्हा वडील वैतागून म्हणाले, "हे सर्व परदेशात चालतं, इथे नाही." म्हणून मी आईवडिलांना 'आउट' होईन याची शक्यता कमी आहे. तेव्हा सध्या निदान माझ्या 'स्ट्रेट' मित्रमैत्रिणींमध्ये तरी 'आउट' व्हावं असं वाटतंय.

जीवनाच्या या वळणावर मागे वळून पाहता, मी निवडलेल्या जोडीदाराची मला पुरेपूर साथ मिळाली....मिळते आहे... सुखातही आणि दुःखातही. भले या टप्प्यावर आम्ही लौकिकार्थाने एकत्र राहात नसू, पण माझ्यासाठी ती आणि तिच्यासाठी मी, हे पक्कं आहे आणि त्याइतकं दुसरं वैभव नाही. जे सर्वसामान्य जोडप्यात असतं ते... प्रेम, जिव्हाळा, कधी भांडण, कधी अबोला...हे सर्व सर्व आमच्यात आहे तरीही या नात्याचा उत्सव मात्र आमच्यासाठी नाही कारण ही लैंगिक ओळख अजूनतरी समाजमान्य नाही. स्वतःच्या अस्तित्वाची ओळख अशी लपवून जगावं लागणं तेही आप्तस्वकीयांपासून यासारखी अत्यंत क्लेशदायक गोष्ट नाही. ती एक प्रकारची घुसमटच आहे. मला आताशा असं वाटू लागलंय, की हे लपवणं म्हणजे प्रतारणा आहे... माझी

माझ्याशी आणि जे माझे स्वकीय आहेत त्यांच्याशीही. हे आता थांबवावं. सांगून टाकावं सगळं. जे माझे खरे स्वकीय आहेत ते मला माझ्या या ओळखीसह नक्कीच स्वीकारतील. हे समजल्यावर जे भविष्यात सोबत नसतील ते मला अनोळखी होते आणि अनोळखीच राहतील असं समजेन. शेवटी या माझ्या 'ओळखी'च्या आवरणाखाली मी तर तीच आहे, पूर्वीची नलिनी!

**कॉलेजमध्ये असताना सपनाला लिहिलेली एक कविता -**

शब्दाविन सांग सारे
आहे जे जे मनी
भास की स्वप्न हे
वदशील का सत्वरी
भ्रम निवारून कधी
बघ माझ्या सखी
गुज एकच सांगेन कानी
प्रिती परी तुझ्यावरती...

*****

## सपना (मुंबई)

मी एका मिडल क्लास जॉइन्ट फॅमिलीतली. माझा जन्म चेंबूरला झाला. मग आम्ही देवनारला एक बंगला घेतला व तिथे सर्वजण स्थायिक झालो. खालच्या मजल्यावर चुलत काका, वरती दोन सख्खे काका व अजून दोन काका. आजीने प्रत्येक काकाला वन रूम किचन अशी विभागणी करून दिली. एका बंगल्यात राहिलो तरी प्रत्येकाचे स्वतंत्र संसार आहेत. घरात धार्मिक वातावरण होते, पण माझा या गोष्टींवर फारसा विश्वास नव्हता व आजही नाही.

या सगळ्या काकांच्या घरात मुलींची संख्या जास्त. त्यामुळे सगळ्या मुली एकत्र आल्या, की खूप धिंगाणा असायचा. आता असा धिंगाणा नसतो कारण जवळपास सगळ्यांची लग्नं झालेली आहेत. घरात वातावरण खूप मोकळं होतं, 'तू मुलगी आहेस, तू असंच वागलं पाहिजेस' असे काही भेदभाव नव्हते.

माझे आई-वडील लोअर मिडल क्लास कुटुंबातून आले आहेत. आईचे वडील आणि वडिलांचे वडील मिलमध्ये कामाला होते. आर्थिकदृष्ट्या बेताची स्थिती होती. माझी आई २२ वर्षांची असताना वडिलांशी अ‍ॅरेंज्ड मॅरेज झाले. ती घरकाम सांभाळायची. वडील इलेक्ट्रिकल इंजिनिअर.

मी तिसरी मुलगी होते. त्यामुळे आईला भरपूर काम असायचे. माझ्या मोठ्या बहिणीच्यात आणि माझ्यात ९ वर्षांचे अंतर आहे व माझ्या आणि मधल्या बहिणीमध्ये ५ वर्षांचे अंतर आहे. आईचा मध्ये एक गर्भपात पण झाला. मला वाटतं त्यांना मुलगा हवा होता. पण मी मुलगी असले तरी मला कधी कोणी वाईट वागवलं नाही. वडिलांनीही कधी भेदभाव केला नाही. उलट लाडच जास्त झाले. काय पाहिजे ते दिले.

मला इंग्लिश मीडिअम शाळेमध्ये घातले. मला मराठी वाचता येतं, पण मराठी वाचायची आवड नाही. मी अभ्यासात फार चांगली नव्हते.

पास होण्याइतपत मार्क मिळायचे. इतिहास विषय मला बिलकुल आवडायचा नाही. काठावर पास व्हायचे. गणित आणि सायन्समध्ये मी त्यातल्या त्यात चांगली होते. मला कलाकुसरीची (क्राफ्ट) खूप आवड होती. मी क्रिएटिव्ह होते. म्युझिकही आवडायचे. माझं सगळं लक्ष आर्टिस्टिक गोष्टींकडे होतं. आमच्या हिंदीच्या शिक्षिका ड्रॉईंगच्याही शिक्षिका होत्या. त्या मला सांगायच्या, की कोणीतरी मदतीला घे आणि शाळेतल्या बाहेरच्या बोर्डावर प्रोग्रॅम किंवा इतर कोणतेतरी डिटेल्स लिही. त्यामुळे मी या गोष्टी करण्यात तास घालवायचे. मजा यायची.

आमच्या घरचा एवढा गोतावळा असायचा, की बाहेरची मित्रमंडळी नव्हती. माझ्या एका काकाच्या दोन मुली, दुसऱ्या काकाच्या दोन मुली व एका काकाची एक मुलगी आणि आम्ही. शाळेत एक बेस्ट फ्रेंड होती व एक मैत्रीण होती जी माझ्या स्कूलबसमध्ये माझ्याबरोबर जायची-यायची. मित्र तर बिलकुल नाव्हते.

मला जीन्स, टी-शर्ट घालायला आवडायचं. फ्रॉक घालायला आवडायचं नाही. माझ्या इतर बहिणी फ्रॉक घालायच्या. दिवाळी, वाढदिवस आले, की मी घरच्यांच्या मागे लागायचे, की मला जीन्स पाहिजे. टी-शर्ट घालण्याला घरच्यांकडून कधी विरोध झाला नाही.

वयात यायच्या वेळी माझ्या टॉन्सिल्सची शस्त्रक्रिया झाली आणि मी हॉस्पिटलमध्ये असतानाच माझी पहिली 'एमसी' आली. आई हॉस्पिटलमध्ये माझ्याबरोबरच होती, तिनं मला त्याबद्दल थोडंसं सांगितलं.

मला वाटतं, की सातवी-आठवीत मला मुली बघायला आवडायला लागलं; पण तेव्हा मला माहीत नव्हतं, की या कशासाठी आवडतात. मुलांबद्दल मला कधीच आकर्षण वाटलं नाही. मला जे वाटलं त्याच्याबद्दल मला काही चुकीचं वाटलं नाही. माझा स्वभाव आहे, की मला जे वाटतं ते मी करते. आय डोन्ट थिंक धिस इज राइट ऑर राँग, आय ॲम व्हेरी सॅटिसफाइड विथ व्हॉट आय ॲम डुईंग आणि मला जे

'फील' होतं ते मी स्वीकारतही गेले आहे. मला जे वाटतं तसं इतरांना वाटतं का? किंवा हे फक्त मलाच असं का वाटतंय? असं मला कधी वाटलं नाही.

दहावी झाल्यावर मला आर्टच्या कॉलेजला जायचं होतं. घरच्यांचा माझ्या निर्णयाला पाठिंबा होता. त्यावेळी 'जेजे' सर्वांत उत्तम आर्ट कॉलेज मानलं जायचं. म्हणून मी 'जेजे'ला प्रवेश परीक्षा दिली. निकाल लागला. नोटिस बोर्डवर माझं नाव होतं पण त्यावर एक आडवी रेघ ओढली होती. हे माझ्यासाठी शॉकिंग होतं. माझ्या वडिलांनी चौकशी केली तर त्यांना सांगितलं गेलं, की माझं नाव चुकून लिहिलं गेलं होतं म्हणून त्यावर काट मारली होती.

मग मी एका दुसऱ्या कॉलेजला नाव घातलं. तिथलं शिक्षण एवढं चांगलं नव्हतं, पण बाबा म्हणाले, ''एक वर्ष इथं कर मग परत दुसऱ्या वर्षी इतर कॉलेजात ट्राय करूयात.'' पुढच्या वर्षी म्हणजे १९९१मध्ये, मी 'जेजे', 'रहेजा' आणि 'सोफिया' अशा तीन कॉलेजेसमध्ये अर्ज केले. 'जेजे'मध्ये नंबर नाही लागला. खटपट करून मग 'रहेजा'त प्रवेश मिळाला. माझी ॲडमिशन कॉलेज सुरू झाल्यावर एक आठवड्याने झाली.

मी पहिल्या दिवशी कॉलेजमध्ये आले तेव्हा नलिनी रेल्वे पास कन्सेशन फॉर्मसाठी रांगेत उभी होती. माझं तिच्याकडे लक्ष नव्हतं, पण माझ्या बहिणीनी (माझी बहीण मला सोडायला आली होती) तिच्याकडे बोट दाखवलं, ''बघ तिचे केस किती लांब आणि जाडजूड आहेत.'' दाखवण्याचं कारण माझ्या दोन्ही बहिणींचे केस खूप मोठे होते. मी नलिनीकडे बघितलं आणि तिथेच तिच्याबद्दल काहीतरी वाटू लागलं. तेव्हा कल्पनाही नव्हती, की पुढे आमचं नातं बनणार आहे.

त्या दिवशी मी वर्गात आले, त्यावेळी ती वेगळ्या बाकावर बसली होती. मधल्या सुट्टीत पाहिलं तर तिचा ऑलरेडी एक ग्रुप बनला होता, कारण ते सगळे एक आठवडा आधी आले होते. त्यानंतर वर्गात

आम्हाला अल्फाबेटिकली बसवले व ती माझ्या मागच्या बाकावर आली. मला तिच्याशी एकटं बोलावं असं वाटायचं पण तिची मैत्रीण तिच्या शेजारी असायची.

आमच्या असाइनमेन्ट्स सुरू झाल्या. माझं एक वर्ष दुसऱ्या कॉलेजमध्ये झाल्यामुळे माझं ते पक्क झालं होतं. म्हणून मी त्या फटाफट करून द्यायची त्यामुळे ती आणि तिची मैत्रीण माझ्याबद्दल सारखी बोलायची, की ही असाइनमेन्ट एवढ्या फास्ट कशी करते? मला तिच्याशी जास्त बोलता यायचं नाही कारण मला बोलण्यासाठी मागे वळून बघायला लागायचं व सर ओरडतील म्हणून मी बोलायची नाही.

मला तिच्याबद्दल काय 'फिलिंग्स' आहेत हे तिला सांगायचं होतं, म्हणून एकदा मी तिच्यासाठी चिठ्ठी लिहिली आणि तिच्या कंपास पेटीत ठेवली, पण तिच्या मैत्रिणीनी पाहिलं, की हिने काहीतरी कंपास पेटीत ठेवलं आहे, म्हणून मी लगेच ती चिठ्ठी काढून घेतली.

आमची हळूहळू ओळख वाढली. कॉलेजला जाता-येताना आम्ही बरोबर जाऊ लागलो. मी कधी लवकर आले तर बांद्रा स्टेशनला थांबायची. त्यांचा ग्रुप ट्रेनने आला, की मी तिच्याबरोबर कॉलेजला चालत जायचे.

पहिल्या वर्षी मनोरीला ट्रिप झाली आणि तिने सांगितल्याप्रमाणे सगळे (संदर्भ : नलिनीची आत्मकथा) आम्हाला नवरा-बायको म्हणून चिडवायला लागले. माझ्या बाजूला एक मुलगी बसायची, ती एकदा म्हणाली, ''तुम दोनो शादी करलो''. माझ्या बरोबरच्या एक-दोन मुलांना शंका आली. ते माझ्याबरोबर बसमध्ये प्रवास करायचे. त्यातल्या एकाला मी भाऊ मानायचे. दुसरा मुलगा त्याला, आम्हा दोघांच्या नात्याबद्दल काहीतरी बोलला. तो मला बोलला, की 'हा असा बोलत होता, की तुझं काही....' मला नक्की काय बोलला हे आठवत नाही. मग मी त्याला दम भरला- ''तुला काय करायचंय? आणि त्याला काय करायचंय? जस्ट माइंड युअर ओन बिझिनेस.'' तेव्हापासून ते माझ्याशी

जास्त बोलायचे नाहीत व मीही त्यांच्याशी इंटरॅक्ट करणं सोडून दिलं. खरंतर तेव्हा आम्ही दोघी आमच्या विश्वात होतो. इतर जण काय म्हणतील याच्याशी आम्हाला काही घेणं देणं नव्हतं. पुढे काय होणार? पुढे आम्ही एकत्र राहणार का? हे काही माहीत नव्हतं.

कॉलेज झाल्यानंतर 'आयबीएच'मध्ये मला फ्री-लान्सर म्हणून २-३ पुस्तकांच्या स्केचिंगचं काम मिळालं. पण कालांतरानं डिझायनिंगसाठी कम्प्युटर्सचा वापर वाढायला लागला व हातानं स्केचिंग करायचं काम कमी होऊ लागलं. मला कम्प्युटर येत नसल्यामुळे कम्प्युटर शिकणं भाग होतं व ते शिकता शिकता इतर छोटी मोठी कामं करत राहिले. पोस्टर्स, बॅनर्स, जाहिराती इत्यादी. करिअर ग्राफ बघितला तर काही विशेष नव्हता.

जॉब मिळत नव्हता म्हणून मी आणि तिने ठरवलं, की आपणच पार्टनरशिपमध्ये काहीतरी सुरू करूयात. त्यात काही यश मिळालं नाही. दोन वर्षांनी मी म्हणाले, की आपल्या दोघींपैकी एकीने तरी परमनंट जॉब करावा म्हणजे आर्थिकदृष्ट्या सुरक्षित होऊ. मी परत जॉब शोधू लागले. एका फर्ममध्ये सहा वर्षं काम केलं. कुठल्याही नोकऱ्यांमध्ये मी 'आउट' झाले नाही. मला लोक विचारायचे, की तू लग्न का नाही केलं? मी म्हणायचे, की 'नाही मला लग्न नाही करायचं' एवढं बोलून टॉपिक संपवायचे.

या दरम्यान माझ्या मोठ्या बहिणीचं लग्न झालं. काही वर्षांनी माझी आई पडली. तिला संधिवाताचा त्रास सुरू झाला. पायाचं दुखणं हळूहळू वाढत गेलं. शी वॉज बेडरीडन, तरी ती खूप आनंदी असायची, कितीही त्रास झाला तरी ती दाखवायची नाही. आईच्या आजारात नलिनी माझ्याबरोबर कायम असायची. आता मला वाटतं, की आईला सांगितलं असतं तर कदाचित तिने समजून घेतलं असतं. आई फारशी शिकलेली नव्हती, पण उदारमतवादी होती.

माझ्या आईने मला एकदाच विचारलं, ''काय तुला लग्न करायचं की

नाही?'' मी म्हणाले, ''नाही मला काही लग्नबिग्न करायचं नाही.'' आई तिच्या स्वतःच्या लग्नाबद्दल समाधानी नव्हती. तिनं एकदा मला हे बोलूनही दाखवलं. ती खूप सुंदर होती व तिच्या वेगळ्या अपेक्षा होत्या. पण घरच्यांनी लग्न ठरवल्यामुळे तिला ते लग्न करावं लागलं. त्यामुळे ती माझ्या लग्नासाठी बळजबरी करत नव्हती. 'तुम्ही तुमचा निर्णय घ्या. तुम्हाला काय करायचं ते तुम्ही ठरवा.'

२००२ साली आई वारली. आता नलिनीच सोबतीला आहे. तिच्यात आणि माझ्यात भांडणं होतात, पण विकोपाची भांडणे विरळ. तिच्या मनात आतापर्यंत दोनदा आत्महत्या करण्याचा विचार आला आहे. एकदा माझ्यामुळे असा विचार आला व एकदा तिच्या आईमुळे. तिची आई तिला वाट्टेल ते बोलते व ते तिला खटकतं. मग तिचं मन खूप सैरभैर होतं. एकदा तिची आई असंच काहीतरी बोलली. ते तिला खूप लागलं. तेव्हा तिला वाटलं, आता मला जगायचं नाही. तिनं मला फोन केला. हे चांगलंय, की तिच्या मनात असा काही विचार आला, की ती एक फोन करते. हा फोन खूप महत्त्वाचा असतो. त्या फोनवरून मी तिला याच्यातून बाहेर काढते. तरी आता तिचे हे इंपलसेस कमी झालेत.

माझ्या मधल्या बहिणीचं लग्न दोन वर्षांपूर्वी झालं. तोवर माझ्यावर लग्नाचा दबाव नव्हता. नंतर सगळ्या मावश्या विचारायला लागल्या, की 'तुझ्या लग्नाचं काय?' मी लग्न करणार नाही हे ठामपणे सांगितलं. काही दिवसांनी मी माझ्या सर्वांत मोठ्या बहिणीला ई-मेलवरून 'आउट' झाले. ई-मेलला उत्तर यायला थोडा वेळ लागला. मग उत्तर आलं, की 'इट इज ओके विथ मी इफ यू आर गोईंग टु बी हॅपी'. तिनं जरी ॲक्सेप्ट केलं असलं तरी ती स्वतःहून हा विषय कधी काढत नाही. तिचंही उशिरा लग्न झालं आहे. आंतरजातीय विवाह आहे म्हणून तीही थोडी दबकून आहे. तरी तिनं माझ्याबद्दल तिच्या नवऱ्याला सांगितलंय. जिजू घरी आले, की नलिनीबद्दल विचारतात. बहिणीने जरी विचारलं नाही तरी मी तिला माझ्या कम्युनिटीबद्दल, इव्हेंट्सबद्दल सांगते. एकदा

एका एक्झिबिशनमध्ये माझं पोस्टर होतं. पोस्टर 'एलजीबीटी' थीमवर होतं. ते बघायला बहीण आणि जिजू आले होते.

मी कम्प्युटर शिकल्यावर जसं नेट वापरायला यायला लागलं तसं मी विविध वेबसाइट्सवर लेस्बियन मैत्रिणी शोधू लागले. मी माझ्यासारख्यांशी ओळख करून घेऊ लागले. काही वर्षांपूर्वी मी 'एलन दजनरेस'चा पूर्ण 'सीझन' बघितला. काही काळानी 'फेसबुक'वरून मला भारतातील एक लेस्बियन मैत्रीण मिळाली. मग तिच्यामार्फत 'फेसबुक'वर अनेक मैत्रिणी मिळाल्या.

वडील आता ७४ वर्षांचे आहेत. त्यांना मी 'आउट' होईन असं वाटत नाही. त्यांना मी माझ्या कम्युनिटीबद्दल सांगते, पण मला माहिती नाही त्यांना ते कितपत झेपतं. मला वाटतं, की त्यांना थोडी कल्पना असणार, कारण मी त्यांना 'एक माधवबाग' (लेखक- चेतन दातार) नाटक बघायला 'टीआयएसएस'मध्ये पाठवलं. ते घरी आल्यावर मी विचारलं, "कसं वाटलं?" ते म्हणाले, "चांगलं होतं". एवढंच बोलले. नलिनी जेव्हा घरी येते तेव्हा तिचं ते आनंदाने स्वागत करतात. ती खूप दिवस घरी आली नाही तर ते फोन करून तिला विचारतात, "कधी येणार आहेस?"

माझ्या शेवटच्या जॉबपासून मी 'आउट' व्हायला लागले. मला कोणी विचारलं, की लग्न का नाही केलंस तर मी सांगू लागले, की आपल्या देशात दोन मुलींना लग्न करायला कायद्यानं मान्यता नाही. मला अजून तरी कोणी वाईट प्रतिक्रिया दिलेली नाही. मी बहुतेक मित्रमंडळींना 'आउट' झाले आहे. जी कॉलेजची मुलगी मला म्हणाली होती, "तुम दोनो शादी करलो" ती मला 'फेसबुक'वर मिळाली. तेव्हा मी तिला 'आउट' झाले. शी वॉज सरप्राइज्ड अॅन्ड शॉक्ड. ती मला काय बोलली होती ते तिला आठवत नाही. म्हणाली, "हाऊ इज इट पॉसिबल?" त्यानंतर परत तिनं माझ्याशी संपर्क केला नाही. मला वाटलं, जाऊ दे, तू लांबच राहा. मी नलिनीलाही सांगते, की 'हळूहळू

'आउट' व्हायला लाग. बिंदुसर पुस्तक काढणार आहेत ते दिवाळी गिफ्ट म्हणून तुझ्या स्ट्रेट मित्रांना दे आणि कम आउट. दॅट इज द बेस्ट गिफ्ट यू कॅन गिव्ह'.

शेवटी मला एक महत्त्वाची गोष्ट सांगावीशी वाटते. मला कोणी कोणतंही लेबल लावलेलं आवडत नाही. लेस्बियन किंवा काहीही. मला लेबलच नको. माझी मला जाणून घ्यायची प्रक्रिया अजून चालू आहे. म्हणजे, आय फील दॅट आय ॲम जेंडरलेस. मला मी पुरुषही नाही आणि स्त्रीही नाही असं वाटतं. आय डोन्ट फील लाइक अ वूमन ॲन्ड आय डोन्ट फील लाइक अ मॅन. माझ्यासाठी मी माणूस आहे हे सर्वांत महत्त्वाचं आहे आणि माझं नातं मला सर्वांत महत्त्वाचं आहे. मी जिला कमिट केलंय ती माझ्यासाठी सर्वांत मोठी प्रायॉरिटी आहे. मला लेबल काय लावलं याला काही महत्त्व नाही. हे लेबल आम्हाला गेल्या ३-४ वर्षांत माहिती झालं. नाहीतर ते आम्हाला माहीतच नव्हतं. आपण कोणत्या लेबलखाली येतो याची पर्वाही नव्हती.

**नलिनीला कॉलेजमध्ये असताना लिहिलेली एक कविता –**

I Love you more than I had thought
Just when I realised that
You are the wealth of my life
The wealth which I would never ever like to loose
I would like to see you happy,
And will try to make you happy
No matter whatsoever happens to me.
I will open the gates of happiness & love for you
And you would ever come to know,
The truth behind my mind
That I love you and can never forget you.

*****

# नेहा (पुणे)

मी एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्माला आले. आईवडील व मी असं आमचं छोटं कुटुंब. मी एकुलती एक मुलगी असल्यामुळे घरच्यांनी मला काही कमी पडू दिलं नाही. लहानपणापासून माझा स्वभाव शांत होता. मैत्रिणी होत्या, पण फार मित्र नव्हते. ५ वर्षांची असताना मला घरच्यांनी इंग्रजी मीडिअम शाळेत घातलं. मी अभ्यासात चांगली होते.

वयात आल्यावर अचानकपणे मला माझी लैंगिकता उमगली. मला माझ्या लैंगिकतेची ओळख वयाच्या १३व्या वर्षी झाली. मी आजी-आजोबांसोबत टीव्ही बघत होते. टीव्हीवर दोन प्रसिद्ध हिंदी नट्यांचा नाच चालला होता. त्यांचं उघडं शरीर बघून मी उत्तेजित झाले. आयुष्यात पहिल्यांदां मला कोणीही न सांगता, शिकवता माझ्या लैंगिकतेचा एक मोठा धडा शिकायला मिळाला. निसर्गानं तो शिकवला. शेजारी आजी-आजोबा बसलेले असल्यामुळे मला खूप लाजायला झालं. मी झटदिशी उठले, माझ्या खोलीत गेले, दार लावलं, कपडे काढले व हस्तमैथुन करायला लागले. खूप आनंद वाटला, पण त्याचबरोबर भीतीही वाटली. मनाशी संवाद चालला होता, 'हे कसं शक्य आहे?'

लैंगिक शिक्षणाबद्दल आईनं व शिक्षिकेनं शाळेत शिकवलं होतं, की एक पुरुष व एक स्त्री सेक्स करतात आणि त्यांना मुलं होतात. मला मात्र लैंगिकतेची एवढी संकुचित संकल्पना मान्य नव्हती. मला कळलं होतं, की दोन स्त्रियाही संभोगातून एकरूप होऊ शकतात. ही संकल्पना कुठून आली हे सांगता येत नाही, पण तीच संकल्पना माझ्यासाठी अत्यंत नैसर्गिक होती.

मनात विचार आला, की हा माझा अनुभव आईला सांगावा का?

अचानक डोक्यात प्रकाश पडला, की याला समलैंगिकता म्हणतात. आपल्या दैनंदिन जीवनात अनेक नवीन गोष्टी आपण सातत्याने शिकत असतो व विसरूनही जात असतो, पण मेंदूमध्ये कुठेतरी खोलवर त्या दडलेल्या असतात. जेव्हा वेळ येते तेव्हा ते शब्द समोर येतात. माझ्या बाबतीतही तेच झालं. मला मी ९ वर्षांची असतानाचा एक दिवस आठवला. मी आणि आई दोघीजणी मिळून 'रीडर्स डायजेस्ट' वाचत होतो. उद्दिष्ट असं, की माझी इंग्रजी भाषा सुधारावी व मला जास्तीतजास्त इंग्रजी शब्द समजावेत. मलाही शिकायची खूप आवड असल्यामुळे मी नवनवीन शब्दांचा अर्थ समजून घ्यायचा प्रयत्न करत होते. एका लेखात 'होमोसेक्शुअल' शब्दाचा वापर केला होता. मी आईला विचारलं तर आईची प्रतिक्रिया होती- ''अशा शब्दांकडे दुर्लक्ष कर. हे शब्द आपल्या संस्कृतीत नाहीत. ते परदेशातील आहेत. अशा व्यक्ती लहान मुलांना पळवून नेतात व त्यांचे कपडे काढतात. अशा वाईट गोष्टी करतात. म्हणून अशा व्यक्तींपासून खूप सावध राहा. जर कोणा परदेशी व्यक्तीनी तुला चॉकलेट दिलं तर ते अजिबात घ्यायचं नाही.'' मी यावर अजून काही तिला विचारलं नाही, पण 'ते कपडे काढतात' या शब्दांची एक अनामिक भीती वाटली. बहुधा ती हिंदी सिनेमातल्या काही दृष्यांतून आली असावी, सांगता येत नाही. माझ्या स्मृतीने हा पूर्वी घडलेला संवाद मला आठवून दिला आणि मी धास्तावले, की मी लहान मुलींना पळवून नेणाऱ्या व्यक्तींमधील आहे. हा माझ्यासाठी मोठा धक्का होता. मी ठरवलं, की माझा अनुभव आईला सांगायचा नाही, नाहीतर अनर्थ होईल.

मी कॉन्व्हेंट शाळेत शिकले. शाळेत सगळ्या मुली. त्यातील एकही मुलगी इतर मुलींबद्दल लैंगिकदृष्ट्या बोलायची नाही. त्यांची सतत बडबड मुलांबद्दल. मीच एकटी वेगळी आहे, असं इतरांना

वाटायला नको म्हणून मीही त्यांच्यासारखी मुलांबद्दल बोलायला लागले. अनेक वेळा मीच पुढाकार घेऊन मुलांबद्दल विषय काढायची. घाणेरडे विनोद करायची. मला जाणवत होतं, की मी मुखवटा धारण केला आहे. पण दुसरीकडे वाटायचं, की मी माझ्या मैत्रिणींसारखीच आहे. मी माझं वेगळेपण विसरायचा प्रयत्न करायची. कोणत्या मुलीबद्दल लैंगिक विचार आले, की ते मी दडपून टाकायची. इथे सांगावंसं वाटतं, की माझ्या मैत्रिणी माझ्याशी चांगल्या वागत असल्या, दिसायला चांगल्या असल्या तरीही मी कोणाच्या प्रेमात पडले नाही.

एक अपवाद होता, वर्गातील एक मैत्रीण मला आवडायची. वर्गात ती माझ्या शेजारी बसायची. आम्ही वर्गात दंगा करायचो व इतर जणींची छेड काढायचो. आमची शिक्षिका आम्हा दोघींना वर्गाबाहेर काढायची. आजही ती माझी चांगली मैत्रीण आहे, पण तिला माझ्याबद्दल काही माहीत नाही.

पहिल्यांदा मी प्रेमात पडले ती माझ्या एका वर्गशिक्षिकेवर. खरंतर दोन वर्गशिक्षिकांवर; पण एकीशी माझी खूप भावनिक गुंतवणूक होती. ती मला ३ वर्षं शिकवायला होती. पाचवी, सहावी व सातवी. मी तिची सर्वांत लाडकी विद्यार्थिनी होते. ती माझं खूप कौतुक करायची. मला अजूनही तिची आठवण येते. ती मला 'बायडा' म्हणाली तरी मला खूप आनंद व्हायचा. तिचं माझ्याकडे लक्ष गेलंतरी मला खूप चांगलं वाटायचं. मी आठवीत गेल्यावर मात्र ती आठवीला एकही विषय शिकवायला नव्हती. मला याचा खूप त्रास झाला. आजही मला तो त्रास आठवतोय.

ती तिच्या वयस्कर आईबरोबर राहायची. मी तिचा कॉन्टॅक्ट नंबर मिळवला व तिला अनेक वेळा ब्लँक कॉल्स करायचे. तिचा नुसता 'हॅलो हॅलो' ऐकलं तरी मन प्रसन्न व्हायचं. तिच्या स्वप्नातदेखील नसेल, की मी

तिला फोन करतेय.

नववीत बाबांची बदली झाल्यावर मी दुसऱ्या शाळेत गेले. ही शिक्षिका मला परत कधी भेटणार? या काळजी व दु:खात मी अनेक रात्री रडून काढल्या. मी शाळा सोडतेय हे मी माझ्या वर्गमैत्रिणीला सांगितलं तेव्हा ती रडू लागली. तिला माझ्याबद्दल असलेला जिव्हाळा बघून मला बरं वाटलं.

परत कॉन्व्हेंट शाळेतच प्रवेश मिळावा अशी माझी खूप इच्छा होती, पण प्रवेश मिळाला नाही. या शाळेत मला मुलामुलींबरोबर शिकावं लागलं, को-एज्युकेशन. इथेही मी माझ्या लैंगिकतेबद्दल कोणाला सांगितलं नाही, कारण मला माहीत होतं, की तसं केलं तर मला चिडवण्यात येईल, मला त्रास दिला जाईल. म्हणून इथेही मी नाटक करत राहिले, की मलाही मुलं आवडतात.

सुरुवातीला मुली माझ्याशी व्यवस्थित वागत नसत. पण नशिबानं माझ्याबरोबर अजून एक नवीन मुलगी वर्गात आली आणि आम्ही दोघी बेस्ट फ्रेंड्स झालो.

माझ्या चेहऱ्याची ठेवण थोडीशी पुरुषी आहे म्हणून जेव्हा जेव्हा संधी मिळायची तेव्हा तेव्हा मुलं मला कुरूप म्हणून चिडवायची, थट्टा करायची (वाचकांचा गैरसमज नको म्हणून सांगते- मुलं मला चिडवतात म्हणून मी लेस्बियन नाही झाले. ती मला चिडवायची कारण मी दिसायला पुरुषी होते. मला मुलं आवडत नाहीत, मुली आवडतात हे त्यांना माहीत नव्हतं.). मला याचं खूप दु:ख व्हायचं, पण त्याच्याकडे दुर्लक्ष करून अभ्यासात मन गुंतवायचे. एसएससी परीक्षेत चांगले मार्क मिळवून मी त्यांचं नाक कापायचं ठरवलं व मी अभ्यासात स्वत:ला वाहून घेतलं. नशिबानं मला साथ दिली व माझ्या प्रयत्नांना यश आलं. मला खूप आनंद वाटला, की मी लैंगिक कलाच्या बाबतीत इतरांपेक्षा

वेगळी आहे पण इतर सर्व बाबतीत मी इतरांशी तुल्यबळ आहे. दोन मुले जी मला खूप चिडवायची त्यांनीही माझ्या यशाबद्दल माझं अभिनंदन केलं. मग ते माझे चांगले मित्र झाले.

काही वर्षांनंतर (शाळेतून बाहेर पडल्यावर) त्यातला एक जण मला म्हणाला, ''तू लेस्बियन आहेस. मला जाणवायचं, की तू वेगळी आहेस पण तेव्हा शब्द माहिती नव्हता. आता मला वाटतं, की माझी शंका खरी आहे.'' हे तो हसत हसत म्हणाला. मी त्याला, 'छे,छे' असं उत्तर दिलं. तेव्हाही मी स्वत:ला स्वीकारायला तयार नव्हते.

शाळेतून बाहेर पडल्यावर माझं अभ्यासातून लक्ष कमी होऊ लागलं. कारण माझ्यामध्ये माझं लैंगिकतेचं द्वंद्व चालू होतं. जगात मी एकटीच लेस्बियन आहे आणि या जगात माझ्यासाठी काहीही नाही या विचारांनी नैराश्य आलं. या नैराश्यातून मी स्वत:ला 'स्ट्रेट' बनवायचं ठरवलं. एका पातळीवर माहीत होतं, की मी प्रयत्न केले तरी कधीही भिन्नलिंगी होणार नाही. तरी माझ्या खचलेल्या मनानं ठरवलं, की पूर्ण जोमानं प्रयत्न केले पाहिजेत. मी अभ्यासाकडे संपूर्णपणे दुर्लक्ष केलं. सारखं स्वत:ला सांगू लागले (ऑटो-सजेशन), की मी भिन्नलिंगी आहे. दररोज देवाला विचारू लागले, की त्यानी मला असं का बनवलं? कृपा करून मला बदल. आपण असे आहोत याचा खूप अपराधीपणा होता. मनात आईवडिलांबद्दल सहानुभूती वाटायची. कीव यायची, की त्यांना माझ्यासारखी मुलगी मिळाली.

एकदा आम्ही घरचे रात्रीचं जेवण करत होतो. माझ्या वडिलांनी उल्लेख केला, की त्यांच्या माहितीचे कोणीतरी गे आहे. ते हसले. मग माझी आई म्हणाली, ''हा मानसिक आजार आहे.'' मी वाद घालायचा प्रयत्न केला- ''नाही, हे नॉर्मल आहे''. आई म्हणाली, ''आम्ही बीएला शिकलो आहोत. हा मानसिक आजार आहे.'' माझे आईवडील

दोघंही माझ्या विरोधात आहेत याची मला खात्री पटली. त्यांच्या मनात मी लहान मुलींना पळवून नेणारी किंवा मानसिक रुग्ण अशी होते. म्हणून मी 'स्ट्रेट' बनायचा अजूनच ध्यास घेतला. पण उलट यामुळे माझं मानसिक आरोग्य अजूनच ढासळायला लागलं. कॉलेजच्या पहिल्या वर्षात माझा आत्मविश्वास खूप खचला. उमेद संपली.

मी २२ वर्षांची झाले, तोवर माझ्या सर्व मैत्रिणी पुरुषांशी डेट करत होत्या. आपण वेगळं पडू नये म्हणून मीही तेच करायचं ठरवलं. माझ्या बेस्ट फ्रेंडबरोबर डेट करू लागले. खरंतर मी त्याची बेस्ट फ्रेंड होते. तो त्याची सर्व गुपितं मला सांगायचा व माझा सल्ला घ्यायचा. जेव्हा जेव्हा संधी मिळेल, तेव्हा मी त्याला माझ्या मनात पुरुषांबद्दल असलेल्या रागाबद्दल बोलायचे. साहजिकच आमचं हे डेटिंग एकच महिना टिकलं. ब्रेक-अप झालं व आम्ही एकमेकांशी बोलणं बंद केलं. (माझ्या रागाचं अजून एक कारण होतं- मला कोणतीही मुलगी आवडली तर मनात यायचं, की तिला मुलं आवडतात. ती मला मिळणार नाही, असं वाटून मला माझ्या भावना दाबून टाकाव्या लागत. त्यामुळे मला मुलांचा मत्सर वाटे आणि त्यांचा राग येई.)

नंतर मला जाणवू लागलं, की मी स्वत:ला लवकर स्वीकारलं नाही तर मला आईवडिलांनी निवडलेल्या मुलाशी लग्न करावं लागेल. ते मला शक्य नव्हतं. शेवटी मी आईला माझ्याबद्दल सांगायचं ठरवलं. मी आडमार्गांनी तिच्याशी बोलले, म्हणाले, की माझा एक बॉयफ्रेंड होता, पण मला त्याच्याबद्दल काहीच भावना नव्हत्या. ती म्हणाली, ''एवढं निराश नको होऊस, फार विचार करू नकोस. ओढ वाटू लागायला वेळ लागतो. आत्ता तू फक्त तुझ्या अभ्यासात लक्ष दे.'' इतरांप्रमाणे तिला काळजी वाटत होती, की लग्नाअगोदरच माझा या मुलाबरोबर सेक्स झाला आहे का? तिला काही कल्पना नव्हती, की मला ते करायची

आयुष्यभरात अजिबात इच्छा नाही.

त्यानंतर दोन-चार दिवसांनी मी तिच्याशी या विषयाबद्दल बोलले, ''मला मुली आवडतात, मी मुलींना पाहिलं, की माझ्यात लैंगिक भावना निर्माण होतात.'' बोलताना मला रडू अनावर झालं. मी रडू लागले. आई म्हणाली, ''आता जर तू म्हणलीस, की तुला त्यांच्याबरोबर संबंध करायचेत तर मी थोबाडात देईन तुझ्या.'' रडता रडता माझ्या मनात विचार येत होते, की 'आई कृपया मला समजून घे. मला तुला दुखवायचं नाही आहे. कृपया सांग, की हे सर्व नैसर्गिक आहे. माझ्याशी भांडू नकोस, मला रागवू नकोस'. वाटलं, की आई खूप समलिंगीद्वेष्टी आहे. ती मला कधीही समजून घेणार नाही.

नंतर मी शिक्षणासाठी परदेशी गेले. माझ्या विद्यापीठात अनेक भारतीय होते. मी फारशी कोणामध्ये मिसळायची नाही. माझा ५-६ मित्रांचा ग्रुप होता. त्यांच्यातच राहायची. इथंही मुलांना लक्षात येऊ लागलं, की मी इतरांपेक्षा वेगळी आहे, पण ते मला तोंडावर काही बोलले नाहीत. आमच्या ग्रुपमध्ये अजून एकच मुलगी होती आणि ते तिला विचारायचे, की ती एवढी एकलकोंडी का आहे? मी तिला सांगितलं होतं, की माझा 'ब्रेक-अप' झालाय म्हणून मला नैराश्य आलं आहे. कधी कधी ही मुलं आम्हा दोघींना 'लेस्बियन' म्हणून चिडवायची आणि माझा चेहरा गोरामोरा झालेला बघून त्यांची शंका अजूनच वाढायची.

पहिलं वर्ष संपायला आलं. मी खूप त्रासलेले होते. मला माझ्यासारख्या लोकांना भेटायचं होतं. जी लोकं मला स्वीकारतील अशांमध्ये मला मिसळायचं होतं. शहरात अनेक गे पब्स होते, पण मला तिकडे एकटीला जायचं कधीच धाडस झालं नाही. मी पूर्णपणे एकटी पडले होते.

पुढे, बहुतेक विद्यार्थ्यांप्रमाणे मीही एका 'फास्ट फूड जॉइंट'मध्ये

पार्ट-टाइम नोकरी धरली. तिथल्या कामगारवर्गाला मी लेस्बियन आहे याचा संशय आला आणि त्यांनी मला खूप त्रास दिला. हे मी एवढ्या करताच सांगत आहे, की लोकांचा गैरसमज आहे, की समलिंगी व्यक्तींना पाश्चात्त्य जगात स्वीकारलं जातं. असं नाही आहे. इथेही अनेक जण खूप समलिंगीद्वेष्टे आहेत. त्यामुळे भारतातील समलैंगिकता ही पाश्चात्त्य देशाच्या संस्कृतीतून आली या विधानात काहीही तथ्य नाही.

मी आता द्विधा मन:स्थितीत अडकले. मला इथे फुल-टाइम काम मिळत नव्हतं आणि परत मायदेशी आले तर आईवडील माझं लग्न लावतील ही काळजी होती. असे दिवस काढता काढता माझी सहनशीलता संपत आली. माझ्या मनात भिन्नलिंगी लोकांबद्दल कमालीचा द्वेष निर्माण झाला. आपलं आयुष्य संपून टाकावं असं वाटू लागलं. आत्महत्येचे विचार मनात येऊ लागले.

मग 'याहू'वर माझी 'गे अ‍ॅण्ड लेस्बियन वैष्णवा असोसिएशन' या ग्रुपशी ओळख झाली. मी इंटरनेटवरून यातील अनेक पुरुष व स्त्रियांशी संवाद साधला. खेदाची गोष्ट अशी, की मी यातील कोणालाच प्रत्यक्षात भेटले नाही कारण मला भीती होती, की खरंच ते म्हणतात तसे ते माझ्यासारखे आहेत का? काहींनी मला 'फेसबुक'वर 'अ‍ॅड' केलं व मी या विषयावरची माहिती समजून घेऊ लागले.

याचबरोबर दोन युरोपीयन स्त्रिया होत्या ज्या माझ्याशी इंटरनेटवरून दररोज 'चॅट' करायच्या. मी कामावरून आले, की त्यांच्याशी संवाद साधायचे. त्या मला खूप आधार द्यायच्या, माझे मनोबल वाढवायच्या. त्यातील एकीला मुलगा होता. ती ३५ वर्षांची झाल्यावर तिने ती कोण आहे हे सांगितलं होतं व घटस्फोट घेतला होता. दुसरी होती ती एकटी राहात होती. त्यांनी मला काही वेबसाइट्स

सांगितल्या. त्या या विषयाकडे आध्यात्मिकदृष्ट्या बघायला मदत करणाऱ्या होत्या. हळूहळू मी सर्व माहिती गोळा केली. माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरं मला मिळाली व मी ठरवलं, की आता घरच्यांना परत 'आउट' व्हायचं- स्पष्टपणे परत एकदा आपल्या लैंगिकतेबद्दल सांगायचं.

घरच्यांना सांगायच्या अगोदर या विषयाची संपूर्ण माहिती मिळवणं खूप महत्त्वाचं आहे. नाहीतर घरचे आपल्यावर तुटून पडतात व आपण घाबरून परत 'क्लोजेट'मध्ये जातो. मी घरी फोन करून आईला परत सांगितलं. परत वाद झाले, पण यावेळी मी प्रत्येक प्रश्नाला उत्तर देऊ शकत होते. सुरुवातीला अर्थातच तिने मी लेस्बियन आहे, हे स्वीकारलं नाही. पण हळूहळू आईने हा विषय समजून घ्यायचा एक प्रामाणिक प्रयत्न केला. योगायोगाने याच दरम्यान तिने टीव्हीवर एक कार्यक्रम पाहिला होता. त्यामुळे तिला थोडं समजू लागलं होतं. असे लोक भारतातही असतात हे तिला कळलं होतं पण आपल्याच घरी अशी व्यक्ती असेल हे तिला स्वीकारायला जड गेलं. ती या विषयावरची पुस्तकं वाचू लागली. फोनवरून आम्ही या विषयावर बोलत राहिलो व हळूहळू तिची समलिंगीद्वेष्टी दृष्टी कमी होऊ लागली. याला अनेक वर्षं लागली. आता ती माझ्या लैंगिकतेला पूर्णपणे नैसर्गिक मानते.

मी परत भारतात आले. मला नैराश्य आलं होतं. मी माझ्यासारख्या व्यक्तींचा शोध घेऊ लागले. मी तेव्हा जोडीदाराच्या शोधात नव्हते. मला माझ्यासारख्या स्त्रिया मैत्रिणी म्हणून हव्या होत्या. मला त्यांच्या कथा ऐकायच्या होत्या. मी बिंदुमाधव खिरे यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी मला खूप आधार दिला व एका 'गे-फ्रेंडली' मानसोपचारतज्ज्ञांची गाठ घालून दिली.

मला नैराश्यातून बाहेर पडायला वेळ लागला, पण काही

महिन्यांनी मी त्यातून बाहेर पडले. एके ठिकाणी नोकरी करू लागले. 'सपोर्ट ग्रुप मीटिंग'ला जाऊ लागले. मला वाटायचं, की सगळ्या लेस्बियन्स नैराश्यग्रस्त असणार व मानसिक व भावनिक आधारासाठी उत्सुक असणार. पण माझा समज चुकीचा होता. जसजशी मी इतरांना भेटायला लागले तसतसं लक्षात आलं, की सगळ्या काही माझ्यासारख्या दु:खी नसतात. (येथे मला सांगावंसं वाटतं, की माझा 'सपोर्ट ग्रुप मीटिंग्ज'चा अनुभव चांगला नाही. मला वाटतं तो फक्त एक देखावा असतो. का कुणास ठावूक मला या मीटिंग्जमधून आधार मिळाला नाही.)

कालांतराने मी जोडीदाराचा शोध सुरू केला. जोडीदार शोधताना मी 'बुच', 'फेम' अशी वर्गवारी करून शोध घेतला नाही. मला ही सर्व लेबल्स वाटतात. ज्या स्त्रीवर मी प्रेम करते तिचं जर माझ्यावर प्रेम असेल तर, ती कोणीही असो 'बुच' किंवा 'फेम' मला तिच्याबरोबर संग करायला आवडेल.

सुदैवाने मला जोडीदार मिळाली, ती मिळाली नसती तर मला कोणताच आधार नव्हता. दुर्दैवाने मी तिच्याशी फार काळ नातं ठेवू शकले नाही. मला या नात्यात प्रेम जाणवत नव्हतं. हे नातं फक्त दोघींची गरज होती. प्रेमाशिवाय नातं फार काळ टिकू शकत नाही. ते नातं संपलं.

आता जी जोडीदार माझ्या आयुष्यात आहे ती खूप प्रेमळ आहे. जीव लावणारी आहे. आमचे विचार खूप जुळतात व आम्ही दोघींचा खूप आदर करतो. एवढं प्रेम करतो, की वाटतं, आम्हाला एकमेकींपासून मूल जन्माला का घालता येऊ नये? मूल जन्माला घालणं हे फक्त पुरुष व स्त्रीच्याच नात्यात का असावं?

आज मी ज्या टप्प्यावर आहे तिथे वळून बघताना वाटतं, लोकांचा लेस्बियन्सकडे बघण्याचा दृष्टिकोन एवढा वाईट का असावा? आम्ही

माणसं नाही का? आम्हाला भावना नाहीत का? मग माझ्या सारख्यांच्या वाट्याला एवढा द्वेष का?

शाळेत असल्यापासून ते आजवर या पुरुषप्रधान संस्कृतीत माझे खूप हाल झाले. इतके की मला त्यांचा द्वेष वाटू लागला; पण आता जगाकडे बघताना वाटतंय, की पुरुष व स्त्री, भिन्नलिंगी व समलिंगी असं विभाजन करता कामा नये. प्रत्येकाकडे एक माणूस म्हणून बघायला शिकलं पाहिजे. म्हणजे माझा हा द्वेष, राग कमी होत जाईल व मन शांत होईल.

*****

## शोभना एस. कुमार (मुंबई)

हा हा म्हणता मला भारतात येऊन दहा वर्षं झाली. ८ सप्टेंबर २०१२ला मी दहा वर्षं भारतात राहिल्याची साजरी केली. त्या दिवशी माझ्या नात्याचीही १० वर्षं पुरी झाली.

जुलै २००२ साली मी इंटरनेटवर सर्फिंग करत होते व अगदी योगायोगाने माझी मुंबईत राहणाऱ्या एका स्त्रीशी ओळख झाली.

सुरुवातीला दोन-चार वेळा तुरळक 'चॅट्स' झाल्या आणि कळत नकळत आम्ही तासनूतास संवाद साधायला लागलो. पुढचे दोन महिने आम्ही दोघीही जवळजवळ दररोज आमचे विचार, दृष्टिकोन व आमच्या अनुभवांबद्दल एकमेकींशी बोलू लागलो. या काळात मी सॅन फ्रॅन्सिस्कोमध्ये होते व सिडनीला परत जायच्या तयारीत होते. या दरम्यान तिने मला मुंबईला यायचे निमंत्रण दिले. इथे माझ्या या गोष्टीला सुरुवात होते.

माझं नाव शोभना एस. कुमार. मी लेस्बियन आहे. फिरण्याची खूप आवड आहे. मी एक भारतीय आहे, जी आता माझ्या जोडीदाराबरोबर या गजबजलेल्या मुंबईत राहत आहे.

माझा जन्म फिजीमध्ये झाला आणि मी १८ वर्षांची असताना सिडनी (ऑस्ट्रेलिया)ला स्थलांतरीत झाले. मी सिडनीला माझं घर मानते. कारण तिथे मी खऱ्या अर्थी स्वतंत्र व सक्षम स्त्री बनले. याच शहरात मी पहिली नोकरी केली व स्वतःच्या पायावर उभी राहिले. स्वतःच्या कमाईतून स्वतः खर्च करू लागले. याच शहरात मला जाणवायला लागलं, की मला फक्त स्त्रियांशी नातं ठेवायला आवडतं. मी सिडनीमध्ये 'एलजीबीटी' समाजाबरोबर १० वर्षं काम केलं व २००० साली मी सॅन फ्रॅन्सिस्कोला स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला. इथे मी अध्यात्माकडे वळले. कामात अध्यात्माचा सहभाग कसा करायचा हे शिकले. आज अध्यात्म माझ्या आयुष्याचा एक मोठा भाग

आहे. याच काळात मी तिला पहिल्यांदा ऑनलाइन भेटले. तिला ऑनलाइन भेटल्यापासून माझं नातं खूप एक्सायटिंग बनू लागलं व मला या नात्याचा पाठपुरावा करायची इच्छा झाली.

मला तो दिवस अजूनही आठवतोय. ८ सप्टेंबर २००२ला ही अतिशय सुरेख स्त्री मला मुंबईच्या विमानतळावर घ्यायला आली. तिच्या आयुष्यात मी प्रवेश करावा म्हणून, ती मला निमंत्रण द्यायला आली होती.

आम्ही तिच्या लोखंडवालाच्या अपार्टमेंटवर गेलो. खूप तळमळीने बोललो. मग तसंत बोलत बोलत लोखंडवाला मार्केटमध्ये फिरलो. तासाचे दिवस, दिवसाचे महिने व महिन्याची १० वर्षं कधी झाली हे मला कळलंच नाही. दिवस इतके भराभर गेले, की आम्ही आमची १० वर्षं एकत्र असण्याचं सेलिब्रेशन करायची तयारी करू लागलो.

माझा जोडीदाराबरोबरचा प्रवास खूप इंटरेस्टिंग झाला. ती एक यशस्वी 'ऑन्त्रप्रनर' आहे. तिनं खूप वर्षांपूर्वी तिचं घरदार सोडलं व स्वतंत्रपणे न्यूयॉर्क व मुंबईत राहिली. आता मुंबईत शहरात आम्ही राहात आहोत. एक अत्यंत सुदृढ व परिपूर्ण असं नातं आम्ही अनुभवत आहोत.

पण, इंडियातलं पहिलं वर्ष मला खूप कठीण गेलं. मी ३५ वर्षांची होते, या देशाला नवखी होते व मला कोणीही मित्र वा नातेवाईक नव्हते. मला स्थानिक भाषा जवळपास येत नव्हती आणि माझी जोडीदार- ती एक अत्यंत जिद्दीची व स्पष्टवक्ती स्त्री होती.

तरीसुद्धा या सगळ्या परिस्थितीत तिचा मला खूप मोठा आधार मिळाला. आमच्या दोघींचा जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन समान असल्यामुळे एकमेकींना समजून घ्यायला मदत झाली. आम्हा दोघींनाही भिन्नलिंगी चौकटीत बसणाऱ्या नात्याप्रमाणे आमचं नातं जोपासायचं नव्हतं.

ती आणि मी एकत्र राहायला लागल्यावर मी 'पर्सन ऑफ इंडियन ओरिजिन कार्ड'(PIO)साठी अर्ज दाखल केला. त्यामुळे मी इंडियात राहून काम करू शकणार होते.

कालांतरानी आमचं नातं अत्यंत स्थिर व भक्कम बनत गेलं. अगदी सुरुवातीला आम्ही नियम ठरवला, की एकमेकांना सदैव समानतेच्या नजरेतून बघायचं. समाजाने ठरवलेल्या 'पुरुष' व 'स्त्री' यांमध्ये असमानता निर्माण करणाऱ्या किंवा जोपासणाऱ्या भूमिका मानायच्या नाहीत. जी नवीन लेस्बियन जोडपी आहेत त्यांना मी नेहमी सांगते, की हीच एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे, जिच्यामुळे आम्ही अत्यंत सुदृढ व यशस्वी नातं निर्माण करू शकलो. नात्याचे तीन भाग असतात- तुम्ही, तुमचा जोडीदार व तुमचं नातं आणि प्रत्येकाला स्वत:ची एक स्वतंत्र जागा मिळाली पाहिजे.

कामाच्या दृष्टीने मी अनेक सामाजिक संस्थांकडे अर्ज केले, पण मला हिंदी येत नसल्यामुळे नोकरी मिळत नव्हती. जागतिकीकरणामुळे भारतामध्ये आर्थिक सुधारणा होऊ लागल्यावर विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात परदेशातून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होऊ लागली. भारतात 'नॉन-प्रॉफिट' व 'डेव्हलपमेंट सेक्टर'मध्ये काही अत्यंत महत्त्वाचे बदल घडत होते. समाजकार्य करणाऱ्या संस्थांना परदेशी गुंतवणूकदारांकडून मोठी मदत मिळू लागली. सामाजिक संस्थाही जास्त शिस्तबद्ध काम करू लागल्या. अनेक सामाजिक संस्थांना या बदलांबरोबर बदलण्याची कौशल्ये ज्ञात नव्हती. कामामध्ये शिस्तबद्धता, नियम, पारदर्शकता हे मॅनेजमेंटचे गुरुमंत्र होऊ लागले होते. मला नॉन-प्रॉफिट सेक्टरमध्ये काम करायचा अनुभव असल्यामुळे मी 'ऑर्गनायझेशन डेव्हलपमेंट'च्या क्षेत्रात काम करायचं ठरवलं.

पुढची काही वर्षं मी एका एनजीओबरोबर कन्सल्टन्ट या नात्याने काम करू लागले. एनजीओमध्ये किती काम होतंय हे तपासणं व

आंतरराष्ट्रीय पातळीवर असणाऱ्या 'बेस्ट प्रॅक्टिसेस'चा वापर करून इथल्या संस्थेच्या निदर्शनास हे मुद्दे आणणं हे उद्दिष्ट होतं. याच आधारावर ह्यूमन रिसोर्सेस, 'आयटी', गव्हर्नन्स, फायनान्स व ॲडमिनिस्ट्रेशनचे नियम बनवले.

२००६ साली मी 'लॉयर्स कलेक्टिव्ह'साठी काम करू लागले. या संस्थेनी 'नाझ फाउंडेशन इंडिया'बरोबर भा.दं.सं. कलम ३७७ बदलावे म्हणून दिल्ली हायकोर्टात दावा दाखल केला होता. या काळात मला भारतातील विविध गे, लेस्बियन व हिजडा समाजातील लोकांना भेटण्याची संधी मिळाली. अनेकांशी विविध विषयांवर संवाद झाले.

हळूहळू माझ्या समाजातील लोक मला ओळखू लागले. मला लेस्बियन व उभयलिंगी स्त्रियांचे कॉल येऊ लागले. सुरुवातीला 'चॅट' करणे हाच त्यांचा हेतू आहे असं त्या सांगायच्या. सुरुवातीची संभाषणं सर्वसाधारण असायची, पण नंतर हळूहळू स्त्रिया त्यांच्या खासगी आयुष्याबद्दल बोलू लागल्या. त्यांचे प्रश्न सोडवायला माझी मदत घेऊ लागल्या व मी लेस्बियन, उभयलिंगी व ट्रान्स व्यक्तींबरोबर काम करू लागले.

लोकांनी समजून घेतलं पाहिजे, की लग्न झालेल्या स्त्रिया भिन्नलिंगीच असतात असं नाही. यातील काही स्त्रिया लेस्बियन असतात, पण त्यांना लग्न करण्याशिवाय या समाजात पर्याय नसतो म्हणून नाइलाजाने लग्न करतात. लग्न झाल्यावर त्यांना प्रकर्षानं जाणवतं, की त्यांना पुरुषांबरोबर संसार नकोय, त्यांना स्त्रीशी संसार करायचाय. काही स्त्रिया लेस्बियन असल्यातरी, 'आम्ही उभयलिंगी आहोत' असं सांगतात, कारण त्यांना लेस्बियन म्हणून भिन्नलिंगी-लग्न संस्थेच्या चौकटीबाहेरच्या जीवनशैलीत जगणं शक्य नसतं.

काही वर्षांनंतर, क्रायसिस कॉल्स आले, की मदतीसाठी मी 'द हमसफर ट्रस्ट' (मुंबई)चा आधार घेऊ लागले. हा ट्रस्ट गे, समलिंगी संबंध ठेवणारे पुरुष, ट्रान्सजेंडर व हिजड्यांबरोबर त्यांचे

आरोग्य व अधिकारांवर काम करतो. त्यांच्याकडे एक अत्यंत चांगली 'क्रायसिस इंटरव्हेन्शन ॲण्ड मॅनेजमेंट' टीम आहे. त्यांची दवाख़ाने, रुग्णालय व पोलिस ठाण्यांशी ओळख असल्यामुळे त्याचा उपयोग स्त्रियांचे प्रश्न सोडवण्यास होऊ लागला.

लेस्बियन समाजात सर्वांत प्रामुख्याने आढळणारा प्रश्न म्हणजे त्यांच्यावर लग्न करण्याचा येणारा दबाव. पालकांना वाटतं, की त्यांचं कर्तव्य आहे, की त्यांच्या मुलीचं लग्न त्यांनी लावलं पाहिजे. म्हणजे तिचा नवरा तिचा सांभाळ करू शकेल. पण ज्या स्त्रिया लेस्बियन आहेत त्यांना लग्न करायची इच्छा नसते. अशा परिस्थितीत आम्ही त्यांना विविध मार्गांनी मदत करतो. काही वेळा त्यांच्या पालकांशी बोलून आम्ही काही तडजोड घडवून आणतो. त्यांना सांगतो, की तिला लग्न करायचं नाहीये व तिने शिकून स्वतःच्या पायावर उभं राहावं, स्वतःचं करिअर बनवावं व आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र व्हावं.

काही तुरळक केसेस अशाही झाल्या, जिथे काही स्त्रियांना इतर शहरात हलवावं लागलं, कारण त्यांचे पालक खूप हिंसक बनले व त्या स्त्रियांची सुरक्षितता धोक्यात आली.

काही क्रायसिस कॉल्स हे लेस्बियन नातेसंबंधातील होते. यात विविध प्रश्न समोर आले व येताहेत. लेस्बियन नातं कसं असावं याचे काही गैरसमज दिसतात ज्यातून या नात्यात पेच निर्माण झालेले दिसतात. काही जोडप्यांमध्ये विसंवाद दिसला. काही स्त्रियांमध्ये गर्लफ्रेंड्सकडून हिंसा होताना दिसून आली तर काही गर्लफ्रेंड्समध्ये दारूचं व्यसन दिसून आलं. अनेक स्त्रियांनी सांगितलं, की त्यांना लहानाचं मोठं होताना सातत्यानी आपल्या भावना, इच्छा, गरजा व स्वप्नं महत्त्वाची नाहीत, हे सर्व दुसऱ्यासाठी (मग ते पालक असोत किंवा नवरा असो) समर्पित करता आलं पाहिजे, आई-वडील व नवरा यांच्या इच्छा जास्त महत्त्वाच्या आहेत असं सुचवलं गेलं आहे. या सर्व संस्कारांपासून स्वतःची लैंगिकता स्वीकारून स्वतःचा प्रवास स्वतःच्या

इच्छेनुसार करणे खूप अवघड होते.

'एलबीटी' समाजासाठी एक सुरक्षित जागा असावी म्हणून, 'द हमहफर ट्रस्ट'नी त्यांचं एक ऑफिस या कामासाठी दिलं. यातून 'उमंग ग्रुप' निर्माण झाला. जानेवारी २०१२ला उमंगच्या बॅनरखाली ५० 'एलबीटी' व्यक्तींनी प्राइड मार्चमध्ये भाग घेतला. आता उमंग एक अत्यंत चांगला आधार देणारी संघटना बनली आहे. उमंगचं आणि मुंबईत विविध सुविधा पुरवणाऱ्या संस्थांशी चांगलं नेटवर्किंग जमलं आहे. हे नेटवर्किंग वाढवण्याचं काम अजून सुरू आहे. हे आमचं काम प्रकाशझोतात नाही कारण या कामाचं स्वरूप खूप नाजूक आहे, पण या कामाला निश्चितच वजन आहे.

उमंगच्या छत्राखाली 'एलबीटी' गटाच्या मीटिंग्ज व विविध कार्यक्रम होतात. ग्रुपमधील मेंबर एकमेकांना मदत करतात, आधार देतात. सक्षम आयुष्य जगण्याबद्दलचे आपले विचार मांडतात. माझं उमंगमधलं काम हे 'मेंटॉर'चं काम आहे. वैयक्तिक समस्या सोडवण्यासाठी मी आधार देते, व्यक्तींना सक्षम करण्यासाठी मी प्रयत्नशील असते.

२००९साली पुण्यात काम करताना मी पडले व माझा पाय फ्रॅक्चर झाला. ३ महिने सक्तीची विश्रांती घ्यावी लागली. या काळात मी वाचन सुरू केलं. 'एलजीबीटी' विषयाची पुस्तकं शोधू लागले. अशी पुस्तकं विकणाऱ्या दुकानांच्या ई-कॉमर्स साइट्स हुडकू लागले. आंतरराष्ट्रीय ई-कॉमर्स कंपन्या अशी पुस्तकं भारतात पाठवत नव्हते कारण 'द इंडियन कस्टम्स ॲक्ट', १९६२नुसार अशा विषयांची पुस्तकं समाजहिताच्या विरोधी आहेत म्हणून त्यांच्या आयातीवर बंधनं होती.

हा अभ्यास चालू असताना 'क्वीअर इंक'ची संकल्पना माझ्या मनात आली. मी आणि माझ्या जोडीदाराने आमच्या निवृत्तीसाठी बाजूला ठेवलेल्या पैशातून 'एलजीबीटी' पुस्तकांचं संकलन करणं व ती ऑनलाइन माध्यमातून (www.Queer-Ink.com) विकायला ठेवणं

सुरू केलं. देशातील विविध 'प्राइड' इव्हेंट्समध्ये भाग घेतला व 'क्वीअर इंक'ची जाहिरात केली.

हा व्यवसाय सुरू केल्यानंतर काही महिन्यांतच दिसून आलं, की भारतात इंग्रजी व स्थानिक भाषांमध्ये जेमतेम १०० पुस्तकं प्रकाशित झालेली आहेत. म्हणून आम्ही दोघींनी फक्त 'एलजीबीटी' पुस्तकं प्रकाशनाचा व्यवसाय सुरू करायचं ठरवलं. उद्दिष्ट हे, की भारतातील 'एलजीबीटी' समाजाचं चांगल्या दर्जाचं साहित्य निर्माण व्हावं. लेस्बियन स्त्रियांनी स्थापन केलेली भारतातील ही पहिली प्रकाशन कंपनी आहे. आमचं पहिलं इंग्रजीतलं पुस्तक 'Out! Stories From The New Queer India' नुकतंच प्रकाशीत झालं आहे.

असा आमचा प्रवास चालू आहे.

*****

# भाग तीन- गे मुलांच्या आत्मकथा

## प्रणेश (जळगाव)

बरेच दिवसांपासून वाटत होतं, की इतरांप्रमाणे मीही माझ्या अनुभवांबद्दल लिहावं, पण धाडस होत नव्हतं. पण आत्ता मात्र ठरवलं, की लिहायचंच. यात फक्त एकाच गोष्टीची खंत आहे, ती म्हणजे यातील माझे अनुभव जरी खरे असले तरी माझ्या समलैंगिकतेबद्दल माझ्या घरी माहिती नसल्यामुळे इथे मी माझं खरं नाव देऊ शकत नाही!

माझे आईबाबा एका मध्यमवर्गीय सर्वसामान्य महाराष्ट्रीयन कुटुंबातले. माझा जन्म महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातल्या एका लहानशा गावात झाला. अर्थातच तिथे पाहिजे तशा सुखसोयी नव्हत्या. माझ्या घरात मी, आई, बाबा आणि मोठा भाऊ असं लहानसं कुटुंब. आईबाबांचं अरेंज्ड मॅरेज होतं. पुढे माझ्या आजोबांचं व माझ्या आईबाबांचं पटेनासं झालं. याला कारण असं, की एकतर बाबा हे सावत्र होते व लग्नानंतर ५ वर्षं माझ्या आईला मूल नव्हतं. मतभेद पराकोटीला गेले व माझ्या आजोबांनी दोघांना घरातून काही न देता वेगळं केलं. त्यानंतर बाबांनी एका मित्राची मदत घेऊन नवीन आयुष्य सुरू केलं. बाबा सरकारी खात्यात कामाला होते. आर्थिक परिस्थिती लक्षात घेता त्याला थोडा हातभार म्हणून आईसुद्धा त्याच कारखान्यात पार्ट-टाइम काम करू लागली. माझे आईबाबा दोघंही खूप कष्टाळू असल्यामुळे त्या दोघांनी शून्यातून आपलं विश्व निर्माण केलं.

मी घरात सर्वांत लहान होतो म्हणून माझे खूप लाड झाले. माझं १ली ते ७वीपर्यंतचं शिक्षण आमच्या गावातच झालं. ८वी ते १०वीचं शिक्षण गावापासून दूर असलेल्या एका शाळेत झालं. शाळेत मित्रांमध्ये टिंगल, मस्करी करणं, अश्लील बोलणं, सेक्सबद्दल बोलणं, मुलींची

छेड काढणं हे तर आमचे रोजचे उद्योग! यापैकी आणखी एक उद्योग म्हणजे घरी कुणी नसताना मित्रांसोबत ब्ल्यू फिल्म बघणं. मित्रांच्या चर्चेतून व काही अपूर्ण माहिती देणाऱ्या मासिकांतून मला माझ्या लैंगिक भावना क्षमवणारा एक नवीन प्रकार माहीत झाला- हस्तमैथुन. मला माझा हस्तमैथुनाचा पहिला अनुभव अजूनही लक्षात आहे कारण तो अनुभव मला घाबरवून सोडणारा होता. अपूर्ण माहितीमुळे हस्तमैथुन कसं करावं हे माहिती होतं; परंतु वीर्यपतनाबद्दल माहिती नव्हती. त्यामुळे जेव्हा मी पहिल्यांदा हस्तमैथुन केलं तेव्हा मला लैंगिक सुख मिळालं परंतु जेव्हा चिकट पांढरा स्राव माझ्या लिंगातून बाहेर पडला त्या वेळी मला हा पांढरा स्राव काय आहे हे माहीत नव्हतं. मी खूप बेचैन झालो.

दहावी नंतर ११वीला सायन्सला ॲडमिशन घेण्याचं ठरवलं, पण आता मात्र माझ्या जीवनाचं चित्र पूर्वीसारखं साधं-सोपं नव्हतं. आता मी माझ्या किशोरावस्थेत होतो त्यामुळे माझ्या लैंगिक भावना मोठ्या प्रमाणात डोकं वर काढू पाहत होत्या. माझे सर्व मित्र भिन्नलिंगी लैंगिक कलाचे असल्यामुळे ते नेहमी मुलींबद्दल अश्लील वर्णनं करायचे, पण मला मात्र तसं काही वाटतच नव्हतं. उलट मला पुरुषांबद्दल आकर्षण जाणवत होतं. मित्रांबरोबर ब्ल्यू फिल्म बघतानासुद्धा माझं लक्ष त्यामधील नटीपेक्षा नटाकडेच जास्त असे. असं का? हा असा लढा माझा स्वत:शीच चालू झाला. या कारणामुळे मी खूप कमी मार्कांनी १२वी पास झालो.

त्यानंतर मी 'बीसीएस'ला ॲडमिशन घेतली. १२वीला कमी मार्क्स असल्यामुळे इतर कोर्सेसकडे वळणं शक्य नव्हतं. दुसरी अडचण म्हणजे, घरची आर्थिक परिस्थिती साधारण होती म्हणून मी 'बीसीएस'ला जाणं पसंत केलं. कॉलेजला गेल्यावर माझ्या लैंगिकतेचं चित्र फार काही वेगळं नव्हतं. कॉलेजला असतांना मला माझ्या वयाच्या मुलांबद्दल लैंगिक आकर्षण वाटायचं व ती लैंगिक भावना माझ्या मनात

एवढी प्रखर होती, की माझं लक्ष कशातच लागत नव्हतं. मी माझ्या या भावनांविषयी कुणाशी बोलूही शकत नव्हतो. मित्रांपाशी बोलायचं म्हटलं तर मनात भीती होती, की ते आपली टिंगल करतील. मी शिक्षणाकडे आणि इतर गोष्टींकडे लक्ष केंद्रित करायचं ठरवलं. माझा हा प्रवास पुढे २ वर्षं असाच चालू राहिला. माझं मला कळत नव्हतं, की याला पर्याय मला कधी व कोणता मिळेल? हिंदू संस्कृतीत राहात असल्याकारणाने शेवटी माझी हाक मी देवाला दिली. मला सुरुवातीला वाटत होतं, की मला एक आजार/रोग झाला आहे, त्यामुळे मी रोज सकाळ-संध्याकाळ देवाला प्रार्थना करायचो, ''देवा मला बरं कर, देवा मला बरं कर'' पण तेव्हा हे मला माहीत नव्हतं, की जो आजार/रोग नाही त्याला देव तरी काय करणार!

शेवटी अशाच परिस्थितीत कॉलेजची ३ वर्षं काढली आणि पुढील शिक्षणासाठी पुण्यात आलो. पुण्यात आल्यावर बघता बघता सारं आयुष्य बदलून गेलं. पुण्यात आल्यानंतर मी हॉस्पिटॅलिटीचा एक पार्ट-टाइम कोर्स जॉइन केला, कारण मला हॉस्पिटॅलिटीची आवड होती. या कोर्सचा एक फायदा असा झाला, की खूप काही नवीन शिकायला मिळालं, जे मी एका लहानशा गावात राहून शिकलो नसतो. सुरुवातीला मला नवीन शहरात जमवून घेणं खूप कठीण गेलं, कारण इथली संस्कृती व गावातली संस्कृती, यात खूप फरक होता. हळूहळू परिस्थितीशी जमवून घेत होतो व माझ्या समलैंगिक भावनांनाही आवर घालत होतो. अशा या परिस्थितीत एके दिवशी माझ्या इन्स्टिट्यूटमध्ये समलिंगी संबंधांबद्दल आमच्या एका ट्रेनरनं चर्चा सुरू केली. त्यावेळी आम्ही अभ्यासाचा एक भाग म्हणून अमेरिकेच्या संस्कृतीचा अभ्यास करत होतो. ज्या क्षणी माझ्या ट्रेनरनं याविषयी बोलणं सुरू केलं त्या क्षणी माझ्या हृदयाचे ठोके नेहमीपेक्षा जास्त गतीने पडू लागले. त्यावेळी ते समलिंगी संबंधांबद्दल जे वर्णन करत होते तीच भावना माझ्या मनात गेल्या अनेक वर्षांपासून मी दाबून ठेवली होती. त्यामुळे आणखीच

दडपण वाढलं, कारण समलिंगी संबंधांबद्दल मी पहिल्यांदाच ऐकत होतो. तो दिवस माझ्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाचा दिवस. त्या दिवशी क्लासमध्ये ते सर्व एका कागदावर नोट्सच्या स्वरूपात लिहून घेतलं. लगेच एका क्षणाचाही विलंब न करता पुढच्या लेक्चरचा विचार न करता तिथून पसार झालो व दुसऱ्याच क्षणी जवळ असलेल्या एका सायबर कॅफेत जाऊन बसलो. ट्रेनरनं या विषयातील अभ्यासासाठी इंटरनेटवर असणाऱ्या काही वेबसाइट्सच्या लिंक्स दिल्या होत्या, त्या मी वाचत गेलो व जी गरजेची वाटेल त्या महितीची प्रिंटसुद्धा घेतली.

पुढील संपूर्ण एक आठवडा माझं हेच काम, की कॅफेत जाऊन समलैंगिकतेबद्दल जास्तीत जास्त माहिती गोळा करणं. जवळजवळ १ महिन्यानंतर मी स्वत:ला समलिंगी म्हणून मानू लागलो. त्यानंतर पुन्हा प्रश्न उभा राहिला, तो म्हणजे मी समलिंगी आहे हे सांगायचं कुणाला? घरची परिस्थिती बघता मी ते गुपित माझ्यापर्यंतच मर्यादित ठेवण्याचा निर्णय घेतला.

पुढे याच प्रश्नाच्या उत्तराच्या शोधात मला इंटरनेटवर माहिती मिळाली, की समलिंगी व्यक्तींची 'चॅटरूम' असते व मीही उत्सुकता म्हणून त्या 'चॅटरूम'वर गेलो आणि बघतो तर काय? माझ्यासारखी समलिंगी असणारी बरीच मुलं तिथं मला ऑनलाइन भेटली. तेव्हापासून मला वाटतं माझ्या आयुष्यानं एक वेगळं व महत्त्वपूर्ण वळण घेतलं. मी त्या 'चॅटरूम'मध्ये तासनूतास घालवू लागलो. बऱ्याच जणांशी लैंगिकतेबद्दल गप्पा मारल्या. यातूनच मला एक जिवाभावाचा व माझी खूप काळजी घेणारा माझ्या आयुष्यातील पहिला समलिंगी मित्र भेटला. त्याचं नाव प्रतीक. तोही माझ्यासारखाच या विषयातील अधिकाधिक माहिती घेण्यासाठी धडपडत होता. आमची चांगली मैत्री जमली व आम्ही तासनूतास 'चॅट'वर गप्पा मारायचो. काही महिन्यांनी आम्ही भेटण्याचा निर्णय घेतला. त्याला भेटण्याच्या आदल्या रात्री मला झोप लागलीच नाही कारण ओढ होती ती त्याला भेटण्याची. मी सकाळ

होण्याची आतुरतेनं वाट बघत होतो. त्या दिवशी आम्ही जवळजवळ पूर्ण दिवस बरोबर घालवला. खूप गप्पा मारल्या. समलैंगिकतेबद्दल चर्चा केली. या चर्चेतून मला बरंच काही नवीन शिकायला मिळालं, जे आजपर्यंत मला माहीत नव्हतं. पुढील काही दिवस आम्ही रोज न चुकता भेटत गेलो.

तो पुण्याचा असल्याकारणाने तो त्याच्या आईवडिलांबरोबर राहात असे. एके दिवशी तो मला त्याच्या घरी घेऊन गेला. आम्ही गप्पा मारत असताना त्यानं मला प्रश्न केला, की माझे कधी कुणाबरोबर समलिंगी शरीरसंबंध झाले आहेत का? मी नकारार्थी मान हलवली. त्यानं मला सांगितलं, की त्याचा दोन पुरुषांबरोबर सेक्स झाला आहे. मग सहजपणे माझा आणि प्रतीकचा सेक्स झाला. आयुष्यात पहिल्यांदा माझा एका समलिंगी मुलाशी शरीरसंबंध झाला. तो सेक्सचा अनुभव मला सुखावणारा होता, पण त्याचबरोबर माझ्या मनात प्रकर्षाने अपराधीपणाची भावना जाणवत होती. पुढील अनेक दिवस आम्हा दोघांचं सेक्स करण्याचं सत्र सुरू राहिलं. हळूहळू अपराधीपणाची भावना कमी होत गेली. काही काळ आमची दोघांची मैत्री खूप छान रंगली. मग हळूहळू अंतर पडू लागलं. मग प्रतीक आणि मी फक्त चांगले मित्र राहिलो. आमच्यामध्ये सेक्सच्या भावना उरल्या नाहीत.

पुढे मला चांगल्या कंपनीत नोकरी मिळाली. ही माझी पहिली नोकरी असल्यामुळे मनात खूप उत्साह होता, पण सोबत एक भीतीसुद्धा होती. मनावर एक दडपण होतं, की जर माझ्या ऑफिसमध्ये किंवा मित्रांना कळलं, की मी समलिंगी आहे तर काय होईल? नोकरी जाईल का? पण तसं काही घडलं नाही. मी नवीन जॉबला लागल्यावर खूप काही नवीन शिकण्यास मिळालं. कामाच्या ओघात माझी आणि प्रतीकची ताटातूट वाढत गेली व आपोआपच आम्ही एकमेकांपासून दूर गेलो.

आता स्वत:च्या पायावर उभा असल्यामुळे आर्थिकदृष्ट्या घरच्यांवर अवलंबून नव्हतो. हाती पैसा असल्याने व नवीन मित्रांची

संगत लाभल्यामुळे माझ्या आयुष्याला उधाण आलं होतं. मी गे पार्ट्यांना जाण्यास सुरुवात केली.

एके दिवशी माझी एका नवीन मित्राशी ओळख झाली. त्या मित्राने माझी एका संस्थेशी ओळख करून दिली. ती संस्था समलिंगी लोकांसाठी काम करत होती. ती संस्था म्हणजे 'समपथिक ट्रस्ट'. माझ्यासाठी ही एक आश्चर्यकारक गोष्ट होती, कारण मी कधी स्वप्नातही विचार केला नव्हता, की समलिंगी लोकांसाठी अशी कुठली संस्था असू शकते. माझ्यासाठी हा एक कुतूहलाचा विषय होता व मी त्या संस्थेला भेट देण्याचा निर्णय घेतला.

मला वाटतं, की समलिंगी म्हणून खऱ्या अर्थी माझ्या आयुष्याला त्या दिवसानंतर सुरुवात झाली. तेथे माझ्यासारखे अनेक समलिंगी पुरुष, ट्रान्सजेंडर, हिजडे नोकरी करत होते. तेथे सर्वांशी गप्पा मारल्या व योगायोग म्हणजे त्या संस्थेचे संस्थापक बिंदुमाधव खिरे हेही त्या दिवशी ऑफिसमध्ये होते, त्यामुळे त्यांच्याशीही संवाद साधला. नंतर माझ्या मित्राकडून कळालं, की तिथं एक जॉब व्हेकन्सी आहे. त्यानं मला विचारलं, की मला तिथं काम करायला आवडेल का? मी त्याला २-३ दिवसांनी विचार करून सांगतो म्हणून सांगितलं. त्या दिवसापासून मनात सारखा तोच विषय होता. माझी कॉर्पोरेट सेक्टरची नोकरी सोडून एका संस्थेमध्ये नोकरी करणं हा माझ्यासाठी खूप कठीण प्रश्न होता. त्याचा परिणाम माझ्या आयुष्यावर- आर्थिकदृष्ट्या व इतर सर्व बाबतीत नक्कीच होणार होता. शेवटी मी राजीनामा देऊन समपथिक ट्रस्टमध्ये नोकरी करण्याचा निर्णय घेतला. त्या मागील एक महत्त्वाचं कारण म्हणजे, स्वतःला समलिंगी म्हणून स्वीकारलं असलं तरी समलिंगी म्हणून जगासमोर अभिमानानं नोकरी करायचं माझं स्वप्न होतं, जे मी कॉर्पोरेट सेक्टरसारख्या ठिकाणी राहून पूर्ण करू शकणार नव्हतो. आता ती संधी माझ्याकडे चालून आली होती.

येथे येऊन खूप नवीन विषयांची ओळख झाली. या संस्थेत मला

एचआयव्ही/एड्स व सुरक्षित संभोगाबद्दल माहिती मिळाली. हे विषय फक्त ऐकून होतो, पण या विषयांचं ज्ञान नव्हतं. यापूर्वी माझ्या माहितीमध्ये निरोध हा फक्त स्त्री-पुरुष संबंधामध्येच वापरतात असा होता. इथे धक्कादायक गोष्ट माहीत झाली, की स्त्री-पुरुष संबंधांपेक्षा असुरक्षित (निराध न वापरता) समलिंगी गुदमैथुनातून एचआयव्ही बाधित पुरुषापासून एचआयव्हीची लागण होण्याचा धोका जास्त असतो.

अजून एक नवीन विषय कळला, तो म्हणजे 'समलिंगी नाती'. मला पूर्वी कल्पनाही नव्हती, की दोन पुरुषांचं कधी नातं किंवा संसार असू शकतो. मला वाटत होतं, की समलिंगी म्हणून आपण एकट्यानंच आयुष्य जगायचं. ट्रस्टमध्ये समलिंगी नात्यांबद्दल नेहमी चर्चा व्हायची. त्यामुळे कुठेतरी माझ्या मनातही आपलंही असं नातं असावं अशी भावना निर्माण होऊ लागली. ती होणं साहजिकच होतं, कारण आजूबाजूला बरेच असे मित्र होते, की ज्यांना गर्लफ्रेंड्स होत्या. माझ्यासाठी प्रश्न होता तो पुरुष जोडीदाराचा! तो शोधायचा कसा? या प्रश्नाचं उत्तर माझ्याकडे नव्हतं. मी बऱ्याच गे पुरुषांना भेटलो व त्यांच्याबरोबर मैत्रीच्या नात्यापलीकडे जोडीदार म्हणून नातं जमेल का? याचा शोध घेतला, पण यश आलं नाही. नंतर नंतर लक्षात येत गेलं, की समलिंगी नातं हे प्रत्येकाच्या वाट्याला येत नसतं. त्यामुळे मनाची समजूत घालून मी स्वतःला काही काळ या सर्व गोष्टींपासून दूर ठेवलं जेणेकरून स्वतःला एकटं राहण्याची सवय लागावी. या काळात माझ्या आयुष्यात फक्त दोन गोष्टींसाठी वेळ होता व त्या म्हणजे माझं घर व माझी नोकरी.

पुढे बऱ्याच दिवसांनी मी एकाला भेटलो. बराच वेळ गप्पा रंगल्या. त्यानं त्याचं नाव अभिषेक म्हणून सांगितलं. गप्पांनंतर माझ्या मनात विचार येऊन गेला, की डेटच्या दृष्टिकोनातून ती संध्याकाळ माझी वाया गेली, मात्र एक चांगला, प्रामाणिक मित्र मला मिळाला. नंतर मी

त्याला माझ्याबरोबर घरी येण्यासाठी विचारले व तो तयार झाला. घरी आल्यानंतर टीव्हीवर चालू असलेला कार्यक्रम बघत आम्ही मी तयार केलेली मॅगी खाल्ली. नंतर रात्री आमच्या दोघांमध्ये सेक्स झाला. सकाळी चहा घेतल्यानंतर तो माझ्या घरून निघून गेला. त्या दिवशी मी कधीही विचार केला नव्हता, की हाच अभिषेक माझ्या जीवनात परत येईल म्हणून. पण दोन दिवसांनी माझा तर्क चुकीचा ठरला. त्यानं मला रविवारी दुपारी फोन केला आणि मला भेटायला बोलावलं. मी त्याच्या रूमवर पहिल्यांदा गेलो, पण यावेळी मात्र आमची भेट काहीशी वेगळी होती. त्या दिवशी त्याच्यातील वेगळेपण मला जाणवत होतं. असेच पुढचे २-३ दिवस एकमेकांना आम्ही संध्याकाळी न चुकता भेटत गेलो. ऑफिसमुळे भेटता आलं नाही तर फोन नक्कीच होत असे. तो एका 'आयटी' कंपनीत नोकरीला होता. सुट्टीचे दिवस आम्ही सोबत घालवायचो. हळूहळू आम्ही एकमेकांना खूप चांगल्या प्रकारे ओळखायला लागलो. मला त्याचा मायाळू, काळजी घेणारा स्वभाव खूप आवडे. त्याच्यामध्ये दुसऱ्या व्यक्तीला आपलंसं करण्याची कला होती. यामुळे आमची घट्ट मैत्री जमली. मैत्रीच्या पलीकडे जाण्याची माझी नक्कीच इच्छा होती, पण पूर्वीच्या काही वाईट अनुभवांमुळे त्या इच्छेला मी शब्दांत उतरु दिलं नाही.

माझा वाढदिवस आला. ती माझ्यासाठी एक अनमोल अशी रात्र होती कारण त्यावेळी प्रथमच मला कोणी त्याच्या खऱ्या भावनांनी "आय लव्ह यू" म्हटलं व मला प्रपोज केलं. त्या क्षणी मी इतर कुठल्याही गोष्टीचा विचार न करता, त्याला होकार दिला.

त्या दिवसापासून आमच्या दोघांपुढे वेगवेगळ्या रंगांनी रंगवलेलं नात्याचं सुंदर चित्र समोर आलं. आम्ही दोघांनी एकमेकांच्या मित्रांना आमच्या नात्याबद्दल सांगितलं आणि आश्चर्य म्हणजे आमच्या सर्व मित्रांनी अशी काही प्रतिक्रिया दिली, की जणू काही आम्हाला लॉटरी लागली आहे, कारण त्या सर्वांमते गे नाती म्हणजे गप्पांमधील

रंगणारा फक्त एक चर्चेचा विषय. तरी त्यातील काहींनी मला या नात्याबद्दल सल्ले दिले. हे नातं पुढं कसं टिकवून धरायचं याबद्दलच्या टिप्सपण दिल्या.

माझं शेड्यूल पूर्णत: बदललं. नो चॅटिंग, नो डेटिंग आणि अगदी स्पष्ट सांगायचं झालं तर या सर्व गोष्टींची मला आता गरज नव्हती. हा बदल फक्त माझ्यासाठीच नव्हे तर अभिषेकसाठीही होता. आम्ही दोघं एकमेकांना भेटण्यासाठी दररोज तासनूतास आतुरतेने वाट बघत थांबायचो. असेच काही महिने आम्ही एकमेकांना रोज न चुकता भेटत राहिलो.

प्रश्न होता तो माझ्या घरच्यांचा. कारण घरच्यांना माझ्या या जीवनशैलीची तीळमात्रही जाणीव नव्हती. याचा पहिला टप्पा म्हणून, माझे आईबाबा काही निमित्ताने पुण्याला आले होते, तेव्हा मी अभीला माझ्या घरी नेऊन त्यांची ओळख करून दिली. अर्थात ती ओळख माझा बॉयफ्रेंड म्हणून नव्हे तर एक जवळचा मित्र म्हणून होती.

नुकतंच जन्माला आलेलं आमचं नातं एका लहान बाळाप्रमाणे वाढू लागलं. नात्याबद्दलची खरी गंमत व उतार-चढाव आम्ही दोघंही अनुभवू लागलो. पुढे आम्ही दोघांनी एकत्र राहण्याचा निर्णय घेतला. एकत्र आल्यानंतर आमचं नातं आणखीनच रंगात येऊ लागलं. आम्हाला कळू लागलं, की नवरा-बायकोच्या संसारात काय जबाबदाऱ्या असतात. काही अंशी आमच्या दोन पुरुषांच्या नात्यात त्या जबाबदाऱ्या सारख्याच होत्या. स्त्री-पुरुषांप्रमाणे आम्हीही आमच्या संसाराच्या जबाबदाऱ्या वाटून घेतल्या व त्या जबाबदाऱ्या व्यवस्थित व वेळेवर कशा पार पाडायच्या याचं ज्ञान आम्हाला येऊ लागलं. या जबाबदाऱ्या पूर्ण करताना आम्हा दोघांना अनेक अडचणी येतात. एकमेकांशी क्षुल्लक कारणांमुळे नवरा-बायकोप्रमाणे भांडणंही होतात. त्या भांडणात दोघांपैकी कुणी एक पुढाकार घेऊन ते भांडण मिटवतो. बऱ्याच वेळा असं सारखं वाटत असतं, की आमच्या दोघांचं नातं हे एका स्त्री-

पुरुषाच्या नात्यापेक्षा काही वेगळं नाही. मात्र आमच्या नात्याला काही प्रमाणात मर्यादा आहेत. आमच्या नात्याला कायद्याने मान्यता नाही. कायदेशीर मान्यता नसल्याने मला आमचं भविष्यातलं नातं कसं असेल ते आत्ता सांगता येणार नाही, पण आज तरी या नात्यातील एक एक क्षण आम्ही आनंदाने उपभोगतो आहोत.

माझ्या पुढे भविष्यात फक्त एकच आव्हान आहे व ते म्हणजे मी समलिंगी आहे हे माझ्या आईबाबांना सांगणे. हे आव्हान नक्कीच माझ्यासाठी व माझ्या आईबाबांसाठी त्रासदायक असणार आहे. मी त्यांचा मुलगा म्हणून त्यांची माझ्याबद्दल खूप स्वप्नं आहेत. त्यातील एक स्वप्न म्हणजे माझ्या लग्नाचं. आपल्या संस्कृतीत लग्न हा महत्त्वाचा भाग आहे आणि त्या संस्कृतीच्या विरुद्ध जाऊन मी लग्न न करणं म्हणजे त्यांच्या विश्वासाला तडा देणं. हे धाडस मी करणार आहे. ते नक्कीच दु:खी होतील. समाज आपल्याला काय म्हणेल याबाबत त्यांना चिंता वाटेल. हे सर्व खरं असलं तरी फक्त आईबाबांच्या, समाजाच्या मान्यतेसाठी मी लग्न करणं हे गणित माझ्या चौकटीत बसत नाही. मी लग्न करणं म्हणजे होणाऱ्या जोडीदाराची फसवणूक करणं. सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे ती माझी स्वत:ची फसवणूक असेल. त्यामुळे हे नक्की, की मी लग्न करणार नाही व मी आणि माझा जोडीदार आयुष्यभर सोबत राहू. हे सगळं माझे आईबाबा कुठल्या स्वरूपात घेतील हा खरंतर मलासुद्धा बऱ्याच दिवसांपासून पडलेला प्रश्न आहे. त्याचं उत्तर येणारा काळ देईल.

*****

## मयूर (सातारा)

बाहेर पाऊस चालू असला तरीही घरात बसायला माझी काहीही हरकत नव्हती. किंवा खरंतर घरात बसायला एक चांगलं कारण मिळालं होतं. कुठे ते नातेवाइकांकडे सदिच्छा देत फिरा....!!

अमेरिकेहून येऊन आता तीन दिवस झाले होते. वर्षभरानं आल्यामुळे माझे लाडही चालू होते. दुपारचं जेवण करून मस्त बाहेरच्या खोलीत बसलो होतो. बाबा, आई, बहीण सगळे होतेच. आईच्या पायाशी टेकून बसलो होतो. आई केसातून हात फिरवत होती आणि तेवढ्यात बाबांनी एक छोटं पाकिट समोर ठेवलं. "बघ जरा" म्हटलं. ॲबसेन्ट-माईंडेडली पाकिट उघडलं तर आत मुलींच्या वेगवेगळ्या जन्मपत्रिका आणि फोटो.

आपल्याला माहीत असतं, की आयुष्यात एखादा असा प्रसंग येणार, पण आपण तरीही काहीशी ती शक्यता अस्तित्वातच नसल्यासारखं वागत, सराईतपणे त्या विचारांकडे दुर्लक्ष करत राहतो...आणि मग एकदम तो प्रसंग जेव्हा समोर उभा राहतो तेव्हा मात्र प्राण कंठाशी येतात. तो एक यक्ष प्रश्नच बनून समोर येतो.

पहिल्या टेन्शनचा भार ओसरल्यावर डोळ्यांनी एकेका फोटोवरून आपोआपच नजर फिरवली. सगळ्या मुलींनी अगदी स्टुडिओत जाऊन फोटो काढले होते. काहींनी नीट 'मेक-अप' केला होता, तर काहींनी पावडर-कुंकू....आणि अगदी छान 'साइडवेज पोझ' घेऊन सगळ्या उभ्या होत्या. पुलंनी म्हटल्यासारखे, 'लग्नाचे फोटो काढणारे' काही खास फोटोग्राफर खरंच देवानं जन्माला घातलेले असतात. त्या विचारानं त्यातही मला हसू आलं. माझा हसरा चेहरा पाहून बाबांना लगेच उत्साह आला. ते पटकन पुढे सरकून म्हणाले,

''ती ना, ती मिरजेची आहे. एम.एस्सी. झाली आहे. कुठे कॉलेजमध्ये शिकवते म्हणे. पत्रिका आहे पाठवलेली.''

''हं'' माझा थोडा गंभीर अनिश्चित रिप्लाय. ''या एवढ्यावरूनच लगेच निवड करायला हवी असं काही नाही. आपण तुझं नाव पुण्यात त्या अमक्या अमक्या संस्थेतही नोंदवू. दादाच्या वेळी केवढी चांगली चांगली स्थळं सुचवली होती त्यांनी. काय गं?''

''हो ना!'' आईचा पाठिंबा.

एरवी दोघं भांडताना अगदी दुसऱ्याचा शब्द खाली पडू देणार नाहीत, पण या बाबतीत मात्र अगदी एकमत; माझ्या डोक्यात विचार येऊन गेला. या प्रसंगाची अनेक वेळा रिहर्सलही घरी झाली असावी अशी एक दाट शंका मला येऊन गेली.

''बघतो, आत्ताच तर येऊन दोन-तीन दिवस झाले ना! लगेच काय सुरू केलंय बरं हे.'' मी असा सूर लावल्यावर लगेचच बाबांनी सगळे फोटो पाकिटात गडबडीनं कोंबले..... ''अरे, फक्त तुझ्या नजरेखालून जरा फोटो घालावे म्हटलं, बाकी काही नाही. तू तुझा वेळ घे. आपल्याला काही घाई नाही.''

''हो, पण आता २९ वर्षांचा झालास २ महिन्यामागे. उशिरा मग चांगली स्थळं मिळत नाहीत.'' आई.

'खरं आहे.' मनात म्हणालो. 'उशिरा मंडईत जाणाऱ्या गिऱ्हाइकाला चांगली ताजी भाजी कुठून मिळणार? 'नवा माल' यायच्या वेळीच बाजारात गेलो तर फ्रेश माल मिळणार. उशीर झाला तर मग जुन्या किंवा खराब झालेल्या 'माला'वर चालवून घ्यावं लागणार ना! आणि अगदी चांगला 'माल' मिळाला तरी एवढ्या उशिरापर्यंत हा का बरं शिल्लक राहिला असावा? अशी शंका डोक्यात कायम वळवळ करत राहणार. आणि गिऱ्हाइकाला उशीर झाला तर 'एवढा उशीर का हो झाला यायला बाजारात?' अशी शंका विचारणारेही काही कमी

नसतात. लग्नाचा बाजार म्हणतात ना ते काही खोटं नाही.

पुन्हा एक नि:श्वास टाकून मी खाली सतरंजीवर आडवा झालो. पावसाची रिपरिप चालू झाली होती. बाकी दुपारची स्तब्धता. ही या गावची खासियत. शांत आणि निवांत. पावसाचा आवाज ऐकता ऐकता मी मनानं केव्हाच तेव्हाच्या 'श्रीकांत' बंगल्याच्या दारात जाऊन उभा राहिलो होतो.

तिथले वारे, ऊन, बाग, चिंचा, घरामागचे शेत, वावटळी, माळावर कोसळणाऱ्या विजा, दणाणत वाहणारे ओढे आणि तिथला पाऊस ! चौथीच्या सुट्टीत आम्ही 'श्रीकांत'मध्ये राहायला आलो तेव्हा हा बंगला आवडलाच. भाड्यानं राहायला असलो तरी भोवती बाग वगैरे होती. आवडलाच आम्हाला तो !

मला वाटतं इतक्या लहानपणी घडणाऱ्या गोष्टीही मनावर कायमच्या कोरल्या जातात. आता कळतं, बालपण सुंदर जाणं आयुष्यभरासाठी किती महत्त्वाचं आहे. या घरानं माझी मुळं निसर्गाच्या मातीत कायमची आणि अगदी खोल नेऊन रुजवली. आजही जेव्हा आयुष्यात काही कसोटीचे किंवा औदासीन्याचे क्षण येतात तेव्हा 'श्रीकांत'मधली वाऱ्याची एक झुळूक आठवली तरी सारे प्रश्न एकदम हलके, सोपे वाटू लागतात. बालपण तसं माझं मस्तच गेलं !

तशी माझी तब्येत लहानपणापासून काही चांगली नव्हती. अनेक डॉक्टरांनी अनेक प्रकारची औषधं/टॉनिकं देऊनही मी आपला बाबांच्या भाषेत 'हाडका', शेजाऱ्यांच्या आणि रागात आली तर आईच्या भाषेत 'पाप्याचं पितर' (ही काय भानगड आहे ते अजून मला कळलेलं नाही) आणि भावाच्या भाषेत 'किडकिडा' राहिलो. आपल्याकडे मध्यमवर्गीय मराठी घरांमध्ये घरचेच लोक मिळून आपल्या घरातल्या पोरांचा आत्मविश्वास खच्ची करण्याचं काम इतक्या सहजपणे करत असतात, की बाकीच्या सो कॉल्ड समाजाची वगैरे गरजच पडत

नाही. त्यात भर म्हणून माझ्यावर एक्सक्लूझिव्ह प्रेम असल्याचं सांगणारी आणि मला 'नाना' म्हणणारी आत्या माझ्यासाठी प्रेमाने 'नानाजीची मांडी जशी खडूची कांडी' हे 'सुंदर, मायेनं ओथंबलेलं' गीत येता जाता गात असे ! आईच ती काय काही फारसं बोलत नसे. नशिबानं मी कायम अबाऊ ॲव्हरेज अशा हुशार मुलांमध्ये गणलो गेलो. त्यामुळे ती बाजू बऱ्यापैकी भक्कम होती.

घरापासून थोड्याच अंतरावर एक आर.एस.एस.ची शाखा होती. बाबा पूर्वी शाखेत खूप ॲक्टिव्ह होते. (मला वाटतं त्यांच्या वयाचे सर्वच ब्राह्मण लोक 'शाखेचे निष्ठावंत सेवक' कधी ना कधी होतेच.) त्यामुळे त्यांनी मला आणि भावालाही शाखेत जाण्याचा एकदा आग्रह धरला होता. आम्ही गेलो, पण तिथे जे काही दंगा मस्तीचे खेळ चालले होते ते पाहून मला धडकीच भरली. एक दिवस गेलो, पण परत मात्र मी आणि भाऊ कधीही शाखेच्या वाटेला गेलो नाही. मला मुलांबरोबर असली दंगामस्ती, मारामारी करणे आवडत नसे.

मी अगदीच खेळांचा शत्रू होतो असं नाही. सुट्टीत आजीकडे आल्यावर आम्ही भरपूर दंगा करत असू आणि भरपूर दमवणारे पळापळीचे खेळ सगळी भावंडे मिळून खेळत असू.

५वीसाठी शहरातल्या एका सुप्रसिद्ध शाळेमध्ये माझं नाव घातलं. शाळेत आम्हा काही मुलांचा एक मस्त ग्रुप जमला. आमच्या क्लासमध्ये बेंचेसच्या तीन रांगा मुलांच्या आणि मला वाटतं २ रांगा मुलींच्या होत्या. या दोन सेक्शनच्या मध्ये एक रांग होती त्यात उर्वरित मुली आणि मुलं बसत. मी या मध्यममार्गी रांगेत बसणं पसंत करत असे. इकडे मुलांच्या रांगेत होणारा आचरटपणा, दंगा, मारामाऱ्या चालत नसे. मुली शेजारीच असल्यामुळे मुलं या रांगेत येऊन दंगा करू धजत नसत, जे माझ्या पथ्यावर पडे.

तशी शाळा मला कधी फारशी आवडली नाही. 'ही आवडते

मज मनापासूनी शाळा' असे प्रेम ऊतू जाणे तर लांबचीच गोष्ट. कधी एकदा घरी पळतो असं मला होऊन जात असे.

'श्रीकांत'मध्ये राहताना मी आणि भाऊ अशी आमची छोटी टोळीच होती. दोघे मिळून काय काय उद्योग करत असू. सुट्टीत मागच्या वर्षीच्या वह्यांची उरलेली पाने काढून नव्या वह्या शिवणे, कधी शिवणकामच करणे (दादानं बनवलेल्या विनोदी पर्सेस हा आईबरोबर मिळून त्याची खिल्ली उडवण्याचा विषय अजूनही टिकून आहे.), माळावर वणवण हिंडून बाभळीची झाडं शोधून त्याचे काटे चुकवत बाभळीचा डिंक गोळा करणे असे अनेक उद्योग. पावसाळ्यात मागच्या ओढ्याला जोरदार पाणी येत असे. त्यातील उड्या मारणारे मासे पकडून आमच्या घराच्या सिमेंटच्या टँकमध्ये सोडत असू. त्यांची रोज सकाळी उठल्या उठल्या धावत जाऊन विचारपूस करणे हे आवडते काम असे.

नववी-दहावीत येता येता माझी उंची चांगलीच वाढायला लागली, पण तरीही तब्येतीत काहीही फरक पडला नाही. आधीसारखाच हडकुळा होतो. ज्या दंगेखोर मुलांचा रागच जास्त येत असे, त्यातील काही मुलांकडे पाहत राहावेसे वाटू लागले. ही आगाऊ पोरे दोन लेक्चर्सच्या मध्ये मागच्या बेंचवर बसून काहीबाही चाळे करत. या चाळ्यांचे फार आकर्षण वाटे, पण तिकडे जाऊन बघण्याएवढे धाडसही नसे. एक प्रकारची भीतीच वाटायची आणि एक प्रकारचं आकर्षणही. मुलं अशी सगळी ऐन वयात येत असलेली. भयंकर आकर्षण वाटे त्या मुलांबद्दल, पण हे काय आहे हेही कळत नसे. ''तुम्ही काय बाबा, मुलींच्या जवळच्या रांगेत बसणारे, मज्जा आहे तुमची'' असं म्हणणाऱ्या मुलांचाच उलट मला हेवा वाटत असे. त्यांचा जीव मुलींमध्ये गुंतलेला तर माझा त्यांच्यामध्ये, अशी मजेशीर अवस्था.

आजकाल मुलांना आणि मुलींना सारं लैंगिक ज्ञान कधी कधी वयात येण्याच्या आधीच मिळालेलं असतं. मला तब्बल दहावीत

येईपर्यंत सेक्स म्हणजे नक्की काय असतं हेही माहीत नव्हतं. जेव्हा एका मित्रानं मला ते सगळं एकदा हळूच सांगितलं तेव्हा मी अवाकच झालो होतो. माझ्या विस्फारलेल्या डोळ्यांकडे पाहून त्याची भरपूर करमणूक झाली असणार. पण नंतर मात्र त्याने 'वत्सा तुजप्रत कल्याण असो' अशा आविर्भावात बाकी काही काही माहिती दिली. .तोपर्यंत त्या विशिष्ट अवयवाचा उपयोग शू करणे एवढाच असतो असा माझा ठाम समज होता. तसं इरेक्शन त्यापूर्वी काही वेळा आलं होतं, पण त्याचं काय करावं हे कळत नसे आणि कालांतराने ते आपलं आपण नॉर्मल होत असे.

१०वीचं वर्ष काही फार चांगलं गेलं नाही. या वर्षात मी एकदम काहीसा प्रौढ झालो. बरेच काही घडले आणि त्या साऱ्यामध्ये आपल्या सेक्शुअल जाणिवांकडे लक्ष देण्याची उसंतही मिळाली नाही.

९वीनंतरच्या सुट्टीतच बाबांची नोकरी गेली. बाबा काम करत असलेली बँक बुडाली आणि समोर सारा अंधारच. (बाबा तरीही बँकेत जात असत.) 'श्रीकांत'पासून जवळच आम्ही घर बांधायला घेतलं होतं, पण ते अर्धवटच बांधून झालं होतं आणि कॉन्ट्रॅक्टर सारे पैसे खाऊन बसला होता. आईनं नव्या घरी राहायला जाण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे बाबांचे पैसे वाचणार होते. नवीन घराच्या खिडक्यांना काचा नव्हत्या. प्लंबिंग नव्हतं आणि इलेक्ट्रिसिटीही नव्हती. दहावीचं वर्ष सुरू झालं ते या अशा परिस्थितीत. आईनं दूध कमी केलं, पेपर बंद करून शिवणाचं कामही वाढवलं. रोज शाळेतून घरी आलो, की लालटेन किंवा कंदील पुसून रॉकेल भरून तो लावणे हे माझं काम असे. घरी वॉशिंग मशिन, टीव्ही वगैरे सर्व असूनही काही उपयोग नव्हता. मीही आईबरोबर छोट्या मुलांचे शर्ट, चड्ड्या, स्कर्ट शिवत असे. कधी कधी रात्री ११-१२ वाजेपर्यंत कंदिलाच्या प्रकाशात आम्ही शिवण करत बसल्याचं आठवतं. भाऊ ११वीत होता. त्यानी तेव्हाच जॉब शोधायला सुरुवात

केली होती. (नशिबानं तसं काही त्याला करावं लागलं नाही.) बाबांची नोकरी गेल्यावर १-२ महिन्यांतच दोन्ही बहिर्णींनी पळून जाऊन आपली लग्नं उरकून टाकली. त्यामुळे त्यांचा ग्रॅज्युएट होऊनही घराला अडचणीच्या काळात काहीच आधार झाला नाही.

अशा अडचणीतच वर्ष गेलं. दहावीची परीक्षा आली आणि गेली. कंदिलाच्या प्रकाशात अभ्यास करून पेपर दिले. नंतर एमएसईबीची आम्हावर कृपा झाली आणि घरी इलेक्ट्रिसिटी आली.

या साऱ्या वर्षात रक्ताचे नातेवाईक, चुलत, आते, मावस भावंडं माना फिरवून जाताना पाहिली, कुठले कुठले अपेक्षा न केलेले लोक पाठीशी ठाम उभे राहिलेलेही पाहिले. आईबाबांना या साऱ्यांत मान ताठ ठेवून कुणाकडून एक पैसाही न घेता आपल्या हिमतीवर वाट काढताना पाहिलं. आत कुठंतरी आपोआपच बरंच काही शिकलो!

दहावीचा निकाल लागला तेव्हा मात्र सगळ्यांच्या टोप्याच उडाल्या. मला छान मार्क्स पडले. माझा बोर्डातील नंबर अगदी थोडक्यात १-२ टक्क्यांनी हुकला. टीव्ही वगैरे सर्व एन्टरटेन्मेंट बंद असल्यामुळे माझा अभ्यास बहुतेक नीट झाला असावा.

११वीला सायन्सला प्रवेश घेतल्यामुळे अगदी श्वास घ्यायलाही उसंत मिळेना झाली. १२वीला चांगले मार्क पडले, पण ओपन कॅटेगरीच्या मुलाला फ्री सीट्समधून चांगल्या शाखेला प्रवेश मिळण्याला ते पुरेसे नव्हते. शेवटी इंजिनिअरिंगचं स्वप्न तात्पुरतं दूर ठेवून पॉलिटेक्निकला इंजिनिअरिंग डिप्लोमासाठी प्रवेश घेतला.

हा काळ म्हणजे अगदी आयुष्यातला सोनेरी काळ म्हटला तरी चालेल. अतिशय रिझर्व्हड आणि सहसा कुणाशी फार न बोलणारा मी वसतिगृहात राहून जरा बोलका झालो. विचारांमध्ये आणि विचार करण्यामध्ये एक प्रकारची समज आपोआप येत गेली. आकर्षणाचे विषय अवतीभवती होतेच, पण कधीच पुढे जाऊन काही 'स्टेप'

घ्यावीशी वाटली नाही. तेव्हापासून मला मैत्री ही सगळ्यात महत्त्वाची वाटत आली आहे. आपण काही पावलं पुढे टाकावी आणि त्या पावलांमुळे जर ती मैत्री पूर्ण तुटणार किंवा धोक्यात येणार असं वाटलं तर मी ती शक्यताच मनातून काढून टाकत असे. नंतर एक-दोनदा काही मित्र अशातून तुटले तेव्हा तर जास्तच सावध झालो. तशा मुलांच्या नजरा फार तिखट असतात हेही खरं! मला वाटतं काहींना मी गे आहे असा दाट संशय होता. अर्थात त्या काळी मला तो शब्दही माहीत नव्हता आणि आपल्यासारखे लोक असतात हेही माहीत नव्हतं.

नंतर अनेक मुलांकडून मी- त्यांच्या बायकीपणामुळे त्यांना लहानपणापासून सोसावे लागलेले त्रास- अशा आठवणी ऐकल्या, पण मला तरी असा काही फारसा त्रास कधी झालेला आठवत नाही. कदाचित मी वागण्या-बोलण्यामध्ये बायकी नव्हतो त्यामुळे असेल.

डिप्लोमानंतर पुण्यात इंजिनिअरिंगला प्रवेश मिळाला. पुण्यात एक सेमिस्टर कोथरूड, एक सेमिस्टर शिवाजीनगर, एक वसतिगृह असा वेगवेगळ्या ठिकाणी राहिलो. मला वाटतं याच काळात माझी लैंगिकता नीट डिफाइन होत गेली. आपल्याला मुलींमध्ये अजिबात रस वाटत नाही हे हळूहळू कळून आलं होतं. याच काळात मला काही पहिले लैंगिक अनुभवही मिळाले. आता हे म्हणजे थोडे विचित्रच अनुभव होते. आम्ही प्रत्येक ठिकाणी मित्र मित्र मिळून राहत असू आणि सर्वसाधारणपणे सर्वजण एक सलग गाद्या घालून झोपत असू. जरी हे सारे मित्र 'कन्व्हेन्शनली स्ट्रेट' असले तरी त्यातील काहींबरोबर काही ना काही चावटपणा झाला हे खरे. मलाही तसा लैंगिकतेचा किंवा संभोगाचा अनुभव नसल्यामुळे हे म्हणजे अगदीच जुन्या मराठी कादंबऱ्यांमध्ये रंगवलेला एखादा प्रणय प्रसंग जसा जास्तीत जास्त चुंबन, आलिंगनापर्यंतच जात असे, त्याच नमुन्याचे होते. पण तेव्हा म्हणजे ते अगदी प्रचंड ॲडव्हेंचरस वाटत असत, हे खरं.

अर्थात विचित्र गोष्ट म्हणजे मला या मित्रांनी नेहमीच प्रतिसाद दिला. साऱ्यांनाच ते माफक प्रणय प्रसंग हवेहवेसे वाटत. त्या मित्रांनाही या गोष्टीचं थोड्याफार प्रमाणात आकर्षण असावं. पण असा एखादा प्रसंग घडल्यानंतर किमान दोन-तीन आठवडे तरी त्या मित्रांच्यातला आणि माझ्यातला संवाद जवळपास बंदच होत असे. या 'टिपिकल गिल्ट ट्रिप्स' असत! पण आमची मैत्री ही इतकी चांगली होती, की त्या 'गिल्ट ट्रिप'नंतर आम्ही पुन्हा एक होऊन परत बडबड, दंगा सुरू करत असू.

हे मोजके प्रसंग जरी थोड्या सुखाचे असले तरी अपराधीपणाही तितकाच असे. आता मागे वळून पाहताना हसूच येतं. एकतर आम्ही तसाही काही फार सेक्स करतच नसू. काही किसेस, जरा छातीवर हात फिरवणे वगैरे. कंबरेखाली तर कधीच गेलो नाही पण तरीही त्याची गिल्ट मात्र महिनोन्‌महिने पुरेल एवढी असे आणि ती अभ्यासासकट आयुष्याच्या त्या वळणाच्या सर्व बाबींवर परिणाम करे. मला वाटतं याचं प्रमुख कारण हे अशा भावनांबद्दल असलेलं संपूर्ण अज्ञान. हे असं वाटणं नैसर्गिक आहे ही भावनाच नव्हती. मुळातच आपल्याकडे संभोग म्हणजे एखादी न बोलण्यासारखी घाणेरडी गोष्ट असल्यासारखं शिकवलं जातं. तोही एक निखळ आनंद आहे, हेच कधी शिकवण्यात आलं नाही. त्यामुळं एखादं साधं किसही एक अख्खा महिना पश्चात्तापानं जळण्यास पुरेसं होई. पण मी तरुण होतो. या भावना आवरण्याच्या शपथा हजारदा स्वत:शीच घेतल्या तरी रात्रीचा अंधार काही जादू करून जाई आणि निश्चय पार गळे.

हा पश्चात्ताप किंवा गिल्ट कधी कधी किती टोकाला नेऊ शकतो याचं एक उदाहरण सांगणं गरजेचं आहे. एकदा गणू नावाचा माझा मित्र माझ्याकडे एका रात्रीपुरता राहायला आला होता. गणू फारच गोड आणि लोभस म्हणतात तसा होता. दिसायलाही सुरेख होता. दिवस तर मजेत गेला. रात्री आम्ही शेजारी झोपलो असताना माझा डावा हात मी

त्याच्या अंगावर टाकला. फार काही केलं नाही, जरा हात त्याच्या छातीवर फिरवला एवढेच! पण मला भयंकर 'गिल्ट अटॅक' आला आणि मी हात मागे घेतला. दुसऱ्या दिवशी गणू निघून गेला. त्याला तर कळालंही नव्हतं मी असं काही रात्री केलं होतं हे. तो गेल्यावर मात्र माझं मन मला खाऊ लागलं. इतका चांगला मित्र आणि मी हे काय केलं? माझ्या हातून हे झालंच कसं? मला स्वत:च्या या भावनांची इतकी किळस आली, की ती जाता जाईना. आपल्या हातून भयंकर पाप झालं आहे, असं वाटू लागलं. भयंकर लाज वाटू लागली. अपराधीपण पाठ सोडेना. 'हाच हात ज्यानं हे पाप केलं, याला शिक्षा व्हायला हवी.' त्या तिरीमिरीत मी रोजचं दुधाचं पातेलं गॅसवर सणसणीत तापवलं आणि उतरवून त्या पालथ्या पातेल्यावर डावा तळहात ठेवला. कळवळलो. निश्चय डळमळू नये म्हणून उजव्या हातानं तो तिथेच चांगला दाबून धरला. चर्र आवाज झाला आणि झणझणीत वेदना मेंदूला भिडली. डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहू लागल्या. थोड्या वेळानं हात काढला तर चांगला चरचरून भाजला होता. संपूर्ण हातातून पाठीपर्यंत आणि मेंदूपर्यंत आगीच्या लाटा चालल्या होत्या. पातेल्यावर हाताच्या रेषा उमटलेल्या होत्या. हे दुखणं मला चांगलं ३-४ आठवडे पुरलं. तळहातभर मोठा फोड आला. हातानं काही फारसं काम करता येईना. नंतर आठवड्याच्या शेवटी घरी गेल्यावर आईनं बघितलं तर ती घाबरलीच. पण तोवर मी 'स्टोरी' तयार करून ठेवली होती. 'दूध तापलं होतं ते उतरवायला काही पटकन सापडेना म्हणून हातानंच उतरवलं.' तरीही बोटं भाजायला हवी होती, बरोबर तळहातानं दूध कसं उतरवलं? ही शंका होतीच, पण काहीबाही सांगून मी वेळ मारून नेली. हे मला वाटतं मी आयुष्यात प्रथम इथे सांगतो आहे. यापूर्वी कुणाला सांगितलं नसावं. मी हात जाळण्यावर थांबलो.... कुणास ठाऊक, काही मुलं लैंगिकतेच्या अज्ञानामुळे होणारी घुसमट सहन न होऊन आत्महत्याही

करत असतील.

माझी इंजिनिअरिंगची सारी वर्षे या 'कशमकश'मध्ये तशी फारच कुतरओढीची गेली. कितीही नाही म्हटलं तरी नंतर काही मित्रांनी याची 'बातमी' केली. काही टोमणेही मला आडून आडून ऐकायला मिळाले. त्यातल्याच एका मित्राने अशाच एका प्रसंगी अचानक मिळालेल्या एकांतात प्रथमच कंबरेखाली मजल मारली. हे मोठं धाडसच होतं, पण ते माझ्या पुरुषपणाची खात्री करून घेण्यासाठी होतं हे लगेचच कळलं. आता अक्षरश: हसू येतं तो प्रसंग आठवला की. सरतेशेवटी माझ्या लैंगिक अवयवामध्ये काहीही समस्या नाही आणि ते उलट बरंच सरस आहे हे कळल्यावर तो बिचारा काहीसा वरमलेला दिसला.

पुढे कालांतरानं कळलं, की गे नावाची काही एक गोष्ट असते आणि असे काही लोक असतात. तेही समाजाचे घटक आहेत आणि बघता क्षणी ओळखू येतील अशी त्यांना नक्कीच काही शिंग-शेपट्या नसतात. (सर्व गे लोक बायकी असतात हा एक आपल्याकडे सार्वत्रिक गैरसमज आहे. गरजूंनी लक्षात घ्यावं, की असं काही नसतं. अगदी 'माचोमॅन' असणारा माणूससुद्धा गे असू शकतो आणि विशेषत: भारतात अत्यंत बायकी चालणारी, बोलणारी माणसंही स्ट्रेट असू शकतात.) नंतर तर असंही झालं, की २-३ वर्षं मित्र असलेली व्यक्ती कधीतरी अचानक नंतर गे असल्याचं कळालं.

इंजिनिअरिंग झालं आणि एका 'आयटी' कंपनीमध्ये कॅम्पसमधूनच निवड झाली. त्या कामानिमित्त तामिळनाडू, कर्नाटक, ओडिसा (ओरिसा) अशा वेगवेगळ्या संस्कृतींमध्ये वावरण्याची, काम करण्याची संधी मिळाली. वैचारिक समृद्धता अनुभवातून हळूहळू येत गेली.

काही दिवसांनी मी अचानक नैराश्यामध्ये गेलो. त्याचा त्रास एक

वर्ष झाला आणि मग बरंच काही बदललं. सुरुवातीला नैराश्य असं काही असतं हेही माहीत नव्हतं. आधी जेवण कमी होत जाऊन पोटात अल्सर झाला आणि मग नैराश्याचं निदान झालं. गोळ्या चालू झाल्या. त्यांनी साऱ्या संवेदनाच बोथट करून टाकल्या. मग मनाच्या काहीशा बधिर अवस्थेत आपोआपच शरीरानं मला काही गोष्टींकडे वळवलं (इन्स्टिंक्ट). बहुधा शरीर आपल्या आजारावर करेक्टिव्ह ॲक्शन घेत असतं, आपण फक्त ते ऐकून त्यानुसार प्रतिक्रिया मात्र द्यायला हवी.

मी जिमला जाऊ लागलो. मी ५'११'' उंच होतो आणि वजन फक्त ४८ किलो होतं. मला पाहून जिम इन्स्ट्रक्टर शॉक्ड झाला. त्यानं मला जिम सुरू करायला सांगितलं. बिचारा मायाळू होता. 'आपण तुझं वजन वाढवू' वगैरे प्रेमानं सांगितलं. मी जिमला जाऊ लागलो व माझ्या इन्स्ट्रक्टरने माझ्या तब्येतीची पायाभरणी नीट लक्ष देऊन करून घेतली.

हळूहळू मन जे सांगत गेलं, जे भावत गेलं, ते मी करत गेलो. मित्र जमवले, ट्रेकिंग, जिमसारखे उपक्रम सुरू केले. स्वतः ट्रेक्सचं संघटन करायला सुरुवात केली. एक गट स्थापन केला, त्यातून घरापासून दूर असलेल्या माझ्यासारख्या लोकांसाठी आपले सणवार- गणपती, संक्रांती वगैरे साजरे करायला सुरुवात केली. हळूहळू औषधं कमी कमी करत नेली आणि नंतर तर ती कधी बंद केली लक्षातही आलं नाही.

हे सारे नवे मित्र स्ट्रेट होते, पण माझ्या गे असण्याने आमच्या मैत्रित कधी बाधा आली नाही. आपल्याकडे कुणी गे म्हटलं, की लोक लगेच त्यांच्या बेडरूममधील गोष्टींच्याच कल्पना करायला लागतात. लैंगिकतेमध्ये लैंगिक हा शब्द येत असला तरी गे म्हणजे फक्त तेवढाच भाग असतो असं नाही. मनानं माणूस प्रेम कुणावर करतो, कुणामध्ये त्याचं मन जास्त गुंततं हाही भाग त्यात येतो आणि तेवढा भाग सोडला तर गे माणूस हा कुठल्याही इतर माणसासारखाच असतो, हे लोक सोयीस्कररीत्या विसरतात. त्यालाही सण साजरे करायला आवडतात.

घरच्यांशी आणि मित्रमैत्रिणींबरोबर गप्पाटप्पा करायला आवडतात. त्यालाही कामाचा आणि घरचाही तसाच ताणतणाव असतो. त्याचे राग-लोभ कुठल्याही सामान्य माणसांप्रमाणेच असतात, हे विसरून लोक, साधारणपणे हे लोक सेक्स कसा करतात आणि तो नैसर्गिक आहे की अनैसर्गिक, या एकाच बाबीवर जास्त डोकं चालवताना दिसतात.

कालांतराने अमेरिकेत प्रोजेक्टवर गेलो. हा जीवन बदलवणारा अनुभव होता. जवळपास दीड वर्षं अमेरिकेमध्ये होतो. कामासाठी आणि आजूबाजूची नैसर्गिक दृश्यं पाहावी म्हणून भरपूर भटकून घेतलं. ट्रेकिंग केलं. बऱ्याच गे लोकांना भेटलो. त्यातून माझी स्वत:ची सेक्शुॲलिटी मला अधिकाधिक स्पष्ट होत गेली.

शिकागोला असताना मला चिनू भेटला. आम्ही एका सोशल साइटवर भेटलो आणि 'चॅट' करायला लागलो. बोलता बोलता इतकी मैत्री वाढली, की दिवसाचे तासन्‌तास आम्ही दोघं फोनवर, 'चॅट'वर बडबड कधी करायला लागलो कळलंही नाही. काय एवढं बोलायचो तेही आठवत नाही! मात्र प्रत्यक्ष त्याला भेटलो ते जवळपास एक महिन्यानी, कारण माझ्याकडे तेव्हा गाडी नव्हती, आणि तिथे स्वत:ची गाडी नसताना इकडेतिकडे जाता येत नाही! नंतर मी गाडी घेतली आणि मग मात्र आम्ही आठवड्याचा शेवट जवळजवळ एकत्रच घालवायला सुरुवात केली. चिनू दुसऱ्या सॉफ्टवेअर कंपनीत काम करत होता. तो थोडा दूर राहायचा, १०-१५ मैलांवर, त्याच्या ऑफिसच्या स्ट्रेट मित्रांबरोबर आणि मी माझ्या ऑफिसच्या स्ट्रेट मित्रांसोबत राहत असे. अशा गप्पा आणि भेटीगाठीत ४-५ महिने गेले आणि आम्ही एकमेकांच्या प्रेमातच पडलो. आता फक्त ते प्रथम ओठातून व्यक्त करायचं कुणी हाच प्रश्न होता. मग मीच एकदा पुढाकार घेऊन 'चॅट'वर त्याला माझ्या मनातलं सांगून टाकलं. त्यालाही ते काही नवीन नव्हतं. फक्त प्रथम कोण बोलणार हाच प्रश्न होता.

ते दिवस सोनेरी दिवस होते. दूरदूर ड्राइव्हला जाणं, जंगलात चालणं, 'डंकिंग डोनट'मध्ये कॉफी घेऊन तासन्तास गप्पा मारणं, असं सर्व चालत असे. आम्ही भांडतही असू. मला वाटतं आमच्या त्या कोर्टशिप पीरिअडमध्ये रोमॅन्टिक गोष्टींपेक्षा आम्ही बडबडच जास्त केली.

विचित्र गोष्ट म्हणजे, प्रेम या गोष्टीची मी कायमच टिंगल करत असे. कुणी प्रेमात कसं पडू शकतं हे कोडंच मला कधी उमजत नसे. ते शेवटी मी स्वत: प्रेमात पडूनच सुटलं. पण या काळातही गे नाते संबंधांना भारतात मान्यता नाही, कुटुंबात चालणार नाही हे माझ्या मनात ठाम होतं. त्यामुळे मी भारतात परत गेल्यावर रीतसर मुली बघून लग्न करणार हे मी चिनूला आधीपासूनच सांगितलं होतं. त्यानंही कधी त्यावर हरकत घेतली नाही. तो लग्नाचा निर्णय घ्यायला अजून लहान होता. मी २८-२९च्या वयाचा होतो. 'लग्न झालं तरीही आपण आयुष्यभर मित्र म्हणून राहूच' हे एक गृहीतक आम्ही अनेकदा उच्चारूनही झालेलं होतं.

असे गुलाबी महिने गेले आणि माझा परतीचा दिवस येऊन ठेपला. निरोप घेणं एवढं अवघड काहीच नव्हतं. चिनूचा गोड चेहरा बघून मला सारखं सारखं भरून येत होतं. चिनूनं आधीच भरपूर रडून घेतलं असावं. त्यानं शेवटपर्यंत एक हास्य ओठांवर ठेवलं होतं, पण डोळे काही वेगळं सांगत होते आणि मी तर घरी जाऊन लग्न करणार होतो. मनोमन ओझं लावलेल्या पायांनी विमानतळावर चिनूचा निरोप घेतला. वळून वळून पाहत होतो, पण आता हा नापरतीचा प्रवास...... समाजमान्य आयुष्याकडे! पाऊल मागे घेतलं तर समाज काय म्हणेल? आईबाबा काय म्हणतील? आईबाबा नातेवाइकांच्या प्रश्नांना काय उत्तरं देणार? जी काय मनाची तडफड झाली, काही विचारू नका. दुःख होण्यापेक्षा मी चिनूला भेटलो नसतो तर बरं झालं असतं, असाही विचार मनात येऊन गेला... पण मग ते सोनेरी दिवस आठवले. चिनूच्या

डोळ्यांतली स्निग्धता आठवली, मी नि:शब्दपणे कितीतरी वेळ त्या डोळ्यांत बघत बसत असे. तो नेहमी माझ्या कुशीत शिरून झोपत असे. झोपेत त्याच्या कुरळ्या केसांमुळे मला छातीवर होणाऱ्या गुदगुल्या आठवल्या. कधी कधी तर तो झोपेत सरकला, की ते कुरळे केस अचानक नाकात जाऊन गडबडीने मी जागा होत असे. चिनू नेहमी झोपेत अचानक दचकून जागा होत असे. मग त्याला थोपटलं आणि त्यानं मला बघितलं, की छोट्या बाळासारखं पुन्हा कुशीत शिरून तो झोपून जाई. कधी कधी तर तो चष्मा डोळ्यावर ठेवून तसाच झोपी जायचा आणि मी तो काढायला गेलो, की दचकून जागा व्हायचा. हसला, की ओठांच्या कडेला इतके सुंदर-गालाचे कव्हे्ज दिसत आणि बोलताना उत्साहात आला, की डोळे विस्फारून एवढ्या मोठमोठ्यानं बोलायचा, की समोरचे लोक घाबरूनच गेले पाहिजेत. पाणी पिताना ग्लासमध्ये बघून प्रत्येक घोटाबरोबर भुवयाही आश्चर्य वाटल्यासारखं उंचवायचा. मी तर ते बघून हसायलाच लागायचो.... अशा हजार आठवणी.

जे गवसलं होतं ते लाख मोलाचं होतं. बाकी कशाहीपेक्षा एखाद्या मुलामध्येही मला प्रेम मिळू शकतं, हा विश्वास मला चिनूमुळे मिळाला. आणि त्या जन्मभर पुरतील अशा आठवणी मनात घोळत मी विमानात पाऊल ठेवलं.

*****

पत्रिकांपासून सुरुवात झाली आणि हा सगळा इतिहास डोळ्यांसमोरून चित्रपटासारखा सरकून गेला.

आता परत ऑफिस जॉइन करायचं तेही घरापासून दूर. पॅकिंगची तयारी सुरू झाली, पण मन उदास होतं. येताना तर मी पूर्ण तयार होऊन आलो होतो, की आता घरी जायचं आणि लग्न करून मोकळं व्हायचं. समाज आणि नातेवाईक यांची कटकट नको. आपल्या स्वत:च्या शेकडो इनसेक्युरिटीज सांभाळत हे आणि पुन्हा कुठे शिरावर

घ्या. पण हे सारं लॉजिक आता मात्र अवघड वाटू लागलं. पाहिलेले मुलींचे फोटो राहून राहून माझ्या डोळ्यांसमोर येऊ लागले. भावी आयुष्याची स्वप्ने डोळ्यांत घेऊन या पोरींनी, थोड्या विनोदी वाटतील अशा पोझेस देऊन फोटो काढून घेतलेले होते. पण त्यातला भाबडेपणाही जाणवणारा होता. यातली कुणीही मुलगी मी पसंत केली तर ती आपलं घरदार, मित्रपरिवार, सगेसोयरे सोडून केवळ माझ्यासाठी म्हणून माझ्याबरोबर येणार; मला आपला जन्मभराचा साथीदार मानणार. मला ही खात्री आहे, की तिला हवं असलेलं सर्व भौतिक, शारीरिक सुख मी व्यवस्थित देऊ शकीन, पण तिला 'तुझ्यावर माझं प्रेम आहे' असं म्हणायला माझी जीभ रेटेल का? किंवा आपल्या आयुष्याचा जो महत्त्वाचा भाग आहे- आपली सेक्शुॲलिटी, ती लपवून ठेवून मी तिच्याबरोबर आयुष्य काढू शकेन का? असे अनेक गे लोक मी पाहिले आहेत, जे लग्न करून बायको घरी ठेवतात आणि बाहेर खुशाल इतर गे मुलांबरोबर पार्ट्या, मौजमजा आणि सेक्सही करत असतात. बायकोला याचा पत्ताही नसतो.

पण त्यांचं राहू दे. मला हे असलं फसवणुकीचं आयुष्य पटणार आहे का? होणाऱ्या बायकोलाही भावना आहेत. आपण गे आहोत म्हणून आपल्या आयुष्याचं जे काही व्हायचं असेल ते होईल, पण तिला यामध्ये ओढून तिच्या आयुष्याशी खेळण्याचा आपल्याला अधिकार आहे का? आई, वडील, भाऊ, बहीण हे जन्मतःच आपले असतात. त्यात आपण काही बदल करू शकत नाही. आपल्याला स्वीकारताना त्यांना जो काही त्रास होईल त्याची जबाबदारी घ्यावीच लागेल. पण लग्न हे तर आपल्या हातात आहे, तो आपला निर्णय आहे.

अशा कितीतरी गे व्यक्ती माझ्या डोळ्यांसमोर आहेत, की लग्न झालं आणि एक-दोन वर्षांनी अनेक वाद सुरू झाले. माणसाला त्या नात्याची मुळात आवड नसली, की ते तोडायला काहीही कारण पुरतं.

मग त्या बायकोला तिचा नवरा गे आहे हे कळण्याची गरज नसते. वेगवेगळ्या कारणांनी ४-५ वर्षांत काहींचा घटस्फोट होतो. मुलगी आयुष्यभराचं दुःख घेऊन घरी जाते. कदाचित सुडाची भावना घेऊन आणि शिव्याशाप देऊन जाते. हे आपल्याला झेपणार आहे का? एखादं मूल झालं असेल तर अजूनच त्रांगडं होऊन बसतं. धरलं तर चावतंय आणि सोडलं तर पळतंय! आणि कितीही नाही म्हटलं तरी पूर्ण घर त्यात ओढलं जातं. सर्व सख्खे जिवाचे यात भरडले जातात. आईबाप, बहीण, भाऊ, मित्रपरिवार कुणालाच सुख लाभत नाही. लग्न ही मोठी भावनिक गुंतवणूक असते. आपल्याला भावनेनं आणि संपूर्णपणे एखाद्या मुलीशी एकरूप होणं शक्य नसेल तर शहाण्यानं लग्न करू नये. किंवा लग्न करून बायको घरी ठेवून बाहेर वाटेल तसा स्वैराचार करण्याची आपल्यात धमक असेल तर करावंही. पण हा कैफ क्षणाचाच. ४०व्या, ५५व्या वर्षी मुलाबाळांसमोर हे उघडं पडताना किंवा मागे वळून पाहताना आपण आपल्या आयुष्याचं आणि आयुष्यभर केलेल्या फसवणुकीचं काय जस्टिफिकेशन देणार?

मग प्रश्न राहतो आयुष्यात जोडीदार, प्रेम मिळेल का? प्रत्येक गे माणसाला हीच असुरक्षितता सतावत असते. तसंही असे किती लोक आयुष्यभरासाठी साथ देतात? शेवटी आपली यात्रा किती सुंदर, सुखद होईल हे आपल्याच हातात असतं आणि प्रेम करणारा एखादा पुरुष मिळणार नाही कशावरून?

चिनू... चिनूचं प्रेम नव्हतं का मिळालं भरभरून! आपण आपल्या मनाची दारं उघडी ठेवावीत आणि नात्याकडून अवास्तव अपेक्षा ठेवू नये, बस्स ! तसंही गे लोकांचं नातं आणि स्ट्रेट लोकांचं नातं यात फरक असणारच! तो जाणतेपणाने समजून घेतला तर काय अवघड आहे? भिन्नलिंगी जोडप्यांमध्ये एकजण 'अल्फा मेल' असतो. तो प्रामुख्यानं पैसा कमावतो, घराची काळजी घेतो, सामाजिक प्रतिष्ठा

मिळवून देतो. जरी स्त्री कमावती असली तरी छायेसारखी त्याच्याबरोबर असते. त्याला कॉम्प्लिमेंट करते. बदली झाली, की बायकोनं काम सोडण्याचा अर्ज करणं किंवा आपलाही जॉब बदलणं हे नॉर्मल मानलं जातं. मूल झालं, की तिनं सुट्टी घेऊन घरी राहणं. मुलांचा सांभाळ करणं किंवा एकूणच गरज पडल्यास आपला इगो समर्पण करण्याची स्त्रीची तयारी 'स्ट्रेट' नातेसंबंधांमध्ये गृहीतच धरलेली असते. समलिंगी नात्यांची गोष्ट वेगळी आहे. समलिंगी संबंध आपल्या मायबाप सरकारनं कालपरवापर्यंत गुन्हा ठरवल्यामुळं (भा.दं.सं.३७७) कायद्याचा आधार या नातेसंबंधांना मिळत नाही. कुटुंबाचा आधारही नसतो. भिन्नलिंगी नवरा बायकोत भांडण झालं, रुसवे फुगवे, 'मी माहेरी जाते' वगैरे की मोठे लोक प्रसंगी मध्ये पडतात. कान धरून समेट घडवून आणतात. अशा जोडप्याला अगदी बेडरूममध्ये समस्या असल्या तरी मोठे लोक समंजसपणे त्यात लक्ष घालून सोडवू पाहतात. गे मुलांच्या बाबतीत मात्र 'तरी मी सांगत होतो' हेच पालुपद! कुठलाच आधार किंवा समंजस मध्यस्थ नसल्यामुळं बऱ्याचदा साधी साधी भांडणं ब्रेक-अपची कारणं ठरतात.

म्हणजे जर लग्न न करण्याचा निर्णय घेतला तर तो निभावून नेण्याची संपूर्ण जबाबदारी माझीच असणार होती. नाती, त्यातले प्रश्न, त्यातली गुंतागुंत आणि नशिबात असल्यास शेवटपर्यंत एकटं राहण्याची मानसिक तयारी, ही सर्व करूनच हा निर्णय घ्यायचा होता. शिवाय जर आईबाबांना सांगितलं आणि त्यांनी मला घरातून काढून टाकलं तर? हा प्रश्न होताच. मला प्रचंड भीती वाटली, पण मग पुन्हा त्या मुलींचे फोटो समोर आले. हे सगळे प्रश्न माझे आहेत, मला सोडवायचे आहेत. त्यासाठी मी केवळ ट्रायल म्हणून एका मुलीचा बळी देणं योग्य ठरतं का?

माझा निर्णय झाला! पण तो घरी सांगणं तेवढंच अवघड होतं. आईबाबा काय म्हणतील, मला हाकलून देतील का? घरापासून, माझ्या

साऱ्या लाडक्या लोकांपासून मला कायमचं दूर लोटतील का? हा प्रश्न डोक्यात घण घालावा तसा आदळत होता.

आईला मी काही ताणतणावामध्ये आहे हे कळलं असावं. तिनं एक-दोनदा विचारलं, पण मी काहीच बोललो नाही. ''ठीक आहे गं'' असं चिमणीएवढ्या आवाजात बोलून गप्प बसलो.

पण दुपारी सगळे इतर लोक बाहेर गेलेले असताना आईनं मला पकडलंच. मी एकटाच आढ्याकडं बघत हॉलमध्ये पडलो होतो. आई आली आणि दिवाणाशेजारी बसून विचारू लागली- ''काय झालं? लग्नाचं टेन्शन आहे का? आपण अजून थोडा वेळ थांबू. तुला वाटेल तेव्हा आपण तुझं लग्न करू.'' वगैरे....

अगदी बालपणापासून आधार देणाऱ्या तिच्या साडीच्या घरगुती वासानं तर माझ्या मनाचा बांध अगदी फुटून गेला. तोंडून शब्द फुटेना. कसातरी दात आवळून गप्प राहिलो. मी बोलत नाही असं पाहून तिनं हळुवार केसांमधून बोटं फिरवायला सुरुवात केली. तिच्या खरखरीत मायाळू हाताचा स्पर्श झाला आणि मग मात्र सारा बांध फुटला. तिच्या कुशीत डोकं खुपसून मी प्रचंड रडलो. ती काही बोलली नाही. फक्त डोक्यावरून हात फिरवत राहिली. अर्धा तास तरी मी रडलो असेन. तोंडून शब्द फुटण्याच्या अवस्थेत नव्हतो. मग रडता रडताच आईला सांगितलं- ''आई मला हे लग्न नाही करता येणार. मला नाही करायचं लग्न मुलीशी. मी नाही करू शकत. मला नाही आवडत मुली तशा.... मला मुलं आवडतात.'' आणि त्या बरोबरच माझ्या सगळ्या असुरक्षिततेचाही पाढा वाचला. ''तुम्ही मला दूर तर नाही ना करणार? तू, बाबा, दादा, ताई. तुम्हा सगळ्यांशिवाय मला जगणं शक्य नाही गं.'' आणि पुन्हा मी रडू लागलो.

आईनं माझी समजूत काढली. ''असं कुणी कधी पोटच्या गोळ्याला दूर करतं का? काहीतरी वेड्यासारखे विचार आणू नको. जे

काही आहे त्यावर आपण काय करता येईल ते बघू, पण काही झालं तरी तुला वेगळं वगैरे करण्याचा या घरात कोणी विचारही करणार नाही.'' असं सांगितल्यावर मग मी हळूहळू शांत झालो. तोवर बाकीचे घरी यायची वेळ होत आली होती. आई म्हणाली ''ऊठ बरं आता, छानसा चहा करते. सध्या मी बाबांना लग्नाचा विषय काढू नका म्हणून सांगते, आपण सगळ्या गोष्टींचा विचार करू नंतर. नुकताच आला आहेस इतक्या लांब अमेरिकेतून, आत्ता उगाच विचार करू नकोस.'' आईशी बोलल्यावर खूप मोकळं वाटलं. नवा आत्मविश्वास आला.

ऑफिसला रुजू झालो तरी घरात बाकी लोकांना सांगितलेलं नाही हे मनात होतंच. त्यांचं काय म्हणणं आहे हे जाणून घ्यायचं होतं. शेवटी ते माझे होते, त्यांना मला सांगायचं होतंच. १५ ऑगस्टला जोडून सुट्टी येणार होती. हे पाहून मी लगेचच ताई, दादा दोघांनाही सुट्टी काढून घरी यायला सांगितलं.

१५ ऑगस्टच्या सुट्टीसाठी मी घरी गेलो. घरी साऱ्यांना बोलवून त्यांना हे सारं विस्तृतपणे सांगितलं. मनात काय बोलायचं याची उजळणी, खाडाखोड वगैरे अनेकदा झालेलीच होती. बाबा काहीच बोलले नाहीत. भाऊ बोलला. त्याच्याच शब्दात, ''कुटुंब हे एका हृदयासारखं असतं, त्यातला कुठलाही भाग तोडून काढला तर ते बंद पडेल. तसा अधिकार आम्हा कुणाला नाही, तसाच तो भाग आपणहून काढून घेण्याची, भविष्यात कधी इच्छा झाली तरी तो अधिकार तुलासुद्धा नाही. वुई ऑल विल बी टुगेदर अ‍ॅण्ड दॅट्स नॉट गोइंग टु चेन्ज.'' एवढा मोठा भरोसा मिळाल्यावर मग काय....., अजून काय हवं मला.....

आईची खात्री होती, की ही काहीतरी मानसिक समस्या आहे. मी तिला म्हटलं, ''मी तुझ्याबरोबर समुपदेशकाकडे येईन, पण कुठल्याही मानसोपचारतज्ज्ञांचं औषध मी घेणार नाही.'' नैराश्याच्या एक वर्षाच्या

काळातल्या या औषधांचा मला चांगलाच अनुभव होता. आईबरोबर मी समुपदेशकाकडे गेलोही, पण त्या समुपदेशकाने नंतर आईलाच आत बोलावून गे असणं कसं नॉर्मल आहे, हे सांगायला सुरुवात केल्यावर आईनं आपला विचार बदलला. "काही कळत नाही त्या समुपदेशकाला. मलाच उलट सांगितलं, की हे सगळं नॉर्मल आहे." असं म्हणून आईनं समुपदेशनाच्या नियोजनावर पाणी सोडलं. मला तिची ती टिपिकल प्रतिक्रिया बघून हसू आलं.

यालाही आता काही वर्षं झाली. या वर्षांत बरंच काही बदललं. मी पुण्यात आलो. पुन्हा एकदा अमेरिकेला जाऊन आलो. दादाचं लग्न पुढे नीट चाललं नाही. त्यालाही बरेच मानसिक त्रास झाले. त्यावेळी मी इथे असावं म्हणून मी अमेरिकेतून परत निघून आलो. अजूनही सारं काही नीट झालं आहे असं नाही, पण तो बराच सावरला आहे. घटस्फोट होईल किंवा न होईल, पण जे काही होईल त्याला खंबीरपणे तोंड देऊन पुन्हा आयुष्यात उभं राहण्याची धमक मला त्याच्यात दिसते आहे. आईबाबांनी आता मला 'बदलण्याचा' विचार सोडून दिला आहे. अधूनमधून लग्नाचा किंवा असा काही विषय काढतात ते, नाही असं नाही, पण त्यात तेवढी शक्ती राहिली नाही. त्यांना मुख्य काळजी असते, की त्यांच्यानंतर माझं कसं होणार. मी एकदा, तुम्हाला मुलगा अविवाहित पण सुखी पाहिजे, की लग्न करून आयुष्यभर दुःखात असलेला पाहिजे, असं विचारल्यावर ते निरुत्तर झाले.

बाबांशी या विषयावर वेगळं असं कधी बोलणं झालं नाही. ही इज द स्वीटेस्ट डॅड एनीवन कॅन हॅव. अजूनही आम्ही लहान असताना करत असू तशी आमची चेष्टा, मस्करी, दंगा चालू असतो. त्यात माझ्या गे असण्याने काही फरक पडलेला नाही. बहीण तर आता माझी मैत्रीणच झाली आहे. परवा परवाच माझ्या भाच्यालाही मी गे असल्याचं सांगितलं. तो नुकताच कॉलेजमध्ये गेला आहे आणि त्यानी तर ते

अगदीच सहजतेनं स्वीकारलं. आजच्या पिढीमध्ये जुन्या पिढीचे लैंगिकतेबद्दलचे 'टॅबू' नाहीत, हे पाहून खूप बरं वाटतं.

चिनूनं पुढे कामाचा राजीनामा देऊन अमेरिकेतच एम.एस.ला प्रवेश घेतला. तो लोकांना आदर वाटावा एवढा भयंकर हुशार व ज्ञानी आहे. त्यानंतर त्याला लगेच पीएच.डी.लाही प्रवेश मिळाला. आम्ही दोघे अजूनही कायम फोनवर बोलत असतो. भारतात मी कित्येकदा त्याच्या घरी जाऊन आलोय. त्याच्या घरचे मी येणार म्हटलं, की वाट बघत असतात.

आपापल्या व्यवसायामुळे आता आम्ही दोघे वेगवेगळ्या मार्गांवर येऊन उभे आहोत. ते मार्ग पुन्हा एकमेकांना भेटतील का? आम्ही खरंच कधी एकत्र राहू शकू की नाही, माहीत नाही. खरं सांगायचं तर ती शक्यता मला फार अंधूक वाटते, पण मनात चिनूविषयी असलेलं प्रेम हे तसंच आणि तेवढंच आहे. किंबहुना आता जास्त परिपक्व झालेलं आहे, इतकं की, तो इतक्या दूर असूनही तो माझ्या मनात एका उबेसारखा कायम असतो.

एक वर्षापूर्वी माझ्या आयुष्यात शेखर आला आणि पुन्हा सारं काही ढवळून निघालं. फार फार पूर्वी एक प्रसिद्ध नाटक पाहिलं होतं. 'चारचौघी'! त्यातल्या सगळ्यात धाकट्या मुलीचा जो प्रश्न होता तोच प्रश्न आता माझ्यासमोर आहे- चिनू आणि शेखर. एक खूप समंजस, शांत, विचारी, प्रेमळ, तर दुसरा अगदी नाचरा, बालिश, वेड्यासारखा जीव ओतून प्रेम करणारा, हळवा, घडोघडी 'इमोशनल ड्रामा' करणारा वेडा! एक जवळपास अमेरिकेत सेटल झालेला, परत भारतात येण्याची शक्यता नसलेला आणि दुसरा अजून करिअरची सुरुवातही न केलेला, निवांतपणे एकेक विषय पास होऊन एम.बी.ए. करणारा. एकाबद्दलचं प्रेम हे आत गाभाऱ्यात तेवत असलेल्या मंद ज्योतीसारखं तर दुसऱ्याबद्दलचं प्रेम एखाद्या उड्या मारत वाहणाऱ्या नदीसारखं....मला

दोन्ही हवेत. पण कसे? मला माहीत नाही.

आयुष्याच्या या टप्प्यात मागं वळून पाहिलं तर वाटतं, काहीही असो..ऑल धिस हॅज बीन अ वन्डरफुल राइड. मागं वळून पाहताना मला एकलकोंडा, बावळट, कुरूप, आत्मविश्वास नसलेला आणि लोकांच्या हसण्याचा विषय असलेला मुलगा दिसतो आणि आत्ताचा.... जिमला जाऊन आपल्या दिसण्यानं आणि व्यक्तिमत्त्वानं, चार लोकांत बोलण्यानं लक्ष वेधून घेणारा, छाप पाडणारा मी दिसतो. तोही मीच होतो, हाही मीच आहे. अजूनही गाभा तोच आहे, जो आईबाबांनी लहानपणापासून दिलेला आहे- त्यांच्या विचारांतून, संस्कारांतून, बोलण्यातून, वागण्यातून आणि वाचनाच्या आवडीतून, तो अजूनही खोलवर रुजलेला आहे. त्याच्या आधारे हे आताचे प्रश्नही मी नक्कीच सोडवेन आणि पुढे पुढे जात राहीन! स्वत:लाच सापडत जाईन.

*****

## अशोक (परभणी)

माझा जन्म १९७२साली परभणी जिल्ह्यातील एका गावी झाला. घरची अत्यंत गरिबी. त्याला कारण वडील. सतत जुगार खेळण्याची त्यांना सवय. मोलमजुरी करून जुगार खेळत बसणं हा त्यांचा आवडता छंद. मजुरीला नाही गेलो तरी चालेल पण जुगार खेळत बसणार! मग एकट्या आईनं दुसऱ्याच्या शेतात मजुरीला जायचं, तिथेसुद्धा बापडा अगोदरच त्या मालकाकडून पैसे घेऊन यायचा.

वडील अहंकारी, क्रूर आहेत हीच भावना. वडिलांकडे कुत्सित नजरेनं पाहत आलो आहे. आज ते मरणावस्थेत आहेत (आम्ही त्यांच्यापासून विभक्त होऊन दहा वर्षांचा कालावधी लोटला आहे.) तरी माझी त्यांच्याबद्दल तीच भावना आहे.

आई घर सांभाळायची, म्हणून फक्त आईवरच प्रेम. घरातील कामं जसं पाणी भरणं, स्वयंपाक करणं, झाडून काढणं, ती मी करायचो. मी अशी कामं का करतो? ती मला खूप आवडतात. त्याची जराशीही लाज वाटत नाही. उलट उत्स्फूर्तपणे मी ती कामं करतो.

बिकट परिस्थितीत फक्त मामाच्या सहकार्यानं शिक्षण पूर्ण केलं. खेडेगाव असल्यानं मागास जातीची फक्त दोन ते तीन मुलं होती, जी बारावीच्या पुढे शिक्षण घेत होती. आपणही असंच शिक्षण घ्यावं, त्यांचा आदर्श घेऊन नाव मोठं करावं ही भावना मनात होती. वर्गात जी काही दोन-चार हुशार मुलं होती, त्यात माझाही नंबर होता. मी इंग्रजी, गणित, विज्ञान या विषयांत हुशार होतो. सातवीच्या स्कॉलरशिप परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन, वार्षिक शिष्यवृत्तीचा हक्कदार झालो.

इयत्ता आठवीपासून पुरुषांबद्दल लैंगिक आकर्षण वाटू लागलं. बाकीची मित्रमंडळी मुलींबाबत बोलत होती. मला मात्र या गोष्टी त्यांच्या तोंडून ऐकताना अपराधीपणाची भावना वाटत होती. मला ते मुलींबाबत असं का बोलतात असा प्रश्न पडायचा. मला फक्त माझ्या

वर्गातील मुलं किंवा समवयस्क मुलांबाबत आकर्षण असायचं.

समवयस्क मुलांसोबत रात्रीच्या वेळी लपाछपीच्या खेळात एका मुलासोबत खेळ (बॉडी सेक्स) झाला. मला त्या खेळापुरतं समाधान वाटायचं, नंतर मात्र सतत अपराधीपणाची भावना वाटायची. मी असं कृत्य का करतो आहे याची मला नंतर लाज वाटायची. या नंतर मी असं काही करणार नाही हे ठरवून ठेवायचो. मग जेव्हा तो यायचा तेव्हा त्याला धुडकावून लावायचो. पण किती दिवस? पुन्हा मला त्याची गरज वाटू लागायची आणि मग नंतर मीच त्याला परत बोलावून घ्यायचो.

असं करत असता या खेळात खेळाडूंची संख्याही वाढू लागली. ज्या समवयस्क मुलांना याची माहिती होती ती मुलं जेव्हा मी मुद्दाम त्यांच्याशी भांडायचो तेव्हा मला 'बुळग्या' म्हणत. मला ते अपमानास्पद वाटे म्हणून मग मी त्यांच्याशी अबोला धरी.

मी लक्ष अभ्यासातच घालायचा प्रयत्न केला. विविध स्पर्धात्मक परीक्षेत भाग घेतला. सेट, नेट परीक्षा दिल्या; पण मन कधीच एकाग्र नव्हतं. ते काय विचार करत होतं माहीत नाही. बुद्धिमत्ता असूनही केवळ बिकट परिस्थितीमुळे यश आलं नाही असं आज म्हणणं निश्चितच उचित ठरणार नाही, कारण माझं मन कधीच स्थिर नव्हतं. अंतर्गत कलह खूप होता.

एकदा लैंगिक जोडीदाराच्या शोधात मला जबर मारहाण झाली. तो शेळीपालन करणारा जोडीदार होता. त्याच्या मित्रांनी आम्हाला आडोशाला गेल्याचं पाहिल्यावर आमच्या पाठीमागे आले. त्यांच्या हातात झाडांच्या ओल्या काठ्या होत्या. त्यांनी मला प्रचंड मारहाण केली. त्यांचे म्हणणे मी त्यांच्या मित्राला बिघडवतो आहे. असं का? तो व मी प्रौढ होतो व हे संबंध संमतीने होत होते. माझ्या मित्रानं मला वाचवण्यासाठी थोडीशीही मदत केली नाही, याचं वाईट वाटलं.

काही दिवसांनी घरच्यांनी लग्नाचा विषय काढला. मला खूप

भीती वाटत होती. नेमकं या परिस्थितीत काय करावं हे कळत नव्हतं. माझ्या भावना कोणाला सांगू? कशा सांगू? हा खूप मोठा प्रश्न होता. बरेच वेळा शिष्यवृत्तीतून मिळणाऱ्या पैशाचा उपयोग मी आयुर्वेदिक हकिम, डॉक्टर तसेच गुप्तरोगतज्ज्ञांना दाखवण्यात केला, पण त्यांना स्पष्टपणे मी समलिंगी पुरुष आहे याची कधीच कल्पना दिली नाही. त्यांनी दिलेल्या विविध औषधांचा वापर केला, पण समलैंगिकता त्याने थोडीच कमी होणार होती?

हो ना करत २००२मध्ये मोठ्या धूमधडाक्यात माझं लग्न झालं. परंतु वडिलांनी आम्हाला खूप त्रास दिल्यामुळे पंधरा दिवसांतच मी, आई व माझी पत्नी, आम्ही परभणीला स्थायिक झालो. एका संस्थेत ७५० रु.च्या मासिक वेतनावर शिक्षक म्हणून काम केलं. त्याचबरोबर काही ठिकाणी खासगी शिकवण्या घेतल्या. मामानी त्यांच्या घरून आम्हाला पैसे देऊ केले आणि आमचा जीवनप्रवाह सुरू झाला. वैवाहिक जीवनात अडचण आली नाही. आम्हाला एक मुलगा झाला. माझ्या पत्नीला स्वावलंबी, स्वाभिमानी बनवण्यासाठी तिला नर्सिंगचं शिक्षण घेण्यास सांगितलं.

पुढे मी बी.एड. आणि सी.ई.टी.चीही परीक्षा दिली. त्यात मला चांगले गुण मिळाले व माझा बी.एड.ला नंबर लागला. इथं शिक्षणासाठी २५००० रुपयांसाठी खूप जणांना पैसे मागावे लागले. आजही त्यांचे पैसे मी देऊ शकलो नाही. पुढे एका कनिष्ठ महाविद्यालयामध्ये (जे कायम विनाअनुदानित आहे) प्राध्यापकाची नोकरी करू लागलो.

मी कॉलेजमध्ये नोकरीला असताना कॉलेजमधील एकावर प्रेम करू लागलो. त्याला माझ्या लैंगिकतेच्या भावना सांगितल्या, मन मोकळं केलं. त्याला समलैंगिकतेबाबत माहिती नव्हती. तो माझी खूप कदर करतो, पण त्याला प्रेम म्हणायचं का? म्हणून त्याच्याशी कसं वागावं हे कळत नाही, पण असं असलं तरी माझा त्याच्यावर खूप जीव आहे.

कालांतराने अनेक समलिंगी लोकांशी माझी ओळख झाली. तोपर्यंत माझ्याशिवाय या जगात अजूनही माझ्यासारखी मंडळी आहेत याची मला कल्पना नव्हती. वयाच्या ३१व्या वर्षी मला कळाले, की माझ्यासारखे खूप आहेत. माझा आनंद द्विगुणित झाला. या समुदायाने मला 'मुक्ता प्रकल्प, परभणी' येथे नेलं. माझ्यातील आत्मविश्वास हळूहळू वाढत गेला, पण त्याचबरोबर एक काळजी वाटत होती, की समुदायातील नसलेले लोक मला स्पष्टपणे 'असे' म्हणून ओळखायला लागतील. घरी बरेच एमएसएम, कोत्या येऊ लागले. माझी बायको म्हणतेही "तुमचे असे कसे मित्र?"

आज माझ्या समुदायाशी माझी गाढ मैत्री झाली आहे. असा एकही दिवस जात नाही, की ज्या दिवशी मला त्यातील कोणी भेटत नाही. पूर्ण दिवसभर जर त्यांची भेट झाली नाहीतर अगदी चुकल्याचुकल्यासारखे वाटते. यात वय वर्षे १८ पासून ६५-७० वर्षांपर्यंतचे मित्र आहेत. फक्त परभणी शहरापुरते मर्यादित न राहता नांदेड, लातूर, उदगीर, अकोला, बीड, परळी, माजलगाव इथपर्यंत माझे मित्र आहेत. आज मोबाइलची सुविधा असल्याने त्यांच्याशी संपर्क होतो, विचारांची देवाण-घेवाण होते. मनोरंजन होतं. त्यांच्या सुखदुःखात मी व माझ्या सुखदुःखात ते सामील होतात.

वाटते हाच आमचा समाज! कारण आमच्या भावना, आमच्या मनातील विचार आम्ही कोणासमोर व्यक्त करणार? कोण आम्हाला समजावून घेणार? फक्त आमचा समुदायच, अगदी यात आम्ही हिजडा समुदायालाही सामावून घेतलं आहे.

असे दिवस जात असताना एक दुर्दैवाची गोष्ट घडली. माझा खूप जवळचा मित्र एचआयव्ही पॉझिटिव्ह निघाला. पायाखालची वाळूच सरकली. मला खूप वाईट वाटलं.

बऱ्याच एमएसएमना एचआयव्हीसंसर्गित पुरुषांपासून असुरक्षित गुदमैथुनामुळे एचआयव्ही/एड्सची लागण होते याची

माहिती नाही. माझा मित्र एचआयव्ही पॉझिटिव्ह झाला, म्हणून मी इतरांना त्यांनी सुरक्षित लैंगिक संबंध ठेवावेत हा सल्ला दिला. यासाठी संदर्भ म्हणून त्याचं उदाहरण दिलं, पण खूप वाईट अनुभव आला. त्याला सर्वांनी जणू वाळीतच टाकलं. त्याच्याशी अबोला धरला. असा परिणाम होईल याची मला कल्पना नव्हती. त्यानेही माझ्याशी अबोला धरला. मी त्याची क्षमा मागितली. मी चांगल्या हेतूने समुदायाला माहिती सांगितली, पण आता त्याचा पश्चात्ताप झाला.

त्यानंतर माझे अजून काही एमएसएम मित्र एचआयव्ही पॉझिटिव्ह निघाले. त्यातील ४-५ वारले. यातून मी खूप सावध झालो. प्रत्येक संबंधामध्ये कंडोमचा वापर करू लागलो. रक्ताची तपासणी वेळोवेळी करू लागलो.

एमएसएम समुदायाला आरोग्य व अधिकार मिळवून देण्यासाठी आपण स्वत:ची संघटना स्थापन करावी अशी कल्पना मी एमएसएम बांधवांपुढे मांडली. जवळपास ५० एमएसएमशी चर्चा केली. सगळे तयार होते, पण उघडपणे बोलण्यास घाबरत होते. काहींना ट्रस्टमध्ये न राहता काम करण्याची इच्छा होती. जवळपास २ वर्षे सतत संपर्कात राहून शेवटी २ डिसेंबर २०११ला आम्ही 'दि लाइट ऑफ एशिया सोशिओ ट्रस्ट' स्थापन केला. याबाबत बिंदुमाधव खिरे यांच्याकडून मार्गदर्शन घेतलं. नागपूरच्या 'सारथी ट्रस्ट'ची भेट घेतली. आनंद चंद्रानींनी आम्हाला भरपूर मार्गदर्शन केलं. 'द हमसफर ट्रस्ट'कडूनही मार्गदर्शन मिळालं. हे कार्य लवकरात लवकर कसं पुढे न्यावं याबाबत प्रयत्नशील आहे.

*****

## आदित्य (अहमदनगर)

मी मूळचा संगमनेर तालुका, जिल्हा अहमदनगर येथील आहे. माझं नाव आदित्य. मला दोन बहिणी आणि आईवडील, असा माझा परिवार. मी एक वर्षाचा असताना माझ्या वडिलांची बदली दुसऱ्या गावी झाली. आजपर्यंत ते तेथेच नोकरी करतात. ते फक्त शनिवारी रात्री येतात आणि सोमवारी पहाटे निघून जातात. त्यामुळे वडिलांचे प्रेम काय असते हे आम्हा तीनही बहीण-भाऊ यांना माहीत नाही आणि त्यात माझ्या वडिलांचा अति तापट स्वभाव. त्यामुळे आम्ही त्यांना खूप घाबरायचो. माझ्या वडिलांच्या अति तापट स्वभावामुळे आमच्या घरी दर शनिवार-रविवार भांडणे, कलह, कटकट चालू राहायची. मला लहानपणापासून माझ्या वडिलांचा स्वभाव कधीच पटला नाही म्हणून मी मुद्याचं सोडून कधीही त्यांच्याशी बोललो नाही. मी आणि माझ्या बहिणींकडे लक्ष देण्याचं, सांभाळण्याचं काम माझ्या आईनेच केलं, त्यामुळे ते श्रेय फक्त तिला जातं कारण अशी वेळ होती, की माझ्या वडिलांना आम्ही कोणत्या वर्गात शिकत आहोत आणि कोणत्या शाळेत आहोत हे सांगता येत नसे. त्यांनी फक्त आमच्या संगोपनासाठी पैसा पुरवला. हो, पण माझ्या वडिलांनी कधीही आम्हा सर्वांना कशाचीच कमी केली नाही. आम्ही खाऊन-पिऊन अगदी सुखी होतो. वडील म्हणायचे, "तुम्हाला काय पाहिजे ते मला सांगा. मी उपाशी राहीन, पण तुम्हाला कशाचीही कमी पडू देणार नाही." पण तुम्ही प्रेमाचे दोन शब्दच बोलायला विसरलात हे कधी तुमच्या लक्षातच नाही आलं.

मी लहानपणी इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत एकाच विद्यालयात शिक्षण घेतलं. शाळेत मी बॅडमिंटन खेळायचो. माझं मुलींसारखं बोलणं, चालणं, वागणं, हावभाव, या सर्वांमुळे मला मुलं खूप त्रास द्यायची. टिंगल करणं, वाईट बोलणं हे रोजच चालू असायचं. त्यामुळे मला खूप दुःख होत असे आणि मी एका रूममध्ये जाऊन खूप रडायचो. मुलांच्या

अशा वागण्यामुळे मला मुलांशी बोलायला, त्यांच्यासोबत कुठेही येण्या-जाण्याची किंवा त्यांच्यासमोर उभं राहण्याची खूप भीती वाटायची. माझा थरकाप व्हायचा, हृदयाचे ठोके वाढायचे. माझा आवाज आणि बोलणं मुलींसारखं असल्यामुळे मी लगेच वेगळा दिसायचो. इतका, की कधी कधी शिक्षक पण माझी नक्कल करत. मला खूप राग यायचा. एकतर मरावं तरी किंवा मारावं तरी अशी भावना माझ्या मनात यायची. पण ते शक्य नव्हतं म्हणून मी एखाद्या अंधाऱ्या खोलीत जाऊन एकटाच रडायचो. मला दुसऱ्यांसमोर रडायला येत नाही आणि एकटं रडून मला माझं मन शांत झाल्यासारखं वाटतं.

शाळेत असताना जे माझ्या वाट्याला यायचं तेच माझ्या आजूबाजूच्या परिसरात देखील, पण तेथील प्रमाण जरा कमी होतं. मी कुठे जात असलो, की सर्व मुलं एकटक माझ्याकडे पाहत असत आणि मी मान खाली घालून जात असे. मी पुढे गेलो, की मागून शिट्टी वाजवत किंवा मोठ्याने हसत. या सर्व कारणांमुळे माझी खूप चिडचिड व्हायची आणि माझ्या मनात नेहमी सुडाची भावना यायची. आजही तेच होतं. मला हे सर्व नको होतं म्हणून मी घराच्या बाहेर पडणे टाळत असे. दिवसभर घरातच बसून टीव्ही बघत असे. मला माझ्या बहिणी, आई, शेजारपाजारची माणसं नेहमी म्हणत- ''बाहेर मुलांमध्ये खेळायला जा, घरात बसून काय अंडी घालतो.'' घरात जर कोणी पाहुणे आले तर मी स्वयंपाकखोलीत जाऊन बसायचो. आलेले पाहुणेपण मला नावं ठेवत, की आम्ही आल्यावर आमच्याशी बोलायचं सोडून स्वयंपाकखोलीत जाऊन बसतो किंवा बाहेर निघून जातो. कधी कधी घरातील कलह, भांडणं यामुळे जीव अगदी नकोसा व्हायचा. मग मी अंगणात जायचो. बागकाम करायचो. वेगवेगळी कलमं करणे, फुलांची झाडं लावणे, वेगवेगळ्या फळांच्या, फुलांच्या झाडांच्या बिया गोळा करणे माझा छंद बनला.

माझं ते वृक्षप्रेम पाहून माझी मम्मी मला नेहमी मस्करीत

बोलायची, ''तू शाळा सोडून दे आणि नगरपालिकेत किंवा एखाद्या गार्डनमध्ये जा कामाला.'' सर्वजण बोलत, की तू ॲग्रिकल्चर किंवा वृक्षांशी निगडित असं काहीतरी करिअर कर. नातेवाईक बोलायचे, की तू आमच्याकडे शेती करायला ये किंवा याला शेती घेऊन द्या, हा खूप पुढे जाईल.

मी लावलेल्या झाडांना खूप फुले येतात असा समज झाल्यानंतर आमच्या संपूर्ण कॉलनीमध्ये कुणीही एखादं झाड आणलं किंवा एखादं फुलाचं झाड लावायचं असेल तर मला घरी बोलवायला यायचे. माझे नातेवाईकसुद्धा माझ्याकडून त्यांच्या शेतात नारळ, गुलाब, अंजीर अशी झाडे लावून घेत. मला आठवतं, मी इयत्ता नववीत शिकत असताना आमच्या घराजवळ एकजण राहात होते. त्यांच्या घरासमोर खूप मोठी जागा आहे. तेथे त्यांना १०० गुलाबाची झाडं लावायची होती तर अगोदर एक झाड माझ्या हातानं लावून घेतलं होतं. त्यानंतर ते नेहमी मला एखाद्या सण-उत्सवात घरी गुलाबाची फुले आणून देत. जर कोणी एखादं झाड तोडलं किंवा कापलं, की मी खूप भांडायचो.

शाळेत मला माझ्या वर्गातील हुशार आणि सुंदर दिसणारा कुणाल आवडू लागला. पण तो खूप हुशार आणि श्रीमंत होता, त्यामुळे तो आमच्यासारख्या मध्यमवर्गीय मुलांमध्ये कधीच मिसळायचा नाही. पाच वर्षं तो माझ्या वर्गात असूनही तो कधी माझ्याशी बोलला असेल ते मला आठवत नाही. मी मात्र त्याच्यासाठी क्षणाक्षणाला खचत गेलो आणि तो कधी साधं माझ्याकडे बघत पण नसायचा. या बेचैनीमुळे हळूहळू माझं अभ्यासाकडे दुर्लक्ष होत गेलं. याचा परिणाम असा झाला, की मला इयत्ता नववीत असताना ८३ टक्के मार्क्स होते आणि मी दहावीत अचानक ६० टक्क्यांवर आलो. ही माझी घसरण पाहून घरातले सर्व त्रस्त झाले. माझे वडील नेहमी मला म्हणायचे, ''मी शिपाई आहे पण मी तुला नेहमी एखादा साहेब आहे अशा रूपात पाहतो. माझ्यासारखा बनू नको. बहिणींची लग्नं झाली आहेत, तो तुला ताण नाही ठेवला. दोघींच्या

लग्नाचं कर्ज झालं आहे, तेही मीच फेडणार आहे. तुझ्याकडून आम्हाला काहीच नको, फक्त तू तुझं पोट भरशील असं काहीतरी कर आणि नसेल जमत तर घर सोडून जा.'' दहावीला मला कमी मार्क्स पडल्यामुळे माझ्या घरच्यांनी माझ्या हातातून बॅडमिंटनची रॅकेट काढून घेतली ती आजपर्यंत माझ्या हातात आली नाही.

दहावीनंतर मी अकरावीला सायन्स शाखेत प्रवेश घेतला, पण मराठी माध्यमामधून अचानक इंग्रजी माध्यमामध्ये आल्यामुळे मला काहीच जमेना. तरी मी प्रयत्न सोडले नाहीत. कॉलेजमध्ये गेल्यानंतरही मला मुलांकडून खूप तुच्छतेची वागणूक मिळत असे. म्हणून माझ्या मनात त्या मुलांबद्दल राग, द्वेष निर्माण झाला. मी कॉलेजमध्ये असताना सर्वांपासून लांब राहायचो. मी जेवणपण एकटाच करायचो. शाळेत किंवा कॉलेजमध्ये कुणीच मित्र नव्हता. बाहेर मिळणाऱ्या वागणुकीमुळे माझा स्वभाव चिडचिडा बनला. मी कुणालाही उलटी उत्तरं द्यायला लागलो. माझी घरात सर्वांशी भांडणं होऊ लागली. माझ्या मनात अनेकदा आत्महत्येचाही विचार आला. माझी तब्येत खालावली. मी सारखा आजारी पडू लागलो. डॉक्टरला दाखवायला गेलो, की डॉक्टर माझ्या आईवडिलांना सांगायचे, की तो खूप काळजी करतो किंवा कुठल्यातरी गोष्टीचा तो खूप विचार करतो, टेन्शन घेतो. पण आईवडील बोलायचे, ''काळजी, विचार करण्यासारखं काहीच नाही. त्याला आम्ही सर्व काही पुरवतो.''

मला गे समाजाबद्दल काहीच माहिती नव्हती. कधी टीव्हीवर, काही चित्रपटात किंवा कधी कधी समक्ष हिजडा समाजातील व्यक्तींना पाहायचो, तेव्हा मला असं वाटायचं, की मी पण त्यांच्यासारखा हिजडा आहे का? पण मी त्यांच्यासारखा पेहराव(कपडे घालणे) करत नाही, त्यांच्यासारख्या टाळ्या वाजवत, नटत नाही. म्हणजे मी त्यांच्यासारखा नाही, पण मी भिन्नलिंगीपण नाही, म्हणजे मी कोणीतरी वेगळा आहे, पण काय आहे हे माहीत नव्हतं.

पुढे कॉलेजमध्ये होणाऱ्या त्रासाला काहीतरी पर्याय शोधायचा असं ठरवलं. मी माझ्या रूममधील आरशापुढे जाऊन उभा राहायचो. रूम बंद करून आत एकटाच बसायचो. आरशातील माझी प्रतिमा कोणीतरी दुसरा मुलगा आहे, जो रोज मला चिडवतो असे मी मनात रुजवायचो. तो मला काय चिडवेल किंवा मला काय बोलेल आणि त्यावर मी त्याला काय उत्तर द्यायचं असा मी रियाज केला. उदाहरणार्थ, माझी आरशात दिसणारी प्रतिमा म्हणजे मला चिडवणारा मुलगा, ज्याने मला काहीतरी चिडवले आहे किंवा डोळे मारणे, शिट्टी मारणे किंवा मागील बाजूस हात लावणे, माझा हात घेऊन स्वत:च्या मांडीवर ठेवणे इत्यादी. यावर त्याला काय उत्तर द्यायचं असा रियाज मी केला आणि पाच-सहा महिन्यांनी माझ्यात झालेला बदल लक्षणीय होता. आज मला जर कोणी चिडवलं तर, मी असं काही गलिच्छ बोलून जातो, की त्याची त्या ठिकाणी उभं राहण्याचीसुद्धा इच्छा राहात नाही.

अकरावीत असताना माझ्या वर्गात केतन नावाचा एक मुलगा होता. मला तो आवडायचा आणि त्यालाही मी आवडायचो. आमची चांगली मैत्री झाली. आम्ही अभ्यास करायला एकमेकांच्या घरी जायचो. एकदा तो मला म्हणाला, ''मला तुझं आकर्षण वाटतं'' आणि माझ्याबरोबर संभोग करण्याची इच्छा व्यक्त केली. मी या अगोदर असं काही कुणाबरोबर केलं नव्हतं आणि असे समलिंगी संबंध असतात याबद्दलपण माहिती नव्हती. त्यानं मला त्याच्या सेलफोनवर समलिंगी संबंधांची काही चित्रे, फोटो दाखवले आणि मला त्याबद्दल माहिती सांगू लागला. अगोदर मी त्याला नाहीच म्हटलं, कारण मला भीती वाटत होती, पण मलाही तो आवडायचा त्यामुळे मनात इच्छा व्हायची. १०-१५ दिवस मी त्याच्यापासून लांब राहण्याचा प्रयत्न केला, पण त्या नंतर आमच्यात संबंध झाला.

नंतर तो फक्त संबंधापुरता माझा वापर करू लागला. मग मी त्याला टाळायचं ठरवलं. तो येण्याची वेळ झाली, की मी कुठेतरी

दुसरीकडे निघून जायचो किंवा घरातच लपून बसायचो. मी त्याला टाळायला लागलो म्हणून चिडून तो मला ब्लॅकमेल करायला लागला. काही दिवसांपूर्वी त्याने त्याच्या मोबाइलमध्ये माझे नग्न फोटो काढले होते. तो संभोगाचा हट्ट करून बसायचा आणि नाही म्हटलं तर फोटो मित्रांना दाखविन असं धमकवायचा. तीन-चार महिने त्याने मला खूप त्रास दिला. शेवटी मी आयडिया लढवली. एकदा मीच त्याला स्वत: फोन करून बोलावून घेतलं. त्याच्याकडे अश्लील चित्रफिती बघण्याचा हट्ट केला आणि तो मोबाइल मिळवला आणि त्याचं लक्ष नसताना मी ते फोटो डीलिट करून टाकले. त्या दिवशी माझा आणि त्याचा शेवटचा संबंध झाला. फोटो काढून टाकल्याचं त्याला कळल्यावर तो खूप संतापानं लाल झाला आणि बोलला, की आता मी सर्वांना सांगणार आणि तुला बदनाम करणार, पण मी त्याला न घाबरता बोललो- "तुला ज्यांना सांगायचं त्यांना सांग नाहीतर मला घेऊन चल मी स्वत: माझ्या तोंडाने सांगतो, की मी समलिंगी आहे आणि आमचे दोघांचे शारीरिक संबंध झाले आहेत." असं बोलल्यानंतर परत तो कधीही माझ्याकडे आला नाही.

बारावीत गेल्यावर एका युवराज नावाच्या मुलाशी माझी ओळख झाली. तो मला खूप आवडायला लागला. मी रात्रंदिवस त्याचा विचार करू लागलो. त्यामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष झालं. तो माझ्याशेजारी बसला तरी मला भीती वाटायची, तोंडचं पाणी पळायचं, घशाला कोरड पडायची. अनेक महिन्यानंतर मी हळूहळू त्याच्याशी बोलायला लागलो. क्लासमध्ये त्याच्या शेजारी बसणं, गप्पा मारणं सुरू केलं. नंतर त्याच्या होस्टेलवर ये-जा करायला सुरुवात केली. युवराजची आणि माझी चांगली मैत्री झाली तेव्हा त्याने मला गेची संकल्पना सांगितली. नुकताच 'दोस्ताना' चित्रपट प्रदर्शित झाला होता. हा चित्रपट पाहण्यासाठी तो मला थिएटरमध्ये घेऊन गेला. नंतर माझ्या असं लक्षात आलं, की मी समलिंगी आहे हे त्याला माझ्या वागण्यावरून

समजलं असावं, म्हणून तो मला याची सर्व माहिती सांगतो आहे.

बारावीचं वर्ष संपलं, बोर्डाचे पेपर संपले. आता सीईटी परीक्षा देण्यासाठी एक महिना क्रॅश कोर्स लावला. युवराजने जेथे लावला तेथेच मीपण लावला. एक दिवस अचानक युवराजनं मला त्याच्या होस्टेलवर बोलावलं. मी गेलो, तर त्याने मला अचानक मिठी मारली. मी ती मिठी मरेपर्यंत कधी विसरणार नाही. मला त्यावेळी खूप भीती वाटत होती. माझा थरकाप होत होता. त्यानं ते माझ्या हातावरून ओळखलं आणि माझा हात हातात घेतला. मला बोलला, ''तू मला आवडतोस.'' तो दिवस मी आजही विसरलेलो नाही.

त्यानंतर काहीतरी कारणावरून आमचं मोठं भांडण झालं. त्यामुळे मी खूप खचलो. माझा सीईटी परीक्षेचा नंबर नगर येथे होता. मी परीक्षा द्यायला नगरला गेलो; परंतु माझी परीक्षा द्यायची इच्छा होईना. मला सारखं रडायला यायचं. उदास वाटायचं. मी वर्दळीच्या ठिकाणीसुद्धा एकटाच असल्याचा भास व्हायचा. असं वाटायला लागलं, की मी मोठ्यानं ओरडतो आहे, रडतो आहे, पण आजूबाजूला कोणीही माझ्याकडे लक्ष देत नाही.

परीक्षेची वेळ झाली. मनात परीक्षेला बसण्याची इच्छा होत नव्हती. मी कॉलेजमध्ये जाणार तेवढ्यात युवराज माझ्या दृष्टीस पडला. ज्या कॉलेजमध्ये माझा नंबर होता तेथेच त्याचाही होता. मला खूप आनंद झाला. तेव्हा मी त्याच्याशी बोललो नाही. संध्याकाळी पेपर संपल्यावर गेटवर उभा राहून तो कधी येतो आणि मी त्याच्याशी बोलतो असं झालं. तो मला येताना दिसला. मी गेटपाशी उभा होतो. तो गाडीवर आला. मी त्याला थांबवण्याचा अतोनात प्रयत्न केला, पण तो थांबला नाही. मी अगदी त्याच्या गाडीमागे त्याला हाका मारत मारत पळत सुटलो. त्याने गाडीचा वेग वाढवला. मी रडत आणि हाका मारत त्याच्या गाडीमागे पळायला लागलो. त्या नादात सर्व रस्त्यावरची माणसं माझ्याकडे पाहत आहेत याचंसुद्धा भान मला राहिलं नाही. मी पळता पळता रस्त्यावरील

इलेक्ट्रिक दिव्याच्या खांबात माझा पाय अडकला आणि मी खूप जोरात पडलो. माझा पाय, गुडघा, हात संपूर्ण सोलवटले गेले. मला उठता येईना. तेथील एका चहाच्या टपरीवरील तीन मुलांनी मला उचललं आणि खुर्चीवर बसवलं. मला विचारायला लागले, की तो कोण होता? तू का त्याच्यामागे पळत होतास? तू कोण? कुठून आलास? इत्यादी. पण मला काहीच बोलता येईना. मला रडणं आवरेनासं झालं. मला त्या चहाच्या टपरीवाल्यानं पाणी पाजलं. जखम झालेल्या ठिकाणी पाण्यानं धुतलं आणि रक्त थांबण्यासाठी कुठलीतरी पावडर लावली. नंतर चहा पाजला आणि मला संगमनेरला जाणाऱ्या ट्रकमध्ये बसवून दिलं.

मी घरी आलो. माझा अवतार पाहून माझी आई रडायलाच लागली. कुठे पडला? काय झालं? असे प्रश्न सुरू झाले. मी काहीच न बोलता आणि न जेवता झोपून गेलो.

पुढील दोन महिने सुटी होती. मला डिप्रेशनमुळे काहीच सुचत नव्हतं. आई-वडील वेगवेगळ्या डॉक्टरांकडे नेऊन त्रस्त झाले, तरी माझ्यात सुधारणा नाही. माझी आई देवावर खूप विश्वास ठेवणारी. मला वेगवेगळ्या देवांना, ब्राह्मणांकडे घेऊन जाऊ लागली. कोण सांगायचे मंगळ आहे, कोण सांगायचे शनि तर कोण सांगायचे राहू-केतू. माझी राहू-केतूची आणि शनिदेवाची शांती केली.

मला बारावीत कमी मार्क्स मिळाले. मला हॉटेल मॅनेजमेंट करायचं होतं, पण घरच्यांच्या पुढे मला काही बोलता येत नव्हतं. मी आईवडिलांच्या आग्रहास्तव संगमनेरला इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी पॉलिटेक्निकला ॲडमिशन घेतली. माझं पॉलिटेक्निकचं कॉलेज सुरू झालं. माझं मन अजिबात लागत नव्हतं. मला डिप्लोमा अवघड जात होता. मी माझ्या काही मित्रांना किंवा युवराजच्या मित्रांना युवराजबद्दल नेहमी विचारायचो, की तो आता सध्या कुठे आहे? काय करतो? त्यानं कोणत्या कॉलेजला ॲडमिशन घेतली? पण कुणालाही माहीत नव्हतं तो असा अचानक कुठे गायब झाला. मी खूप विचारायला लागलो, की

बाकीची मुलं मला म्हणायची, की तू का सारखा त्याच्याबद्दल विचारतो आम्हाला?

माझं आयटी डिप्लोमाचं दुसरं वर्ष संपलं. मी घरच्यांना सांगितलं, की मला हा आयटी डिप्लोमा खूप अवघड जातोय. मला आता यापुढचं जमणार नाही. मला दुसरा कोर्स करायचा आहे. आईवडील मला समजावून सांगू लागले, की आता फक्त एकच वर्ष राहिलं ते कसंबसं संपवून तुला जो कोर्स करायचा तो कर. मी घरच्यांना सांगून पण ते ऐकेना. मग मी घरातून पळून जाण्याचा प्रयत्न केला, पण तो यशस्वी झाला नाही. मग आईवडिलांना माझी काळजी वाटायला लागली. वडील एकदा बोलले, की हा घरातून पळून जाण्यापेक्षा त्याच्या मनासारखं होऊ दे. मग मी आईवडिलांना सांगितलं, की मला वेब पेज डिझायनिंगचा कोर्स करायचा आहे. मग मी इंटरनेटवर जाऊन सर्च केलं, की कोठे कोठे कोर्स चालतात. नंतर मी पुण्यातल्या एका कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतली.

पुण्यात आल्यानंतर मी ज्या होस्टेलमध्ये राहात होतो त्याच होस्टेलमधील एका मुलाने मी समलिंगी आहे हे ओळखलं आणि दुसऱ्याच दिवशी मला विचारलं, ''तू गे आहेस का?'' पहिल्यांदा तर मी घाबरलोच आणि नाही म्हणून सांगितलं. त्यानं मला सांगितलं, की विचार करून, दोन-तीन दिवसांनी सांगितलं तरी चालेल. मी चार-पाच दिवस त्याला टाळलं. मग एकदा त्यानं मला त्याच्याबद्दल सांगितलं, की तो पण माझ्यासारखा गे आहे. त्याच्या आयुष्यात आजपर्यंत काय घडलं, त्याला आजपर्यंत कोणत्या समस्यांना तोंड द्यावं लागलं, त्याच्यावर शाळा, कॉलेजमध्ये झालेले अन्याय, परिसरातील मुलांमुळे, घरातील परिस्थितीमुळे आलेलं नैराश्य सर्व त्यानं मला सांगितलं.

त्याचं ऐकून मला असं वाटलं, की जे माझ्या आयुष्यात घडलं आहे, बरंचसं त्याच्याही आयुष्यात घडलं आहे. मग मी त्याला माझ्याबद्दल सांगितलं. आम्ही दोघे मित्र झालो आणि मग आम्ही जेवण

करायला, फिरायला कोठेही जाण्यासाठी नेहमी एकत्र असायचो. एकदा गप्पा मारताना मला त्याच्याकडून अशा एका संस्थेबद्दल समजलं, की जी समलिंगी लोकांसाठी काम करते. मला त्या संस्थेत ने म्हणून मी तगादा लावला. अनेक दिवस मागे लागल्यावर तो मला समपथिक ट्रस्टमध्ये घेऊन गेला.

वेब-पेज डिझायनिंगचा कोर्स संपल्यावर, मी 'समपथिक ट्रस्ट'मध्ये नोकरीला लागलो. त्या दिवशी जागतिक एड्स दिन होता. आम्ही रॅलीसाठी शनिवारवाडा येथे जमलो. समपथिकमध्ये गेल्यानंतर मला माझी माणसं मिळाल्याचा खूप आनंद झाला, कारण मी माझ्या आयडिया, विचार, मतं त्यांच्यासमोर मांडू शकलो. समपथिकमध्ये आल्यानंतर आपल्या हक्काचं व्यासपीठ मिळाल्याचा आनंद झाला. तेथे मी नोकरी करतो असं कधी वाटतच नाही. अगदी आपल्या घरच्यांबरोबर काम करतो असंच वाटतं. या घडीला तरी मी सुखी व समाधानी आहे.

*****

## शिशिर (पुणे)

माझे आईवडील मध्यमवर्गीय आणि संपूर्ण वेगळ्या जाती आणि प्रदेशातून आलेले! आई हिंदू पंजाबी (पण अगदी पंजाबमध्येच जन्म झालेली नव्हे) आणि वडील मूळचे आंध्र प्रदेशचे, पण जन्मापासून जबलपूरमध्ये वाढलेले. त्यांचा प्रेमविवाह होता. दोघेही वेगवेगळ्या कार्यक्षेत्रातल्या पदव्या घेतलेले होते. माझी आई वडिलांपेक्षा जास्त शिकलेली आहे आणि तिनं वडिलांनाही त्यांच्या पदवीनंतर पुढचं शिक्षण घ्यायला प्रोत्साहन दिलं. घरी आई, वडील, मोठा भाऊ, मी आणि माझी जुळी बहीण असे पाचजण. आईपण नोकरी करायची, पण मुलांकडे पूर्ण वेळ लक्ष देता यावं म्हणून माझ्या वडिलांनी तिला नोकरी सोडायचा आग्रह केला. परंतु जसजशा वाढत्या गरजा आणि वाढती महागाई यांचा मेळ घालणं अशक्य होऊ लागलं तसतसा घरात रोजचा तमाशा सुरू झाला. बरीच वर्षं हे असंच चालत राहिलं. शाळा बदलल्या, घरं बदलली. तरीही हाच खेळ उद्या पुन्हा! अशी अवस्था.

इतर सर्वसाधारण मध्यमवर्गीय कुटुंबांप्रमाणेच आम्ही पाचजण ४००-५०० स्क्वेअर फुटाच्या घरामध्ये राहत असू. आपला स्वतःचा मोठा, प्रशस्त बंगला व्हायला कित्येक वर्षं जावी लागली. १९९८ला आमचं घर बांधून झालं. अर्थात हे घर बांधण्यासाठी खूप कष्ट करावे लागले. आईनं तिचे लग्नात आलेले आणि इतर दागिने विकले. तिच्या नावावर एक फ्लॅट होता, तो विकला. बाबांनी नातेवाईक, कंपनी वगैरेकडून कर्ज काढली. आयुष्यभराची सारी पुंजी त्यात घातली, तेव्हा कुठं हे घर उभं राहिलं.

१९९९मध्ये माझ्या आईच्या आग्रहाखातर माझ्या वडिलांनी मिडल ईस्टमध्ये नोकरी शोधली. तेव्हापासून आता गेली १२ वर्षं ते तिथंच नोकरी करत आहेत. त्यामुळे आर्थिक बाबतीत आयुष्य सुरळीत झालं. माझ्या वडिलांना पैशाचा नीट विनियोग करता येत नसे, मनी

मॅनेजमेंटमध्ये ते अगदीच कच्चे होते. त्यामुळे नंतर वारंवार आई आणि बाबांचे वाद सुरू झाले. त्याची परिणती शेवटी दोघांचा 'व्हर्बल डिव्होर्स' होण्यात झाली. त्यांचा घटस्फोट जरी झाला नसला तरी त्या अर्थानं ते घटस्फोटितच आहेत. या घटस्फोटाचा आम्हा मुलांवर आणि एकूणच कुटुंबावर परिणाम झाला. जरी वडील अधूनमधून घराला आर्थिक मदत करत राहिले तरी एक वडील म्हणून पूर्वी जे नातं होतं, जो जिव्हाळा होता तो राहिला नाही. हळूहळू आम्हा मुलांना वडिलांशिवायच्या आयुष्याची सवय झाली.

मी एका शाळेत दुसरीपर्यंत होतो. तशा त्या शाळेच्या कुठल्याही वाईट आठवणी नाहीत. ती काही अगदी परफेक्ट शाळा नव्हती, पण हेही खरं, की अगदी लक्षात राहावा असा वाईट प्रसंग तिथे माझ्या बाबतीत कधी घडला नाही.

खरी कथा सुरू होते ती माझ्या नव्या शाळेपासून. ती माझ्या आयुष्यातली दुसरी (आणि शेवटची) शाळा होती. शाळा सुरू झाली आणि माझ्या क्लास टीचर मिसेस कॅथरिन यांनी माझी ओळख साऱ्या वर्गाला करून दिली. मिसेस कॅथरिनला मी पहिल्या दिवसापासूनच आवडलो नव्हतो. त्या वयाच्या मुलांकडून सहसा ज्या चुका होतात, त्या चुकांपायी त्या मला अक्षरश: फोडून काढत असत. माझ्या जुन्या शाळेत शिक्षकांनी मुलांना हात लावणंही निषिद्ध होतं. त्यामुळे इथे जेव्हा मला प्रथम फोडून काढण्यात आलं तेव्हा मी अक्षरश: घाबरून गोळा झालो आणि एकदा जे अत्याचार सुरू झाले ते चालूच राहिले. माझा परफॉर्मन्स झपाट्याने खालावला. शाळेतल्या प्रत्येक शिक्षकानं मला वेगवेगळ्या कारणांसाठी बदडून काढलं. त्यांच्या मते मी नुसता मठ्ठच नाही, तर कुठल्यातरी परक्या, घाणेरड्या संस्कृतीमधून (माझ्या जुन्या शाळेच्या संस्कृतीमधून) आलेला मुलगा होतो.

नंतर नंतर तर परिस्थिती अगदीच हाताबाहेर गेली, कारण बायकी हा शब्दही अपुराच पडेल अशी माझी परिस्थिती होती. माझे हातवारे अगदी भरतनाट्यम् वगैरे नृत्य शिकणाऱ्या मुलीप्रमाणे नाजूक

आणि बायकी होते. इतके, की मुलांचं तर राहूच द्या, ते मुलींनाही बायकी वाटत! पण मी कधी स्वत:ला आरशात जाणीवपूर्वक बघून, निरीक्षण करून त्याची खातरजमा करून घेतली नाही, त्यामुळे मला तसं फारसं कधी वाटलं नाही. मुलं मात्र मला सारखी छळायला लागली. दिवसाच्या कोणत्याही वेळी, कोणाच्याही मनाला येईल तेव्हा मला धक्काबुक्की करणं, मारणं, इकडेतिकडे बडवाबडवी करणं, हे सर्वांचे आवडीचे उद्योग होऊन बसले.

शाळेच्या ग्राउंडवर खेळल्या जाणाऱ्या साऱ्या खेळांमध्ये मला जाणीवपूर्वक खड्यासारखं वगळलं जाई. मला अजूनही आठवतं, मी ४०० मीटर धावण्याच्या रेसमध्ये भाग घेतला होता आणि कदाचित माझे सगळे राहू-केतू त्या दिवशी दुसरीकडे कुठेतरी व्यस्त होते की काय नकळे; पण मी त्या स्पर्धेत भाग घेतला अगदी शेवटच्या क्षणी.... आणि मी जिंकलो! सगळ्या प्रेक्षकांनी आपापल्या मित्रांसाठी जोरदार दंगा केला, माझ्यासाठी चिअर करणारे, दंगा करणारे कोणीही नव्हते. त्या नंतर जेव्हा मी वर्गात शिरलो तेव्हा मात्र 'एक छक्का है रेड हाऊस की शान' असं कोरसमध्ये तालासुरात गाऊन माझं स्वागत करण्यात आलं. मी आत पार हाललो, अपमानानं पूर्ण खच्ची झालो, घाबरलो. माझा आत्मविश्वास पूर्ण खच्ची झाला.

मी संपूर्ण शाळेत परका समजला जाई. कित्येक दिवस मला शाळेत एकही मित्र नव्हता. एक-दोन मित्र कसेतरी झाले. शाळा संपेपर्यंत मला तेवढेच मित्र होते. मी जसा होतो तसा मला स्वीकारून त्यांच्यात घ्यायला मुलं तयार नव्हती. मी माझा डबा कुठेतरी एकटाच तोंड लपवून खात असे... शाळेच्या ग्राउंडच्या कुठल्यातरी लांबच्या कोपऱ्यात मोठ्यात मोठं झाड हुडकून त्याच्या आड दडून मी एकटाच बसून डबा खात असे. तिथे मला जरा सुरक्षित वाटायचं. इथे येऊन तरी मला कुणी त्रास देऊ शकणार नाही असं माझ्या वेड्या मनाला वाटत असे. पण तो आनंद अगदी तात्पुरता, अगदी क्षणभंगुर असे. सुट्टी संपल्याच्या घंटेच्या आवाजाबरोबरच ती नकली, भासमान सुरक्षितता

क्षणात विरून जाई. हे दिवस कधी सरतील असं हजारदा मनात आलं, पण हे सारं असंच महिनोन्‌महिने अखंड चालत राहिलं.

या काळात मला मुली व मुलं आवडत असत, पण मुली आवडत असत त्या त्यांच्या सुंदर केसांमुळे. त्यांच्याकडे मी इतर मुले बघत त्या नजरेनं बघत नसे. खेळकरपणा, खोड्या काढणे हे असले माझे उद्योग त्यांच्याबरोबर चालत असत, पण शारीरिक आकर्षण नव्हतं. पण एकदा, मला वाटतं ९वीत असताना मी आपला धीर गोळा करून एका मुलीला 'आय लव्ह यू' बोललो. तिचा बॉयफ्रेंड दुसऱ्या वर्गात शिकत असे. त्याला हा आगावूपणा आवडला नाही. तिनंही माझं प्रपोजल हसण्यावारी नेलं. नंतर तिच्या बॉयफ्रेंडनं मला ग्राउंडवर माझ्या मित्रांसमोर, माझ्या क्लासमेट्ससमोर धक्काबुक्की केली. हा माझ्या संपूर्ण शालेय आयुष्यातला सगळ्यात लाजिरवाणा प्रसंग होता. हा अपमान आता इतकी वर्षं झाली, तरी मनात तेवढाच आणि तसाच ताजा आहे. अजूनही तो प्रसंग आठवला, की जखमेवरची खपली काढावी तसा हा अपमान भळाभळा वाहू लागतो.

दहावीच्या सुमारास मला मुलांमध्ये इंटरेस्ट असल्याचं कळू लागलं. हळूहळू हे नक्की होत गेलं, की स्कर्ट्सपेक्षा मला शॉर्ट्समध्ये जास्त इंटरेस्ट होता आणि स्कर्ट्समध्ये लपलेल्या बायकी गुळगुळीत मांड्यांपेक्षा शॉर्ट्समधल्या पुरुषी पिळदार मांड्यांचं मला आकर्षण वाटू लागलं.

दहावीच्या सुट्टीपर्यंत माझे 'फेमिनाइन' हावभाव माझ्या भावाच्याही लक्षात येऊ लागले. त्यानं ते बदलायचा प्रयत्न केला आणि त्याचा बऱ्यापैकी उपयोगही झाला. उदा., मी लपाछपी, लंगडी, काचपाणी असे बऱ्यापैकी बायकी खेळ खेळत असे. त्याने जबरदस्तीने मला त्याच्या मित्रांबरोबर फुटबॉल, क्रिकेट वगैरे खेळायला न्यायला सुरुवात केली. अशा बऱ्याच गोष्टी.

दहावीनंतर चित्र बदललं. माझ्या 'मॅन-हार्मोन्स'नी माझ्यामध्ये एक क्रांतीच घडवून आणली! माझं बोलणं, चालणं, उभं राहणं सगळंच

पूर्णपणे बदललं. मस्त वाटू लागलं! आता मी इतर मुलांसारखाच होतो- थोडासा खोडकर आणि खेळकर, विशेषत: मुलींशी! अकरावी-बारावी मस्त गेली. मी मुलांमध्ये एकदम हिट होतो. मुलींमध्ये तसा काही प्रसिद्ध नव्हतो, पण हू केअर्स? सगळी मुलं ज्या मुलीच्यामागे हात धुऊन लागली होती, तिलाच मी कॉलेजमध्ये पटवली. साहजिकच सगळ्या मुलांनी मला शिव्या घातल्या. साला तेरेको कैसे पट गई? (पण, लवकरच तिच्याशी ब्रेक-अपही झालं. तिला शारीरिक जवळीक हवी होती आणि मला तेच नेमकं नको होतं आणि तिला तेवढं कारण ब्रेक-अप करायला पुरेसं होतं.) तो जुना बायकीपणा कधीच नाहीसा झाला होता आणि मी या नव्या 'मला' मस्त एन्जॉय करत होतो. आजवर माझ्या शाळेतल्या किंवा कॉलेजमधल्या कोणालाही मी गे असेन अशी कल्पनाही नाही! अगदी माझ्या कॉलेजमधल्या जिवाभावाच्या मित्रांनादेखील.

दरम्यानच्या काळात मी मार्शल आर्ट्सकडे आकर्षित झालो. माझ्या बालपणीचा वाईट काळ लक्षात घेता खरंतर हे आकर्षण मार्शल आर्ट्समधून मिळणाऱ्या स्वसंरक्षणाचं होतं. कालांतराने मला पहिलं सुवर्ण पदक मिळालं आणि त्यामुळे आजतागायत माझी ओळख राष्ट्रीय पातळीवरचा 'इशीनीयू कराटे'मधला 'गोल्ड मेडॅलिस्ट' अशी आहे.

पुढच्या वर्षी पुन्हा गोल्ड मेडल मिळवायचं लक्ष्य समोर ठेवून ॲन्युअल टुर्नामेंटमध्ये उतरण्याचा माझा विचार आहे, पण तसं असलं तरीही त्या यशाच्या मागे न धावता मार्शल आर्ट एक कला म्हणून जितकं शिकता येईल, तेवढं शिकणं माझ्यासाठी महत्त्वाचं आहे. फिल्डमध्ये एकाग्रतेनं कराटे परफॉर्म करताना कोणतेही सेक्शुॲलिटीशी संबंधित विचार मनाला शिवतही नाहीत. तिथं फक्त मी आणि माझे कराटे असते.

मला एव्हाना हे कळालेलं आहे, की गे असण्या पलीकडेही बऱ्याच गोष्टी आहेत. सेक्शुअल ओरिएन्टेशनच्या प्रश्नामध्ये अडकून न पडता इतर (जसं मी कराटेमध्ये प्रावीण्य मिळवलं) गोष्टींमध्येही प्रत्येकानं स्वत:ला अजमावून पाहायला हवं. कारण दोन पुरुषांमधील

प्रेम, शारीरिक आकर्षण यांच्या पलीकडे या गोष्टी, एक माणूस म्हणून तुम्हाला नेतात.

या काळात मला इंटरनेटवर 'डेटिंग साइट्स' सापडल्या आणि त्यावर भेटणाऱ्या कॉलेजबाहेरच्या मुलांशी 'डेट' करायला मी सुरुवात केली. काही वेळा मी अनप्रोटेक्टेड (कंडोमशिवाय) सेक्सही करून पाहिला. आता कळलं, की ती फार मोठी रिस्क आहे आणि अनप्रोटेक्टेड सेक्स करणं चुकीचंच होतं, पण त्या क्षणाच्या उन्मादात स्वत:वर ताबा नव्हता. आता मी ती रिस्क कधीही घेत नाही.

काही दिवसांपूर्वी मी एका मुलाच्या प्रेमात पडलो. हा मुलगा म्हणजे माझ्या एका मित्राचा मित्र. एक वर्षापूर्वी तो मला भेटला. एखादी कॉफी भेट, मग त्यातून अनेक कॉफी भेटी आणि कधीतरी जबरदस्त पॅशनेट असा सेक्सही झाला. शेवटी मी त्याच्या प्रेमात पडलो. कसला क्यूट आहे तो! वेल, माझी क्यूट या शब्दाची व्याख्या बहुधा चुकीची असावी. कारण या पृथ्वीतलावरच्या दुसऱ्या कोणालाही तो क्यूट वगैरे वाटणं केवळ अशक्यच आहे. आता तो माझा बेस्ट फ्रेंडही झाला आहे आणि तोही माझ्या प्रेमात पडला आहे.

पण.. !! हा 'पण' जिथं तिथं असतोच! त्याच्याबरोबर असलेली रिलेशनशिप थोडीशी नाजूक गुंतागुंत असलेली आहे. कित्येक वर्षं आधीपासून त्याला बॉयफ्रेंड आहे. (त्याचा बॉयफ्रेंड अमेरिकेमध्ये असतो.) तरीही मी त्याच्या प्रेमात पडलो आणि कालांतराने तोही माझ्या प्रेमात पडला. त्यामुळे आता त्याला दोन बॉयफ्रेंड आहेत. मी आणि त्याचा दुसरा बॉयफ्रेंड. दोघांनाही एकमेकांची व्यवस्थित माहिती आहे. त्यामुळे हा एक प्रकारचा प्रेमाचा त्रिकोण झालेला आहे. तर अशी सर्व वाट लागली आहे. कधी कधी काय होईल याचा विचार करून करून मेंदूचा भुगा होतो. असा एकही दिवस जात नाही, ज्या दिवशी माझ्या डोक्यात या नातेसंबंधांच्या गुंतागुंतीचा विचार येत नाही. अनेक दुखवणाऱ्या घटना घडतात. माझा पार इमोशनल ब्रेकडाउन होतो, पण मग गोष्टी पुन्हा सुरळीत होतात..... आणि पुन्हा

काही मोडतोड होते .....

नुकतच आईला मी गे असल्याचं सांगितलं आहे.

दोन वर्षांपूर्वी आईला कॅन्सर झाल्याचं निदान झालं. तो कुटुंबाला एक मोठा धक्काच होता. तिचं ब्रेस्ट कॅन्सरचं ऑपरेशन केलं गेलं. तिला केमोथेरपी घेण्याचा सल्ला देण्यात आला. मी पुरता घाबरलो. कारण तेव्हा थोरला भाऊ आणि वडील दोघेही परदेशात होते. कॅन्सरच्या उपचाराची सारी जबाबदारी मीच पार पाडली. त्यानंतर अगदी सहा महिन्यांपूर्वीपर्यंत सर्व काही व्यवस्थित मार्गाला लागलं आहे असं वाटत असताना तिचं पुन्हा एकदा कॅन्सरचं निदान झालं. आम्ही तिच्या कॅन्सरच्या तपासणीसाठी केरळला गेलो. केरळ राज्य आयुर्वेदिक उपचारांसाठी प्रसिद्ध आहे.

मी आणि माझा बॉयफ्रेंड केरळला असताना मी नक्की केलं, की आईला आता सांगायचं. तिला माझ्याबद्दल सांगायची जाम भीती वाटत होती. मला या निर्णयापर्यंत येण्यासाठी मानसिक आधार देण्यास माझा बॉयफ्रेंड पुढे होता. कसं सांगायचं याचा नीट प्लॅन वगैरे केला नव्हता. मी आणि आई दोघं संध्याकाळी फिरायला गेलो, तेव्हा तिला मी गे असल्याचं सांगितलं. तिला चांगलाच धक्का बसला. मी गे आहे, या गोष्टीवर तिचा प्रथम तर विश्वासच बसला नाही, पण आता ते सत्य ती हळूहळू स्वीकारू लागली आहे. अजून मी माझ्या वडिलांना सांगितलेलं नाही.

आईचे मला बरा करण्याचे प्रयत्न चालू आहेत. कुठल्याही आया सुरुवातीला हे करतातच. वेळ लागेल, पण मला खात्री आहे, की ती मला मी आहे तसा स्वीकारेल आणि माझी त्यासाठी वाट पाहण्याची तयारीही आहे! आईला मी माझ्या गे असल्याबद्दल सांगितल्यामुळे एक मोठं ओझं मनावरून उतरलं आहे. यथावकाश ती माझ्या आयुष्यातील माझ्या जोडीदाराचाही स्वीकार करेल अशी आशा मी धरून आहे.

*****

## उमेश (परभणी)

परभणी जिल्ह्यामध्ये छोटंसं गाव. त्या गावाची लोकसंख्या जेमतेम ३००० ते ३५०० एवढी. त्या गावात माझा जन्म झाला. मला पाच बहिणी आणि दोन भावंडं. सर्व मिळून सात भावंडं. माझं बालपण खूप चांगल्या प्रकारे गेलं. माझे खूप लाड झाले.

पुढे घरच्यांनी मला शाळेसाठी गावात आजीआजोबांकडे ठेवलं आणि आईवडील पोटाची खळगी भरण्यासाठी बाहेरगावी गेले. आजीने मला व आजोबांना सांभाळलं. आजीआजोबांनी मला कधी आईवडिलांची कमतरता भासू दिली नाही. माझे आजीआजोबा हे कडक शिस्तीचे होते. त्यांनी माझ्यावर खूप चांगले संस्कार केले. मीही त्यांना सोडून जात नसे.

लाडाचा म्हणून शाळेत उशिरा घातलं. शाळेत एका शिक्षकाचा मार पाहून शाळेत जाण्यास भीती वाटायची. त्या सरांच्या भीतीने मी खूप रडत असे. ते कडक शिस्तीचे होते, पण हळूहळू त्याच शिक्षकाने मला शाळेची गोडी लावली. वर्गामध्ये पाच ते सहा मुलं हुशार होती. त्यामध्ये मीही होतो. शिकून आपणही कोठेतरी नोकरी करावी ही इच्छा उराशी बाळगून होतो.

एकदा माझा मित्र आणि मी परीक्षेच्या काळात अभ्यासाला म्हणून त्याच्या घरी गेलो. तिथे आमचे चाळे झाले. दुसऱ्या दिवशी त्यानं वर्गामधील त्याच्या मित्राला हे सांगितलं व त्यानं मला खिजवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मला कळलं, की पुरुष लोक बेइमान असतात. त्यांच्या थापांना, त्यांच्या गोड बोलण्याने जसा गूळ पाघळतो त्याप्रमाणे एमएसएम त्यांच्या आवडत्या मित्राशी बोलताना पाघळतात. त्यांच्या बोलण्यात गुरफटून जातात. जो आनंद आपल्याला समलैंगिक संबंध

करताना मिळतो तोच आनंद त्या समोरच्या व्यक्तीला मिळतो, पण मग असं का? त्यावेळी आपली बाजू कमकुवत होते. त्याची बाजू भक्कम होते. त्याला कामही साध्य करायचं असतं आणि इतरांना तो मर्द आहे असंही दाखवायचं असतं, म्हणून तो एमएसएमना तुच्छ लेखतो, त्यांचा अपमान करतो, चारचौघांत त्यांची खिल्ली उडवतो. हे बघून मला खूप त्रास झाला.

कालांतराने पुढील शिक्षणासाठी परभणी शहरात जावं लागलं. मला डी.एड. करण्याची खूप इच्छा होती, पण दुर्दैवाने त्यावेळी बारावीच्या परीक्षेत मला जेवढी अपेक्षा होती तेवढे मार्क्स मिळाले नाहीत. त्यामुळे मामांनी मला आयटीआयला प्रवेश घेण्यासाठी सांगितलं. प्रवेश इलेक्ट्रिशियन या ट्रेडला घेतला. रूमवर राहायचो. शिकता शिकता हॉटेलमध्ये ६०० रुपये पगारावर काम करायचो. त्यात रूम खर्च आणि शिक्षणाचा खर्च भागवावा लागत असे.

हॉटेल लाइनमध्ये असताना एका एमएसएमची ओळख झाली. त्याच्याकडून इतर एमएसएमची ओळख झाली. एमएसएम कुठे जमतात, त्या जागाही माहीत झाल्या. काही काळ परभणीच्या 'मुक्ता' प्रकल्पात काम केलं.

या काळात अचानक वडील घर सोडून गेले. आम्हाला वाटलं इतर पाहुण्यांकडे गेले असतील. सर्व पाहुण्यांकडे चौकशी केली, पोलिस स्टेशनला कळवलं तरीही त्यांचा पत्ता लागला नाही. कोठे आहेत ते देव जाणे!

काही दिवसांपूर्वी अचानक आईची तब्येत बिघडली. तिला हार्ट प्रॉब्लेम झाला. त्या दिवशी मी घरात नव्हतो. दवाखान्यात न्यायला खेड्यामध्ये गाडी मिळेना. माझ्या चुलत भावाने आईला दवाखान्यात नेलं. १० ते १२ दिवस आई दवाखान्यात ॲडमिट होती. मामा चांगल्या नोकरीला असल्यामुळे त्यांनी पैशाची मदत केली व बहिणीने पण मदत

केली. आता तिची तब्येत चांगली आहे. माझ्या आईला भरपूर आयुष्य लाभो हीच ईश्वराकडे माझी प्रार्थना!

शिक्षण झाल्यावर आईनं लग्नासंबंधी विचारलं. तेव्हा मी म्हाणलो, ''मला जोपर्यंत जॉब लागत नाही तोपर्यंत लग्न करणार नाही.'' बाहेरचे लोक या गोष्टीविषयी खूप आत्मीयता दाखवतात. त्यांना काय सांगायचं? माझं लग्नाचं वय आहे. माझ्या बरोबरीच्या मुलांची लग्नं झाली. त्यांना मुलंही झाली.

त्यात अजून एक समस्या आहे. मला एचआयव्हीची लागण झाली आहे. माझा एचआयव्ही रिपोर्ट रिॲक्टिव्ह असल्याचे घरच्यांना माहीत नाही. मला वाटतं लग्न करून आपल्यामुळे दुसऱ्याच्या जीवनाचे वाटोळे होऊ नये. आईचा लग्नाचा हट्ट चालू आहे. एकदा ती म्हणाली, ''तुला कोठेतरी दाखवावं लागेल.'' मी म्हटलं, ''मला कोठेही दाखवण्याची गरज नाही. मला लग्न नाही करायचं.'' कधी कधीतर हे जीवन नकोसं वाटतं, पण काय करणार? आहे त्या परिस्थितीशी तोंड द्यावं लागतं.

या सर्व अनुभवांमुळे मी आणि काही इतर एमएसएमनी एक संस्था सुरू करायचं ठरवलं. आम्ही एमएसएम व एचआयव्ही रिॲक्टिव्ह एमएसएमबद्दलची परिस्थिती जाणतो. आमच्या बॉडीतील काहीजण एचआयव्ही रिॲक्टिव्ह आहेत. आमच्या समाजासाठी काम करण्याच्या अनुषंगाने हा ट्रस्ट स्थापन केला आहे. आमच्या संस्थेचे नाव आहे 'द लाइट ऑफ एशिया सोशिओ ट्रस्ट, परभणी'.

*****

# आतिश (पुणे)

माझं नाव आतिश. मी एक मध्यमवर्गीय कुटुंबातला. वडील, आई आणि लहान बहीण असा आमचा परिवार.

आई ९६कुळी मराठा आणि नाना बौद्ध. दोघांचा प्रेमविवाह होता. त्यामुळे त्या दोघांनी वेगळा संसार थाटला होता. प्रेमविवाह असूनही आई व नानांची नेहमी छोट्या छोट्या कारणांवरून भांडणे होत. त्या भांडणांमध्ये स्नेहा (माझी बहीण) आणि मी सापडायचो. या भांडणांचा माझ्या मनावर खूप परिणाम होत होता. मला नानांचा खूप राग यायचा. अधूनमधून मात्र आनंदी वातावरण असायचं.

लहानपणी मला मुलींबरोबरच खेळायला, बोलायला आवडत असे. मुलींबरोबर लपंडाव, खोखो, लंगडी-पाणी, भांडीकुंडी हेच खेळ खेळायला मला आवडायचे. कधी कधी मला मुलींचे कपडे घालायची इच्छा व्हायची.

शाळेतलं वातावरण मला आवडायचं. आई मला आणि स्नेहाला रोज सकाळी शाळेत सोडून कामाला जायची. शाळेतून घरी आल्यावर मी व स्नेहा दोघंही घरातली सर्व कामं करत असू. उदा., झाडू मारणं, भांडी घासणं इत्यादी.

मी ९ वर्षांचा असतानाची गोष्ट- एके शनिवारी मी चुलत्याकडे राहायला गेलो होतो. माझा आतेभाऊ प्रतीक आणि मी घरात पलंगावर बसून टीव्हीवर कार्टून बघत बसलो होतो. काही वेळ निघून गेला. त्याने माझ्या अंगाला स्पर्श केला. तो स्पर्श वेगळाच होता. आजही चांगला आठवतो. नंतर त्यानं मला मुखमैथुन करायला लावलं. मला ते घाण वाटलं. मी त्याला नकार दिला, पण त्यानं जबरदस्तीनं मला करायला लावलं आणि नंतर धमकीच्या स्वरात मला म्हणाला, ''कोणाला काही

सांगू नकोस, सांगितलं तर मी तुला खूप मारेन." मी खूप घाबरलो. म्हणून मी कुणालाच हे सांगितलं नाही. साधारण ३-४ वर्षं मधूनअधून हे चालू राहिलं.

शाळेत मी खूप रमायचो, अभ्यासातही चांगला होतो. मी शाळेत खूप मित्र बनवले. शिक्षकही खूप चांगले होते. मी आठवी ते दहावी या तीनही वर्षी वर्गाचा मॉनिटर म्हणून निवडला गेलो.

आठवीत असताना माझी निवड शाळेतील खो-खो टीममध्ये झाली. मी लहानपणापासून खो-खो खूप चांगला खेळायचो. टीममध्ये निवड झाल्यानंतर माझा प्रॅक्टिसचा पहिला दिवस होता. माझ्या सरांनी प्रॅक्टिससाठी कपडे बदलून यायला सांगितलं. मी कधीच बनियनवर खो-खो खेळलो नव्हतो पण त्यांनी बनियन आणि खाली छोटी चड्डी घालायला सांगितलं होतं. मला खूप लाज वाटत होती. मला फक्त बनियन घालायला आवडत नसे. शेवटी मी खो-खोच्या टीममधून स्वत:हून बाहेर पडलो. सरांनी मला खूप प्रोत्साहन दिलं, की तू खूप चांगला खो-खो खेळतोस, तू खेळ. पण त्यांना मी नकार दिला, कारण मुलांबरोबर अर्धनग्न कसं खेळायचं?

माझ्या वर्गात एक मुलगा होता. गोरापान, गोल चेहरा, गुबगुबीत गाल, मोठे डोळे, सतत हसरा चेहरा, त्याचं नाव अजिंक्य. अजिंक्य वर्गातील सर्वांत आकर्षक मुलगा होता. माझं त्याच्याकडे सतत लक्ष जायचं. शाळेत अजिंक्यबरोबर वेळ घालवायला मला आवडत असे. आम्ही दोघंही एकाच ट्यूशनला होतो. मी सकाळी ट्यूशनला लवकर पोहोचायचो आणि त्याची वाट बघत ट्यूशनबाहेर थांबायचो. तो दिसला, की मला खूप आनंद होत असे.

दुसरीकडे मला हळूहळू प्रतीक आवडू लागला. आम्ही दर रविवारी बाहेर भेटायचो. प्रतीकच्या टू-व्हीलरवरून लांब फिरायला जायचो. मजा करायचो, सेक्स करायचो. ही तीन वर्षं माझ्या

आयुष्यातली सर्वांत सुंदर आणि सुखी वर्षं होती.

दहावीत ६५% गुण मिळाले. अजिंक्य ज्या कॉलेजमध्ये जाणार होता, मला त्याच कॉलेजमध्ये जायचं असा मी हट्ट धरला. शेवटी अजिंक्य आणि मी एकाच कॉलेजमध्ये ११वी सायन्सला ॲडमिशन घेतली.

कॉलेज चालू झालं. नानांनी मला नवीन सायकल घेऊन दिली. घरचं वातावरण नेहमीप्रमाणे कधी चांगलं तर कधी आई-नानांची भांडणं असं होतं. सायन्सचं क्षेत्र खूप अवघड जात होतं.

कॉलेजमधील माझे मित्र मुलींबद्दल बोलायचे, मुलींकडे बघायचे, म्हणायचे- ''ती मुलगी सुंदर दिसते. ती खूप सेक्सी आहे. तिची फिगर काय मस्त आहे.'' अशा प्रकारच्या चर्चा चालायच्या. मला मुलींकडे बघायला आणि त्यांच्याविषयी बोलायला कधीच आवडलं नाही. मला मुली का आवडत नाहीत? माझं इतर मुलांसारखं मुलींकडे लक्ष का जात नाही? माझं लक्ष फक्त मुलांकडेच का जातं? प्रतीक आणि अजिंक्य मला का आवडतात? माझा मेंदू आता हेच प्रश्न सारखा विचारायचा.

मनाची घुसमट आणि अजिंक्यसाठीची भावनिक जवळीक या सर्वांमुळे माझ्या स्वभावात बदल होत गेला. मी चिडचिडा होत गेलो. कोणाशीही नीट बोलायचो नाही, घरीही नीट वागायचो नाही. लेक्चरमध्ये लक्ष लागायचं नाही, अभ्यासात लक्ष लागायचं नाही. अजिंक्यबरोबरही व्यवस्थित वागायचो नाही. मला नीट आठवत नाही, पण काही कारणामुळे अजिंक्यचं आणि माझं भांडण झालं. आम्ही एकमेकांशी बोलणं बंद केलं. या काळात मी लेक्चरला बसलो तर बसलो, नाही तर नाही. माझं नैराश्य वाढत गेलं.

अजिंक्यशी बोलत नसल्यामुळे आता प्रतीकबरोबर फिरणं वाढलं होतं. माझी भावनिक आणि मानसिक घुसमट होत होती, पण

प्रतीकबरोबर असल्यावर थोडा आनंदी असायचो. आठ महिन्यांनंतर अजिंक्य आणि मी पुन्हा बोलायला लागलो. पुन्हा आमची मैत्री पूर्वीप्रमाणे सुरू झाली.

११वी कसाबसा पास झालो. आता १२वी सायन्स, बोर्डाचं वर्ष. १२वीचं अर्धं वर्ष संपत आलं. माझ्या प्रश्नांच्या उत्तराचा शोध चालू होता. मी कोण आहे? मी हिजडा आहे का? अशा प्रश्नांनी मी वेडा व्हायची वेळ आली. शेवटी खूप विचार करून मी डॉक्टरांना भेटायचं ठरवलं. जवळील मोठ्या दवाखान्यातील मानसोपचारतज्ज्ञ डॉक्टरांना जाऊन भेटलो. डॉक्टरांना सर्व काही सांगितलं. त्यांनी सर्व ऐकून घेतलं व मला म्हणाले, "तू अजून लहान आहेस, तुला काही सांगायच्या अगोदर तू तुझ्या घरच्यांना घेऊन ये." मी आई-नानांना न घेऊन जाता, थोड्या दिवसांनी, माझ्या काकांना घेऊन गेलो, कारण ते शिकलेले नव्हते आणि तसंच, काकांना फारसं काही कळत नव्हतं. या कारणामुळे डॉक्टरांनी काकांना बाहेरच बसण्यास सांगितलं. डॉक्टर मला म्हणाले, "आतिश तू गे आहेस." मला गे या शब्दाचा अर्थ समजला नाही. मी तो डॉक्टरांना विचारला. डॉक्टरांनी सांगितलं "गे म्हणजे समलिंगी व्यक्ती. ज्या पुरुषाला पुरुषांबद्दल आकर्षण आहे अशी व्यक्ती." हे ऐकल्यानंतर मी खूप बेचैन झालो. काका बाहेर असल्यामुळे त्यांना काही कळलं नाही.

मी मानसिकदृष्ट्या अजूनच खचलो. बोर्डाची परीक्षा आली. ती कशी दिली, काही माहीत नाही. दोन महिन्यांनी १२वीचा निकाल लागला. मी तीन विषयांत नापास झालो. आई-नाना, अजिंक्य, प्रतीक आणि इतर मित्रांचा विश्वासच बसला नाही. त्यांना धक्का बसला. नेहमी फर्स्ट क्लास येणारा मी, तीन विषयांत नापास झालो होतो. दिवसेंदिवस माझं नैराश्य वाढत होतं. नापास झाल्यानंतर घरीच होतो. करमत नसे. अजिंक्यने डिप्लोमाला ॲडमिशन घेतली होती. मी मात्र आता एकटाच होतो.

मी नापास झाल्यामुळे, घरी आई-नानांचे सारखे टोमणे ऐकावे लागत, म्हणून घरी न बसता मी एका ठिकाणी कामाला लागलो. या काळात मला एका मुतारीपाशी एक समलिंगी पुरुष भेटला. हळूहळू अशा बऱ्याच जणांबरोबर ओळख झाली. त्यातील काही खूप चांगले मित्र बनले. मला माझ्यासारख्या व्यक्तींबरोबर वेळ घालवायला आवडू लागलं. काही महिन्यांनी त्या जागी आमचा एक मोठा ग्रुप तयार झाला. जवळजवळ २०-२५ गे पुरुषांचा समूह. कामावरून आलो, की त्यांच्याबरोबर रात्री १२ काय, १ काय टाइमपास करायचो. हळूहळू मी मानसिकदृष्ट्या स्थिर झालो. माझ्यासारखीही मुलं असतात, हे कळलं.

दरवर्षी दसऱ्याच्या वेळी आमच्या चाळीत गरबा खेळला जायचा. आमच्या शेजारील काकूंकडे त्यांची भाची राजश्री राहायला आली होती. गरब्याचे दिवस चालू झाले. मी चाळीत सर्वांबरोबर दांड्या खेळायचो. राजश्रीसुद्धा गरबा खेळायला यायची. ती मला येता-जाता, तसंच दांड्या खेळताना बघायची. शेवटी तिची, माझी चांगली ओळख झाली. आम्ही दोघे एकमेकांसोबत बोलू लागलो. दसऱ्याच्या शेवटच्या दिवशी राजश्री मला म्हणाली, ''आतिश मला तू खूप आवडतोस. आय लव्ह यू!'' राजश्री खूप सुंदर मुलगी होती. तिचा स्वभावही खूप चांगला होता. ती माझ्यावर प्रेम करत होती. मला वाटे, मी राजश्रीची फसवणूक करतोय. तिला माहीत नव्हतं, की मी गे आहे. तिला कळेल याची मला खूप भीती वाटायची.

मी दिवसभर कामावर जायचो. कामावरून आल्यावर गे मित्रांबरोबर मौज मस्ती करायचो. सुट्टीच्या दिवशी राजश्रीबरोबर फिरायला जायचो. तिच्याबरोबर लॉजवर जायचो. तिच्याबरोबर सेक्स करायचो. कधी कधी प्रतीकलाही भेटायचो व त्याच्याबरोबर '69' करायचो. अजिंक्यबरोबर एक मित्र म्हणून खूप फिरायचो.

मी कमवायचो आणि सगळे पैसे बाहेर उडवायचो. अगदी थोडी

बचत करायचो. पुढे सिगारेट ओढू लागलो, मित्रांबरोबर पार्टीमध्ये बिअर घ्यायला लागलो. बघता बघता दिवस जात होते. राहिलेले बारावीचे पेपर दिले. दोन विषयात पास झालो. एक विषय राहिला.

स्नेहाला नुकतंच १८वं वर्ष लागलं होतं. तीही १०वी नापास झाल्यामुळे घरीच होती. आई-नानांनी स्नेहासाठी एक मुलगा बघितला. तिच्यापेक्षा १० वर्षांनी मोठा होता. त्याची नोकरीही चांगली नव्हती. तरीही आई-नानांनी स्नेहाचं लग्न जमवलं. माझा लग्नाला नकार होता कारण स्नेहाचं १८ वर्ष पूर्ण नव्हतं, पण आई-नानांनी माझं ऐकलं नाही. ऐकणार तरी का? कारण मीच उनाड आणि टुकार झालो होतो. स्नेहाचा साखरपुडा झाला, पण काही महिन्यांनी त्याचं लग्न मोडलं. ज्या मुलाबरोबर लग्न ठरलं होतं तो मुलगा दुसऱ्या मुलीवर प्रेम करत होता आणि त्याने त्या मुलीबरोबर पळून जाऊन लग्न केलं. आई-नाना व स्नेहानी माझ्यावरच आरोप केला, की मीच काहीतरी केलं आणि माझ्यामुळेच हे लग्न मोडलं. माझं आणि घरच्यांमधलं अंतर अजूनच वाढलं.

बारावीचा राहिलेला पेपर दिला. पास झालो. साधारण दीड वर्षं काम केल्यावर थोडे पैसे साठले. नानांनी थोडे पैसे दिले आणि शेवटी डिप्लोमाला ॲडमिशन घेतली. कॉलेजला व्यवस्थित जाऊ लागलो. कॉलेजवरून घरी आणि घरून परत गे मित्रांबरोबर वेळ घालवायचो. या काळात राजश्री आणि माझ्यामध्ये छोट्या छोट्या कारणांवरून सतत वाद होऊ लागले. मला राजश्रीचा सहवास नको वाटत होता.

एके दिवशी कॉलेज सुटल्यावर मी व प्रतीक एका हॉटेलमध्ये कोल्ड कॉफी प्यायला गेलो. थोड्या वेळानं प्रतीक मला म्हणाला, ''तुला काहीतरी सांगायचंय.'' मी म्हणालो, ''काय? सांग.'' प्रतीक म्हणाला, ''माझ्या मम्मी-पप्पांनी माझ्या लग्नासाठी एक मुलगी बघितलीय.'' हे वाक्य ऐकून माझं मन कासावीस झालं. पुढे मी

विचारलं, ''कुठलं स्थळ आणि कोणती मुलगी?'' प्रतीक म्हणाला, ''तुझी बहीण स्नेहा''. हे ऐकल्यावर मी अवाक झालो. मी म्हणालो, ''काय?'' तो म्हणाला, ''हो, मम्मी-पप्पा येत्या रविवारी तुझ्या घरी स्नेहाचा हात आई-नानांना मागायला येणार आहेत.'' मी म्हणालो, ''पण प्रतीक हे कसं शक्य आहे, तू माझ्या बहिणीबरोबर लग्न करू शकत नाहीस.'' तो म्हणाला, ''तू म्हणतोस ते बरोबर आहे, पण मी मम्मी-पप्पांच्या विरोधात जाऊ शकत नाही आणि मी याबाबत काहीच करू शकत नाही.'' जेव्हा प्रतीक हे बोलला, तेव्हा माझं डोकं फिरलं आणि मी त्याला खूप शिव्या देऊन निघून गेलो.

रविवारी प्रतीक आणि त्याचे मम्मी-पप्पा घरी आले. आई-नानांबरोबर त्यांचं बोलणं झालं. त्या दिवशी मी घरी थांबलो नाही. घराबाहेर पडलो आणि एका गार्डनमध्ये जाऊन दिवसभर एकटाच रडत बसलो. प्रतीक आणि माझ्या नात्याबद्दल आई-नानांना काय सांगू? माझ्या मेंदूवर जबरदस्त ताण आला होता. त्या दिवशी संध्याकाळी घरी आलो. मी आई-नानांना सांगितलं, ''स्नेहाचं लग्न प्रतीकबरोबर नका ठरवू.'' पण त्यांनी माझं नाही ऐकलं. ते म्हणाले, ''मागच्या वेळी स्नेहाचं लग्न तू मोडलं होतंस. आता जर काही केलंस तर खूप वाईट होईल.'' शेवटी मी गप्प बसलो.

साखरपुड्याची तारीख ठरली. मी पूर्णपणे खचलो होतो. साखरपुड्याचा दिवस जवळ येत होता. कॉलेजला जाण्यासाठी सकाळी बॅग घ्यायचो, पण कॉलेजला न जाता कॉलेजजवळील एका नदीकिनारी, सकाळपासून संध्याकाळपर्यंत एकटाच विचार करत बसायचो. नदीत उडी मारून जीव द्यावा असे विचार यायचे. मग स्वत:ला सावरायचो. जवळजवळ दीड महिना मी कॉलेजला न जाता नदीकिनारी बसायचो.

शेवटी साखरपुड्याचा दिवस आला. सर्व पाहुणे घरी आले होते. मी नटूनथटून, नवीन कपडे घालून, परफ्युम मारून, ओठांवर खोटं हास्य

ठेवून तयार झालो. मला प्रतीकचं तोंडही बघायची इच्छा नव्हती. त्या दिवशी मला खूप त्रास झाला. साखरपुडा पार पडला. दोन महिन्यांनंतर लग्नाची तारीख होती.

मी कॉलेजला जात नाही म्हणून मला कॉलेजमधून नोटीस आली. परीक्षेस बसण्यास मला परवानगी मिळाली नव्हती. नोटीस बघितल्यावर आई-नाना अजूनच चिडले. आता ते माझ्याशी बोलतच नव्हते. दुसरीकडे राजश्रीबरोबरही पटत नव्हतं. आमची सारखी भांडणं होत होती.

लग्नाचा दिवस उजाडला. प्रतीककडे बघणंही मला होत नव्हतं. राग, चिड, क्रोध, द्वेष, मत्सर या सर्व भावना एकाच वेळी माझ्या मनात उफाळून वर येत होत्या. तो दिवस मी कधीच विसरू शकत नाही. सर्व पाहुणे, अजिंक्य, माझे गे मित्र लग्नाला आले होते. लग्न पार पडलं.

यानंतर मी राजश्रीला सोडण्याचा निर्णय घेतला. तिचे फोन उचलणं बंद केलं. एके दिवशी ती मला घरी भेटायला आली. मी तिच्याबरोबर बाहेर गेलो, आणि तिला बोललो, "राजश्री आपलं नातं आता टिकू शकत नाही." या गोष्टीवरून ती माझ्याशी खूप भांडली आणि निघून गेली.

मला नैराश्यानं ग्रासलं. प्रतीकबरोबर घालवलेले ते सर्व दिवस आठवत होते. सतत डोळ्यांसमोर सर्व चित्र उभं राहत होतं. मन लागत नव्हतं. झोप लागत नव्हती. शेवटी मी एका मानसोपचारतज्ज्ञाची अपॉइन्टमेंट घेतली. मी नैराश्यावरची औषधं घेऊ लागलो. काही महिन्यांनी मला जरा बरं वाटू लागलं.

प्रतीकचं लग्न झाल्यानंतर मी त्याच्या घरी जाणं टाळलं. स्नेहा व प्रतीक घरी आले तरी मी घराबाहेर निघून जायचो. मी माझा जवळपास सर्व वेळ माझ्या गे मित्रांबरोबर घालवू लागलो.

काही दिवसांनी माझ्या एका गे मित्राकडून मला 'समपथिक

ट्रस्ट'ची माहिती मिळाली. तो तिथे नुकताच कामाला लागला होता. काही दिवसांनी मीसुद्धा 'समपथिक ट्रस्ट'मध्ये कामाला लागलो.

इकडे अजिंक्यवरचं ! म वाढत चाललं होतं, पण त्याला कसं सांगू? कधी सांगू? काय सांगू? असं वाटायचं. शेवटी ठरवलं, की माझ्या मनात त्याच्याविषयी काय भावना आहेत ते सर्व त्याला सांगावं. मी अजिंक्यला माझ्या घराजवळील गार्डनमध्ये भेटलो. मी थरथर कापत होतो. अजिंक्य म्हणाला, ''कारे, इतका का थरथर कापतोयस?'' मी म्हणालो, ''अजिंक्य, मला तुला काहीतरी सांगायचं आहे, पण वचन दे, सर्व ऐकल्यानंतरही, आपली मैत्री गेली १० वर्षं जशी आहे तशीच राहील''. तो म्हणाला, ''उगीचच काहीपण बक्रास करू नको. काय ते सांग.'' मी त्याला म्हणालो, ''अजिंक्य मी गे आहे आणि मी तुझ्यावर खूप प्रेम करतो.'' हे सांगताना मला त्याच्या चेहऱ्याकडे बघायला खूप भीती वाटत होती. तो क्षणभर गप्प बसला, मग म्हणाला, ''आतिश मला माहीत आहे, की तू गे आहेस आणि माझ्यावर प्रेम करतोस ते. पण आपलं फक्त मैत्रीचंच नातं राहिल. हे तू समजून घे.''

आजही आमचं भेटणं चालू आहे. त्याला एक गर्लफ्रेंड आहे आणि मी त्याला माझा बॉयफ्रेंड मानतो. पुढे आमचं नातं काय वळण घेईल मला माहीत नाही.

*****

**टीप :** आतिशला प्रामुख्याने समलिंगी आकर्षण असलं तरी अगदी थोड्या अंशी त्याला मुलींबद्दलही आकर्षण आहे. म्हणजे तो उभयलिंगी कलाचा आहे. तसंच त्याच्यात काही स्त्रीच्या गुणधर्मांच्या छटा दिसतात म्हणजे काही अंशी त्याचा लिंगभाव स्त्रीचा आहे.

## **रोहित** (सोलापूर)

मी अनुसूचित जातीच्या कुटुंबात जन्माला आलो. माझ्या आईच्या माहेरी म्हणजेच मामाच्या घरात आमचं वास्तव्य आहे. या घरात एकूण माझे तीन मामा, तीन मामी, एक मावशी, त्यांची एकूण आठ मुलं, शिवाय मी व माझी आई राहातो. माझ्या जन्मापूर्वीच माझ्या वडिलांनी माझ्या आईला सोडलं.

जेव्हा मी ११ वर्षांचा होतो, तेव्हापासूनच मला मुलींमध्ये बसणं-खेळणं, घरकुल थाटणं, फिरणं आवडत असे. मला मुलांमध्ये खेळण्याची, फिरण्याची लाज वाटायची. मुलं मला 'छक्का', 'बायल्या' असं चिडवायची.

एके दिवशी मी गल्लीत मुलींसोबत खेळत असताना शेजारच्याच एका पंचवीस वर्षांच्या मुलानं मला न मागता खेळायला गोट्या दिल्या. यामुळे मी खूप आनंदी झालो, कारण सर्व मुलं मला जिथं नाकारत होती, तिथं या मुलानं मला गोट्या दिल्या. दुसऱ्या दिवशी त्यानं मला 'टीव्ही बघू' म्हणून त्याच्या खोलीत नेलं. त्या खोलीत आम्ही दोघंच होतो. त्यानं टीव्ही बारीक आवाजात लावला व माझ्या बाजूला येऊन मला चिकटून बसला. टीव्ही बघत बघत त्यानं मला जवळ घेतलं व माझ्या अंगावरून हात फिरवला. त्या स्पर्शानं माझ्या अंगावर शहारे आले. एके दिवशी तर चक्क त्यानं मला मुलीचे कपडे नेसवले आणि माझ्यावर तुटून पडला. मला हा असं का करतो काही समजत नव्हतं, पण त्याचा सहवास मला सुखावत होता. तो मला भेटायला शाळेत येई व शिक्षकांना खोटं कारण सांगून मला जंगलात नेई. तिथे माझ्याबरोबर सेक्स करी. शाळा चुकवल्याबद्दल मला शिक्षकांकडून शिक्षाही व्हायची. पुढे वर्गातल्या टपोर पोरांच्या त्रासामुळे मी शाळा सोडली.

शाळा सुटली. दुसरं काही काम नव्हतं. आईने मला सुधारण्यासाठी प्रयत्न केले, पण काही फरक पडला नाही. मुलींबद्दल मला अजिबात आकर्षण नव्हते व नाही.

पुढे दुसऱ्या गल्लीतल्या एका माझ्यासारख्या मुलाचा मला सहवास मिळाला. त्याने मला एका 'स्पॉट'वर (गे मुलं भेटत ती जागा) नेलं. त्या रात्री जणू माझ्या जीवनाची दिशाच बदलली. माझ्यासारखी अनेक गे मुलं तिथं जमली होती. त्यांच्यासोबत ओळख झाली. खूप बरं वाटलं. एकमेकांचं सुखदुःख ऐकण्यात समाधान मिळे. तिथे कोती भाषेतील काही शब्दही शिकायला मिळाले.

यानंतर स्पॉटवरील पिअर एज्युकेटरकडून आमच्या गे लोकांच्या ऑफिसबद्दल माहिती मिळाली. तिथल्या समुपदेशकाने मला खूप सारी माहिती दिली. कंडोम का वापरावा व एचआयव्हीची टेस्ट किती फायद्याची आहे ही माहिती मिळाली. यानंतर मी एचआयव्ही टेस्ट करण्याचं ठरवलं. सिव्हिल दवाखान्यातल्या समुपदेशकाकडून उलटसुलट प्रश्न आले. यावर मी घाबरलो, पण माझ्या मित्राने (पिअर एज्युकेटर) त्या समुपदेशकाला समजावून सांगितलं आणि एचआयव्ही ची टेस्ट केली. रिपोर्ट निगेटिव्ह आला, पण सिफिलिसच्या टेस्टमध्ये मी पॉझिटिव्ह आलो. यावर इलाज केला.

पुढे समीर नावाच्या मुलासोबत माझी भेट झाली. माझ्या चालढालीवरून त्यानं मला ओळखलं आणि स्वतःहून सेक्ससाठी प्रपोज केलं. थोडासा भाव खाऊन मी त्यासोबत गेलो. जंगलात आमचा सेक्स झाला. यानंतर आम्ही परत भेटत गेलो. एकमेकांच्या जीवनाविषयी चर्चा सुरू झाली. आम्ही जवळ येत गेलो. सेक्सचं प्रमाण कमी झालं पण भेटणं व बोलत बसणं या गोष्टी वाढल्या. आमचं एकमेकांवर प्रेम जडलं.

मी मुलींसारख्या अंगठ्या घालायचो, मेहंदी काढायचो, मोठे केस ठेवायचो, गळ्यात लॉकेट्स घालायचो. त्याने माझ्या या सगळ्या

सवयी मोडल्या, पण ऑफिसमध्ये जाऊ नये व एमएसएम मित्रांसोबत बोलू नये, या त्याच्या गोष्टी मी मान्य केल्या नाहीत.

हळूहळू समीरचा खरा चेहरा माझ्यासमोर आला. समीरच्या मित्रांकडून मला कळालं, की समीरने दुसऱ्या एका एमएसएमसोबतही संबंध ठेवले आहेत. चौकशी केल्यावर हे सत्य असल्याचं कळालं. मला खूप दु:ख झालं. मी त्याला विचारपूस केल्यावर आमच्यात भांडण झालं. मी त्या एमएसएमचा फोन नंबर मिळवला, त्याला फोन केला. यावर समीरनं मला खूप मारलं, कारण तो एमएसएम समीरच्या गरजा भागवत असे. समीरचं व माझं बोलणं दोन महिने बंद झालं. मग तो परत माझ्याकडे आला. खूप निराश होता. त्याला माझी गरज होती. त्यानं सांगितलं, की त्याचं व त्या एमएसएमचं भांडण झालंय आणि ते वेगळे झालेत. यानंतर आम्ही परत एकत्र आलो.

मलाही समीरच्या काही गरजा बघाव्या लागत. त्याच्यासाठी दारू आणणं, त्याच्या मोबाइलचं रिचार्ज करणं, सिगारेटचं पॅकेट देणं वगैरे. मला तो मानसिक व शारीरिक गरजांसाठी हवा होता, म्हणून मी या गोष्टी पुरवत असे.

एके दिवशी समीरने माझ्यासमोर माझ्याशी लग्नाचा प्रस्ताव ठेवला. मला काय करावं काहीच कळेना, पण हे अशक्य होतं. शिवाय त्यानं मला एक तोळा सोनं व पन्नास हजारांची मागणी केली होती.

खूप विचार करून मी लग्नासाठी अट ठेवली, की लग्न हे चारचौघांत करावं व लग्नानंतर मला त्याच्या घरी ठेवावं. यावर तो म्हटला, की लग्न चारचौघांत केल्यास आपल्या घरच्यांचं नाव खराब होईल. लग्नानंतर आपण एक रूम घेऊ. दिवसभर एकत्र राहू. रात्री मी माझ्या घरी जात जाईन. यावर मी लग्नाची गोष्ट टाळू लागलो. तो म्हणू लागला, की तुझं माझ्यावर प्रेम नाही.

मी एमएसएम मित्रांसोबत याविषयी चर्चा केली. त्यांनी मला

समीरला विसरण्याचा सल्ला दिला. मी खूप विचार केला व माझा मोबाइल नंबर बदलला. समीर खवळला. मित्राद्वारे त्यानं कळवलं, की जर मी त्याला भेटलो नाही तर तो माझ्या घरी येऊन राडा करेन. मी खूप वाईट परिस्थितीमध्ये अडकलो होतो. स्वत:ला खूप शिव्याही हासडत होतो. मनाचा कोंडमारा होत होता. शेवटी मी त्याला भेटलो. त्याचं खूप सारं ऐकून घेतलं.

तो फक्त स्वत:च्या गरजेपुरता विचार करतो आहे. माझ्याकडून खूप काही उकळल्यानंतरही, त्याच्या गरजा अजून संपलेल्या नाहीत पण, मलाही तो माझ्या गरजांसाठी पाहिजे आहे. अशा द्विधा मन:स्थितीत मी अडकलो आहे.

मला आर्थिक अडचण असल्यामुळे २१व्या वर्षी मी धंदा (वेश्याव्यवसाय) करायचं ठरवलं. एका साइटवर मी थांबलो. एक कस्टमर आलं. रूमवर नेऊन प्रथम त्याने माझ्याकडून बॉडी मसाज करून घेतला, त्यानंतर मला फक केलं. अवघ्या १० ते १५ मिनिटात मला चक्क १०० रुपये मिळाल्यानं माझी भूक वाढली. माझं रोज धंद्याला जाणं सुरू झालं. कधी जास्त तर कधी कमी पैसे मिळू लागले. काही वेळा जास्त पैसे देऊन विना कंडोमच्या सेक्ससाठी प्रस्ताव आले, पण मला गुप्तरोग, एचआयव्ही या रोगांबद्दल पूर्ण माहिती होती, म्हणून मी ते नाकारले.

काही दिवसांनी मला 'निरामय आरोग्य धाम'मध्ये एमएसएम लोकांसाठीच्या प्रोग्रॅममध्ये पिअर एज्युकेटरचं काम करण्याची संधी मिळाली. या जगण्याला एक वेगळी दिशा मिळते यात समाधान वाटत होतं. स्पॉटवर जाऊन एमएसएम/टीजी लोकांना भेटणे, त्यांना कंडोम देणे, कंडोम-डेमो दाखवणे, गुप्तरोग व एचआयव्हीच्या तपासण्यांसाठी त्यांना प्रवृत्त करणे, इत्यादी कामे मी करू लागलो.

सातवी शिकूनसुद्धा मला इंग्रजीत सही करता येत नव्हती.

ऑफिसमधल्या साक्षरता वर्गाच्या सरांनी मला इंग्रजीत सही करायला शिकवलं. ऑफिसमध्ये येण्याअगोदर मी खूप गबाळ्यासारखा राहायचो. इथे आल्यापासून मी व्यवस्थित राहू लागलो.

एकदा 'निरामय आरोग्य धाम'च्या ऑफिसमध्ये आमच्या एमएसएम/टीजी लोकांसाठी फॅशन शो आयोजित करण्यात आला होता. मी त्यामध्ये स्त्रीची वेषभूशा करून भाग घेतला. मी खूप आनंदात होतो. तो क्षण मी माझ्या आयुष्यात कधीच विसरू शकत नाही.

काही दिवसांनी सोलापूर जिल्ह्यातील एमएसएम/टीजी लोकांसाठी स्वतंत्र संघटना- 'दोस्ताना संघ' निर्माण झाली. यामध्ये निवडणूक होऊन मला खजिनदार पद देण्यात आलं. आमच्या संघटनेचा केटरिंगचा व्यवसाय असल्याने त्या कामात मदत करून मी संघटनेला हातभार लावू लागलो.

आता असं ठरवलं आहे, की फक्त माझ्या एमएसएम लोकांसाठीच काम करायचं. याशिवाय आईला सोन्याचे दागिने घ्यायचे आहेत आणि स्वत:चं घर बनवायचं आहे.

लग्नाविषयी मी नकारार्थी आहे. कारण मला वाटते, की लग्नानंतर खूप अडचणी निर्माण होतील. मला फॅमिलीकडून दबाव आला, की मी सर्वांना माझ्या लैंगिकतेबद्दल सांगणार आहे.

*****

## राहुल (नाशिक)

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव शहरात एका मराठी परिवारात मी १९९०मध्ये जन्मलो. परिवारातील लोक जुन्या संस्कृती आणि परंपरा जपणारे. आमच्या परिवारात माझी आजी, आजोबा आणि त्यांची ८ मुले म्हणजे माझे वडील आणि त्यांचे ७ भाऊ एकाच शहरात वेगवेगळ्या ठिकाणी आपल्या बायका-मुलांबरोबर राहतात.

माझे बाबा मजूर आणि आई घरगुती महिला. एक मोठी बहीण. बहिणीचं लग्न १०वर्षांपूर्वीच झालं. दोन मोठे भाऊ. मी सगळ्यात लहान. काकाची मुलं आणि माझे भाऊ हे सर्व माझ्यापेक्षा मोठे. माझ्याबरोबरचे म्हणजे काकाच्या मुली. मी मुलींमध्ये भातुकली, दोरउडी खेळायचो. मला घरातल्या सगळ्या कामांची आवड. चहापासून पोळी-भाजी, खिचडी, व्हेज, नॉन-व्हेज सगळाच स्वयंपाक बनवणं शिकलो. ताईच्या लग्नानंतर आईला मदत म्हणून सगळं काम करायचो. घरात सगळ्यात लहान होतो त्यामुळे सगळेच माझे लाड करायचे. जेव्हापासून थोडंफार समजायला लागलं, तेव्हा गल्लीतल्या बायका, लोक, मला चिडवायचे, 'ए बायल्या', 'बुळग्या'. शाळेतली मुलंदेखील असंच काहीतरी म्हणत आणि असं झालं, की मी रडत बसायचो.

मला लहानपणापासून पेंटिंगमध्ये आवड होती. नेहमी घरात बसून पेंटिंग करायचो, स्केचेस करायचो. पेपरात आलेली चित्रं, शाळेतल्या चित्रकलेच्या विषयावर नेहमी घरात बसून चित्र काढायचो. अशी एक सुंदर कला देवानं मला गिफ्ट दिली आणि मीही त्यात रमून जायचो.

मी सातवीत असेन- त्या सुमारास आमच्या बाजूला एक मुलगा

आणि त्याचे वडील राहात होते. त्याला आई नव्हती. त्याचे वडील कामाला गेल्यावर तो रोज मला त्याच्या घरी बोलवायचा आणि मी जायचो, कारण तो मला शाळेतल्या सुट्टीत खाऊ घेण्यासाठी रोज ५-१० रुपये देत असे. तो माझ्याशी खूप प्रेमानं बोलत, मस्ती करत, खेळत असे. तो माझ्यापेक्षा मोठा होता, बारावी झालेला होता. त्याला मी खूप आवडायचो. आम्ही झोपून टीव्ही बघत असू. मग तो माझ्या अंगावर हात, पाय टाकून मला मिठीत घेऊन झोपत असे. एके दिवशी दुपारी त्यानं कुठूनतरी ब्ल्यू फिल्मची सीडी आणली आणि मला दाखवली. सेक्सबद्दल, स्त्री-पुरुष कसे संभोग करतात या गोष्टी सांगू लागला. ब्ल्यू फिल्ममध्ये दाखवतात त्यानुसार किस करण्याचा प्रयत्न केला. या दिवसानंतर तो मुखमैथुन करण्यासाठी मला ५० रुपये देत असे. सुरुवातीला मुखमैथुनाने ओकारी आल्यासारखं आणि घाणेरडं वाटायचं. तरी मी करायचो, कारण घरून एवढे पैसे कधी मिळायचे नाहीत. असं आमचं एक ते दीड वर्षं चाललं. नंतर तो दुसरीकडे राहण्यासाठी गेला. त्यानंतर असे इतरही माझ्या जीवनात आले. माझे चुलत मामा, आत्याचा मुलगा असे दहावीपर्यंत झाले.

त्या दरम्यान मी शाळेबरोबरच कामालाही जायचो. कधी भांड्याच्या दुकानात, तर कधी चहाच्या टपरीवर, तर कधी भाजी मंडईत काम केलं. नंतर दहावी पास झाल्यावर एका हॉस्पिटलमध्ये काही महिने काम केलं.

नंतर १२वी आणि पेंटिंग कॉलेजला एकाच वेळेस प्रवेश घेतला. १२वीच्या परीक्षेमध्ये नापास होण्याचं दु:ख आणि पेंटिंग कॉलेजमध्ये संपूर्ण केंद्रात प्रथम आल्याचा आनंद एकाच वेळेस झाला. ते २००५मधलं माझ्या आयुष्याचं पहिलं यश ठरलं. नंतर घरच्या गरीब परिस्थितीमुळे मी एक वर्ष कॉलेज केलं नाही. मी माझा स्वत:चा एक कॅमेरा घेतला आणि लग्नामध्ये फोटो शूटिंगची कामे करून वयाच्या

१७व्या वर्षी एक नावाजलेला फोटोग्राफर बनलो. फोटोग्राफीच्या बेसवर गुजरात, राजस्थान, पुणे, मुंबई असे बाहेर जाऊन लग्नात फोटोग्राफी केली. खूप नाव व त्याचबरोबर पैसा कमवला. ऑफ सीझनला संगणकाचं शिक्षण घेतलं व २००७मध्ये 'जीडी आर्ट' या पेंटिंग शिक्षणासाठी मी नाशिकला गेलो.

नाशिकबद्दल काय सांगू? सांगण्यासारखं खूप काही आहे. एक शांत आणि निसर्गानं भरलेलं एक सुंदर देवस्थान. नाशिकला येण्याआधी मला बाहेरचं जग माहीतच नव्हतं. घर सोडून बाहेर कधीच राहिलो नव्हतो. सुरुवातीला थोडं अवघड गेलं, पण नंतर नंतर नाशिकचं जणू वेडच लागलं.

माझ्या कॉलेजच्या पहिल्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी मला रोहित नावाच्या मुलावर प्रेम झालं. तो माझ्याच कॉलेजमध्ये तिसऱ्या वर्षात होता. तो खूप सुंदर, सुशील आणि आकर्षक होता. नाशिकमधील नावाजलेल्या परिवारातला तो एका श्रीमंत घरातला मुलगा होता, पण त्याला त्याच्या श्रीमंतीचा गर्व कधीच नव्हता. हळूहळू मैत्री झाली. एकमेकांच्याजवळ गेलो. त्याला माहीत नव्हतं, की माझ्या मनात त्याच्यावषयी काय आहे, पण आम्ही खूप चांगले मित्र झालो. त्याच्या घरी नेहमी जाणं- येणं असे. त्याच्या क्लासमधली एक मुलगी माझी खूप चांगली मैत्रीण होती. तिनं एके दिवशी मला सांगितलं, की तिचं रोहितवर खूप प्रेम आहे. मला तिचा खूप राग आला, पण मी रोहितला तिच्याबद्दल सांगितलं तर तो म्हणाला, "मला ती आवडत नाही" आणि पुढे म्हणाला, "मला मुलीच आवडत नाहीत." बोलता बोलता तो असं बोलून गेला आणि न बोलता मला खूप काही सांगून गेला. मला खूप आनंद झाला.

एके दिवशी त्याच्या घरी कोणी नव्हतं. तो मला त्याच्या घरी घेऊन गेला आणि बोलला, "माझे मम्मी, पप्पा, भाऊ सगळे लग्नासाठी

बाहेरगावी गेलेत, तर तू आज येथेच राहा. तुला छान स्वयंपाक येतो ना मग आपण काहीतरी बनवू आणि खाऊ. मग स्केचेस करू.'' त्यावेळी आमची १ली सेमिस्टरची परीक्षा होती. त्यामुळे तो लग्नाला गेला नव्हता. मला एक चांगला चान्स मिळाला होता त्याच्यावर इंप्रेशन पाडण्याचा. त्या रात्रीत आमच्यात खूप काही झालं. जेव्हा त्याने माझ्याबरोबर सेक्स केला तेव्हा मला जगातला सर्वांत मोठा आनंद मिळाला. तो मला नेहमी म्हणायचा, ''तू मुलगी म्हणून जन्माला आला पाहिजे होतास.''

आम्ही दोघं एकमेकांवर खूप प्रेम करू लागलो. खूप सारी स्वप्नं सजवली आयुष्यभर सोबत राहण्याची. एकमेकांना सुखदुःखात साथ देण्याची. एकमेकांसोबत टाइम स्पेन्ड करत, मूव्ही बघत, त्याच्या कारमधून लाँग ड्राइव्हला, मंदिरात, गार्डनमध्ये जात असू. असं आमचं रिलेशन २ वर्षं चाललं. आयुष्याचे खूप सुंदर क्षण एकमेकांसोबत घालवले. पण हे सर्व लवकरच संपलं. एक दिवस आला जो माझं आयुष्य पूर्णतः बदलून गेला.

एका कार दुर्घटनेत त्याचा मृत्यू झाला. ८ दिवस हॉस्पिटलमध्ये तो कोमात गेला आणि त्याची ती अवस्था पाहून मी वेडा झालो. खाणं-पिणं सर्व सोडलं. त्याचा मृत्यू झाला आणि मला हॉस्पिटलमध्ये अॅडमिट केलं. जवळजवळ एक आठवडा मी हॉस्पिटलमध्येच होतो. त्याचं अंतिम दर्शनदेखील झालं नाही. दुःखाचा डोंगरच कोसळला. सर्व स्वप्नं संपली. आयुष्य जणू संपलं होतं. हे लिहीत असतानादेखील माझ्या डोळ्यांतून अश्रू वाहात आहेत. त्यावेळेस मी तिसऱ्या वर्षाची परीक्षापण दिली नाही. पुन्हा गावी आलो. ४ महिने घरच्यांसोबत घालवले. नंतर पुन्हा नाशिकला गेलो. पुन्हा नव्याने जगण्याचा निर्णय घेतला, पण जेथे जथे मी जायचो तेथे तेथे त्याच्या आठवणीत रडायचो.

कालांतराने एक जॉब केला. तेथे माझ्या सीनिअरनी मला सेक्ससाठी मागणी केली. मी नकार दिल्यावर तो मला त्रास देऊ लागला.

मग तोपण जॉब सोडला.

या काळात माझी इतर काही एमएसएमची ओळख झाली. त्यांच्याबरोबर 'प्रवरा मेडिकल ट्रस्ट'च्या एमएसएम प्रकल्पाच्या ऑफिसला गेलो. तेथे पिअर एज्युकेटरचं काम करू लागलो. पुढे साडीवाल्या कोत्यापण माझ्या ओळखीच्या झाल्या. या दरम्यान एकदा मी स्वत: साडी घातली, तो दिवस म्हणजे कोजागरी. साडी घालून वणी गडाला गेलो.

पुढे माझ्या आयुष्यात एक यासिन म्हणून मुस्लिम मुलगा आला. त्याच्यावर मी खूप जीव लावायला लागलो. ४-५ महिने आम्ही दोघे सोबत होतो, पण एके दिवशी यासिनला दुसऱ्या एका कोतीबरोबर सेक्स करताना त्याच्या रूमवर बघितलं. ती कोती माझी खूप चांगली फ्रेंड होती. तिला माहीत होतं, की आमचं रिलेशन आहे, तरीही तिनं असं केलं. त्यात तिचा एकटीचा दोष नव्हता. त्यात यासिनचा पण दोष होता. पुन्हा एकदा आयुष्य संपल्यासारखं झालं. नैराश्य आल्याने मी बिअर प्यायला लागलो. पहिलं प्रेम देवानी नेलं. दुसऱ्यावर जीव टाकला, तो फक्त माझ्यासोबत खेळत होता. हे दु:ख झेपलं नाही आणि मी नाशिक सोडलं. मी पुण्यात तिसऱ्या वर्षाला प्रवेश घेण्यासाठी गेलो.

पुण्यानं आणखी नवीन चॅलेंजेस समोर ठेवली. माझ्याकडे कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी पुरेसे पैसे नव्हते. एक साडीवाली कोती भेटली. तिच्या घरी राहण्यासाठी गेलो. खूप जॉब शोधले, पण १२वी फेल होतो म्हणून जॉब मिळेना. पुण्यात नवीन होतो म्हणून काही माहीत नव्हतं. मग त्या कोतीनं माझी मदत केली. मला साडी घालून तिनं तिच्यासोबत फिरवलं. मंगती केली. रात्रीला हायवेला देहविक्रीसुद्धा केली. एकाच आठवड्यात ५००० रु. मिळवले. मग कॉलेजला प्रवेश मिळाला. रोज सकाळी कॉलेजला जायचो आणि सायंकाळी हायवेला. मिळालेल्या पैशातले तिला काही द्यावे लागायचे. हळूहळू ते आयुष्य

नकोसं वाटायला लागलं. हे साडी घालणं माझ्यासाठी नाही आहे असं ठरवून मी तिची रूम सोडली. काही पैसे हातात होते म्हणून कॉलेजच्या मित्रांसोबत राहिलो. नंतर एका कॉल सेंटरमध्ये जॉब मिळाला. त्याचे ७००० रुपये मिळायचे. नंतर माझ्या मुंबईच्या एका कोती मैत्रिणीकडून बॉडी मसाज शिकलो. तिच्याच ओळखीनं गिऱ्हाईक मिळू लागलं. प्रत्येक शनिवारी आणि रविवारी मसाजचं काम करून काही पैसे यायचे. नोकरी व मसाजच्या पैशांतून शेवटचं वर्ष पूर्ण केलं. या काळात भरपूर व्यक्ती भेटल्या, पण कधी कोणावर प्रेम नाही केलं.

मी एमएसएम आहे हे लवकरच मी माझ्या घरच्यांना सांगणार आहे. मला मुलींविषयी आकर्षण नाही. एखादी मुलगी किती तरी स्वप्नं घेऊन कोणाच्यातरी आयुष्यात येते. मी तिचं ते स्वप्न पूर्ण नाही करू शकत, म्हणून मुलीशी लग्न नाही करणार. मग जर मला माझ्या फॅमिलीने स्वीकारलं नाही तरी चालेल. मी माझं आयुष्य माझ्या इच्छेनं जगण्यास सक्षम आहे. अजून आयुष्यात खूप काही करायचं आहे. स्वत:साठीपण आणि माझ्या एमएसएम लोकांसाठीपण. देवाकडे एकच प्रार्थना आहे, की या प्रवासात आणखी दु:ख नको देऊस.

*****

## जमीर (पुणे)

माझं नाव जमीर कांबळे. मी समलिंगी आहे. पुणे विद्यापीठात मी जर्मन भाषेचा अध्यापक म्हणून काम करतो. मी माझे मित्र, सहकारी प्राध्यापक, विद्यार्थी व नातेवाईक या सर्वांसमोर माझी लैंगिकता उघडपणे मान्य करतो. पाच वर्षांपूर्वी मी समलैंगिक लोकांची व्यथा मांडणारं मराठी नाटक 'ऑफबीट' बसवलं होतं. त्याचे पुण्यात पाच प्रयोगही झाले. या नाटकामुळे मी अजून बऱ्याच लोकांना समलैंगिक म्हणून माहीत झालो. अधूनमधून वेळ होईल तसा मी समलैंगिकांसाठी कार्यरत असलेल्या संस्थांसाठीसुद्धा काम करतो. एकूणच माझं माझ्या लैंगिकतेशी एक सहज नातं आहे. पण ही सहजता वाटते तेवढ्या सहजतेनं नाही घडली. माझा हा समलैंगिकतेचा प्रवास तीन टप्प्यांतून पुढे आला आहे, जो मी तीन शब्दांच्या आधारे मांडणार आहे; ते तीन शब्द म्हणजे उमज.... समज... व सहज.

मी लहान असताना मला माझा पहिला लैंगिक अनुभव माझ्या एका नातेवाइकामुळे मिळाला. तो माझ्यापेक्षा वयाने वीस वर्षांनी मोठा होता. मी जेमतेम पाच वर्षांचा असेन. तो दिसायलासुद्धा देखणा होता. मला हाताळताना त्यानं मला कुठलीच इजा पोहोचवली नाही. आमच्याकडे मोठं कुटुंब असल्यामुळे आम्हाला एकत्र येण्याची बरीच संधी मिळायची. तो इतरांना घाबरत असल्यामुळे त्यानं मला आमच्यातलं मलाही आवडणारं हे गुपित कोणाला सांगायचं नाही असं बजावलं होतं. मीसुद्धा त्याचं ऐकलं. त्या तरुण नातेवाइकाचं माझ्यावरचं लक्ष मला खूप आवडायचं. असं बरेच वर्षं चाललं.

कालांतराने इतर काही मित्रांबरोबर संबंध झाले, पण माझ्यात आणि त्यांच्यात एक फरक मात्र होता. मी ज्याकडे प्रेम म्हणून पाहात

होतो त्याला ते लपूनछपून केला जाणारा लैंगिक प्रकार म्हणून पाहात होते. संबंध करायचे व विसरून जायचं असंच त्यांचं वागणं होतं आणि इथेच माझा निराळा मानसिक प्रवास सुरू झाला. मला जे आवडतं त्याची मला लोकांसमोर लाज व भीती वाटली पाहिजे असं चित्र मला दिसत होतं. मन मात्र निराळंच सांगत होतं. मन सांगत होतं, की जसं स्त्री-पुरुषांमध्ये प्रेम होतं तसं पुरुष-पुरुषांमध्येसुद्धा होतं व हा अनुभव आपण घेतो आहोत. फक्त त्याला समाजात मान्यता नाही; हे मला कळायला लागलं होतं.

प्रेमाची उमज हळूहळू एका मोठ्या व भयानक समस्येचं रूप घ्यायला लागली होती व इच्छा नसतानाही मला भीती वाटू लागली होती. सतत माझ्याच विचारांमध्ये गर्क असल्यामुळे मी एकलकोंडा होत चाललो होतो. माझ्या आजूबाजूला समाजमान्य जगात फक्त भिन्नलिंगी लोकच वावरत होते. घरात आईबाबा, काका-काकू, आजी-आजोबा, शेजारीपाजारीसुद्धा 'नवरा बायको', एवढंच काय माझ्या मित्रांनासुद्धा आता मुलींचंच आकर्षण वाटू लागलं होतं. सिनेमात पाहिलं तर राजची प्रेयसी सिमरन व बंटीचं लग्न बबलीशीच. मला एकट्यालाच पुरुषांबद्दल समलैंगिक आकर्षण वाटतंय असंच मला जाणवू लागलं होतं. लैंगिकतेविषयी जे काही साहित्य हातात आलं, त्यात समलैंगिकतेचा एक विकृती म्हणूनच उल्लेख केला होता आणि तेव्हा माझ्या मनामध्ये विचारांचं मोठं द्वंद्व सुरू झालं. आपल्याला वाटणारं आकर्षण, आपली लैंगिकता ही प्राकृतिक आहे का एक विकृती? असा प्रश्न मला पडू लागला आणि प्रकृतीमध्ये काय आहे वा काय नाही, हे सांगण्याचा अधिकार कोणाला आहे? आपल्याकडे पिढ्यान्‌पिढ्या चालत असलेल्या संस्कृतीला का स्वत: प्रकृतीला? माझं व प्रकृतीचं नातं विचारलं तर प्रकृतीमध्ये मला निर्धास्त वावरण्याचा अधिकार होता, पण माणसांमध्ये आलो, की संस्कृतीची बंद चौकट जाणवायची व भीती

वाटायची. माझ्यातल्या उमजेला समाजाच्या समजेची साथ नव्हती. त्यांच्यातलं भांडण लक्षात यायचं आणि म्हणून माझ्या लैंगिकतेबद्दल मला माझ्यापुरती वाटणारी सहजता इतरांपुढे नष्ट व्हायची. अशा वेळेला मी सिनेमांमधून स्फूर्ती घ्यायचो.

लहानपणापासून मला श्रीदेवी ही नटी खूप आवडायची. कॉलनीमध्ये जेव्हा केव्हा 'नगीना'चं गाणं वाजत असे तेव्हा मी रस्त्यावर सर्वांसमोर श्रीदेवीचा नाच डिट्टो करायचो. आपल्या लैंगिकतेला मान्यता न देणाऱ्या समाजापुढे मला माझं नागीण असणं एक हुकमी हत्यार वाटू लागलं होतं. अशावेळी लोकांनी हे माझ्या वडिलांना जाऊन न सांगितलं तरच नवल. वडील तेव्हा नगरसेवक होते. सेवादलाचे कार्यकर्ते होते. ते मला खूप ओरडायचे, पुरुषांसारखा चाल असं बजावायचे, पण मारायचे कधीच नाहीत.

पुढे जसा जसा मी मोठा झालो, कॉलेजला जायला लागलो तसं मला इतरांपुढे वडील चिडवतात म्हणून स्वतःच्या बोलण्याची, चालण्याची व पुरुषांबद्दल वाटणाऱ्या आकर्षणाची लाज वाटू लागली. पण कितीही प्रयत्न केले तरी मला स्वतःला बदलणं शक्य नव्हतं. मग मी इतरांपुढे माझ्या भावना लपवू लागलो. मित्रांनासुद्धा 'मलाही मुलीच आवडतात' असं खोटं बोलू लागलो. मुलींवर केलेल्या त्यांच्या घाणेरड्या विनोदांवर इच्छेविरुद्ध हसू लागलो. थोडक्यात, माणसांच्या संस्कृतीच्या चौकटीत जागा मिळवण्यासाठी मी चेहऱ्यावर मुखवटे चढवले व ते छान अंगवळणीसुद्धा पडले. पण शेवटी मुखवटेच ते! पुढे ते मला आतल्या आत खाऊ लागले. माझ्या आत्म्याला, माझ्या विवेकाला आव्हान द्यायला लागले.

माझ्या एम.ए. नंतर मला जर्मनीला जायची संधी मिळाली तेव्हा तिथली एक मैत्रिण- हेल्गाच्या घरी जेवणाच्या कार्यक्रमाला मी गेलो. तिथे हेल्गाचा मित्र क्लाऊस त्याच्या लग्नाची पत्रिका वाटत होता.

मलासुद्धा त्यानं लग्नाचं निमंत्रण दिलं. त्याची पत्रिका वाचून मला धक्काच बसला. त्यावर लिहिलं होतं- 'क्लाऊस वेड्स मार्टिन' अर्थात मला मनातून खूप आनंद झाला होता. क्लाऊस समलैंगिक आहे व त्याच्या समलैंगिक मित्राबरोबर तो लग्न करणार ही कल्पना मला खूप छान वाटत होती. इतर भिन्नलिंगी मित्रांचीही त्याला साथ होती. ही सहजता पाहून मला खूप आनंद झाला व क्लाऊसचा हेवासुद्धा वाटला. वाटलं, की जर्मनीचं बरं आहे, इथे समलैंगिकतेला मान्यता आहे. भारतामध्ये अशी परिस्थिती कधी येणार? शेवटी मी न राहवून तिथल्या सर्वांना सांगून टाकलं, मी समलैंगिक आहे. त्या सर्वांनी माझ्यासाठी टाळ्या वाजवल्या व त्यांची मला असलेली साथ नमूद केली. जर्मनीतल्या या घटनेनं माझा आत्मविश्वास खूप वाढला. मी पहिल्यांदाच कोणालातरी माझ्या लैंगिकतेबद्दल असं उघडपणे सांगितलं होतं. पुण्यात आल्यावर मी माझ्या आईलासुद्धा सांगायचं असा ठाम निश्चय केला.

वडिलांच्या मृत्यूनंतर आणि बहिणीच्या लग्नानंतर आई व मी एकटेच राहात होतो. तिला सांगण्यापूर्वी मी चेतन दातार यांचं 'एक माधवबाग' हे नाटक वाचत होतो. या नाटकामध्ये एक आई आहे व तिला तिच्या मुलाच्या आत्महत्येनंतर तो समलैंगिक होता असं कळतं व पूर्ण नाटकभर ती या ढोंगी समाजापुढे आकांत मांडते. आपल्या समलैंगिक मुलाला समजून घेणारी आई पाहून मला माझ्या आईबद्दलसुद्धा खूप विश्वास वाटू लागला. मी आणि आई त्या काळी एकत्र संध्याकाळी चालायला जात. तेव्हा मी ठरवलं, की असंच चालत असताना आईला एकदा सांगून टाकावं आणि कमाल म्हणजे मी सांगायच्या आधी आईच माझ्याशी एकदा बोलली, म्हणाली, की घरात ठेवलेलं 'एक माधवबाग' हे नाटक तिनं वाचलं आहे व मी जसा आहे तसा तिनं मला स्वीकारलं आहे. तिचे हे शब्द ऐकून मी शांतच झालो. ती पुढे म्हणाली, ''काही काळजी करू नकोस, तू माझा खूप चांगला

मुलगा आहेस, हे मला माहीत आहे. तेव्हा माझी तुला पूर्ण साथ आहे.'' त्या दिवशी माझ्या आईने माझी लैंगिकता नाहीतर मला एक माणूस म्हणूनच समजलं होतं. समलैंगिकतेविषयी काहीही गंध नसताना, स्वत: फक्त दहावीच शिकलेली असताना, केवळ प्रेमाच्या जोरावर तिने माझा स्वीकार केला होता.

आईने माझा समलैंगिक म्हणून स्वीकार केल्याने माझा आत्मविश्वास खूप वाढला व हळूहळू मी सर्वांना निर्धास्तपणे सांगू लागलो, की मी समलैंगिक आहे. माझ्या शिक्षकांना, मित्रमैत्रिणींना आणि विद्यार्थ्यांनासुद्धा. माझ्या या बोधकपणाचं दुसरं कारण होतं, ते म्हणजे माझी नुकतीच झालेली एका समलैंगिक मित्राशी ओळख. बिंदुमाधव खिरे त्याचं नाव. जर्मनीतल्या मित्रांनी मलाँ फोन करून कळवलं होतं, की समलैंगिकांसाठी मुंबईत एक 'गे बाँबे' नावाचा ग्रुप आहे. मी मुंबईला जाऊन या ग्रुपमधील विक्रम डॉक्टर यांना भेटलो. त्यांनी मला पुण्याच्या संस्थेचा पत्ता आणि नंबर दिला. अशा तऱ्हेने मी 'समपथिक ट्रस्ट' चालवणाऱ्या बिंदूला भेटलो. बिंदू समलैंगिक लोकांसाठी लढत होता, एकटा जागोजागी जाऊन सुरक्षित संभोगाची, लैंगिकतेची माहिती देत होता. खरंतर तो खूप जोखमीचं काम करत होता. त्याचं धाडस पाहून मीसुद्धा धाडसी व्हायला लागलो.

पुढे बऱ्याच समलैंगिकांशी ओळख झाली. त्यातील काहीजण माझे कायमचे मित्रही बनले. पण माझा एकूण समलैंगिक लोकांबरोबरचा अनुभव फार काही सकारात्मक नव्हता. मला भेटलेले समलैंगिक भिन्नलिंगी लोकांसारखेच समलैंगिकतेची एक नवी चौकट बनवत चालले होते. बिंदूच्याच संस्थेत आम्ही काहीजण नुसते भेटायचो. बिंदूने एकदा औपचारिकता म्हणून सर्वांना विचारलं, की पुढच्या वेळी अजून काहीजण येऊ इच्छितात आणि बाकीच्यांची हरकत नसेल तर ते साडी नेसणार आहेत. तिथे आलेल्या जवळजवळ सर्वांचीच याला हरकत

होती. बहुतेकांचं म्हणणं होतं, की आपण समलैंगिक आहोत, हिजडे नाही. मला हे सारं पाहून खरंतर खूप त्रास झाला. वाटलं, की आपण एकीकडे एक चौकट मोडतो तर लगेच दुसरीकडे एक नवी चौकट बनत चालली आहे. माणसांना बहुधा सगळीकडेच एक चौकट हवी असते. आता भिन्नलिंगी व समलैंगिक यांच्यातला फरक हा काळा व पांढरा या रंगांसारखा ठळक असू शकत नाही. मध्ये काळ्या व पांढऱ्या रंगाच्या मिश्रणाच्या हजारो छटा शक्य आहेत, त्याचं काय करायचं? मी लैंगिकतेला एका फूटपट्टीसारखं पाहतो. पट्टीच्या एका टोकाला भिन्नलिंगी आहेत तर दुसरं टोक हजारो, लाखो, करोडो शक्यतांचं. अंतहीन. म्हणून एकदा का आपण भिन्नलिंगी नाही असं लक्षात येतं, तेव्हा आपण भिन्नलिंगी नसणाऱ्या इतर अनेक शक्यतांना स्वीकारलं पाहिजे, नाहीतर आपणसुद्धा 'चौकटी'वालेच ठरू.

माझे हेच विचार मांडायला मी पुढे 'ऑफबीट' या नावाचं एक मराठी नाटक रंगभूमीवर आणलं. हे नाटक बसवत असताना बरेच अडथळे आले. आधी मला वर्षभर सेन्सॉरचं सर्टिफिकेटच दिलं जात नव्हतं. सेन्सॉरवाल्यांचं म्हणणं चमत्कारिक होतं. त्यांच्या मते 'मराठीत समलैंगिकता नसते'. मराठीकरणाचे पडसाद पार इथपर्यंत पोचतील याची मला मुळीच कल्पना नव्हती.. असो. पॅनलवरच्या काही जणांच्या मदतीने शेवटी मला नाटकाच्या प्रयोगांसाठी परवानगी मिळाली. पुढे या नाटकात काम करण्यासाठी चांगले कलाकार मिळेनात. पुण्यातल्या बहुतेक 'प्रायोगिक कलाकारांनी' नाटक वाचून काम करण्याचं नाकारलं. शेवटी मी समलैंगिक लोकांनाच जमा केलं व त्यांच्याकडे अभिनयाचा अनुभव नसताना नाटक एकदाचं बसवलं. माझ्या नाटकात आजीच्या मुख्य भूमिकेचं काम दीपा लागू यांनी केलं. समलैंगिक बाईची भूमिका करण्यासाठीसुद्धा माझीच एक भिन्नलिंगी मैत्रीण उज्ज्वला मेहेंदळे पुढे सरसावली. माझ्या इतर भिन्नलिंगी मित्रांनीसुद्धा भावनिक व आर्थिक

मदत केली. या सर्वांनी मला, माझ्या नाटकाला व आमच्या विषयाला दिलेली साथ पाहाता त्यांचे आभार शब्दात मांडणं अवघड आहे. माझ्या आईनेसुद्धा नाटकाचा एक प्रयोग लावला, तेव्हा खूप आनंद झाला. आतापर्यंतच्या प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया पाहून लक्षात आलं- नाटक नक्कीच प्रेक्षकांना विचार करायला लावतं. त्यांचे पूर्वग्रह दूर करतं. माझ्या नाटकात मी भिन्नलिंगी, समलिंगी पुरुष, स्त्री, हिजडा वगैरे सर्वांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे व नाटकाच्या अंताला आम्ही अशा एका समाजाची रचना करतो, जिथे माणसाला त्याच्या माणूसपणामुळे ओळख असेल; त्याच्या लिंग, रंग, जात, धर्म, भाषा व लैंगिकतेमुळे नव्हे. अशा समाजात माणसा-माणसाला त्याचं खरं स्वातंत्र्य अनुभवण्याची शक्यता असेल. त्यांच्या उमजेला एक सहज जागा असेल. अर्थात हे सगळं समजेमुळेच शक्य होईल आणि म्हणूनच माझा व माझ्या इतर समलैंगिक कार्यकर्त्यांचा लढा हा चालूच असणार आहे. हीच माझी गोष्ट, हाच माझा प्रवास उमज, समज व सहजचा....

*****

## अजित (चंद्रपूर)

माझा जन्म १९८२मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील छोट्याशा गावात झाला. वडिलांकडून व मोठ्या बहिणीकडून कळालं, की माझ्या जन्माच्या वेळी घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. त्यापेक्षाही गरिबी माझ्या मोठ्या बहिणीच्या वेळी होती. जेव्हा मला कळू लागलं तेव्हा घरात आजी, वडील, तीन मोठ्या बहिणी व मी सर्वांत लहान भाऊ असं आमचं कुटुंब होतं.

आईबाबांचं कॉलेजमध्ये प्रेम झालं व नंतर लग्न होऊन आई घरी आली. वडिलांची आर्थिक परिस्थिती गरिबीची तर आई श्रीमंतीत वाढलेली. आईच्या घरून लग्नाला विरोध होता. संसार सुखात चालत असतानाच आईच्या आईने घरात भांडण लावून आईवडिलांना आजीआजोबांपासून वेगळं राहायला प्रवृत्त केलं. कलह वाढतच गेला व मी ३ वर्षांचा असताना आई विष पिऊन मरण पावली. संपूर्ण घराची जबाबदारी एकट्या वडिलांवर पडली.

पुढे माझ्या नजरेत थोडा फरक दिसू लागला होता. असाच फरक माझ्या सर्वांत मोठ्या बहिणीच्या डोळ्यातही होता. डॉक्टरांना दाखवलं असता हा डोळ्यांचा अनुवंशिक रोग असल्याचं कळालं. ताबडतोब शस्त्रक्रियेचा डॉक्टरांनी सल्ला दिला. मात्र घरी विडी मजुरीशिवाय दुसरा उद्योगधंदा नव्हता त्यामुळे नागपुरातील शासकीय डोळ्यांच्या इस्पितळात डोळ्याची शस्त्रक्रिया करून घेतली. मोठ्या बहिणीची शस्त्रक्रिया सफल झाली, मात्र माझा उजवा डोळा कायमचा गेला.

मी साडेपाच वर्षांचा झालो तेव्हा वडिलांनी पहिलीत नाव दाखल केलं. तेव्हा दोन बहिणींसोबत मी शाळेत जाऊ लागलो. मी अभ्यासात तसा हुशार होतो आणि इतर कलागुणांमध्येही पुढे होतो म्हणून शिक्षक

माझे लाड करायचे.

मी ८वीला होतो तेव्हा परत हळूहळू डोळ्याचा त्रास वाढू लागला. मोठ्या बहिणीप्रमाणे मलाही मोठ्या भिंगाचा चष्मा लागला. मोठ्या बहिणीला चष्मा होता आणि तिचं शिक्षणही सुरू होतं, म्हणून पहिल्यांदा दुसऱ्या बहिणीचं लग्न झालं. या दरम्यान वडिलांनी दुसरं लग्न केलं व आम्हाला सावत्र आई आणली. पुढे एका महिन्यातच आजीचे डोळे गेले व वर्षभरात आजी वारली. सावत्र आईने आम्हा चौघा भावंडांचा छळ करायला सुरुवात केली.

इतक्यात वडिलांना एका अनुदानित वसतिगृहावर अधीक्षकाची नोकरी मिळाली. आईबाबा तिकडे जाऊन राहू लागले व इकडे आम्ही चौघं भावंडं राहू लागलो.

आठवीत शिकत असताना मला एक नवीन मित्र मिळाला. त्याचं नाव दीपक. मला त्याच्यासोबत राहायला खूप आवडायचं, म्हणून मी वाट्टेल ते करून त्याच्यासोबत जास्तीतजास्त वेळ घालवायचो. मी त्याचा विचार करून हस्तमैथुन करायचो. आपणही इतर मित्रांप्रमाणे मुलींबद्दल गप्पा माराव्या, त्यांच्याशी प्रेमसंबंध स्थापित करावे, असे विचार मनात यायचे, पण एखादा सुंदर मुलगा बघितला, की ज्या भावना जागृत व्हायच्या त्या मुलींबद्दल कधीच होत नव्हत्या.

१०वी पास झाल्यानंतर मी व दीपकनी ११वी विज्ञान शाखेत प्रवेश मिळवला. आता मात्र बाहेरच्या भागातले विद्यार्थीही सोबत होते. दीपकची त्यांच्याशी जास्त मैत्री वाढू लागली व मला आतल्या आत जळल्यागत होऊ लागलं. कालांतराने मी १२वी पास झालो. घरात लहान बहिणीचं लग्न झालं. त्यानंतर मोठ्या बहिणीचं लग्न झालं. आता मात्र घरात आम्ही तिघंच राहिलो होतो. मी आणि आईवडील.

मी बी.कॉम.ला प्रवेश घेतला. दुसऱ्या वर्षाला असताना माझ्या दुसऱ्याही डोळ्यावर परिणाम जाणवू लागला. सायंकाळचं अंधूक दिसू

लागलं. त्याच काळात वनविभागात अपंगांसाठी भरती मोहीम सुरू झाली व सुदैवाने मला नोकरीही मिळाली. आता माझी जबाबदारी अजूनच वाढली होती. नोकरी सांभाळत असताना कॉलेजचा अभ्यासही करायचो, पण डोळ्याचा त्रास अजूनच वाढला. मी लगेच वैद्यकीय रजा घेतली व डॉक्टरांना गाठलं. त्यांनी काचबिंदू असल्याचं निदान केलं व तत्परतेने शस्त्रक्रिया करायला सांगितली. नोकरी लागून जेमतेम दोन-तीन महिनेच झाले होते व घरातील आर्थिक परिस्थिती सुधारण्याची संधी मला मिळाली होती. त्यात हे एक मोठं संकट आलं होतं.

डोळ्याची शस्त्रक्रिया करून घेतली तो दिवस माझ्या आयुष्यातला हे जग पाहू शकण्याचा शेवटचा दिवस ठरला. डॉक्टरांनी मला पूर्णपणे अंध जाहीर केलं.

आता जीवनाचं चित्र पूर्णपणे बदललं. कुठे जायचं म्हटलं तर एखाद्याचा हात धरून जावं लागायचं. ज्या वयात मी वडिलांचा आधार व्हायला हवं होतं, त्या वयात वडील मला हात धरून घेऊन जायचे. डोळे गेल्यामुळे वनविभागात अधिकारी कामावर घ्यायला तयार नव्हते. माझ्या एका बहिणीनं अंधांसाठी असलेल्या आयटीआय संस्थेत प्रवेश मिळवून दिला, जेणेकरून मला स्वावलंबी होता येईल.

मी अंधांच्या संस्थेत राहू लागलो व हळूहळू अंधजगात वावरू लागलो. तिथले अंध विद्यार्थी मला, ''सावली कशी असते?, सूर्य कसा दिसतो?'' असे अनेक मनाला भिडणारे प्रश्न विचारायचे, ज्यांची उत्तरं देणं अवघड होतं. मला वाटू लागलं, की मी नशीबवान आहे, ज्याला डोळस आणि अंध या दोन्ही जगांचा अनुभव घेता आला. जी मुलं जन्मत:च अंध होती त्यांना रंग, आभाळ यांची जाणीव नव्हती. त्यांचं वागणं व राहणीमान विक्षिप्त होतं. मी त्यांच्यात मिसळून आपल्यापरीनं जे करता येईल ते करून त्यांना मदत करायचो. केस विंचरून देणे, पायऱ्या चढणे उतरणे, संगणक हाताळणे, व्यवस्थित कसं जेवावं हे सर्व

मी त्यांना समजावू लागलो. इथेसुद्धा मी मुलांचा व शिक्षकांचा लाडका होतो.

काही दिवसांनंतर एक जण मला खूप आवडू लागला. एके दिवशी वर्गात मी त्याला त्याच्यावर प्रेम करू लागल्याचं सांगितलं. पण तो समलिंगी नव्हता. वर्गातल्या एका मुलीशी त्याचं मन जडलं होतं. मला त्याचा खूप मत्सर वाटू लागला. त्याची व माझी मैत्री इतरांच्या डोळ्यांत सलू लागली. मात्र आम्हाला कुणाचीही पर्वा नव्हती. पुढे त्याचं व माझं काही कारणांवरून संस्थेशी भांडण झालं व आम्हाला संस्थेतून बाहेर काढलं गेलं. मी बहिणीकडे गेलो. त्याच्यापासून दूर असलो तरी आजही आमची मैत्री आहे.

एक वर्षानंतर, एका अंध प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेतला. अभ्यासक्रम सुरू असताना मी बऱ्याचशा स्पर्धेत भाग घेतला- जसे गायन, नृत्य, कविता करणे, मातीच्या वस्तू तयार करणे व अशा स्पर्धेत मी प्रथम यायचो. मी माझ्या संस्थेला पारितोषिकंही मिळवून दिली. अभ्यासक्रम संपल्यावर मी गावाला परतलो.

काही दिवसांनी वडील खूप आजारी पडले. घरात एकही पैसा नव्हता. बहिणीने कशीबशी पैशांची व्यवस्था करून वडिलांना वाचवलं. त्यांच्या कंपनीच्या लोकांनीही खूप मदत केली. मी मात्र कसलीही मदत किंवा धावपळ करू शकलो नाही, कारण मला अंधत्वामुळे काहीच करता येत नव्हतं. आता मला खरंच अपंग असल्याची व बेकामी असल्याची जाणीव होऊ लागली. या जन्माचा व दैवाचा वीट येऊ लागला. लहानपणापासून ईश्वराने आपल्यावर अन्यायच केला, याची मला प्रचिती आली.

याच्यामुळे हळूहळू मी तापट व चिडखोर झालो. एखादी वस्तू हवी तेव्हा मिळाली नाही तर माझा संताप एकाएकी वाढायचा. एके दिवशी रागाच्या भरात, मी बहिणीच्या मुलाचं डोकं फोडलं. सगळं

झाल्यानंतर मला पश्चात्ताप व्हायचा व मला स्वत:चा राग यायचा. त्यामुळे पुन्हा मी कुठल्यातरी संस्थेत जाऊन राहाण्याचं ठरवलं व एका अंधांच्या संस्थेत प्रवेश मिळवण्यात यशस्वी झालो. पुन्हा तोच अभ्यासक्रम पूर्ण करण्याचं ठरवलं.

या संस्थेतील एक मुलगी- राणी माझ्या प्रेमात पडली. राणी सर्व मुलींमध्ये खूप वेगळी होती व राहणीमानही एकदम चांगलं होतं. तिचं माझ्यावर प्रेम आहे म्हणून इतर मुली तिच्यावर जळायच्या. राणीला माझ्याशी लग्न करण्याची इच्छा होती. एकदा रात्री मी तिची शारीरिक भूक भागवण्याचा प्रयत्न केला मात्र माझ्या मनात कुठलीही कामभावना जागृत झाली नाही. त्यामुळे राणी नाराज झाली व रडू लागली. तिची समजूतसुद्धा मला काढता आली नाही. नेमकं कारण तरी काय सांगावं तेच सुचत नव्हतं. मी समलैंगिक आहे हे उघडपणे तिला सांगू शकलो नाही. मी राणीला सांगितलं, की तू मला विसरून जा, दुसरा जोडीदार शोध. मात्र राणी मला आहे त्या परिस्थितीत स्वीकारायला तयार होती.

घरात सर्वांना वाटत होतं, की माझं लग्न व्हावं व वंशाला दिवा मिळावा, तसंच जन्मभर सांभाळणारी हक्काची बायको असावी. पण, राणीची दृष्टी कमी असल्यामुळे माझ्या बहिणीने लग्नास नकार दिला. ''एकच अंध व्यक्ती आम्हाला सांभाळणं जड झालंय, त्यात दुसरीही व्यक्ती अंध असेल, तर आम्ही कुणीही तुम्हाला सांभाळणार नाही.''

अंधत्व आल्यावर त्याच्या दु:खातून बाहेर पडण्यासाठी, स्वत:ला पुढील जीवनात येणाऱ्या संकटांना तोंड द्यायला तयार करण्यासाठी व आहे त्या परिस्थितीशी तडजोड करण्यासाठी मला घरच्यांनी खूप मार्गदर्शन केलं. आशावादी कसं बनायचं, एखादी वस्तू हवी असेल तर तिची उत्कट इच्छा मनात कशी निर्माण करायची हे सगळं मी 'आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या वर्गात शिकलो.

असाच आयुष्याचा प्रवास करताना माझी शिवशी भेट झाली. तो

डोळस होता. आमची मैत्री वाढत गेली. आम्ही रोज फोनवर बोलू लागलो. शिव मला सुट्टीच्या दिवशी फिरायला घेऊन जायचा. मधून-मधून आमचा सेक्स व्हायचा. कधी मला डोळ्याच्या हॉस्पिटलला जावं लागे तेव्हा शिव मला घ्यायला यायचा.

शिव आणि मी दोघांनी स्वत:चा परफ्यूम/अत्तरचा व्यवसाय सुरू केला. मुंबईत प्रशिक्षण घेऊनही ती कार्यकुशलता माझ्यात आली नाही. आपल्या वस्तू लोकांपर्यंत पोहोचवण्याची कला मला माहीत नव्हती. चार लोकांना आपल्या वस्तूविषयी माहिती देणंसुद्धा मला जमत नव्हतं. हे सगळं शिवला पटकन जमायचं. त्यात मला शिवची खूप मदत होऊ लागली. कित्येकदा शिव एकटाच परफ्यूम विकायला खूप लांब पायी चालत जायचा व मी घरीच बसून राहायचो. बऱ्याचदा आम्ही दोघंही चालत चालत खूप लांब जायचो व वस्तू विकली नाहीतर साधा चहासुद्धा घेत नव्हतो. पुढे त्याला डोकेदुखीचा त्रास होऊ लागला. त्याचं डोकं दुखून चक्कर यायची. डॉक्टरांना दाखवलं असता तातडीने सीटी स्कॅन करण्याचा सल्ला दिला. नंतर निदान झालं, की त्याला कॅन्सर झाला आहे. तो गावी गेला.

पूर्वी मला एखाद्यावेळी फिरायला जावंसं वाटलं, की इतरांची खूप वाट बघावी लागायची. शिव सोबत होता तेव्हा अशा अडचणी येत नव्हत्या. शिवाय अंधत्व येण्यापूर्वीच्या माझ्या आवडीनिवडी अंधत्वानंतर मला सोडून द्याव्या लागल्या होत्या. मात्र शिव आणि मी मिळून ते दिवस पुन्हा परत आणले होते. आता तो गेल्यावर पुन्हा पूर्वीप्रमाणे घरात बसून रहावं लागलं. मला एकट्याला व्यवसाय सांभाळणं अशक्य होतं. शिव असेपर्यंत मला त्याची सवय झाली होती. मी एखादी वस्तू शोधू लागलो, की शिव लगेच ती शोधून आणून द्यायचा. त्यामुळे आता एकट्याला खूप अवघड जातं. माझा स्वभाव खूप तापट झालाय त्यामुळे बऱ्याचदा विनाकारण घरात सारखा चिडत

असतो.

डोळे जाण्यापूर्वी मी रोज रात्री झोपताना स्वत:ची रोजनिशी लिहायचो. मात्र अंधत्वानंतर मी आपल्या सगळ्या जुन्या डायऱ्या जाळून टाकल्या होत्या. मला मित्रांचे फोटो व त्यांनी दिलेली शुभेच्छापत्रं जपून ठेवण्याची सवय होती. ती अजूनही मी तशीच जपून ठेवलेली आहेत. तसेच पेंटिंग माझा आवडीचा विषय होता. माझी शेवटची पेंटिंग्ज मी अजूनही तशीच ठेवली आहेत. सुदैवाने आज मला पुन्हा स्वत:बद्दल स्वत:चे विचार घटनावारी लिहिण्याचा योग प्राप्त झालाय. ही आत्मकथा लिहिण्यात ज्या मित्रानं मला मदत केली त्याचा मी खूप आभारी आहे. रात्री उशिरापर्यंत जागून एक एक क्षण आठवून मी हे आत्मकथन लिहिलं आहे. लोकांपर्यंत माझे अनुभव व माझी लढाई यांचं वर्णन करताना मला खूप आनंद होतोय. माझी इच्छा आहे, की माझ्या भागातही समलिंगी व्यक्तींसाठी काम करणारी संस्था सुरू व्हावी व माझं या संस्थेला योगदान मिळावं.

मी माझं स्वत:चं व्यक्तिचित्र यात रेखाटलं आहे, त्यातले बरेचसे प्रसंग असे आहेत, की त्यात माझी चूक जाणवते तर काही प्रसंगी माझी काहीच चूक नाही. जे काही घडलं व पुढे भविष्यात जे काही घडेल त्यात नशिबाची व देवाची इच्छा असावी असंच मी म्हणेन. आजपर्यंत मी जे काही केलं ते नियतीनं माझ्याकडून करून घेतलं तसंच जे मला अपंगत्व आलं, ते मी मागच्या जन्मातील भोग समजून स्वीकारलं.मी देवावर श्रद्धा ठेवतो पण प्रसंगी असं वाटतं, की देवानं आपली खूप परीक्षा घेतली.

*****

## मंदार (नाशिक)

प्रत्येक एमएसएमचे अनुभव हे वेगवेगळे असतात, पण काही बाबतीत सारखेही असतात. मला वाटतं माझं वय साधारणत: १० वर्षांचं असेल; तेव्हा मला असं कुठंतरी जाणवायला लागलं, की मला एका पुरुषाविषयी आकर्षण आहे. मला कधीही मुलींमध्ये रमावंसं वाटत नव्हतं. त्यावेळेस मला सेक्सविषयी एवढी माहिती नव्हती. पण एखाद्या वेळेस मित्रासोबत मला कधी झोपायची वेळ आली तर मला अधिकच आनंद व्हायचा. त्या वेळेस मला का कुणास ठाऊक झोप येण्याऐवजी माझी झोप उडून जायची व मला त्यांच्याविषयी आकर्षण वाटू लागायचं. पण मित्र असल्यानं व तो लोकांना आपल्याविषयी काही उलटसुलट सांगेल या भीतीनं स्वत:ला आवरून घ्यावं लागायचं. पण आपणही किती दिवस स्वत:ला आवरून ठेवायचं?

एकदा एका मित्रासोबत झोपलो असताना मी त्याला स्पर्श केला. त्यानेही मला सपोर्ट करत माझ्याशी सेक्स केला. मित्रांना कळालं, तेव्हा सर्व मित्र मला चिडवायला लागले. त्यामुळे मन दु:खी व्हायचं व असं वाटायचं, की जगात आपण एकटीच व्यक्ती अशी का आहे, की त्याला मुलींविषयी आकर्षण नसून मुलांविषयी आकर्षण आहे?

नंतर मी कॉलेजला गेलो तेव्हा मला एक एमएसएम साइट माहीत पडली व तेथे मला माझ्यासारखे भरपूर मित्र भेटले. त्यावेळेस मला असं वाटलं, की जगात मी एकटाच असा नसून माझ्यासारखे भरपूर लोक असे आहेत. पुढे मी नाशिकमधील टीजी लोकांना भेटलो. मलाही साडी घालावीशी वाटायची, मग मीही केव्हातरी प्रोग्रॅममध्ये साडी घालणे, स्त्रियांसारखा मेक-अप करणे वगैरे करायचो.

कालांतराने बहिणीचं लग्न झालं. घरी घरकामाला आईला

हातभार लावण्याकरता सुनबाई पाहिजे होती. मला पुरुषांविषयी आकर्षण होतं. पण कुठंतरी हे माहीत होतं, की आपल्याला एका मुलीबरोबर लग्न करावंच लागेल.

लग्नाआधी भीती वाटायची, की आपण स्त्रीसोबत सेक्स करू शकू का? मी एका मित्राला भेटलो व त्याला माझ्या भीतीविषयी सांगितलं व बोललो, की आपण एका डॉक्टरकडे जाऊ व त्याचा सल्ला घेऊ. तो मला म्हणाला, ''वेडा आहेस तू. आधी लग्न कर. जर तुला काही प्रॉब्लेम वाटला तर आपण डॉक्टरांना नक्कीच भेटू''.

वयाच्या २२व्या वर्षी माझं लग्न झालं व लगेचच दीड ते दोन महिन्यात कळालं, की मी बाप बनणार आहे. त्यावेळीचा आनंद मी शब्दांत सांगूच शकत नाही. मला मुलगा झाला. हे सर्व चालू असताना मात्र मला कधी एचआयव्ही/एड्स होईल याकडे लक्षच दिलं नाही. मुलगा साधारणतः सहा महिन्यांचा झाला. त्यावेळेस मी एचआयव्हीची तपासणी केली. मला एचआयव्हीची लागण असल्याचं निष्पन्न झालं. मला एचआयव्ही झाला याचं मला दुःख होतंच, पण ज्या स्त्रीने आपल्यावर विश्वास ठेवून आपल्याशी संसार केला तिलाही हा आजार असेल व ज्याला आपण जन्म दिला त्या मुलालाही आजार असेल या भीतीपोटी व टेन्शनमुळे मी वेडाच होऊन गेलो. असं वाटायचं, की जीव द्यावा. पण असंही वाटायचं आपल्याला कळालं म्हणून आपण जीव देतोय, पण माझी बायको व मुलानं कोणाच्या भरोशावर जगायचं. आपल्याला येणाऱ्या प्रत्येक संकटाला तोंड द्यावंच लागेल.

सासूचं ऑपरेशन असल्यामुळं बायको एक महिन्यापासूनच माहेरी होती. सासूचं ऑपरेशन झाल्यावर सासूला पाहायला जायचं होतं म्हणून मी सासरवाडीला गेलो. मुलगा कदाचित पॉझिटिव्ह नसेल, पण आईचं दूध पितो व त्यातून तो कदाचित पॉझिटिव्ह होऊ शकतो. म्हणून मी बायकोला शपथ घातली, ''तू माझ्या बाळाला दूध पाजणं बंद कर.''

दूध बंद का करायचं असं मला सगळेजण विचारू लागले. मला रडू आवरणं अवघड जात होतं. मी काहीही न सांगता शांत बसलो.

बायकोला सांगितलं मला चांगल्या कंपनीत नोकरी लागलीय. त्याकरता फॅमिलीचा ब्लड ग्रुप हवाय म्हणून आपण तुझा रक्तगट तपासायचाय अशा बहाण्याने तिची एचआयव्हीची तपासणी केली. ती निगेटिव्ह आली. तेव्हा मला थोडा धीर आला. मी बायकोला घेऊन घरी आलो, पण तिला काहीच सांगितलं नाही.

सांगायचं कसं हा प्रश्न पडला तेव्हा मी एमएसएम प्रोजेक्टवर काम करणाऱ्या प्रोजेक्ट मॅनेजर यांना घरी घेऊन गेलो व त्यांच्याकडून बायकोला सांगितलं, की मी एचआयव्ही पॉझिटिव्ह आहे. तिला खूप दु:ख झालं, पण तरी तिनं माझ्यासोबतच राहायचं ठरवलं.

जेव्हा कोणी एमएसएम व्यक्ती एचआयव्ही पॉझिटिव्ह होतात तेव्हा आपण एचआयव्ही पॉझिटिव्ह आहोत हे इतरांपासून लपवून ठेवतात. त्यातील अनेकजण व्यसनाच्या आहारी जातात व मृत्यूला आमंत्रण देतात. मी तसं केलं नाही. मला ज्यावेळेस कळालं, की मी एचआयव्ही पॉझिटिव्ह आहे, तेव्हापासून मी एनजीओशी जॉइन झालो. मी एनजीओमार्फत इतर एमएसएम लोकांना सांगितलं, की मी जी चूक केली आहे ती तुम्ही करू नका. तुम्ही वेळीच जागे व्हा. प्रत्येक संबंधाच्यावेळी निरोध वापरा. जे एचआयव्ही पॉझिटिव्ह लोक आहेत त्यांचे वेगवेगळे गट तयार केले व त्या गटांना मी मागील पाच ते सहा वर्षांपासून स्वत:ची तब्येत कशी सांभाळतोय याबद्दल माहिती देत आहे. या कामात आमच्या संस्थेतील सर्वच लोक मला खूप मदत करतात.

*****

## विद्यासक्त (पुणे)

आज मी चोवीस वर्षांचा झालो आहे. मी हातात लेखणी घेतली आणि माझ्या आतापर्यंतच्या प्रवासाबद्दल लिहायला सुरुवात केली तेव्हा मला अनेक गोष्टींचं आश्चर्य पुन्हा पुन्हा वाटत होतं. मी सध्या ज्या ठिकाणी, ज्या अवस्थेत आहे त्याची मी काही वर्षांपूर्वी कल्पनाही करू शकत नव्हतो. एकटेपणानं घेरलेल्या माझ्या आयुष्यात कधी मित्रमैत्रिणी, आप्तेष्ट, माझ्या वेगळं असण्याची आणि त्याची मुक्त अभिव्यक्ती करण्याची मोकळीक माझ्यासुद्धा आयुष्यात येऊ शकेल याची कल्पनाही मी कधी केली नव्हती.

मी एक नुकताच गद्देपंचविशीत पोहोचलेला, ब्राह्मण आणि तेही पुरोहित/भटजी असणाऱ्या ब्राह्मणाच्या घरात वाढलो. लहानपण अगदी सामान्य गेलं. अगदी सुरुवातीला मी हुशार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होतो. नाटकं, नकला, खेळ, इ.मध्येही माझा सहभाग असे. माझ्या बालपणापासून, मला वाचनाचा प्रचंड नाद होता.

२री-३रीनंतर सगळी हुशारी न जाणे कुठे पळून गेली. या काळात नक्की काय झालं, ज्याच्यामुळे माझा शिक्षण आणि इतर गोष्टींमधला रस कमी झाला, हे मला आठवत नाही. जरी माझं शिक्षणासंदर्भात वाचन आणि अभ्यास हे कमी होत चाललं होतं तरीही, मी अवांतर वाचन करतच होतो. नव्याने आमच्या घरी टीव्ही आला होता, ज्याने आणि पुस्तकांनी मला चष्म्याचा प्रसाद दिला. चौथीच्या सहामाही परीक्षेनंतर मी शाळेत गेलो ते चष्मा घालूनच. मी वर्गात पहिलाच चष्मावाला असल्यानं आणि तसा बऱ्याच लवकर चष्मा लागल्यानं मला वेगळं असल्याची भावना पहिल्यांदा चष्म्यानं दिली. जीवनाकडे चष्म्यातून पाहण्याची दृष्टी मला माझ्या आसपासच्या गोष्टी वेगळ्या रूपात दाखवण्यासाठी मदत करत होती. तशीच ती मला खास कष्ट करून

सांभाळावीही लागत होती आणि चष्मावाला असल्याचं वेगळेपण मला सतत बाळगावं लागत होतं.

मी सर्वसाधारण मुलांसारखाच आपल्या घरच्यांचा मार खात आपल्या आयुष्याची मला पाहिजे तशी शाळा करत होतो. मी जरा जास्तच प्रोटेक्शनमध्ये वाढलो आहे. त्याचा एक परिणाम म्हणून मी आणि माझं वाचन, याबाहेर फारसा पडत नसे. मला माझ्या आसपास माझ्या बरोबरीने खेळण्यासाठी अशी मुलं फारच कमी होती आणि जी होती ती माझ्या संपर्कात जास्त येऊ शकत नसत, कारण त्यांची जात आणि वर्ग येथे आडवा येई. त्यांच्याबरोबर खेळल्यास मी त्यांच्यासारखाच बिघडेन असं माझ्या घरच्यांचं म्हणणं असे. पण माझ्याबरोबर खेळण्यासाठी मुली मात्र सहज यायच्या. कारण, त्या मराठा आणि ब्राह्मण असत, ज्या माझ्या घरच्यांना त्यांच्या जातीच्या आणि वर्गाच्या हिशेबात बसणाऱ्या वाटत. मी त्यांच्यामध्येच, त्यांच्या खेळांमध्ये रमत असे. जेव्हा तिसरी दरम्यान माझ्या आसपासच्या मुलांची आणि तेही माझ्या जात, वर्गातल्या मुलांची संख्या वाढली तेव्हा मी त्यांच्यात मिसळण्याचे काही प्रयत्न करून पाहिले, पण मला त्यांच्याशी जुळवून घेणं शक्य झालं नाही, त्यामुळे एकतर मुलींशी खेळणं किंवा घरातच बसणं असे दोनच पर्याय मला उरले होते. मी घरातच बसणं पसंत केलं. पुढेही मी माझ्या आयुष्याचा जास्त वेळ माझ्या खोलीमध्येच घालवला. अगदी शेवटी शेवटी म्हणजे आत्ता गेल्या तीन वर्षांमध्ये परिस्थिती पालटली आहे.

चौथीच्या वार्षिक परीक्षेच्या नंतर माझ्या आयुष्यातला पहिला शारीरिक संबंध मला अनुभवावा लागला. माझ्याच शेजारी असणारा एक माझ्यापेक्षा वयाने ५-६ वर्षं मोठा मुलगा मला एकदा असंच खेळत खेळत एका बांधकाम चाललेल्या बंगल्यात घेऊन गेला आणि तिथं त्यानं त्याच्या लिंगाशी मला खेळ करावयास लावला. मला तेव्हा काहीच कळलं नाही, पण पुन्हा पुन्हा त्यानं तेच करणं चालू ठेवलं. एकदा

त्यानं माझ्याशी व्यवस्थित सलगी प्रस्थापित करून गुदमैथुन केलं. जे झालं त्याबद्दल त्यानं मला कुणाशीही न बोलण्याबाबत सक्त ताकीद दिली. त्यामुळे मी त्याबद्दल कोणाशीही बोललो नाही आणि ही घटना मी माझ्या मनात खोलवर पुरून टाकली. या काळात मी या घडलेल्या गोष्टींचा कुठल्याही प्रकारे काहीही विचार करत होतो असं मला आठवत नाही. त्यानेही पुन्हा माझ्याशी संपर्क न ठेवल्यानं आणि कालांतराने तो दुसऱ्या जागी राहावयास गेल्यानं ही घटना आणि त्याचा लाक्षणिक परिणाम संपल्यासारखा झाला. पण ही गोष्ट माझ्या मनात अनेक वर्षं घर करून आहे आणि मला तो मुलगा दिसला, की अजूनही सगळ्या गोष्टी आठवतात. त्यावेळी झालेल्या शारीरिक वेदनांचा अपवाद सोडता, काहीच विशेष वाटल्याचं आठवत नाही. त्यावेळेला शारीरिक सुखाच्या कल्पनांचा मला काहीच मागमूस नव्हता. परंतु आज जेव्हा मी या सगळ्या घटनांचा विचार करतो तेव्हा या घटना माझ्यावर फार मोठा परिणाम करून गेलेल्या आहेत, याची खात्री पटते. या प्रसंगामुळे मला मुलांबाबत एक प्रकारची भीती, असुरक्षितता निर्माण झाली. माझ्यामध्ये आणि माझ्याबरोबरच्या मुलांमध्ये एक दरी निर्माण झाली. ही दरी मला पुढे खूप प्रयत्न करून बुजवावी लागली.

मी १३-१४ वर्षांचा झाल्यावर मुलींकडे मानसिक पातळीवर आणि मुलांकडे शारीरिक पातळीवर असे दोन्हीकडे आकर्षित होत असल्याचं मला चांगलंच आठवतं. यानंतरचा पुढचा दोन वर्षांचा काळ मला मोठा गोंधळाचा वाटला. या काळात मी एका मुलीला तिच्या चित्रकलेवर भाळून जाऊन प्रेमपत्र लिहिल्याचेही प्रसंग आहेत आणि त्याच पुढच्या सहा महिन्यात मी माझ्याच वयाच्या एका पुरुष नातेवाइकाबरोबर लैंगिक संबंध प्रस्थापित केल्याचंही आठवतं.

माझ्या वर्गातील माझ्या वयाची मुलं जेव्हा मुलींबाबत आणि त्यांच्या लैंगिक कल्पनांबद्दल बोलत तेव्हा मला खूपच वेगळं असल्याची जाणीव होत असे. मला मुलींबाबत लैंगिक विचार नव्हते आणि

मुलांबद्दलच्या लैंगिक विचारांमध्ये वेदना आठवायची. त्यामुळे मुलांबरोबरच्या लैंगिक विचारांना मी त्रासदायक समजत होतो. याच काळामध्ये माझा लिंगभाव (जेंडर आयडेंटिटि) यामध्ये गोंधळ होता. मला मी मुलगा आहे, की मुलगी यात जसा भ्रम होता तसंच मी नक्की कोणाकडे आकर्षित होत आहे यातही गोंधळ होताच. माझ्या आयुष्यात घडणारे अनेक प्रसंग, अनेक गोष्टी मला मुलगी म्हणून दाखवत, ज्यामध्ये माझा आवाज, माझं वागणं, बोलणं हे मुलींसारखं होतं. मला अनेकदा माझ्या आवाजामुळे वर्गातील सर्वजण चिडवत असत. माझ्या ब्राह्मणी स्पष्ट आणि मुलींसारख्या सौम्य आवाजामुळे मी शालेय जीवनामध्ये कायम चेष्टेचा विषय राहिलो. तसेच, याच काळात मी लैंगिकतेशी सामोरा जात होतो आणि लैंगिक कृतींमध्ये पुरुष काय करतात आणि स्त्रिया काय करतात याच्यासारख्या अनेक गोष्टी माझ्या मनात गोंधळ निर्माण करत होत्या. एका मुलाने माझ्याबरोबर लैंगिक चाळे केले म्हणून, मी नक्की कोण आहे? अशा प्रकारचे प्रश्न मला सतत पडत होते, ज्यांची उत्तरं मला सापडत नव्हती.

अगदी लहानपणापासून मी वाचनात गुंतलेलो असल्याचं आधी लिहिलंच आहे. त्यात मी तत्त्वज्ञानावर जास्त वाचण्यास सुरुवात केल्याचं मला नक्की आठवतं. मी तिसरीत असताना मला श्री कलावती आईंच्या पुस्तकांशी आणि मुख्यत: त्यांच्या चरित्राशी भेट झाली. त्यातूनच मला अध्यात्माच्या क्षेत्रात असणाऱ्या तथाकथित संतांच्या चरित्रांचीही ओळख झाली. कुमार वयाकडे येता माझ्या वाचनात रजनीश, श्री. जे. कृष्णमूर्ती, जॉन दवे, स्वामी विवेकानंद, निर्मला माता, फ्रेडरिक नित्शे आणि इतर असे अनेक आले.

दहावी झाल्यानंतर मी कला शाखेला प्रवेश घेणं निश्चित केलं होतं. परंतु नातेवाइकांकडून आणि घरच्यांकडूनही माझ्या कला शाखेला प्रवेश घेण्याला मोठ्या प्रमाणावर विरोध झाला. मी माझी उतू चाललेली अक्कल विज्ञान शाखेला प्रवेश घेऊन अजून उतू घालवावी असाच

सर्वांचा विचार होता. मी नाइलाजाने शास्त्र शाखेला प्रवेश घेतला.

दहावी झाल्यापासून मी ज्योतिषाचा अभ्यासही सुरू केला. ते शिकण्यासाठी माझ्या घरच्यांकडून खासकरून वडिलांकडून माझ्यावर प्रचंड दबाव होता. ''निदान भिक्षुकी नाहीतर काहीतरी दुसरे म्हणजे ज्योतिष तरी शिकून ठेव. पाहिजे तर तुझे शिक्षण चालू ठेव, पण त्याचबरोबर ज्योतिषही शिक.'' असा सतत मारा माझ्यावर होत होता. शेवटी दहावीची परीक्षा संपल्यावर मी ज्योतिष शिकण्यास आरंभ केला. मला माझ्या आयुष्यात घडणाऱ्या घटनांचा अर्थ लावण्याव्यतिरिक्त ज्योतिष माझ्या हातात काही पैसासुद्धा देणार होतं. या दोन्हीं कारणांनी मी ज्योतिष शिकण्यास सुरुवात केली. मी पहिल्यापासून के. कृष्णमूर्ती पद्धतीप्रमाणे शिकण्यास सुरुवात केली. कृष्णमूर्ती पद्धती ही एक ज्योतिषातील पद्धत आहे. चेन्नईचे के. कृष्णमूर्ती यांनी तिचा शोध लावला. ही पद्धत अचूक भविष्य वर्तवण्यासाठी म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु त्याचबरोबर अतिशय किचकट अशी गणितं आणि तार्किक समीकरणं पार करत उत्तरापर्यंत पोहोचावं लागतं. के. कृष्णमूर्ती यांनी लिहिलेली इंग्रजी पुस्तकं मिळवली. बारावी अखेरपर्यंत मी संपूर्ण कुंडली मांडणं शिकलो. मानवी मनाचा आणि त्याच्या अथांगतेचा मानवी आयुष्याच्या संदर्भात ज्योतिषाने केलेला विचार मला खूप महत्त्वाचा वाटला. पण मला साजेशी, पटणारी उत्तरे ज्योतिष्याने, ज्योतिषशास्त्राने दिली नाहीत. तसेच ज्योतिषाचा मार्ग तितकासा विश्वासार्हही वाटला नाही. या सगळ्या प्रयत्नांत मी माझ्या बारावी शास्त्र परीक्षेला आणि तिच्या अभ्यासाला मुकलो. मी बारावीत नापास झालो.

मला कला शाखेला जाणं खूप महत्त्वाचं वाटत होतं आणि शेवटी खूप भांडणं, वादावादी आणि रुसवेफुगवे यानंतर मी पुन्हा एकदा बारावी कला शाखेला प्रवेश घेतला. यावेळी माझ्याकडेही वाटाघाटी करण्यासाठी संसाधने होती. दहावीनंतर सुरू केलेल्या ज्योतिषाच्या अभ्यासाचे रूपांतर आता व्यवसायात झालेलं होतं. मी मधल्या काळात

डीटीपी शिकलो आणि भटजीचे कामही वडिलांबरोबर करत होतो. माझ्या व्यवसायाच्या प्रगतीच्या आणि माझ्या ज्योतिषातल्या अभ्यासाच्या जोरावर घरच्यांना संगणक घेण्यास भाग पाडलं. ज्योतिषामुळे संगणक आला, इंटरनेट आलं. गाडी आणि मोबाइल आला.

याच दरम्यान माझ्या आयुष्यात एक मित्र आला ज्याला मी येथे 'क्ष' असंच संबोधणार आहे. मला माझं गाव आणि जवळचं मोठं शहर हे व्यवस्थित माहिती नसल्यानं मी 'क्ष'ला सतत बरोबर घेऊन फिरायचो. अकरावी आणि बारावीपर्यंत आम्ही एकाच कॉलेजला पण वेगवेगळ्या शाखांमध्ये होतो. आम्ही खूप वेळ एकमेकांशी एकमेकांच्या आयुष्याच्या स्वप्नांवर फालतू खयाली पुलाव पकवण्यात घालवत असू. आम्ही कायम बरोबर असल्यानं माझी बहीण आम्हाला गर्लफ्रेंड, बॉयफ्रेंड चिडवत असे. मला त्याचं खूप विशेष वाटे. आमच्यामध्ये खूप भावनिक गुंतागुंतीचं नातं निर्माण झालं होतं. माझ्या आयुष्यातला तो पहिला मुलगा ज्यावर मी माझ्या कळत्या वयात आल्यावर प्रेम केलं. पण आमच्यात लैंगिक स्तरावर कधीच काही झालं नाही. या कळात मी 'क्ष'ला माझ्या 'वेगळे'पणाची कल्पना द्यायचे अनेक प्रयत्न केले; परंतु ते निष्फळ ठरले. शेवटी मी एका पीडीएफ फाईलमध्ये मराठीमध्ये माझे सर्व विचार मांडले आणि त्याला ती फाईल दिली. त्यानं अगदी उत्सुकतेनं त्याच रात्री ती वाचली व तेथेच त्याचे माझे सगळे संबंध संपले. तो पहिला माझ्या आयुष्यात आलेला मुलगा होता, ज्याला मी माझ्या वेगळेपणाची कल्पना दिली होती. त्याचं माझ्याशी असं वागणं मला अगदीच अनाकलनीय होतं. तोपर्यंत मला माहीत असलेला 'क्ष' एकदम असा कसा वागू शकतो? हेच मला कळत नव्हतं. त्यानंतर मी त्याच्याशी संपर्क करण्याचा अनेकदा प्रयत्न केला, पण सर्व प्रयत्न निरर्थक ठरले. त्याने एक दिवस मला बोलावून माझ्या भवितव्याविषयी आणि माझ्या मर्यादित विचारविश्वाबाबत मोठं भाषण दिलं, पण त्या

पत्राबाबत तो काहीही बोलला नाही. मला ते भाषण खूप लागलं व मी मध्येच त्याचा मुद्दा तोडला व निघून गेलो.

जवळजवळ ४-४॥ वर्षं त्याच्याबरोबर एकत्र काढल्यानंतर मला एकट्याला कशातच मन लागेना. का त्यानं असं केलं असेल? माझ्यातलं वेगळेपण काय आहे? असं नक्की काय कारण असावं जेणेकरून मला एवढा त्रास होतो आहे ते वेगळेपण जगताना? असा त्रास आधी कोणाला झाला असेल का? असे अनेक प्रश्न मला भेडसावत होते.

आतापर्यंत टी.वाय. संपत आलं होतं. 'क्ष'ने इतरांना सांगितल्यामुळे माझी जुनी मित्रमंडळी आता मला काहीही उपयोगाची नव्हती. त्यातला फक्त एकच जण मला मी जो काही 'वेगळा' आहे त्याच्यासकट स्वीकारण्यास तयार होता. मी नव्याने माझ्या सर्व नात्यांची पुनर्रचना केली. नवीन मित्र शोधू लागलो. आता मला खरंतर पुढच्या शिक्षणाचा विचार निश्चित करावयाचा होता. मी शिक्षण, माझं भवितव्य या सगळ्या गोष्टी अशा वाऱ्यावर सोडून देऊन चालणार नव्हतं. पण या सर्व गोष्टींच्या ताणाने माझ्यावर भयंकर परिणाम झाला आणि मी पूर्णपणे डिप्रेशनमध्ये गेलो. ग्रॅज्युएशनचे शेवटचे सहा महिने आणि त्या पुढचा एक वर्षाचा काळ माझ्यासाठी मोठा कठीण गेला. मला हाय ब्लडप्रेशरचा त्रास याच काळात सुरू झाला. या सगळ्याचा परिणाम म्हणजे, कला शाखेतील आवडत्या विषयांच्या परीक्षासुद्धा मला खूप अवघड गेल्या. मी एका विषयात नापास झालो. पुन्हा मला त्याच वर्गात एक वर्ष आणखी काढावं लागणार होतं. मग त्या वर्षात आणखी काहीतरी नवीन करायचं ठरवलं आणि संस्कृत विषयाचा एक वर्षाचा डिप्लोमा पूर्ण केला.

२००८ ते २०१० या वर्षांमध्ये मी मोठ्या प्रमाणात मानसिक आणि शारीरिक समस्यांना तोंड देत होतो आणि मानसोपचारतज्ज्ञाकडून उपचारही घेत होतो. माझ्या मानसिक आजारांवर म्हणजेच

स्कित्झोफ्रेनिया आणि सिव्हिअर डिप्रेशनसाठी दिलेल्या औषधांचा असह्य दुष्परिणाम माझ्यावर होत होता. त्याचप्रमाणे, २०१०च्या शेवटी शेवटी माझ्या मानसोपचारतज्ज्ञाशी चर्चा करून मी त्याचे उपचार थांबवून माझे स्वत:चे असे उपचार सुरू केले, ज्याला तोही अधूनमधून मदत करणार होताच. मी माझ्या स्वत:च्या वागणुकीवर बारीक लक्ष ठेवून त्यामध्ये मला त्रासदायक ठरणारे घटक काढून टाकणार होतो. स्वत:च्या वागणुकीचे सततचे निरीक्षण मला कायम उपयोगी पडत गेलं आणि पुन्हा पुन्हा माझी वागणूक सुधारत राहिलो. आसपासच्या कोणत्या लोकांच्या कोणत्या वागण्यामुळे मला त्रास होत आहे याची एक यादी बनवली. याच्या साहाय्याने मी असा एक दिनक्रम ठरवला, ज्यात मी माझ्या वर्तनाच्या समस्या आणि माझ्या आसपासच्या लोकांच्या त्रासिक वागण्यामधून बाहेर पडू शकेन.

माझ्या आजारांचा मी अभ्यास केल्यावर माझ्या लक्षात आलं, की माझे सर्व आजार हे प्रथम मानसिक पातळीवर तयार होऊन नंतर शारीरिक पातळीवर मला त्रास देत आहेत. हाय ब्लडप्रेशर, डिप्रेशन, स्कित्झोफ्रेनिया इ. सगळी माझ्या मानसिक आंदोलनांनी निर्माण केलेली आजारांची जंत्री आहे.

ग्रॅज्युएशननंतर, मी विद्यापीठातल्या स्त्री-अभ्यास केंद्रात एम.ए. जेंडर कोर्ससाठी अर्ज दिला. तिथे मला एम.ए.ला प्रवेश न मिळता डिप्लोमाला मिळाला. प्रवेश परीक्षेदरम्यानच्या इंटरव्ह्यूमध्येच मी, 'मला गे आणि लेस्बियन्स यांच्यावर काम करायचे आहे' असं सांगितलं. मी निवडलो गेलो आणि डिप्लोमाला सुरुवात झाली.

विद्यापीठात पहिल्या दिवसापासूनच मी माझ्या विषयावर वाचायला, बोलायला सुरुवात केली. स्त्री-अभ्यासाचे अनेक तास लिंगभाव आणि आपलं आयुष्य यावर चर्चा करण्यात संपत असत. तिथे सर्वच माणसं मुळातच लिंगभाव, लैंगिकता, जात, वंश, वर्ण, वर्ग

इत्यादींवर सतत काम करणारी असल्यानं, त्या त्या प्रकारच्या चळवळींशी निगडित असल्यानं त्यांना सर्व प्रकारच्या विचारप्रणालींशी एक प्रकारची सहजता आहे. तिथं खऱ्या अर्थानं मी स्त्रीवाद आणि लैंगिक हक्कांच्या चळवळीविषयी आणखी जास्त जाणून घेण्यास सुरुवात केली आणि स्त्रियांची, दलितांची आणि इतर तत्सम समाजात बाजूला ठेवलेल्यांची आयुष्यं ही एकाच पुरुषीसत्तेच्या नियंत्रणात ठेवली जातात हे उमगलं. जेंडर या भानगडीची जडणघडण मुळातच कशी श्रेणीबद्ध केली जाते हे समजलं. जेव्हा माझ्यासारखे लैंगिक अल्पसंख्याक आपल्या हक्कांसाठी आवाज उठवतात तेव्हा खरे हादरे त्या पुरुषसत्तेला बसतात हेही तिथेच ध्यानात आलं.

विद्यापीठाच्या केंद्रानं मला पूर्णपणे माझ्या वेगळेपणासहित स्वीकारलं. मला याचं कायम विशेष कौतुक वाटत राहातं, कारण प्राध्यापकांनी आणि विद्यार्थ्यांनी मला माझ्या वेगळेपणासकट स्वीकारणं हे समजून घेता येतं, पण कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा अभ्यास विषयाशी आणि त्याच्याभोवती होणाऱ्या चर्चांशी तसा संबंध नसतो असा माझा समज चुकीचा ठरला. गे, लेस्बियनसारख्या विषयांवर आधी कधीही न बोललेल्या कार्यालयात काम करणाऱ्या बायकांनी मला एक दिवस रिकाम्या वेळात गाठून माझ्याशी चर्चा केली. त्यामागे त्यांचं गे या लोकांबाबतचं कुतूहल नसून त्यांची माझ्याविषयी असलेली काळजी आणि प्रेम होतं.

विद्यापीठात शिकताना विविध सामाजिक संस्थांमध्ये जे लैंगिकतेविषयक कार्यक्रम आयोजित केले गेले ते माझ्यासाठी पर्वणीच होते. स्त्री-अभ्यास केंद्र, समाजशास्त्र हे विद्यापीठातील विभाग, 'समपथिक' (पुणे), 'संगमा' (बेंगलोर) अशा संस्था माझ्या आयुष्यात बरंच काही देऊन गेल्या आहेत.

या सर्व प्रवासात मला आधार मिळाला तो फक्त माझ्या

मित्रांचा. घरच्यांची मदत पैसे आणि राहायला छत यापलीकडे कुठल्याही प्रकारे झाली नाही. माझ्या वडिलांचं आणि माझं कधीच पटलं नाही. त्यांचं वागणं मला कायम अगदी लहानपणापासून खटकत राहिलं आहे. माझ्यासारखे 'वेगळे' माझे जवळचे मित्र इमरान व अनुज आणि माझ्यासारख्या नसणाऱ्या पण मला समजून घेणाऱ्या प्रभू, जयंती व मदन या माणसांच्या जोरावर मी उभा आहे.

मी ग्रॅज्युएशनच्या दुसऱ्या वर्षाला असताना मला अनुज भेटला. मला लैंगिक पातळीवर जरी नसलं तरी भावनिक पातळीवर अनुजचं नातं खूप काही देऊन गेलं. ग्रॅज्युएशनच्या शेवटच्या वर्षी म्हणजेच २००८ला इमरान भेटला. इमरान आणि मी गप्पा मारायला म्हणून भेटलो आणि मग काय भेटतच राहिलो. अनुजसारखंच इमरानबरोबरही भावनिक पातळीवरच नातं राहिलं. मला 'गे कल्चर'ची ओळख इमरानकडून झाली. पुढे त्याचं इथलं शिक्षण पूर्ण झालं आणि तो माझं शहर सोडून परत मुंबईला गेला. त्याला अजूनही माझी आठवण आली, की तो माझ्याशी फोनवर संपर्क साधतो आणि तासन्तास बोलतो.

अनुज हा मूळचा ओरिसाचा आणि इमरान मुंबईचा असे दोघेही माझ्यापेक्षा बऱ्याच अंशी वेगळ्या विश्वातून आल्यामुळे आणि त्या दोघांनाही माझा सहवास आवडत असल्यानं मला त्यांच्याबरोबर राहून माझ्या वेगळेपणाची अभिव्यक्ती करता आली. या काळात माझं वागणं या दोन मित्रांबरोबर असताना वेगळं आणि इतर 'हेटरोसेक्शुअल' मित्रांबरोबर असताना वेगळं असं दोन प्रकारचं असे. त्यांच्या दोघांच्याबरोबर घालवलेला माझा काळ मला कायम लक्षात राहील.

त्यानंतर जे माझ्यासारखे वेगळे नव्हते, पण ज्यांनी माझं वेगळेपण स्वीकारलं, ते म्हणजे प्रभू व माझ्या तरुणपणातली एकुलती एक मैत्रीण जयंती आणि तिचा नवरा मदन. प्रभूची आणि माझी जेव्हा ओळख झाली तेव्हा तो नुकताच आपलं एमसीए संपवून शहरात नोकरी

करण्यासाठी आला होता. एकेकाळी मेंढरं हाकून शाळा शिकणारा प्रभू, आता सॉफ्टवेअर कंपनीमध्ये नोकरी करत होता. 'ऑर्कुट'वर आमची भेट झाली. आम्ही भेटलो तेव्हा तो, कवींचा एक ग्रुप चालवत होता. त्याला एक ऑनलाइन मासिक सुरू करायचं होतं आणि त्यासाठी एका डिझायनरची गरज होती म्हणून मी त्याला भेटलो. हळूहळू त्याला माझ्या नव्या विश्वाची ओळख करून दिली. तो गे आणि लेस्बियन हे शब्दच फक्त ऐकून होता. एका गे मुलाचा आपल्या आयुष्यात झालेला हा प्रवेश त्यानं स्वीकारण्यास वेळ घेतला. त्यानं मला सुरुवातीला डॉक्टरकडे नेऊन बरं करण्याचा प्रयत्न केला, पण त्याच डॉक्टरने त्यालाच गे आणि लेस्बियन असणं नैसर्गिक आहे आणि तीही आपल्यासारखीच माणसं आहेत हे सांगून, खऱ्या अर्थानं बरं केलं. तो माझ्या 'वेगळेपणाला' स्वीकारू लागला. अजूनही त्या स्वीकाराची प्रक्रिया चालूच आहे. त्यानं माझ्याविषयीचं प्रेम, आदर सोडलेला नाहीये.

माझी जयंतीशी ओळख झाली तेव्हा जयंती नुकतीच मदनच्या प्रेमात पडली होती. जयंती, मी आणि मदन खूप जवळचे मित्र बनलो. त्यांचे एकमेकांशी झालेले, आमचे एकमेकांशी झालेले तात्त्विक मतभेद, इत्यादी गोष्टी आम्ही सहजतेनं, प्रेमानं, सामंजस्यानं सोडवल्या आहेत; जी रक्ताची नातीही करत नाहीत. जयंतीचा जीवनसाथी मदननं सुरुवातीला मला अक्षरशः सहन केलं. त्याला लैंगिक हक्क या गोष्टीबाबत काहीच माहीत नव्हतं. गे, लेस्बियनसारखे तर फक्त शब्दच त्यानं ऐकले होते. एकदा जयंतीच्या अपरोक्ष तो मला भेटायला आला आणि आम्ही रात्री उशिरापर्यंत खूप वेळ गप्पा मारत राहिलो. तेव्हा त्याला मी एक माणूस म्हणून माहीत झालो. त्यानंतर मदन माझा चांगला मित्र झाला.

जयंतीचे आणि माझे विचार तसेच आमचा दोघांचाही लहानपणापासूनचा सारा प्रवास यात एक साम्य आम्हाला सापडतं, ते म्हणजे स्त्रीवादी तत्त्वज्ञान आणि त्यावर असलेला ठाम विश्वास. त्यातून खऱ्या अर्थानं आमची नाती दृढ झाली. दोघांच्या स्त्रीवादी तत्त्वज्ञानात

बरंच साम्य आहे. तिच्यासारखंच मला अगदी सुरुवातीपासूनच कुटुंबात असलेल्या सर्वच प्रकारच्या संसाधनांच्या वाटपाला काहीतरी राजकारणाचा वास असल्याचं जाणवत असे, पण मला ते कळायला खूप वेळ जावा लागला. प्रत्येक कुटुंबात सत्ता, अधिकार, पैसा, निर्णयक्षमता यांचं वाटप असमान असतं, किंबहुना त्या असमान वाटपावरच आदर्श कुटुंबाचं स्वप्न उभं राहातं, हे तेव्हापासून वाटे, फक्त त्याचा अर्थ मला आता कळतो.

२००८साली झालेलं माझ्या बहिणीचं लग्न मला बरंच काही शिकवून गेलं. दोन माणसांनी एकत्र राहाण्यासाठी समारंभ पाहिजेत, पण वास्तव असं आहे, की हे फक्त त्या दोन माणसांच्या जीवनाबद्दल नसून, ज्या कुटुंबातून ती माणसं येतात त्यांच्या संपत्तीच्या, त्यांच्या सामाजिक मानमरातबाच्या तकलादू संकल्पनांतून या प्रकारच्या समारंभांचा उदय होतो. मुलीच्या लग्नाच्या थाटामाटातून मुलीचा बाप हा त्याचा पुरुषार्थ सिद्ध करत असतो. वर हा आपल्या पुरुषत्वाच्या पुढच्या प्रवासासाठी एक हक्काचा गुलाम मिळवण्यासाठी प्रयत्नशील असतो म्हणून त्याचा समारंभ त्याला साजरा करणं आवश्यक वाटतं. भावनांच्या वेष्टनात गुंफलेलं हे अर्थ व राजकारणाचं कोडं विवाहाच्या मंचावर फार सुंदर रीतीने मला उलगडलं.

मी एक समलिंगी म्हणून जेव्हा प्रत्यक्ष माझ्या भावी जीवनाबाबत विचार करतो तेव्हा मला या माझ्या पूर्वायुष्यात झालेल्या घटनांची फार काळजीपूर्वक मांडणी उभी करावी लागते. मी समलिंगी आहे म्हणून मला या प्रस्थापित गोष्टींविषयी घृणा निर्माण झाली आहे असं नसून, माझं समलिंगी असणं मला एक नवी दृष्टी देतं, ज्यातून मी तटस्थपणे आसपासच्या माणसांच्या जीवनाकडे पाहू शकतो.

मी आयुष्याबद्दल काही प्रश्न विचारले आहेत, ज्यांची उत्तरं मला हवी आहेत. या पुस्तकाच्या निमित्तानं मला त्यांचा पुन्हा आढावा

घेण्याची संधी मिळाली आहे. वाचकही पुढे त्याचा विचार करून त्यांच्या आयुष्यात असे प्रश्न पडले का? आणि पडले असतील तर त्यांनी त्याची काय उत्तरं दिली यावर विचारमंथन केल्यास त्याचा त्यांना उपयोग होईल असं मला वाटतं. त्यातला पहिला विषय म्हणजे विवाह.

विवाहाची खरंच गरज आहे का? नात्यांना सतत नावं देत राहाण्याची? विवाह नक्की काय देतो? आयुष्यभरासाठी एका लैंगिक नात्याचं साजरीकरण एवढंच ना? पण का साजरा करायचा आहे तो? आणि समलिंगी विवाह? आपणही तेच करणार आहोत का? विवाह या प्रकाराला मला एकच पर्याय थोडासा बरा वाटतो. तो म्हणजे 'सिव्हिल युनियन्स'चा. कुटुंबात राहाणारी जोडी म्हणून कायद्यानं मान्यता मिळवणं. एवढंच, की या कुटुंबात जोडीदारांना समान अधिकार असतील. कोणालाही पारंपरिक जोडीदारांच्या कल्पनांप्रमाणे पती किंवा पत्नी म्हणून जास्तीचे अधिकार मिळणार नाहीत. जगातील काही देशांमध्ये असले कायदे अस्तित्वात आले आहेतही. या प्रकारच्या युनियन्समुळे आणि त्याने आणलेल्या नव्या कुटुंबाच्या व्याख्येने परंपरागत कुटुंबात मिळणारी सुरक्षितता मिळेलच, पण त्याने निर्माण केलेली बंधने येणार नाहीत.

दुसरा विषय म्हणजे अस्मितादर्शी हक्कांचे राजकारण. जेव्हा गे असा शब्द आपण उच्चारतो आणि त्याबाबत विचार करायला सुरुवात करतो तेव्हा आपल्या डोळ्यांसमोर मानवी हक्कांचा जाहीरनामा आणि तत्सम गोष्टी उभ्या राहतात. येथे मला हक्कांबाबत कोणतीही अडचण नाहीये. मला प्रश्न आहे, ते मिळवण्याच्या मार्गांशी. आपण घरच्यांसमोर, ज्यांना समाजाच्या अनेक प्रश्नांना तोंड द्यायचं असतं, त्यांना एकदम आपण वेगळे आहोत हे सांगून आणखी गोंधळात टाकतो. एकदमच घरच्यांच्या समोर उभं राहून मी तुमच्यापेक्षा खूपच वेगळा आहे आणि मला माझे हक्क पाहिजेत अशी सिंहगर्जना करण्यापेक्षा, मी हीच गोष्ट हळुवार व योग्य पद्धतीनं करू इच्छितो.

मला 'कमिंग आउट' ही गोष्ट वेगळ्या रीतीने करण्याची इच्छा आहे. माझ्या कुटुंबातल्या लोकांना कोणत्याही प्रकारची लैंगिक स्वातंत्र्याच्या विचारविश्वाची पूर्वपीठिका नसताना 'कमिंग आउट' मला योग्य वाटत नाही. 'कमिंग आउट'पूर्वी घरच्यांना गे असणे याबाबत आपण योग्य ती माहिती देणे मला आवश्यक वाटतं. तसंच, लैंगिकता ही इतर अनेक गोष्टींशी म्हणजेच जात, वर्ग, इत्यादींशी जोडलेली असल्याने इतर बाबींचा विचार करणं आवश्यक ठरतं असं मला वाटतं. त्यासाठी 'कमिंग आउट'विषयी केल्या गेलेल्या अनेक संशोधनांचा वापर करून मी एक कल्पना शोधून काढली, ती म्हणजे आधी आपल्या घरच्यांना आपल्या गे मित्रांना, कथा/पुस्तकांना भेटू द्यावं. या सगळ्यांशी त्यांची हळूहळू ओळख होऊ द्यावी. त्यांच्यामध्ये घरच्यांची भावनिक गुंतवणूक होऊ द्यावी. त्यासाठी आपल्या गे मित्रांना घरी आणावं, घरच्यांनी त्यांच्याबरोबर वेळ घालवावा. आपल्या घरच्यांना कळू द्यावं, की गे असणारी अनेक मुलं आपलं आयुष्य चांगलं जगत आहेत. आपल्या जीवनातल्या सर्व जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत आहेत. मग त्यांना हळूहळू आपोआपच आपल्या मुलाबाबत आणि त्याच्या मित्रांबाबत माहिती होईल. इथपर्यंत येईपर्यंत त्यांचीही मानसिक, भावनिक गुंतवणूक आपल्या मुलाबरोबरच त्याच्या मित्रांमध्ये, तसेच त्याच्या गे विश्वामध्येही झालेली असेल, जेणेकरून त्यांना गे विश्वाबद्दलची वाटणारी परकेपणाची भावना नाहीशी होऊन, त्यांना आपला मुलगा गे आहे हे स्वीकारणं अगदी सहज शक्य होईल.

*****

## परिशिष्ट अ - अधिक वाचन

- **लैंगिकतेचे विविध पैलू**

1. **मानवी लैंगिकता**- एक प्राथमिक ओळख
   लेखक : बिंदुमाधव खिरे

- **समलैंगिकता**

1. **इंद्रधनु**- समलैंगिकतेचे विविध रंग. लेखक : बिंदुमाधव खिरे
2. **पार्टनर**- लेखक : बिंदुमाधव खिरे
3. **मनाचिये गुंती**- समलिंगी मुलामुलींच्या पालकांच्या आत्मकथा
   संकलन : बिंदुमाधव खिरे
4. **Less Than Gay.**
   Published by: AIDS Bhedbhav Virodhi Andolan.
5. **Queer-** Despised Sexuality, Law and Social Change. Author: Arvind Narrain.
   Published by: Books for Change.
6. **Whistling in the Dark.**
   Edited by: Raj R. Rao & Dibyajyoti Sarma.
   Published by: Sage India.

## परिशिष्ट ब - समलिंगी समाजाबरोबर काम करणाऱ्या काही संस्था

### 1. Samapathik Trust (समपथिक ट्रस्ट, पुणे)

Address : 1004, Budhwar Peth,
Office No. 9, 3rd floor,
Rameshwar Market, Pune 411 002
Phone : (020) 6417 9112
Timings : Monday to Saturday. 10.00 AM to 6.00 PM.
Email : samapathik@hotmail.com
Helpline : 9763640480 (Mondays Only from 7PM to 8PM)
Facebook Page : Samapathik-Trust-Pune
Website : http://www.samapathiktrust.wordpress.com

### 2. The Humsafar Trust (द हमसफर ट्रस्ट, मुंबई)

Address : Manthan Plaza, 3rd floor,
Nehru Road, Vakola,
Santacruz (East), Mumbai- 400 055
Phone : (022) 26673800
Email : humsafar@vsnl.com
Website : http://www.humsafar.org

### 3(a). Niramaya Arogya Dham, Solapur (निरामय आरोग्य धाम, सोलापूर)

Address :15C, Gold fich Peth, Near Sarswati Book Depot.
Navi Peth, Solapur.
Phone : (0217) 2326205, (0217) 2326264
Email : bvkinikar@hotmail.com ,
kinikar.seema@yahoo.co.in
Website : http://www.nad.org.in

### 3(b). Dostana Sangh, Solapur (दोस्ताना संघ, सोलापूर)

Email : dostana696@gmail.com

## 4. Sarathi Trust (सारथी ट्रस्ट, नागपूर)

Address: 140, YMCA Premises,
Opp. Eternity Mall, M. G. road,
Civil Lines, Nagpur.
Phone : (0712) 2560376
Email : sarathitrust_2005@yahoo.co.in

## 5. Pravara Medical Trust's MSM TI, Malegaon

## (प्रवरा मेडिकल ट्रस्ट, एमएसएम हस्तक्षेप प्रकल्प, मालेगाव)

Address: Sanskar Apartment,Shop No.8,9,
Near Sujan Theatre, Old Agra Road,
Sangmeshwar, Malegaon-423203.
Phone : (02554) 236136
Email : muktanashikmsm@gmail.com

## 6. Prayatna Group, Pune


Facebook Page: QUEST-Prayatna

## 7. Umang Group, Mumbai (For Lesbians, Bisexual women and F to M's)

Facebook Page: Umang Lbt Persons

## 8. Gay bombay Group, Mumbai

Website: http://gaybombay.org



"माझे सर्व मित्र भिन्नलिंगी असल्यामुळे ते नेहमी मुलींबद्दल अश्लील वर्णनं करायचे, पण मला तसे काही वाटतच नव्हते. मला माझ्या लिंगाच्या व्यक्तींबद्दल आकर्षण जाणवत होते.

मी माझ्या या भावनांविषयी कोणाला बोलूही शकत नव्हतो. मित्रांपाशी बोलायचे म्हटले तर मनात भीती होती, की ते आपली टिंगल करतील. आईबाबांकडे बोलण्याचा प्रश्नच नव्हता.

मला सुरुवातीला वाटले, की मला एक रोग झाला आहे. त्यामुळे मी रोज सकाळी देवाला प्रार्थना करायचो,"देवा मला बरे कर". पण तेव्हा मला माहीत नव्हते, की जो रोग अथवा आजारच नाही, त्याला देव तरी काय करणार ?"

समपथिक ट्रस्ट, पुणे